म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३४८९

णि व्यवहार-
चक ग्रंथ-परीक्षणे

ग्रंथ-संवाद

REFBK-0025171

ा.शं.चौघुले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

4 JAN 1987

18 MAR 1987

27 MAY 1987

31 MAY 1987

7 JUL 1987

4 MAY 1988

11 NOV 1992

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

सप्रभ निबंध सं. संभो हा
३१८९
२५१७१
२१११९८९

ग्रंथ-संवाद

प्रा. विश्वनाथ शंकर चौघुले


REFBK-0025171

सजय
प्रकाशन, पुणे४

संजय प्रकाशन : दोनशे एक्याऐंशी

प्रकाशक :
अभय शं. भावे
संजय प्रकाशन
९१७/२२, फर्ग्युसन कॉलेज रोड
पुणे ४११ ००४.

प्रथमावृत्ती : १५ मार्च १९८६

© उषा वि. चौघुले

मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी

मुद्रक
प्रमोद वि. वापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.

मूल्य : पंचेचाळीस रुपये फक्त

कै. सौ. आई, गं. भा. मोठी आई, ती. आबा, आणि भाऊ

यांच्या

पावन स्मृतीस सादर समर्पण

ऋणनिर्देश

माझ्या ग्रंथपरीक्षणपर लेखनाची सुरुवात १९६३ साली 'दीपावली' मासिकात झाली. 'दीपावली' चे संपादक कै. दीनानाथ दलाल आणि 'ललित' चे संपादक कै. केशवराव कोठावळे या दोन ज्येष्ठ स्नेह्यांचे आज स्मरण होत आहे.

'दीपावली' नंतर 'लोकसत्ते'त बाळ देशपांडे, 'मराठा' मध्ये शिरीष पै, 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये दिनकर गांगल व भालचंद्र वैद्य, 'आलोचने'त वसंत दावतर यांच्या सहकार्याने वेळोवेळी परीक्षणे प्रसिद्ध झाली.

'ग्रंथ-संवाद' मधील बरीचशी ग्रंथपरीक्षणे 'मुंबई सकाळ' च्या रविवार आवृत्तीत प्रसिद्ध झाली आहेत. मर्यादित जागा असूनही माधव गडकरी यांनी विस्तृत परीक्षणे लिहिण्याची संधी दिली.

आकाशवाणीवरील पुस्तकपरिचयपर भाषणे प्रसारित होण्यात मंगेश पाडगावकर व रवींद्र पिंगे यांचे साहाय्य झाले आहे.

या पुस्तकाची संकल्पना आणि मांडणी यासंबंधीच्या चर्चेत गुरुवर्य प्रा.रा.भि. जोशी, डॉ. स. गं. मालशे व प्रा. रमेश तेंडुलकर यांचे मौलिक साहाय्य झाले आहे. माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य एन्. के. वेल्हेकर, सहकारी प्रा. सौ. अंजली सरदेसाई व ग्रंथपाल सौ. निर्मला गोखले यांच्या सहकार्याचाही उल्लेख केला पाहिजे. या ग्रंथाचे शीर्षक माझे स्नेही डॉ. विलास खोले यांनी सुचविले आहे.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या श्रीमती लतिका जोशी यांनी परीक्षणांची तारीखवार सूची तयार केली.

माझे ज्येष्ठ स्नेही प्राचार्य डॉ. हेमंत इनामदार यांनी या पुस्तकाच्या कल्पनेचा सतत पाठपुरावा केल्यामुळे हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. 'संजय प्रकाशना'चे अभय भावे यांनी पुस्तक प्रकाशनात मनापासून रस घेतला आणि मुद्रक श्री. प्रमोद वि. बापट यांनी सुबक छपाई केली.

'ग्रंथ–संवाद' सिद्ध होण्यासाठी सहकार्य देणाऱ्या वरील सर्वांचे मनःपूर्वक आभार !

१० 'आकाशदीप' सब्–वे
सांताक्रूझ (पश्चिम) मुंबई ४०००५४

वि. शं. चौघुले

लेखक-परिचय

जुन्या रत्नागिरी जिल्ह्यातील प्रभानवल्ली या गावी दि. २२ जानेवारी १९३७ रोजी प्रा. चौघुले यांचा जन्म झाला. मुंबईतील आर्यन हायस्कूल आणि सिद्धार्थ महाविद्यालय या संस्थांतून त्यांचे शिक्षण झाले. १९६२ मध्ये मुंबई विद्यापीठाची एम्. ए. पदवी त्यांनी संपादन केली.

श्रीरामपूर येथील बोरावके महाविद्यालय (१९६३ ते १९६६) आणि चिपळूणचे दातार महाविद्यालय (१९६७ ते १९६९) या संस्थांतून मराठीचे अध्यापन केल्यानंतर प्रा. चौघुले १९७० मध्ये विलेपार्ले (पूर्व) येथील एल्. जे. एन्. जे. महिला महाविद्यालयात मराठीचे विभागप्रमुख म्हणून रुजू झाले. सध्या त्याच संस्थेत ते काम करतात.

दीपावली, आलोचना, ललित, म. सा. पत्रिका व साधना ही नियतकालिके आणि मराठा, लोकसत्ता, मुंबई सकाळ व महाराष्ट्र टाइम्स या दैनिकांच्या रविवार आवृत्ती यामधून प्रा. चौघुले यांचे समीक्षा-लेख वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहेत.



अनुक्रमणिका

ग्रंथपरीक्षण– काही विचार / ९

कथा

'ख्याल'– चोरघडे यांच्या सर्जनशील सामर्थ्याचा प्रत्यय / २८

गोखले यांच्या प्रभावी दीर्घकथा
सोनार यांच्या लघुकथेचे सामर्थ्य } ३०

मानवी संबंधाची कथा – 'अनोळखी' / ३४
अडचणींतून स्वत:ची सुटका – 'प्रवासिनी' / ३७
ज्योत्स्नाबाईंच्या निवडक कथा / ३९
नव्या लेखक-कलावंतांचा 'आरंभ आणि अनुबंध' / ४३
माणसांच्या दुरावलेपणाची कथा – 'कवडसा' / ४७
करुण, गंभीर व नाटचपूर्ण अनुभवांची गुंफलेली 'माळ' / ५१
तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा / ५७
'पूर्वज'– गतकालीन व्यक्तींचा घेतलेला कलात्मक शोध / ६०
'दिवस सोनियाचे'– स्त्री–जीवनाच्या विविध समस्यांशी निगडित कथा / ६५

कादंबरी

चक्र – एक रसग्रहण / ७०
सय – नेहमीच्या वळणाची एक कादंबरी / ७५
एका स्पृश्याची डायरी – विशिष्ट जीवनदृष्टीचा कादंबरीवर प्रभाव / ७७
काचापाणी – एक असफल सामूहिक प्रयत्न / ८०
उभयान्वयी अव्यय – धीटपणाचे कौतुक नको / ८३
'स्फोट' आणि 'बहिष्कृत'– अरुण साधू यांनी हाताळलेले नवे विषय / ८७
'शापित' व 'देवाची घंटी'– वास्तवाचा आभास / ९०
मुक्या मुलीची बोलकी कहाणी – 'सुखदा' / ९२
'अकरा कोटी गॅलन पाणी'– खाण-कामगारांच्या जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण / ९६
'भाकरी आणि फूल'– कोकणातील दलित जीवनाचा शोध / ९९

आत्मकथन-आत्मचरित्र-चरित्र

अलिप्तपणे सांगितलेली 'वडिलांची कीर्ती' / १०६
सामान्य माणसाचे वेधक आत्मकथन – कैदी नं. ३१४६७ / ११०
चंदेरी दुनियेत – लीला चिटणीस / ११३
आत्मचिंतनपर – एक सर्वमंगल क्षिप्रा / ११८
एक सर्वमंगल क्षिप्रा (भाग २)– काहीसे समाधान, बरीचशी खंत / १२७
कॉ. डांगे यांच्या तुरुंगवासाची कहाणी – नरकपुरी गवसली / १३०
स्वानुभवाचा जिवंत प्रत्यय देणारे 'कसोटीचे क्षण' / १३२
सामान्य माणसाचे मनोरंजक आत्मकथन – 'उलगा-उलग' / १३७
प्रेरणादायी 'पहाडातील पाऊलवाटा' / १४०
शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक – 'एक लालित्यपूर्ण चरित्र / १४३

दलित साहित्य

पारंपरिक संकेत मोडणाऱ्या दोन कलात्मक दीर्घकथा / १५२
दलित अनुभूतीचा सहज आविष्कार – 'मुक्काम पोष्ट : देवाचे गोठणे' / १५५
अस्वस्थ करणारे आत्मनिवेदन – 'उपरा' / १५९
दलित कथेचे वेगळे रूप – 'पड' / १६३
'विटाळ'– दलितत्वाच्या मर्यादा ओलांडणाऱ्या कथा / १६५
दलित साहित्यात नवी भर – 'रस्ता' / १६९

व्यक्तिविशेष

काही क्षण शब्दांकित केलेली व्यक्तिचित्रे / १७४
हृदयस्पर्शी व्यक्तिचित्रण– वसंत बापटांचे 'जिकुनी मरणाला' / १७७
उत्कट भावबंध जोपासणाऱ्या दोन मित्रांची भावगाथा –
'खांडेकर : मित्र आणि माणूस' / १८०
'न पुसणारे ठसे'– वेधक व्यक्तिचित्र / १८५
रामकृष्ण आणि विवेकानंद– दोन अलौकिक व्यक्तिमत्त्वांचा शोध / १८८

ललित गद्य

'द्राक्ष आणि रुद्राक्ष' आल्हाददायक कौटुंबिक विनोदी लेखसंग्रह / १९४
रवींद्र पिंगे यांचे आनंददायी आनंदव्रत / १९८
साच्यात न बसणारे ललित लेख – 'शालजोडी' / २०१ व २०५
(वृत्तपत्रीय परीक्षण व आकाश-भाषित)



ग्रंथपरीक्षण : काही विचार

'ग्रंथ-संवाद' हे पुस्तक म्हणजे प्रामुख्याने गेल्या बारा वर्षांत 'महाराष्ट्र-टाइम्स', 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'मुंबई सकाळ', 'आलोचना' इत्यादी नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या लहानमोठ्या ग्रंथपरीक्षणांचा आणि आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून केलेल्या ग्रंथपरिचयपर भाषणांचा संग्रह आहे. प्रसंगोपात्त एक गरज म्हणून लिहिलेली ही ग्रंथपरीक्षणे आहेत. काही वेळा केवळ गरजच म्हणून नव्हे, तर नव्याने प्रसिद्ध झालेली पुस्तके अन्य कारणांमुळे मनात घोळत होती. 'चक्र,' 'उभयान्वयी अव्यय,' 'स्नेहांकिता' ही पुस्तके प्रकाशनाच्या वेळी गाजली होती. त्यांच्यावर लिहिण्याची संधी मात्र नंतर कारणपरत्वे मिळाली. या पुस्तकांची निवड निश्चित निकष लावून केलेली नाही. कारण ग्रंथपरीक्षणपर लेखन करताना पुस्तके आपल्या इच्छेप्रमाणे निवडण्याचे स्वातंत्र्य दर वेळी मिळतेच असे नाही. परीक्षणासाठी घेतलेल्या या पुस्तकांची गुणवत्ताही समान नाही. यांतील काही गाजलेली आहेत; काही लोकप्रिय लेखकांची आहेत; काही नवोदित लेखकांची आहेत; काही राजकारण, समाजकारण, शिक्षण, कला, प्रकाशन या क्षेत्रांतील व्यक्तींची आहेत. यांपैकी काही पुस्तके वाङ्मयगुणांनी युक्त आहेत; तर काही अन्य कारणांसाठी महत्त्वाची आहेत. उदाहरणार्थ, 'एक सर्वमंगल क्षिप्रा (भाग १)' हे पुस्तक अनुभवसमृद्धी व्यक्त करणारे आत्मनिवेदन म्हणून महत्त्वाचे आहे. गतकालात आपण ज्या पुस्तकांचा आस्वाद घेतला; ज्या पुस्तकांना ग्रंथ-परीक्षणाच्या माध्यमाद्वारे वाचकांच्या निकट नेण्याचा प्रयत्न केला; त्या आस्वाद-प्रक्रियेत इतरही रसिकांना सामावून घेता यावे, या भूमिकेतून 'ग्रंथ-संवाद' या ग्रंथपरीक्षणांच्या संग्रहाची सिद्धी झाली आहे.

ग्रंथपरीक्षण : एक गरज

आज मराठी वाङ्मयव्यवहाराचे स्वरूप खूप विस्तृत झाले आहे. वेगवेगळ्या

प्रकाशन संस्थांतर्फे प्रसिद्ध होणारी ललित आणि ललितेतर पुस्तके, अनेक ग्रंथ-सवलतीच्या योजना, बुकक्लब योजना, ग्रंथजत्रा, ग्रंथालयीन चळवळी, शासकीय अनुदानामुळे नवोदित लेखकांना आपल्या पुस्तकप्रकाशनाची मिळणारी संधी, 'ग्रंथाली' सारख्या वाचक चळवळीचे प्रयत्न, शिक्षणाचा शहरी आणि ग्रामीण विभागांत होणारा प्रसार व त्यातून होणारी वाचकांची वाढ इत्यादींमुळे ग्रंथनिर्मितीचे स्वरूप पूर्वीच्या मानाने खूपच व्यापक झाले आहे. समाजातल्या वेगवेगळ्या थरांतील नवा वाचकवर्ग निर्माण झाला आहे. तसेच शहरी आणि ग्रामीण भागांतील वाचकवर्गातही नव्याने भर पडत चालली आहे. जिल्हा व तालुका पातळीवरील छोटी छोटी साहित्यसंमेलने, वाचक मेळावे यांच्या आयोजनामुळे 'ग्रंथरुची' त वाढ होत आहे. वाढती ग्रंथनिर्मिती आणि वाढता वाचकवर्ग यांमुळे ग्रंथपरीक्षणपर लेखनाची अधिक आवश्यकता आहे. त्या दृष्टीने काही मोजकी दैनिके, साप्ताहिके, मासिके, त्रैमासिके व अन्य नियतकालिके जमेल तेवढ्या प्रमाणात ग्रंथपरीक्षणे प्रसिद्ध करीत आहेत. परंतु ते कामही पुरेशा प्रमाणात होत नाही. काही नियतकालिकांतून नवीन पुस्तकांची पोच व स्थूल ग्रंथपरिचय दिला जातो. काही नियतकालिके विस्तृत ग्रंथपरीक्षणे देण्याचा प्रयत्न करतात. याचा अर्थ मराठी वाचक ग्रंथपरीक्षण वाचून नंतर पुस्तक वाचायला प्रवृत्त होतो असा होत नाही. कारण प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांच्या मानाने ग्रंथपरीक्षणे अगदी अल्प प्रमाणात प्रसिद्ध होतात. दुसरे असे की, प्रथम ज्या पुस्तकाचे परीक्षण एखादा वाचक वाचतो, त्याला ते पुस्तक वाचायला मिळेलच अशी खात्री नसते. काही वेळा पुस्तक आधी वाचले जाते आणि परीक्षण वाचकाच्या हाती नंतर येते. या बाबतीत आणखी एक शक्यता असते. चोखंदळपणे केलेले एखादे ग्रंथपरीक्षण वाचनात आल्यामुळे वाचकाला ते नवीन पुस्तक वाचण्याची उत्सुकता निर्माण होते. ग्रंथालयासाठी पुस्तक निवडतानाही ग्रंथपालांना छोटेखानी का होईना, ग्रंथपरीक्षणाचा किंवा ग्रंथपरिचयाचा फायदाच होत असतो. 'ललित' सारख्या वाङ्मयीन मासिकाने घेतलेला वाचकांचा कौल या संदर्भात वेगळ्या अर्थाने महत्त्वाचा आणि दिशा देणारा ठरतो. 'ललित शिफारस' या सदरात केली जाणारी परीक्षणे जास्तीत जास्त वाचकांना आवडलेल्या पुस्तकांचीच असतात. नव्याने प्रसिद्ध झालेल्या चांगल्या पुस्तकांचा वाचकांना परिचय करून देणे, ही आजच्या विस्तृत नि व्यापक अशा वाङ्मयव्यवहारातील एक महत्त्वाची गरज आहे.

ग्रंथपरीक्षण आणि प्रस्तावना

ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर नियतकालिकांची मागणी म्हणून ग्रंथपरीक्षण केले जाते. ग्रंथाला असलेल्या प्रस्तावनेचे स्वरूप ग्रंथपरीक्षणाहून वेगळे असते. नवोदित

लेखकाला प्रस्थापित व लोकप्रिय लेखकाच्या आशीर्वादाची, पुरस्काराची वा पाठराखणीची आवश्यकता असते. नवोदित लेखकाला उत्तेजन देणे, त्याचे कौतुक करणे, त्याच्या पुस्तकाच्या वेगळेपणाचे मर्म सांगणे, भविष्यकाळातील त्याच्या लेखनसामर्थ्याविषयी अंदाज बांधणे इत्यादी हेतू प्रस्तावना-लेखनामागे असतात. वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, वा. ल. कुलकर्णी, पु. ल. देशपांडे यांनी अनेक नवोदित लेखकांच्या पुस्तकांना प्रस्तावना लिहून त्यांना उत्तेजन दिले आहे. कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' काव्यसंग्रहाला असलेली खांडेकरांची प्रस्तावना, विंदा करंदीकरांच्या 'स्वेदगंगा' या काव्यसंग्रहाला लाभलेली प्रा. अनंत काणेकरांची प्रस्तावना आणि मधु मंगेश कर्णिकांच्या 'कोकणी गवस्तीऽऽ' या पहिल्याच कथासंग्रहाला पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेली प्रस्तावना, यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. कधी कधी लेखकाला आपल्या पुस्तकाचा विषय आणि आपली लेखनविषयक भूमिका वाचकांसमोर मांडावीशी वाटते. प्रस्तावनेद्वारे हे काम त्याला करता येते. वि. स. खांडेकरांनी आपल्या सविस्तर प्रस्तावनांमधून आपली कादंबरी-लेखनविषयक भूमिका स्पष्ट केली आहे. ललित वाङ्मयीन स्वरूपाच्या ग्रंथालाच नव्हे, तर सैद्धान्तिक स्वरूपाच्या तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, सौंदर्यशास्त्र, भाषाशास्त्र अशा विषयांवरील ग्रंथांच्या प्रस्तावनांत लेखकांना आपली भूमिका विशद करता येते. काही वेळा प्रस्तावना त्या त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तीकडून लिहून घेतली जाते. महाराष्ट्रातील तज्ज्ञ अभ्यासकांच्या काही प्रस्तावना बऱ्याच गाजल्या आहेत. त्यांच्यामुळे वैचारिक मंथनही घडले आहे. महाराष्ट्रात विचारप्रवर्तक ठरलेल्या प्रस्तावनांचा उल्लेख करायला हवा. बा. सी. मर्ढेकरांच्या 'वाङ्मयीन महात्मता' या ग्रंथाला वामन मल्हारांची प्रस्तावना, प्रभाकर पाध्ये यांच्या 'कलेची क्षितिजे' ला मर्ढेकरांची प्रस्तावना, 'श्रीमान योगी' या रणजित देसाईंच्या कादंबरीला नरहर कुरुंदकरांची प्रस्तावना, 'महाभारत: एक सूडाचा प्रवास' या दाजी पणशीकरांच्या ग्रंथाला मिळालेली नरहर कुरुंदकरांची प्रस्तावना, 'एकच प्याला' या गडकऱ्यांच्या गाजलेल्या नाटकाचे शोकांतिका म्हणून मूल्यमापन करणारी श्री. के. क्षीरसागर यांची प्रस्तावना इत्यादी ग्रंथांची प्रस्तावना म्हणजे केवळ परिचय आणि मूल्यमापन नसते. नरहर कुरुंदकरांसारख्या साक्षेपी आणि व्यासंगी अभ्यासकांच्या प्रस्तावना म्हणजे विशिष्ट विषयाचा सर्व बाजूंनी साधकबाधकपणे केलेला विचार असतो. काही प्रस्तावनांत मूल्यमापनाप्रमाणेच आस्वादालाही महत्त्व असते. बा. ल. कुलकर्णी यांनी 'वाटचाल' सारख्या रा. भि. जोशी यांच्या प्रवासवर्णनाला किंवा मंगेश पाडगावकरांच्या 'जिप्सी' या काव्यसंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावना आस्वादक स्वरूपाच्या आहेत. ना. ग. गोरेंसारखा राजकारणाशी अधिक निगडित असलेला लेखकही रसपूर्ण प्रस्तावना

लिहिताना दिसतो. 'जिकुनी मरणाला' या वसंत बापटांच्या व्यक्तिरेखाटनांच्या संग्रहाला किंवा 'आणीबाणीतील पत्रे' या दंडवते दाम्पत्याच्या पत्रसंग्रहाला ना. ग. गोरे यांनी लिहिलेल्या प्रस्तावना सौंदर्यवादी वृत्तीच्या निदर्शक आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संपादित पुस्तकांची आवश्यकता असते. संपादित पुस्तकांच्या प्रस्तावना सामान्यपणे माहितीपर असतात. परंतु त्यांतही काही प्रस्तावना आस्वादक स्वरूपाच्या असून प्रस्तावनाकाराच्या व्यक्तिमत्त्वाचा आल्हादक विशेष घेऊन येतात. 'मृण्मयी' (इंदिरा संत) संपा.–रमेश तेंडुलकर; 'आदित्य' (मनमोहन) संपा.–शंकर वैद्य, 'रसयात्रा' (कुसुमाग्रज) संपा.–शंकर वैद्य हे संपादित कवितासंग्रह म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केवळ उपयुक्त ठरणारी पुस्तकेच नसून आस्वादक समीक्षेचे उत्तम नमुने आहेत. प्रस्तावनेत एका विशिष्ट अर्थी ग्रंथाचे परीक्षण केलेले असले तरी ते नियतकांलिकातील परीक्षणापेक्षा वेगळे असते; परीक्षणकर्त्याला दिशा देणारे ठरते.

ग्रंथपरीक्षणाचे स्वरूप आणि व्याप्ती

ग्रंथपरीक्षण अनेक पातळ्यांवरून केले जाते. 'सत्यकथा', 'आलोचना' यांसारख्या मासिकांतून एखाद्या ग्रंथाचा घेतला जाणारा विस्तृत परामर्श वाङ्मयाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरणारा असतो. ह्या नियतकालिकांतील परीक्षणात ग्रंथाचा सूक्ष्म अभ्यास केलेला असतो; ग्रंथाच्या गुणदोषाची सविस्तर चर्चा केलेली असते. 'साहित्यपत्रिका', 'प्रतिष्ठान', 'नवभारत', 'समाजप्रबोधन पत्रिका', 'अनुष्टुभ', 'सोबत', 'साधना', 'युगवाणी', 'अस्मितादर्श', 'दिनांक', 'लोकप्रभा' इ. नियतकालिकांतून बव्हंशी संक्षिप्त स्वरूपाची पण पुस्तकाच्या वाङ्मयीन गुणवत्तेकडे लक्ष वेधून घेणारी पुस्तक-परीक्षणे प्रसिद्ध होत असतात. 'पुस्तक पंढरी', 'साहित्यसूची', 'वाचनालय' ही वाङ्मयविषयक उपक्रमांची माहिती देणारी मासिके छोटी परिचयपर परीक्षणे प्रसिद्ध करीत असतात. याशिवाय परीक्षणपर लेखनाचा आणखी एक गट म्हणजे दैनिकांच्या रविवार आवृत्तीतून प्रसिद्ध होणारी ग्रंथपरीक्षणे. या परीक्षणांचे स्थूलमानाने पुढील दोन प्रकारांत विभाजन करता येईल.

(१) ग्रंथाचा केवळ संक्षिप्त असा परिचय देणे.

(२) ग्रंथपरिचयाबरोबरच पुस्तकातील वाङ्मयगुण, शैली इ. चे आस्वादप्रक्रियेच्या दृष्टीने स्वरूप विशद करणे आणि पुस्तक वाचण्यासाठी वाचकाच्या मनात उत्सुकता निर्माण करणे.

प्रस्तुत पुस्तकात आलेली बरीचशी ग्रंथपरीक्षणे दुसऱ्या प्रकारात मोडणारी आहेत. वर्तमानपत्री परीक्षणांना निदान आज तरी फारसे महत्त्व दिले जात नाही. किंबहुना, अशा परीक्षणपर लेखनाची उपेक्षाच केली जाते. वस्तुतः वर्तमानपत्री ग्रंथ-

परीक्षणही गांभीर्यपूर्वक, नेमकेपणाने आणि आस्वादक भूमिकेतून केले तर वाचकाला वाङ्मयीन जाण देणारे, त्याच्या अभिरुचीला वळण लावणारे ठरू शकते. वर्तमानपत्राच्या वाचकांची संख्या मासिके आणि साप्ताहिके वाचणारांच्या संख्येपेक्षा खूप मोठी असल्यामुळे ते परीक्षण जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचूही शकते. परीक्षणार्थ आलेल्या पुस्तकाचे स्वरूप, त्याचे महत्त्व आणि वर्तमानपत्रात उपलब्ध होणारी मर्यादित जागा यांचा परीक्षणकर्त्याला तारतम्याने विचार करावा लागतो. या पुस्तकातील चरित्र-आत्मचरित्र विभागातील परीक्षणांकडे या संदर्भात लक्ष वेधावेसे वाटते. 'एक सर्वमंगल क्षिप्रा (भाग १)' आणि 'शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक' या पुस्तकांचे सविस्तर परीक्षण केलेले दिसेल; तर 'नरकपुरी गवसली', 'पहाडातील पाऊलवाटा' व 'उलगाउलग' या आत्मचरित्रांचे परिचयात्मक परीक्षण केलेले आढळून येईल.

पुस्तकांच्या निवडीतील सर्वसमावेशकता

गाजलेल्या व लोकप्रिय लेखकांच्या पुस्तकांची परीक्षणे सामान्यतः नियतकालिकांतून प्रसिद्ध होतात. 'साहित्य अकादमी', 'महाराष्ट्र साहित्य परिषद', 'महाराष्ट्र शासन' यांच्यातर्फे ज्या ग्रंथांना पारितोषिके दिली जातात, त्यांच्यावर आवर्जून लिहिले जाते. ही पुस्तके दर्जेदार असतात आणि त्यांच्या परिचय, परामर्शाची आवश्यकता असते, यात संशय नाही. शिवाय नियतकालिकांकडे विविध प्रकाशन संस्थांतर्फे जी पुस्तके 'अभिप्रायार्थ भेट' म्हणून आलेली असतात त्यांवरही लिहिले जाते. मात्र अशा वेळी काही उल्लेख करण्याजोगी पुस्तके बाजूला पडतात. या पुस्तकांच्या परीक्षणांना कमी संधी मिळते. प्रस्तुत पुस्तकातील परीक्षणांमुळे काही दुर्लक्षित पुस्तकांचा परिचय होईल. काही वेळा लोकप्रिय लेखकाच्या किंवा कलावंताच्या एखाद्या पुस्तकावर विस्तृत चर्चा झालेली दिसते. उदा. जयवंत दळवींची 'चक्र' ही कादंबरी किंवा स्नेहप्रभा प्रधान यांचे 'स्नेहांकिता' हे आत्मनिवेदनपर पुस्तक. परंतु लोकप्रिय लेखकाच्या सर्वच पुस्तकांवर लिहिले जातेच असे नाही. उदा. : व. पु. काळे यांचे 'सांगे वडिलांची कीर्ती' आणि वसंत बापट यांचे 'जिकुनि मरणाला' या पुस्तकांची परीक्षणे प्रस्तुत संग्रहात आहेत. वाङ्मय व्यवहारात आणखीही एक गोष्ट घडत असते. काही व्यक्ती लेखक म्हणून महत्त्वाच्या नसल्या तरीही त्यांच्या लेखनाची दखल घेणे आवश्यक ठरते. प्रमिला संघवी आणि अनंतराव पाटील यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांत बरेच काम केले आहे. हरिभाऊ मोटे यांच्यासारख्या जिद्दी माणसाचे सिनेसृष्टी आणि प्रकाशन व्यवसायातील अनुभव मौलिक स्वरूपाचे आहेत. 'न पुसणारे ठसे' हे प्रमिला संघवींचे व्यक्तिरेखाटनपर पुस्तक आहे. 'पहाडातील पाऊलवाटा' हे पुस्तक प्राचार्य अनंतराव

पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव कथन करणारे पुस्तक आहे. प्रकाशक हरिभाऊ मोटे अनुभवसंपन्न जीवन जगले. वाङ्मय आणि चित्रपट या दोन क्षेत्रांतील त्यांचे 'एक सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मनिवेदनातील अनुभव अंतर्मुख करणारे आहेत. या पुस्तकांच्या परिचयाने वाचकांना वेगळ्या विश्वाचे दर्शन होईल. याशिवाय पोलिस महानिरीक्षक श्रीधर प्रधान यांचे आत्मचरित्र (कसोटीचे क्षण), सुप्रसिद्ध कम्युनिस्ट नेते श्रीपाद अमृत डांगे यांचे मीरत कटाच्या खटल्यानंतर कानपूर येथील तुरुंगवासातील अनुभव कथन करणारे (नरकपुरी गवसली) आणि नारायण महाडिक या खुनी नसलेल्या, पण जन्मठेपेची शिक्षा झालेल्या एका साध्यासुध्या माणसाच्या अनुभवांचे प्रांजल कथन (कैदी नंबर ३१४६७) ही आत्मनिवेदने तीन भिन्न स्तरांतील व्यक्तींची, भिन्न अनुभवांचे कथन करणारी पुस्तके आहेत वर्तमानपत्रांसाठी लेखन करणाऱ्या परीक्षणकर्त्याला वाङ्मयीन गुणवत्ता असलेल्या पुस्तकांवर लिहावे लागते. शिवाय पुस्तकातील सामाजिकता, त्यातील अनुभवाचा वेगळेपणा, त्याची उपयुक्तता यांचाही विचार करून अन्य पुस्तकांवर त्याला लिहावे लागते. तसेच नवोदित लेखकाच्या पुस्तकाच्या परिचयाचे कामही त्याला करावे लागते.

परीक्षणांची वाचकसापेक्षता

परीक्षण-लेखकाला सर्व वाङ्मय-व्यवहाराबद्दल कुतुहल असले पाहिजे. 'मी केवळ विशेष गुणवान वाङ्मयकृतीबद्दलच लिहीन', असा आग्रह त्याने धरल्यास आपल्या व्यापक वाङ्मय-व्यवहारात उणीव राहील. परीक्षण ही जशी वाचकांची गरज आहे, तशीच लेखकांचीही गरज आहे. नवोदित लेखक आपल्या पहिल्या पुस्तकाला प्रथितयश साहित्यिकाची किंवा समीक्षकाची प्रस्तावना घेतो, याचे कारण वाङ्मयक्षेत्रात अडखळते पाऊल टाकणाऱ्या त्या नवोदिताला कुणाचा तरी आधार हवा असतो. त्याच्या पहिल्या पुस्तकाचे परीक्षण थोडचाफार सहानुभूतीने केले गेले. तर त्याला निश्चितच धीर येतो. त्याच्या पहिल्या पुस्तकात दोष आणि उणिवा असल्या तरी भविष्यकाळातील यशाच्या अस्पष्ट खुणाही दिसत असतात. प्रस्तुत पुस्तकात मंगला गोडबोले यांचा 'आरंभ' आणि साधना कामत यांचा 'अनुबंध' या कथासंग्रहांची परीक्षणे आहेत. हे दोन्ही संग्रह त्यांचे पहिले कथासंग्रह आहेत.

ग्रंथपरीक्षण ही वाचकांची गरज मानली म्हणजे परीक्षणकर्त्यावर एक वेगळी जबाबदारी पडते. प्रत्येक नियतकालिकाचा विशिष्ट वाचकवर्ग असतो. परीक्षण करणाऱ्या समीक्षकाला अशा वाचकाचा चेहरा सतत नजरेसमोर ठेवावा लागतो. वाचनाची आवड असणाऱ्या सर्वसाधारण वाचकाला पुस्तकाच्या टीकात्मक परामर्शाची वा मूल्यमापनाची आवश्यकता असतेच असे नाही. त्याला हवा असतो तो

आस्वादक भूमिकेतून घडवून दिलेला पुस्तकाचा परिचय. पुस्तक वाचकाकडे घेऊन जाणे, त्या पुस्तकाविषयी रसिक वाचकाचे कुतुहल जागृत करणे, वाचकाच्या आस्वादक्षमतेत भर घालणे, जाता जाता त्या पुस्तकाचे नेमके स्थान दिग्दर्शित करणे, लेखकाच्या शैलीचा परिचय करून देणे, हे परीक्षणकर्त्याचे काम असते. आपली स्वत:ची वाङ्मयविषयक भूमिका न सोडता आपल्या परीक्षणाद्वारे समीक्षकाला वाचकांशी संवाद साधता आला पाहिजे. हा संवाद अधिक स्नेहशीलतेने परंतु तर्ककर्कश आणि कठोर न बनता साधणे, यात परीक्षणकाराचे कौशल्य असते. एका विशिष्ट स्तरावर समीक्षेची भाषा क्लिष्ट होणे अपरिहार्य असले तरीही ही भाषा काही वेळा गुंतागुंतीची, बोजड आणि अनाकलनीय बनलेली दिसते. म्हणूनच आजची काही समीक्षा सर्वसामान्य वाचकापासून दूर जात चालली आहे. अशा परिस्थितीत चांगल्या पुस्तकाचे रसिकतेने केलेले परीक्षण वाचकाची अभिरुची वाढविण्यास साहाय्यभूत ठरेल. दर्जेदार वर्तमानपत्री परीक्षणातून वाचकाला त्याची वाङ्मयीन जाण पक्की होण्यास मदत होईल. बाह्यत: क्लिष्ट वाटणाऱ्या समीक्षेला तो सामोरा जाऊ शकेल. वर्तमानपत्रासाठी ग्रंथपरीक्षण करणाऱ्या समीक्षकाने सामान्य वाचकाच्या अस्तित्वाचे भान ठेवून चोखंदळपणे परीक्षण केले, तर वाचकाच्या रसिकतेत निश्चितच भर पडेल. जागेची मर्यादा व अन्य कारणांमुळे आज केल्या जाणाऱ्या ग्रंथपरीक्षणांचे जुजबी स्वरूप बदलले पाहिजे. ती अधिक वाचकसापेक्ष बनायला हवीत.

ग्रंथपरीक्षण : सारांश, भाषा, शीर्षके

वर्तमानपत्री परीक्षणात ग्रंथाचा संक्षेप देणे आवश्यक ठरते. वर्तमानपत्राचा वाचकवर्ग समाजाच्या सर्व थरांतील असतो. नवी पुस्तके त्याला जवळजवळ अपरिचित असतात. यामुळेच पुस्तकाचे सौंदर्य-दर्शन घडविण्यापूर्वी, मूल्यमापनात्मक भाष्य करण्यापूर्वी ग्रंथाचा संक्षेप देणे आवश्यक ठरते. प्रस्तुत पुस्तकातील 'महाराष्ट्र-टाइम्स' आणि 'मुंबई सकाळ' या वर्तमानपत्रांत आलेल्या ग्रंथपरीक्षणांत ग्रंथाचा सारांश दिलेला बहुधा आढळून येईल. आकाशवाणीवरील ग्रंथपरिचयपर भाषणातही सारांश द्यावा लागतो. ग्रंथाचे संक्षिप्त रूप वाचकांसमोर ठेवणे ही वर्तमानपत्री परीक्षणांची एक निकड आहे. मासिकासाठी केल्या जाणाऱ्या ग्रंथपरीक्षणात ग्रंथ-संक्षेपाची फारशी आवश्यकता भासत नाही. कारण मासिकाचा वाचकवर्ग वर्तमानपत्राच्या वाचकांपेक्षा वेगळा असतो. उदा. 'ललित शिफारस' या सदरात केले जाणारे परीक्षण; बहुसंख्य वाचकांना पुस्तकाची माहिती आहे, असे गृहित धरूनच ते केलेले असते. या पुस्तकातील 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' आणि 'उपरा' ही परीक्षणे म्हणजे 'ललित शिफारशी' आहेत. या पुस्तकांच्या परीक्षणांत

त्यांच्या वाङ्मयीन गुणवत्तेकडे आणि अनुभवातील वेगळेपणाकडे लक्ष वेधले आहे.

वर्तमानपत्राचा वाचक वाङ्मयीन संकेत आणि समीक्षेची भाषा यांना सराव-वलेला नसतो. वाङ्मयीन समीक्षेच्या परिभाषेने ग्रंथपरीक्षण ग्रांथिक बनण्याची शक्यता असते. म्हणूनच वर्तमानपत्रातील परीक्षणाची भाषा सहज सोपी असली पाहिजे. असे असले तरीही ती अगदीच अनौपचारिक न राहता विशिष्ट दर्जा सांभाळणारी हवी. वर्तमानपत्रात उपलब्ध होणारी कमी जागा हे समीक्षकाला एक आव्हानच असते. मर्यादित जागेत नेमकेपणाने ग्रंथपरिचय करून देणे, ग्रंथाची आस्वादकता सिद्ध करणे आणि परीक्षणाला वाङ्मयीन गुणवत्ता आणून देणे, हे खरोखरच अवघड काम आहे.

ग्रंथपरीक्षण वाचणाऱ्या वाचकाचे लक्ष प्रथम शीर्षकाकडे जाते. परीक्षणाला अनुरूप शीर्षक उपसंपादक देतात. क्वचित परीक्षण-लेखकही देतो. परीक्षणाचे शीर्षक आशयाचे नेमके मर्म मांडणारे आणि चटकन लक्ष वेधून घेणारे हवे. प्रस्तुत पुस्तकातील काही शीर्षकांचा उल्लेख करता येईल.

१) माणसाच्या दुरावलेपणाची कथा– 'कवडसा'. (उर्मिला सिरूर यांच्या 'कवडसा' या कथा-संग्रहाचे शीर्षक)

२) करुणगंभीर नाट्यपूर्ण अनुभवांची गुंफलेली 'माळ.'
(विद्याधर पुंडलिक यांच्या 'माळ' या कथा-संग्रहाच्या परीक्षणाचे शीर्षक)

३) 'एका स्पृश्याची डायरी'– विशिष्ट जीवन-दृष्टीचा कादंबरीवर परिणाम.
(सदा कऱ्हाडे यांच्या कादंबरीच्या परीक्षणाचे शीर्षक)

४) 'उभयान्वयी अव्यय'– धीटपणाचे कौतुक नको.
(चंद्रकांत खोत यांच्या 'उभयान्वयी अव्यय' या कादंबरीच्या परीक्षणाचे शीर्षक)

५) 'भाकरी आणि फूल'– कोकणातील दलित जीवनाचा शोध.
(मधु मंगेश कर्णिकांच्या कादंबरीच्या परीक्षणाचे शीर्षक)

६) अलिप्तपणे सांगितलेली 'वडिलांची कीर्ती.'
(व. पु. काळे यांच्या 'सांगे वडिलांची कीर्ती' या आत्मकथनाच्या परीक्षणाचे शीर्षक)

७) स्नेहांकिता– स्नेहधाग्यांची समर्थनपर गुंफण.
(स्नेहप्रभा प्रधान यांच्या 'स्नेहांकिता' या आत्मकथनाच्या परीक्षणाचे शीर्षक)

८) रवींद्र पिंगे यांचे आनंददायी 'आनंदव्रत.'

(रवींद्र पिंगे यांच्या प्रवासवर्णनपर लेखांच्या संग्रहाचे परीक्षणाच्या शीर्षक)

आकाशवाणीवरील परिचयपर भाषणाला अशी शीर्षके नसतात. प्रस्तुत पुस्तकात ती दिली आहेत.

ग्रंथपरीक्षणातील नेमकेपणा आणि शैलीचा निर्देश

वर्तमानपत्री ग्रंथपरीक्षणासाठी उपलब्ध असणाऱ्या कमी जागेमुळे कोणत्याही ग्रंथातील सर्व गुणदोषांचे विवेचन करणे शक्य नसते. ग्रंथाचा परिचय वाचकाला व्हावा, एवढी मर्यादित अपेक्षा परीक्षणकाराकडून असली तरीही ग्रंथाचा नेमका विशेष नोंदून ग्रंथाची गुणवत्ता सांगता येते. या पुस्तकातील काही परीक्षणांत असा उल्लेख केलेला दिसून येईल. अनिल बर्वे यांच्या 'अकरा कोटी गॅलन पाणी' या कादंबरीच्या परीक्षणात बर्वे यांनी आधी लिहिलेल्या 'डोंगर म्हातारा झाला,' 'थँक यू मिस्टर ग्लॅड' आणि 'स्टडफार्म' या तीन कादंबऱ्यांचा उल्लेख केला आहे. मानवी जीवनाचे विविध पैलू जवळून पाहणारा, सूक्ष्म निरीक्षणशक्तीची देणगी लाभलेला हा लेखक आपले अनुभव चटकन लिहून मोकळा होतो, ही त्याच्या लेखनाची फार मोठी मर्यादा आहे. 'उभयान्वयी अव्यय' ह्या चंद्रकांत खोत यांच्या कादंबरीने खळबळ माजवून टाकली. तिचा प्रकाशन-सोहळाही वेगळ्या तऱ्हेने साजरा झाला. निवेदनातील सहजता हा या कादंबरीचा एक आकर्षक गुण-विशेष आहे. पण धीटपणे अनुभव कथन करण्याच्या लेखकाच्या प्रयत्नामुळे या कादंबरीत कृत्रिमता आली आहे. 'एका स्पृश्याची डायरी' ही कादंबरी लिहिताना सदा कऱ्हाडे यांना विस्तृत जीवनपट सापडला होता. वास्तव वातावरण उभे करीत असताना सदा कऱ्हाडे आपली विचारप्रणाली कादंबरीवर लादू पाहतात आणि कादंबरी स्वत्व हरवून बसते. 'एका स्पृश्याच्या डायरी'चे लेखन करणाऱ्या लेखकाला त्याच्या जीवनदृष्टीला पडणारा, त्याच्या संवेदनक्षम वृत्तीला जाणवणारा एक उत्कट जीवनानुभव सापडला होता. पण विशिष्ट जीवनदृष्टी आणि काही संकेत स्वीकारणाऱ्या विचारवंताने कलावंतावर मात केली आहे. सामाजिक विषमतेतील, दारिद्र्यातील कारुण्य जितके मनाला भिडावे तितके भिडू शकत नाही. सतत वैचारिकतेची छायाच या कादंबरीवर वावरत राहिली. यामुळेच कादंबरीत भव्य जीवनपट निर्माण होण्याची संधी दुरावली. आजच्या मराठी कादंबरीत वेगळा जीवनानुभव देणाऱ्या आणि लक्ष वेधून घेणाऱ्या कादंबरीची ही एक मोठी मर्यादा आहे.' दलित साहित्यातील तोचतोपणाचा, पुनरावृत्तीचा उल्लेख अनेक वेळा केला जातो. ती वस्तुस्थितीही आहे. 'अमिताभ' या लेखकाने आपल्या 'पड' या कथासंग्रहात दलित कथेची मर्यादा ओलांडली आहे.या कथा-संग्रहातील 'हरिजन मास्तर' या कथेत गांधीवादी विचारसरणीचा स्वीकार करणारा दलित शिक्षक 'अमिताभ' यांनी उभा केला आहे. जीवनाच्या विविध पातळ्यांना स्पर्श

पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव कथन करणारे पुस्तक आहे. प्रकाशक हरिभाऊ मोटे अनुभवसंपन्न जीवन जगले. वाङ्मय आणि चित्रपट या दोन क्षेत्रांतील त्यांचे 'एक सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मनिवेदनातील अनुभव अंतर्मुख करणारे आहेत. या पुस्तकांच्या परिचयाने वाचकांना वेगळ्या विश्वाचे दर्शन होईल. याशिवाय पोलिस महानिरीक्षक श्रीधर प्रधान यांचे आत्मचरित्र (कसोटीचे क्षण), सुप्रसिद्ध कम्युनिस्ट नेते श्रीपाद अमृत डांगे यांचे मीरत कटाच्या खटल्यानंतर कानपूर येथील तुरुंगवासातील अनुभव कथन करणारे (नरकपुरी गवसली) आणि नारायण महाडिक या खुनी नसलेल्या, पण जन्मठेपेची शिक्षा झालेल्या एका साध्यासुध्या माणसाच्या अनुभवांचे प्रांजल कथन (कैदी नंबर ३१४६७) ही आत्मनिवेदने तीन भिन्न स्तरांतील व्यक्तींची, भिन्न अनुभवांचे कथन करणारी पुस्तके आहेत वर्तमानपत्रांसाठी लेखन करणाऱ्या परीक्षणकर्त्याला वाङ्मयीन गुणवत्ता असलेल्या पुस्तकांवर लिहावे लागते. शिवाय पुस्तकातील सामाजिकता, त्यातील अनुभवाचा वेगळेपणा, त्याची उपयुक्तता यांचाही विचार करून अन्य पुस्तकांवर त्याला लिहावे लागते. तसेच नवोदित लेखकाच्या पुस्तकाच्या परिचयाचे कामही त्याला करावे लागते.

परीक्षणांची वाचकसापेक्षता

परीक्षण-लेखकाला सर्व वाङ्मय-व्यवहाराबद्दल कुतुहल असले पाहिजे. 'मी केवळ विशेष गुणवान वाङ्मयकृतीबद्दलच लिहीन', असा आग्रह त्याने धरल्यास आपल्या व्यापक वाङ्मय-व्यवहारात उणीव राहील. परीक्षण ही जशी वाचकांची गरज आहे, तशीच लेखकांचीही गरज आहे. नवोदित लेखक आपल्या पहिल्या पुस्तकाला प्रथितयश साहित्यिकाची किंवा समीक्षकाची प्रस्तावना घेतो, याचे कारण वाङ्मयक्षेत्रात अडखळते पाऊल टाकणाऱ्या त्या नवोदिताला कुणाचा तरी आधार हवा असतो. त्याच्या पहिल्या पुस्तकाचे परीक्षण थोडचाफार सहानुभूतीने केले गेले. तर त्याला निश्चितच धीर येतो. त्याच्या पहिल्या पुस्तकात दोष आणि उणिवा असल्या तरी भविष्यकाळातील यशाच्या अस्पष्ट खुणाही दिसत असतात. प्रस्तुत पुस्तकात मंगला गोडबोले यांचा 'आरंभ' आणि साधना कामत यांचा 'अनुबंध' या कथासंग्रहांची परीक्षणे आहेत. हे दोन्ही संग्रह त्यांचे पहिले कथासंग्रह आहेत.

ग्रंथपरीक्षण ही वाचकांची गरज मानली म्हणजे परीक्षणकर्त्यावर एक वेगळी जबाबदारी पडते. प्रत्येक नियतकालिकाचा विशिष्ट वाचकवर्ग असतो. परीक्षण करणाऱ्या समीक्षकाला अशा वाचकाचा चेहरा सतत नजरेसमोर ठेवावा लागतो. वाचनाची आवड असणाऱ्या सर्वसाधारण वाचकाला पुस्तकाच्या टीकात्मक परामर्शाची वा मूल्यमापनाची आवश्यकता असतेच असे नाही. त्याला हवा असतो तो

आस्वादक भूमिकेतून घडवून दिलेला पुस्तकाचा परिचय. पुस्तक वाचकाकडे घेऊन जाणे, त्या पुस्तकाविषयी रसिक वाचकाचे कुतुहल जागृत करणे, वाचकाच्या आस्वादक्षमतेत भर घालणे, जाता जाता त्या पुस्तकाचे नेमके स्थान दिग्दर्शित करणे, लेखकाच्या शैलीचा परिचय करून देणे, हे परीक्षणकर्त्याचे काम असते. आपली स्वत:ची वाङ्मयविषयक भूमिका न सोडता आपल्या परीक्षणाद्वारे समीक्षकाला वाचकांशी संवाद साधता आला पाहिजे. हा संवाद अधिक स्नेहशीलतेने परंतु तर्ककर्कश आणि कठोर न बनता साधणे, यात परीक्षणकाराचे कौशल्य असते. एका विशिष्ट स्तरावर समीक्षेची भाषा क्लिष्ट होणे अपरिहार्य असले तरीही ही भाषा काही वेळा गुंतागुंतीची, बोजड आणि अनाकलनीय बनलेली दिसते. म्हणूनच आजची काही समीक्षा सर्वसामान्य वाचकापासून दूर जात चालली आहे. अशा परिस्थितीत चांगल्या पुस्तकाचे रसिकतेने केलेले परीक्षण वाचकाची अभिरुची वाढविण्यास साहाय्यभूत ठरेल. दर्जेदार वर्तमानपत्री परीक्षणातून वाचकाला त्याची वाङ्मयीन जाण पक्की होण्यास मदत होईल. बाह्यत: क्लिष्ट वाटणाऱ्या समीक्षेला तो सामोरा जाऊ शकेल. वर्तमानपत्रासाठी ग्रंथपरीक्षण करणाऱ्या समीक्षकाने सामान्य वाचकाच्या अस्तित्वाचे भान ठेवून चोखंदळपणे परीक्षण केले, तर वाचकाच्या रसिकतेत निश्चितच भर पडेल. जागेची मर्यादा व अन्य कारणांमुळे आज केल्या जाणाऱ्या ग्रंथपरीक्षणांचे जुजबी स्वरूप बदलले पाहिजे. ती अधिक वाचकसापेक्ष बनायला हवीत.

ग्रंथपरीक्षण : सारांश, भाषा, शीर्षके

वर्तमानपत्री परीक्षणात ग्रंथाचा संक्षेप देणे आवश्यक ठरते. वर्तमानपत्राचा वाचकवर्ग समाजाच्या सर्व थरांतील असतो. नवी पुस्तके त्याला जवळजवळ अपरिचित असतात. यामुळेच पुस्तकाचे सौंदर्य-दर्शन घडविण्यापूर्वी, मूल्यमापनात्मक भाष्य करण्यापूर्वी ग्रंथाचा संक्षेप देणे आवश्यक ठरते. प्रस्तुत पुस्तकातील 'महाराष्ट्र-टाइम्स' आणि 'मुंबई सकाळ' या वर्तमानपत्रांत आलेल्या ग्रंथपरीक्षणांत ग्रंथाचा सारांश दिलेला बहुधा आढळून येईल. आकाशवाणीवरील ग्रंथपरिचयपर भाषणातही सारांश द्यावा लागतो. ग्रंथाचे संक्षिप्त रूप वाचकांसमोर ठेवणे ही वर्तमानपत्री परीक्षणांची एक निकड आहे. मासिकासाठी केल्या जाणाऱ्या ग्रंथपरीक्षणात ग्रंथसंक्षेपाची फारशी आवश्यकता भासत नाही. कारण मासिकाचा वाचकवर्ग वर्तमानपत्राच्या वाचकांपेक्षा वेगळा असतो. उदा. 'ललित शिफारस' या सदरात केले जाणारे परीक्षण; बहुसंख्य वाचकांना पुस्तकाची माहिती आहे, असे गृहित धरूनच ते केलेले असते. या पुस्तकातील 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' आणि 'उपरा' ही परीक्षणे म्हणजे 'ललित शिफारशी' आहेत. या पुस्तकांच्या परीक्षणांत

त्यांच्या वाङ्मयीन गुणवत्तेकडे आणि अनुभवातील वेगळेपणाकडे लक्ष वेधले आहे.

वर्तमानपत्राचा वाचक वाङ्मयीन संकेत आणि समीक्षेची भाषा यांना सराव-वलेला नसतो. वाङ्मयीन समीक्षेच्या परिभाषेने ग्रंथपरीक्षण ग्रांथिक बनण्याची शक्यता असते. म्हणूनच वर्तमानपत्रातील परीक्षणाची भाषा सहज सोपी असली पाहिजे. असे असले तरीही ती अगदीच अनौपचारिक न राहता विशिष्ट दर्जा सांभाळणारी हवी. वर्तमानपत्रात उपलब्ध होणारी कमी जागा हे समीक्षकाला एक आव्हानच असते. मर्यादित जागेत नेमकेपणाने ग्रंथपरिचय करून देणे, ग्रंथाची आस्वादकता सिद्ध करणे आणि परीक्षणाला वाङ्मयीन गुणवत्ता आणून देणे, हे खरोखरच अवघड काम आहे.

ग्रंथपरीक्षण वाचणाऱ्या वाचकाचे लक्ष प्रथम शीर्षकाकडे जाते. परीक्षणाला अनुरूप शीर्षक उपसंपादक देतात. क्वचित परीक्षण-लेखकही देतो. परीक्षणाचे शीर्षक आशयाचे नेमके मर्म मांडणारे आणि चटकन लक्ष वेधून घेणारे हवे. प्रस्तुत पुस्तकातील काही शीर्षकांचा उल्लेख करता येईल.

१) माणसाच्या दुरावलेपणाची कथा– 'कवडसा'. (उर्मिला सिरूर यांच्या 'कवडसा' या कथा-संग्रहाचे शीर्षक)

२) करुणगंभीर नाटचपूर्ण अनुभवांची गुंफलेली 'माळ.'
(विद्याधर पुंडलिक यांच्या 'माळ' या कथा-संग्रहाच्या परीक्षणाचे शीर्षक)

३) 'एका स्पृश्याची डायरी'– विशिष्ट जीवन-दृष्टीचा कादंबरीवर परिणाम.
(सदा कऱ्हाडे यांच्या कादंबरीच्या परीक्षणाचे शीर्षक)

४) 'उभयान्वयी अव्यय'– धीटपणाचे कौतुक नको.
(चंद्रकांत खोत यांच्या 'उभयान्वयी अव्यय' या कादंबरीच्या परीक्ष-णाचे शीर्षक)

५) 'भाकरी आणि फूल'– कोकणातील दलित जीवनाचा शोध.
(मधु मंगेश कर्णिकांच्या कादंबरीच्या परीक्षणाचे शीर्षक)

६) अलिप्तपणे सांगितलेली 'वडिलांची कीर्ती.'
(व. पु. काळे यांच्या 'सांगे वडिलांची कीर्ती' या आत्मकथनाच्या परी-क्षणाचे शीर्षक)

७) स्नेहांकिता– स्नेहधाग्यांची समर्थनपर गुंफण.
(स्नेहप्रभा प्रधान यांच्या 'स्नेहांकिता' या आत्मकथनाच्या परीक्षणाचे शीर्षक)

८) रवींद्र पिंगे यांचे आनंददायी 'आनंदव्रत.'

(रवींद्र पिंगे यांच्या प्रवासवर्णनपर लेखांच्या संग्रहाचे परीक्षणाच्या शीर्षक)

आकाशवाणीवरील परिचयपर भाषणाला अशी शीर्षके नसतात. प्रस्तुत पुस्तकात ती दिली आहेत.

ग्रंथपरीक्षणातील नेमकेपणा आणि शैलीचा निर्देश

वर्तमानपत्री ग्रंथपरीक्षणासाठी उपलब्ध असणाऱ्या कमी जागेमुळे कोणत्याही ग्रंथातील सर्व गुणदोषांचे विवेचन करणे शक्य नसते. ग्रंथाचा परिचय वाचकाला व्हावा, एवढी मर्यादित अपेक्षा परीक्षणकाराकडून असली तरीही ग्रंथाचा नेमका विशेष नोंदून ग्रंथाची गुणवत्ता सांगता येते. या पुस्तकातील काही परीक्षणांत असा उल्लेख केलेला दिसून येईल. अनिल बर्वे यांच्या 'अकरा कोटी गॅलन पाणी' या कादंबरीच्या परीक्षणात बर्वे यांनी आधी लिहिलेल्या 'डोंगर म्हातारा झाला,' 'थँक यू मिस्टर ग्लॅड' आणि 'स्टडफार्म' या तीन कादंबऱ्यांचा उल्लेख केला आहे. मानवी जीवनाचे विविध पैलू जवळून पाहणारा, सूक्ष्म निरीक्षणशक्तीची देणगी लाभलेला हा लेखक आपले अनुभव चटकन लिहून मोकळा होतो, ही त्याच्या लेखनाची फार मोठी मर्यादा आहे. 'उभयान्वयी अव्यय' ह्या चंद्रकांत खोत यांच्या कादंबरीने खळबळ माजवून टाकली. तिचा प्रकाशन-सोहळाही वेगळ्या तऱ्हेने साजरा झाला. निवेदनातील सहजता हा या कादंबरीचा एक आकर्षक गुण-विशेष आहे. पण धीटपणे अनुभव कथन करण्याच्या लेखकाच्या प्रयत्नामुळे या कादंबरीत कृत्रिमता आली आहे. 'एका स्पृश्याची डायरी' ही कादंबरी लिहिताना सदा कऱ्हाडे यांना विस्तृत जीवनपट सापडला होता. वास्तव वातावरण उभे करीत असताना सदा कऱ्हाडे आपली विचारप्रणाली कादंबरीवर लादू पाहतात आणि कादंबरी स्वत्व हरवून बसते. 'एका स्पृश्याच्या डायरी'चे लेखन करणाऱ्या लेखकाला त्याच्या जीवनदृष्टीला पडणारा, त्याच्या संवेदनक्षम वृत्तीला जाणवणारा एक उत्कट जीवनानुभव सापडला होता. पण विशिष्ट जीवनदृष्टी आणि काही संकेत स्वीकारणाऱ्या विचारवंताने कलावंतावर मात केली आहे. सामाजिक विषमतेतील, दारिद्र्यातील कारुण्य जितके मनाला भिडावे तितके भिडू शकत नाही. सतत वैचारिकतेची छायाच या कादंबरीवर वावरत राहिली. यामुळेच कादंबरीत भव्य जीवनपट निर्माण होण्याची संधी दुरावली. आजच्या मराठी कादंबरीत वेगळा जीवनानुभव देणाऱ्या आणि लक्ष वेधून घेणाऱ्या कादंबरीची ही एक मोठी मर्यादा आहे.' दलित साहित्यातील तोचतोपणाचा, पुनरावृत्तीचा उल्लेख अनेक वेळा केला जातो. ती वस्तुस्थितीही आहे. 'अमिताभ' या लेखकाने आपल्या 'पड' या कथासंग्रहात दलित कथेची मर्यादा ओलांडली आहे.या कथा-संग्रहातील 'हरिजन मास्तर' या कथेत गांधीवादी विचारसरणीचा स्वीकार करणारा दलित शिक्षक 'अमिताभ' यांनी उभा केला आहे. जीवनाच्या विविध पातळ्यांना स्पर्श

करणारी, 'अलिप्ततेने शब्दांकित झालेली 'हरिजन मास्तर' ही एक 'स्व-तंत्र' कथा आहे. प्र. श्री. नेरूरकर यांनी मुलकराज आनंद यांच्या मूळ इंग्रजीतील 'रोड' या कादंबरीचा अनुवाद केला आहे. ह्या अनुवादातून मूळ कादंबरीचे सामर्थ्य जाणवत असले तरी अनुवादात कच्चेपणा आहे. आत्मनिवेदनपर लेखनाचे मूल्यमापन केवळ लालित्याचा विचार करून होत नाही. निवेदनातील सहजता व अनुभवातून होणारे वेगळे जीवनदर्शन यांना महत्त्व असते. कैदी नंबर ३१४६७ हे, जन्मठेपेची शिक्षा झालेल्या नारायण महाडिक या कैद्याच्या अनुभवांचे प्रांजल कथन आहे. श्रीधर प्रधानांसारखी पोलिसी जीवन जगलेली व्यक्ती केवळ आपण केलेल्या बंदोबस्ताचे निवेदन करीत नाही. ते जिथेजिथे गेले तिथल्या लोकजीवनाशी समरस होत राहिले. विरमगावच्या कोळी समाजाची अनोखी माहिती प्रधान यांनी आपल्या 'कसोटीचे क्षण' या आत्मचरित्रात दिली आहे. विरमगावच्या आसपास असलेल्या चुमाळिया कोळी जमातीतील तरुणास लग्न होण्यापूर्वी एक तरी शिक्षा व्हावी लागते. दोहद येथील भिल्ल तरुणी प्रेमविवाह करतात, तेव्हा प्रौढ माणसे त्यांच्या विवाहाला लटका विरोध दाखवून संमती देतात. भिल्ल स्त्री-पुरुष समूहाने दारू प्यायला जातात तेव्हा त्यांच्यातील एक पुरुष दारू पीत नाही. कारण इतरांना सांभाळून नेणे ही सामाजिक जबाबदारी त्याला पार पाडावी लागते ! सांशी जातीचे गुन्हेगार आपल्या नातेवाइकांना नॉटपेड पत्रे पाठवितात. कारण ती पत्रे इतर रजिस्टर पत्रांपेक्षा जास्त सुरक्षिततेने मिळतात. खेडा जिल्ह्यातील पेटलादजवळचे वाघरी जमातीचे लोक बारीकसारीक चोऱ्या करीत नाहीत. "चाळीस हजारांच्या खालची चोरी असेल तर, तुम्ही आमचा संशय पण घेऊ नका" असे ते पोलिसांना बिनदिक्कतपणे सांगतात. 'कसोटीचे क्षण' या आत्मचरित्रात केवळ पोलिसी जीवनाचे ठरीव चित्रण न येता विविध सामाजिक पैलूंचे दर्शन होते. यामुळेच या आत्मचरित्राला वेगळे परिमाण लाभले आहे. 'एक सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मचरित्राचा पहिला भाग हरिभाऊ मोटे यांनी प्रकृतीचे आणि परिस्थितीचे स्वास्थ्य लाभले असता लिहिला आहे. या पहिल्या भागात हरिभाऊंच्या समृद्ध जीवनानुभवाचा प्रत्यय येतो; उलट दुसरा भाग हरिभाऊंनी लिहायला सुरुवात केली आणि त्यांच्या मृत्यूनंतर कृष्णाबाई मोटे यांनी तो पूर्ण केला. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धाचे निवेदन हरिभाऊंना सविस्तरपणे करता आले नाही, याची रुखरुख दुसरा भाग वाचीत असताना सतत वाटत राहाते. विजयाबाई राजाध्यक्षांच्या 'अनोळखी' या कथा-संग्रहातील कथा समकालीन लेखिकांच्या रंजक कथांच्या पार्श्वभूमीवर कलात्मक ठरतात; तर ज्योत्स्नाबाई देवधरांसारख्या लेखिकेकडे जीवनानुभवाचे संचित असूनही तटस्थतेच्या अभावामुळे आणि अनुभव नाटचपूर्ण व भडक करण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीमुळे

त्यांच्या कथा साचेबंद बनतात.

ग्रंथपरीक्षण ही ग्रंथाची एक झलक असते. प्रत्येक लेखकाची स्वत:ची शैली असते. त्या शैलीचा प्रत्यय थोडयाफार प्रमाणात का होईना, देता आला तर वाचक मूळ पुस्तक वाचायला प्रवृत्त होतो. पुस्तकातील एखादे स्थळ, एखादे व्यक्तिचित्र, एखादा प्रसंग यांचा उल्लेख करून लेखकाच्या निवेदन–शैलीकडे वाचकांचे लक्ष वेधता येते. उदा. 'आनंदव्रत' या पुस्तकात रवींद्र पिंगे यांनी अहमदाबाद या शहराचे केलेले वर्णन "बाहेरून धुरकटलेलं भाताचं तपेलं आतून लख्ख ताजी कल्हई लावल्यामुळे लखपख दिसावं, तसं आख्खं अहमदाबाद स्टेशन दुधाळ प्रकाशलोटानं भगभगलं होतं. बाहेर मात्र काळोख मिट्ट होता. सर्वत्र चिडीचूप होतं. वातावरण मलूल होतं."

मं. वि. राजाध्यक्षांनी नाना रानडे यांच्या बालसुलभ वृत्तीचा सूचकतेने एका वाक्यात उल्लेख केला आहे–"नानांना सर्वांशी नीट जमवून घेता आले; घेता आले नाही फक्त आपल्या वयाशी." एस. एम. जोशींच्या व्यक्तिमत्त्वाचे अज्ञात पैलू रेखाटणाऱ्या प्रमिला संघवी 'न पुसणारे ठसे' या पुस्तकात आपल्या सासूबाईंच्या मृत्यूचे वर्णन करतात–"आतापर्यंत बांनी अनेकवेळा प्रवासाचं प्रस्थान ठेवलं होतं व आम्ही त्यांना त्या वेळी मोठ्या आनंदानं निरोप दिला होता. कारण त्या वेळी ती थकली पावलं आपल्या घरटचाकडे परतणार आहेत हा दिलासा मनाला होता. परंतु त्या संध्याकाळचं ते प्रस्थान मात्र परत कधीही न येण्यासाठी होतं. जगड्व्याळ व्यापारातील हा जीवनबिंदू ओघळला होता व आम्ही वेडयासारखे तो सोडलेला बिंदू पकडण्यासाठी धडपड करीत होतो...सारं सारं संपलं होतं. आमच्यावर वात्सल्याचा वर्षाव करणारे ते नेत्र नेत्रपेढीची वाट चालू लागले होते. बांच्या चेहऱ्यावरच्या त्या नेहमीच्या हास्यात मिटल्या पापण्यांनी थोडीसुद्धा उणीव भासत नव्हती. एक जीवनपुष्प मिटलं होतं. व आम्ही त्या समर्पित जीवनाला निरोप देत होतो."

व्यक्तिचित्रणपर लेखन केवळ निवेदनाने होते असे नाही, तर कलावंताच्या भावनिक प्रतिक्रियांच्या आविष्काराने होत असते. प्रस्तुत पुस्तकातील परीक्षणांत, आवाबेन देशपांडे यांच्या मृत्यूनंतरच्या वसंत बापटांच्या प्रतिक्रिया किंवा पु. आ. चित्रे किंवा अलूरकर यांच्याबद्दलच्या मं. वि. राजाध्यक्षांच्या स्नेहशील प्रतिक्रिया यांचे उल्लेख सोदाहरण केले आहेत.

'अमिताभ' सारखा दलित लेखक 'पड' या कथेत मेलेल्या जनावराचे (पड) मांस आणायला गेलेल्या स्त्री-पुरुषांचे पुढील शब्दांत वर्णन करतो– "रंगपंचमी खेळल्यागत रक्ताच्या रंगानं सारे रंगले होते. केस रंगले होते. हात रंगले होते. पाय रंगले होते. अंगावरचे फाटके मळके कपडे रंगले होते. तोंड, नाक, कान

रंगले होते. सारे एकाच रंगात रंगले होते...मग प्रत्येकजण घराकडे निघाला. डोक्यावर, काखेत, हाती, फडक्यात, मडक्यात, गंजात, घमेल्यात, दवडीत, टोपलीत, धोतरात, जमेल तेथे रक्ताळलेलं ताजं ताजं मांस घेऊन निघाले...मग कावळ्यांना, घारी-गिधाडांना चेव आला. कुत्र्यांना जाग आली."

प्रत्येक लेखकाची अनुभव व्यक्त करण्याची, प्रतिमा वापरण्याची शैली असते. परीक्षणात उल्लेखिलेल्या पुढील काही वाक्यांवरून त्या त्या लेखकाच्या शैलीची कल्पना येईल–

'चरकातून निघालेल्या उसाच्या पेरासारखा त्याचा हात उंचावला.' वा. रा. सोनार (अंगावर अंधार)

"पुढ्यातला रस्ता दुपारच्या जेवणानंतर डुलक्या घेऊ लागल्यासारखा सुस्त दिसत होता." मंगला गोडबोले (आरंभ)

"तो वीतभर लांबीची लाल चिंधी थुंकला." जयवंत दळवी. (चक्र)

"सबंध आकाश चिखलाच्या पाण्यासारखं दिसत होतं." विद्याधर पुंडलिक (माळ)

"चांदण्याच्या प्रकाशात सगळं लख्ख दिसावं, पण काही वाचू म्हटलं, तर वाचता येऊ नये, अशी आमची स्थिती होती." अच्युत बर्वे (सुखदा)

"सारी आठ-दहा घरे पण कोंबडीच्या रवणीसारखी एकमेकांत खुपसून राहिलेली." मधु मंगेश कर्णिक (भाकरी आणि फूल.)

"अंतःकरणाच्या गाभ्यात कुठेतरी टाचणी रुतून राहावी तशी अजितची काळजी आज कितीतरी वर्षे माझी सोबतीण झाली होती." लीला चिटणीस (चंदेरी दुनियेत)

"टाक्यात टाकलेल्या चामड्याला जुना रंग चिकटावा, तशी ही जात मला जन्मल्यापासून चिकटली आहे." माधव कोंडविलकर (मुक्काम पोष्ट-देवाचे गोठणे)

"गर्भाशयात मूल झोपावं तसा तो दिसत असतो." दया पवार (विटाळ)

"पटावर फासे पडावेत तसे छोटचा छोटचा कॉलनीजचे पुंजके सर्व शहरभर पसरलेले आहेत." रवींद्र पिंगे (आनंदव्रत)

"तापलेल्या जमिनीत पाणी पाहता पाहता रिचावे, तशी अलोट गर्दी थिएटरच्या दरवाजातून काही मिनिटांतच खालच्या भागात अदृश्य होत होती." वि. ग. कानिटकर (पूर्वज)

'पूर्वज' या कथासंग्रहातील 'मंथरे, तुला लागले पिसे' या कथेत वि. ग. कानिटकर यांनी भास्करबुवा बखल्यांचे वडील रघुनाथराव यांचे चित्रदर्शी शब्द-चित्र रेखाटले आहे.

"डोक्यावर कडांना काळसर झिलई चढलेली पगडी होती. भव्य कपाळावर दुबोटी गंधाचे पाखरू होते. श्मश्रू केलेली नसल्याने पांढऱ्या दाढीचे खुंट चेहऱ्यावर सर्वत्र डोकावत होते. दोन्ही ओठांवर पिकलेल्या मिशांचे दाट सुरवंट हनुवटीपर्यंत

खाली आलेले होते. गळ्याभोवती उपरण्याचा अपसव्य वेढा होता. आणि पैरणी-वरून त्याचे टोक उजव्या गुडघ्यापर्यंत पोचले होते. कमरेला खोचलेले धोतर उजव्या गुडघ्यापर्यंत एका अंगाने वर होते, तर डावीकडचा सोगा डाव्या पायाच्या अंगापर्यंत खाली लोंबत होता, रस्त्याच्या कडेने विचारमग्न स्थितीत चालणाऱ्या अशा व्यक्तीकडे कुणा व्यक्तीचे लक्ष जाण्याची शक्यताही नव्हती."

लहानशा परीक्षणातही पुस्तकातील काही उदाहरणांनी लेखकाच्या भाषा-शैलीचा प्रत्यय देता येतो. त्यामुळे ग्रंथपरीक्षण माहितीपर न राहता आस्वादक बनते. वाचकाला पुस्तकाचा आस्वाद घ्यावा, असे वाटते.

आकाशवाणीवरील ग्रंथपरिचयपर भाषणे

निरनिराळ्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथपरीक्षणांप्रमाणेच आकाशवाणीवरील ग्रंथपरिचयपर भाषणे प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केली आहेत. आकाशवाणीच्या मुंबई (ब) केंद्रावरून, तसेच अन्य केंद्रांवरून महिन्यातील निश्चित अशा दिवशी बारा-तेरा मिनिटांचे ग्रंथपरिचयपर भाषण प्रसारित केले जाते. दोन पुस्तकांचे परीक्षण करावे अशी संयोजकांची सर्वसामान्यपणे अपेक्षा असते. एखादे पुस्तक आकाराने फार मोठे असेल, तसेच परीक्षणाच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे असेल तर एकाच पुस्तकाचे परीक्षण केले तरी चालते.

नियतकालिकांतील परीक्षणे आणि आकाशवाणीवरील परिचयपर भाषणे यांत बराच भेद आहे. आकाशवाणीवर एका पुस्तकाच्या परिचयाला जेमतेम साडेपाच ते सहा मिनिटे वेळ असतो. या मर्यादित वेळात ग्रंथपरिचयाबरोबरच ग्रंथनाम, ग्रंथकर्ता, प्रकाशनसंस्था, तिचा पत्ता, ग्रंथाची पृष्ठसंख्या आणि ग्रंथाचे मूल्य यांचा निर्देश व्हावा, अशी संयोजकांची सूचना असते. आकाशवाणीवरील परिचयपर भाषणात पुस्तकावरील टीकात्मक भाष्याला फारसा वाव नसतो. हे भाषण श्रोते समोर कल्पून करायचे असते. अर्थातच नित्याच्या भाषेचा स्वीकार या वेळी करावा लागतो. म्हणूनच ग्रंथपरिचयपर भाषण ग्रांथिक भाषेत न लिहिता आधीच उच्चारानुसारी लिहून ठेवावे लागते. (मात्र या पुस्तकात समाविष्ट केलेली भाषणे मजकुरात सुसूत्रता यावी, म्हणून ग्रांथिक भाषेत लिहिली आहेत.) दीर्घ समास, क्लिष्ट व संस्कृतप्रचुर शब्द, अलंकरण, प्रदीर्घ वाक्ये आकाशवाणीवरील भाषणात टाळावी लागतात. एवढेच नव्हे, तर 'व' या उभयान्वयी अव्ययाऐवजी 'आणि' हे ठाशीव उभयान्वयी अव्यय मुद्दाम योजावे लागते. कारण निसटत्या 'व'चा उच्चार आकाशवाणीच्या श्राव्य माध्यममुळे श्रोत्यांपर्यंत ठळकपणे पोचणे कठीण असते. आकाशवाणीवरील भाषण सोप्या, सुबोध भाषेत लिहिले पाहिजे; आणि ठाशीवपणे वाचलेही पाहिजे. जेव्हा नियतकालिकातील ग्रंथपरीक्षण वाचक

वाचीत असतो, तेव्हा तो एकाग्र आणि सावध असतो. एखादा विचार नीटसा समजला नाही तर तो मागील मजकूर पुन्हा वाचू शकतो. त्याच्या कल्पनाशक्तीला थोडाफार वाव असतो. आकाशवाणीवरील भाषण ऐकणारे श्रोते समाजाच्या वेगवेगळ्या घटकांतील असतात. त्यातही ग्रामीण विभागात आकाशवाणीवरील भाषणे अधिक ऐकली जातात. म्हणूनच सर्व प्रकारच्या श्रोत्यांचे अवधान भाषणावर सतत खिळलेले राहील याची खबरदारी भाषण वाचणाराला घ्यावी लागते. भाषण वाचताना शब्द, शब्दसमूह, वाक्यांश, उपवाक्ये, यावरील आघात आणि मधूनमधून घेतले जाणारे विराम यांना महत्त्व असते. भाषणात येणारे दीर्घ वाक्य उचित आघात आणि विराम यांनी युक्त असे वाचले तरच वाक्याचा आशय श्रोत्यांच्या मनावर सहजपणे ठसतो. पुस्तकातील अवतरण वाचताना, एखाद्या शब्दाकडे लक्ष वेधताना वेगळ्या लयींची आणि आघातांची आवश्यकता असते. आकाशवाणीवरील भाषण परीक्षणकाराने वाचण्यासाठीच लिहिलेले असते. या अर्थी परीक्षणकर्ता चांगला 'वाचक'ही असायला हवा. आकाशवाणीवरील ग्रंथ-परिचयपर भाषणाचे स्वरूप नियतकालिकातील ग्रंथपरीक्षणापेक्षा वेगळे आहे. परीक्षणकर्ता तोच, ग्रंथ तोच आणि हेतू तोच असला तरी माध्यम बदलले की त्याचे स्वरूपही बदलते. मं. वि. राजाध्यक्षांच्या 'शालजोडी' या ललित लेखसंग्रहाचे नियतकालिकातील ग्रंथपरीक्षण आणि आकाशवाणीवरील ग्रंथपरिचयपर भाषण (उच्चारानुसारी) अशी दोन्ही या पुस्तकात समाविष्ट केली आहेत. यामुळे दोहोंतील भेद अजमावता येईल.

ग्रंथपरीक्षण : एक तात्कालिक प्रतिसाद

नियतकालिकातील परीक्षण म्हणजे ग्रंथाला मिळणारा तात्कालिक प्रतिसाद असतो. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथावरची ती ताजी प्रतिक्रिया असते. ग्रंथपरीक्षण प्राधान्याने पहिल्या किंवा दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी केले जाते. विशिष्ट ग्रंथावरील प्रतिक्रियांशी परीक्षणकाराचा काळ आणि त्याचे व्यक्तिमत्त्व यांचा संबंध असतो. विश्राम बेडेकरांची 'रणांगण' कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर तिच्यावर समकालीन लेखकांनी लिहिले होते. उदा. नी. म. केळकर (यशवंत, फेब्रुवारी १९४०), वसंत तांबे (सह्याद्री; डिसेंबर १९४०), द. ब. सुळे (नयन, एप्रिल १९४१). त्यानंतर 'रणांगण' कादंबरी काही वर्षे उपेक्षितच राहिली. नवसमीक्षेच्या काळात प्रा. गंगाधर गाडगीळ, प्रा. कुसुमावती देशपांडे, माधव आचवल, प्रा. ल. ग. जोग, प्रा. नरहर कुरुंदकर, प्रा. द. भि. कुलकर्णी, प्रा. सरोजिनी वैद्य इ. समीक्षकांनी 'रणांगण'ची विविध अंगांनी चर्चा केली. असे असूनही केळकर, तांबे, सुळे यांच्या तत्कालीन ग्रंथपरीक्षणांचे मूल्य शिल्लक राहतेच.

ग्रंथपरीक्षण तात्कालिक आणि कालसापेक्ष असते. म्हणूनच एखाद्या ग्रंथाविषयी समीक्षकाने व्यक्त केलेली प्रतिक्रिया भविष्यकाळात बदलण्याचीही शक्यता असते. जयवंत दळवींची 'चक्र' कादंबरी प्रसिद्ध झाली तेव्हा ती झोपडपट्टीवरील पहिलीच कादंबरी होती. त्यानंतर झोपडपट्टीतील जीवनावर अनेक लेखकांनी लिहिले आहे. अशा वेळी तिचा फेरविचार करताना तसल्याच इतर कादंबऱ्यांशी तिची तुलना करता येईल. 'तो आणि त्याचा मुलगा' ही ल. ना. केरकर यांची 'चक्र'नंतर वीस वर्षांनी प्रसिद्ध झालेली, झोपडपट्टीतील जीवन चित्रित करणारी लक्षणीय कादंबरी आहे. 'चक्र'चा आज विचार करताना मधु मंगेश कर्णिक यांची 'माहिमची खाडी' किंवा ल. ना. केरकर यांची 'तो आणि त्याचा मुलगा' या कादंबऱ्यांची तुलना करता येईल, आणि आधी व्यक्त केलेल्या मतापेक्षा वेगळे मत मांडता येईल. दुसरे उदाहरण दलित आत्मकथांचे देता येईल. प्रस्तुत पुस्तकात 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे' (माधव कोंडविलकर) आणि 'उपरा' (लक्ष्मण माने) या दलित आत्मकथांची परीक्षणे आहेत. याच सुमारास 'बलुतं' (दया पवार), 'आठवणींचे पक्षी' (प्र. ई. सोनकांबळे), 'काट्यावरली पोटं' (उत्तम बंडू तुपे) ही आत्मकथने प्रसिद्ध झाली आहेत. अलीकडे दादासाहेब मोरे यांचे 'गबाळ' आणि रुस्तुम अचलखांब यांचे 'गावकी' अशी दोन आत्मकथने प्रसिद्ध झाली आहेत. नंतरच्या या दोन आत्मकथनांवर लिहिताना आधीच्या आत्मकथनांची तुलना करता येईल; किंवा 'उपरा'सारख्या पुस्तकावर पुन्हा लिहिताना नंतरच्या आत्मकथनांची तुलना करता येईल. ('उपरा' हे लक्ष्मण माने यांचे आत्मनिवेदन म्हणजे भटक्या जमातीतील तरुणाचे वास्तवकथन आहे. 'गबाळ'मधील अनुभवाशी त्याचे नाते शोधता येते. 'गावकी' या आत्मकथनाचा परिघ लेखकाच्या बालपणीच्या स्मृतींशीच फक्त निगडित आहे. गावकी आणि मु. पो. देवाचे गोठणे या आत्मनिवेदनांची तुलना करता येईल.) परीक्षणकर्त्याचे व्यक्तिमत्त्व, ग्रंथपरीक्षणाचा विशिष्ट काळ यांचा संबंध मूल्यमापनाशी निगडित असतो तो असा.

परीक्षणकाराचे ग्रंथाविषयी मत बदलण्याची शक्यता असते. त्याने आग्रही भूमिका सोडावी, सहानुभूतीने आस्वादकाच्या भूमिकेतून ग्रंथाकडे पाहावे हे सर्वमान्य केले तरी त्याने निरपेक्ष मूल्यमापनात्मक भूमिकेतूनही साहित्यकृतीकडे पाहिले पाहिजे. आजचे दलित साहित्य हा वादग्रस्त विषय आहे. गेल्या वीस वर्षांत दलित साहित्यिकांनी कथा, कविता, कादंबरी या वाङ्मयप्रकारांत बरीच निर्मिती केली आहे. दलित साहित्यावर समीक्षणपर लेखनही खूप झाले आहे. दलित साहित्याविषयी सहानुभूती असणारे दलितेतर समीक्षक व दलित समीक्षक त्या साहित्याविषयी आपली मते मांडीत आहेत. त्यांच्या विचारांत दलित साहित्याचा वाजवीपेक्षा जास्त गौरव करण्याची वृत्ती आणि दलित साहित्यकृतींना उचलून धरण्याची अभिनिवेशी व आग्रही भूमिका

दिसून येते. उलट दलित साहित्याविषयी आस्था नसणारे दलितेतर साहित्यिक या नव्या प्रवाहाची उपेक्षा करताना दिसतात; दलित साहित्याच्या केवळ दोषांवर आणि मर्यादांवर बोट ठेवताना दिसतात. निदान दलित साहित्याच्या प्रारंभावस्थेत तरी या साहित्याकडे सहानुभूतीने पाहिले पाहिजे. निकोप रसिकतेने पाहिले पाहिजे. असे झाले तरच समीक्षेने दलित साहित्याला न्याय दिल्यासारखे होईल. प्रस्तुत पुस्तकातील ग्रंथपरीक्षणात दलित साहित्यकृतीविषयी लिहिताना थोडीफार सहानुभूतीची भूमिका घेतलेली दिसेल. मात्र दलित साहित्यिकांच्या ललितकृतींचा अकारण गौरव करणे ही गोष्ट जेवढी आक्षेपार्ह आहे, तेवढीच दलितेतर लेखकाच्या दलित जीवनानुभवावरील ललितकृतीकडे उपेक्षेने पाहणे हीसुद्धा आहे. ज्ञानकोशकार केतकरांनी याविषयी मार्मिकपणे आपले विचार व्यक्त केले आहेत: 'मराठी वाङ्मयाचा अभ्यास करताना केवळ मराठीत जे साहित्य सापडेल तेवढ्यावरच तो अभ्यास रचता कामा नये, तर भोवतालची भावनात्मक परिस्थिती वारंवार लक्षात घेतली पाहिजे. त्याशिवाय मराठी ग्रंथाचे ऐतिहासिक स्वरूप समजणारच नाही." (महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण अथवा महाराष्ट्रीय वाङ्मयाभिरुचीच्या इतिहासातील एक प्रकरण, प्रस्तावना, पृ. ३ प्रकाशक. श्री. व्यं. केतकर, ज्ञानकोश छापखाना, ८४१, सदाशिव पेठ, पुणे, १९२८) दलित कथा साहित्यात वेगळेपणा प्रकट करणारे दलित साहित्यिक अभिताभ यांच्या 'पड' या कथासंग्रहाचे परीक्षण या पुस्तकात आहे, त्याप्रमाणेच दलितेतर लेखक मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' या कादंबरीचेही परीक्षण आहे. मधु मंगेश कर्णिकांसारख्या दलितेतर लेखकाच्या या कादंबरीकडे दलित समीक्षकांचे फारसे लक्ष गेलेले नाही. (गंगाधर पानतावणेंसारख्या समीक्षकाने या कादंबरीचे मनापासून कौतुक केले आहे.) या कादंबरीवर मूल्यमापनात्मक लिहिताना या पुस्तकातील परीक्षणात काही निष्कर्ष काढले आहेत. 'दलितेतर लेखक दलित जीवनावर वास्तव आणि उत्तम कलाकृती निर्माण करू शकणार नाही, असे म्हणणे संपूर्णपणे बरोबर नाही. एखादा दलितेतर लेखकही दलित जीवनावर उत्तम कलाकृती निर्माण करू शकेल. दलित साहित्यिक त्याच्या जीवनातील वास्तव आणि दाहक अनुभव प्रत्यक्ष घेत असला तरीही त्याला यशस्वी कलाकृती निर्माण करता येईलच असे म्हणता येणार नाही. उत्तम कलाकृती निर्माण करणे कलावंताच्या जातीपेक्षा त्याच्या प्रतिभाधर्मावर अवलंबून असते. शेवटी कोणत्याही साहित्यकृतीत व्यक्त होतो तो रसिकांना अस्वस्थ आणि अंतर्मुख करणारा समग्र आणि व्यापक असा जीवनानुभव. 'दलितत्व 'जीवनानुभवाचा भाग असते. अशा वेळी दलित साहित्याची संकल्पना फार ताणणे म्हणजे त्या साहित्यालाच मर्यादा घालून घेणे होय. दलित कलावंताने निर्माण केलेल्या कलाकृतीचा अवाङ्मयीन भूमिकेतून गौरव

करणे जेवढे गैर आहे, तेवढेच दलितेतर कलावंताने निर्माण केलेल्या कलाकृतीला कारागिरी असे म्हणणेही गैर आहे, दलित साहित्याच्या आजच्या प्रारंभावस्थेत त्याचे समर्थन करणे, त्या साहित्याकडे सहानुभूतीने पाहिले जाणे हे समजण्यासारखे असले तरीही दलितेतर लेखकाने दलित जीवनावर लिहिलेल्या साहित्यकृतीचा वस्तुनिष्ठपणे विचार करणेही अपरिहार्य आहे. दलितजीवनविषयक साहित्य, मग ते दलित साहित्यिकाचे असो वा दलितेतर साहित्यिकाचे असो, साहित्यविषयक गुणवत्तेवरच मापले जावे. कालांतराने दलित साहित्य व दलितेतर साहित्य यांच्या सीमारेषा धूसर होत जाणार आहेत. त्या वेळी कोणत्याही कलाकृतीत मूलभूत मानवी जाणिवांना कितपत स्थान मिळाले आहे, याचा विचार होईल. ती कोणत्या जातीच्या कलावंताने निर्मिली आहे, याला महत्त्व राहणार नाही. या व्यापक भूमिकेतून पाहिले असता 'भाकरी आणि फूल' ही, दलितेतर साहित्यिकाने निर्मिलेली, दलित जीवनानुभव प्रकट करणारी एक लक्षणीय कादंबरी ठरते."

वर्तमानपत्री ग्रंथपरीक्षणातही मूल्यमापनात्मक भूमिका घेणे शक्य असते.

ग्रंथपरीक्षणे, समीक्षा आणि वाङ्मयेतिहास

वेगवेगळ्या स्तरांवरील ग्रंथपरीक्षणे नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असतात. प्रसंगपरत्वे लिहिलेल्या ग्रंथपरीक्षणाला जसे मूल्य असते, तसेच परीक्षणांच्या संग्राह्यतेलाही मूल्य असते. एकाच परीक्षणकर्त्याची परीक्षणे, एकाच लेखकाच्या अनेक ग्रंथांची विभिन्न समीक्षकांनी केलेली परीक्षणे, एकाच ग्रंथाची समीक्षकांनी केलेली परीक्षणे, एकाच वाङ्मयप्रकारातील विशिष्ट कालखंडात लिहिली गेलेली परीक्षणे, विशिष्ट कालखंडातील निरनिराळ्या ग्रंथांची परीक्षणे असे परीक्षणांचे संग्रह प्रकाशित होणे आवश्यक आहे. 'वासूनाका–सांगोपांग' या पुस्तकात भाऊ पाध्ये यांच्या 'वासूनाका' या गाजलेल्या कादंबरीवरील परीक्षणे एकत्रितपणे छापली आहेत. 'आकाशभाषिते' हे प्रा. ना. सी. फडके यांच्या आकाशवाणीवरील भाषणांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. केवळ ग्रंथपरीक्षणांचे संग्रहही गेल्या काही वर्षांत प्रसिद्ध झाले आहेत. उदा. 'जिव्हार स्वानंदाचे' (विजया राजाध्यक्ष), 'अनुभव आणि आकार' (प्रल्हाद वडेर), 'अनुषंग' (मा. ना. आचार्य), 'प्रतिक्रिया' (नरेश कवडी). संग्रहित परीक्षणांच्या वाचनाने समीक्षकाच्या समीक्षादृष्टीचा प्रत्यय येतो. त्याच्या समीक्षेचा साकल्याने विचार करता येतो. माधव मनोहरांनी प्राधान्याने नाट्यविषयक परीक्षणे गेल्या काही वर्षांत प्रसंगपरत्वे लिहिली आहेत. परंतु ती संग्रहरूपाने प्रसिद्ध न झाल्यामुळे माधव

मनोहरांच्या समीक्षेचे विशेष, तिच्या मर्यादा, त्यांचे आग्रह, म्हणजेच त्यांची एकूण 'समीक्षादृष्टी' यांचे मूल्यमापन करता येत नाही. विशिष्ट कालखंडात प्रसिद्ध झालेल्या ग्रंथपरीक्षणांचे तत्कालीन समीक्षेशी नाते असते. ग्रंथपरीक्षणातून तत्कालीन समीक्षेची वैशिष्टये शोधता येतात. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राच्या मांडणीनंतर गंगाधर गाडगीळ किंवा श्री. पु. भागवत यांनी लिहिलेल्या परीक्षणपर लेखनातून नवीन समीक्षापद्धतीचा शोध घेता येतो.

ग्रंथपरीक्षणे समीक्षापद्धतीची प्रतिबिंबे असतात, तशीच ती वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीनेही महत्त्वाची असतात. ग्रंथपरीक्षणे, समीक्षापद्धती आणि वाङ्मयेतिहास यांचे नाते असते. वाङ्मयेतिहासाचे लेखन करणाऱ्या लेखकाला समकालीन आणि उत्तरकालीन ग्रंथपरीक्षणांचा आणि समीक्षेचा धांडोळा घ्यावा लागतो. 'महाराष्ट्र सारस्वता'ला विस्तृत आणि विवेचक प्रस्तावना लिहिणाऱ्या शं. गो. तुळपुळे यांनी सारस्वतकार भाव्यांच्या मतांचा फेरविचार करताना नंतर उपलब्ध झालेल्या परीक्षणांचा आणि टीकात्मक लेखांचा उपयोग केला; आणि आपल्या लेखनाने प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाला नवे रूप प्राप्त करून दिले. ग्रंथपरीक्षणे आणि वाङ्मयेतिहास यांच्या संबंधांविषयी लिहिताना ज्ञानकोशकार केतकरांच्या विचारांची आठवण होते. विविधज्ञानविस्तारातील ग्रंथपरीक्षणे वाचून काढल्यावर त्यांनी आपले मत मांडले आहे. " किरकोळ दोष व चुकीने ग्रंथकारास दिलेले दोष हे सोडून दिले व शंभर-दीडशे परीक्षणे गोळा केली आणि त्यांतील तात्त्विक विचार निवडून मांडला तर काव्यपरीक्षणात्मक एक उत्तम ग्रंथ तयार होईल, व त्याबरोबरच गेल्या पन्नास वर्षांचा वाङ्मयात्मक इतिहासही देता येईल. ज्याप्रमाणे कायदा शिकताना खटल्याचे निवाडे घेऊन कायदा शिकण्याची पद्धत आहे, त्याप्रमाणे साहित्यशास्त्र शिकावयाचे ते प्रसिद्ध व परिचित ग्रंथांवर झालेल्या टीकांचा संग्रह करून अभ्यासकाने का शिकू नये ? (उ. नि. प्रस्तावना, पृ.२)

नियतकालिकांसाठी केले जाणारे ग्रंथपरीक्षण अनेक दृष्टींनी मोलाचे असते. दर्जेदार ग्रंथपरीक्षणांनी वाचकांच्या अभिरुचीचे संवर्धन होते; समीक्षेत भर पडते आणि वाङ्मयेतिहास लेखनासाठी त्यांचे साहाय्यही होते. ग्रंथपरीक्षण हा समीक्षेतील उपेक्षित विषय न मानता अभ्यासू आणि चोखंदळ समीक्षकांनी आस्वादक ग्रंथपरीक्षणे लिहून रसिकांच्या अभिरुचिसंवर्धनासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

ग्रंथ-परीक्षणाविषयी अधिक विचार करणे व त्यात नवी भर टाकणे शक्य आहे. म्हणूनच मराठी समीक्षेत अस्पृष्ट राहिलेल्या 'ग्रंथ-परीक्षण' या विषयाच्या विचारांना 'अक्षर–संवाद' या पुस्तकामुळे चालना मिळाली तर मला आनंदच वाटेल.

वि. शं. चौघुले

कथा

'ख्याल'–चोरघडे यांच्या सर्जनशील सामर्थ्याचा प्रत्यय

गेली पस्तीस-चाळीस वर्षे कथालेखन करणाऱ्या वामनराव चोरघडे यांचा 'ख्याल' हा कथासंग्रह वाचला आणि काही संमिश्र प्रतिक्रिया मनात निर्माण झाल्या. नवकथा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कथेपूर्वी वामनरावांनी सकस कथालेखन केले. चिंतनशीलता, हळुवारपणा, काव्यात्मता, अभिव्यक्तीतील नेटकेपणा व सूचकता यामुळे त्यांची कथा सतत 'नवी' राहिली, त्यांची 'स्वत:'ची राहिली. लेखनातील आदर्शवादी प्रवृत्तीमुळे, हळवेपणामुळे या कथेत काही वेळा कृत्रिमता येते, संवादात व्याजनाट्य येते आणि त्यांच्या कथेची वीण विसकटताना दिसून येते. 'ख्याल'मध्ये चोरघडयांच्या लेखनाचे वरील गुण आणि दोष दोन्ही दिसून येतात.

संग्रहाच्या प्रस्तावनेत लेखक म्हणतात, " सदतीस वर्षांपूर्वी दि. २०-६-१९३६ ला माझा विवाह झाला. माझे कार्य, उत्कर्ष, यश जे काय असेल ते माझ्या पत्नी-मुळे सिद्ध झाले, ही माझी श्रद्धा आहे...या अडतीस वर्षांत मी खूप पाहिले, भोगले, अनुभवले, सार घेतले. माझ्या परीने मी तुष्टपुष्ट झालो. या दरम्यान काही मित्र, काही निर्मळ सख्या सोबतीणी मला भेटल्या. त्यांनी मला सावरले, उचलले, झेलले ! माझा ख्याल सर्वांवर खिळला–सुखी झाला ! माझी पत्नी, मित्र, सख्यांची मी या माझ्या वयाच्या सांजेला आठवण करतो. या सर्वांनी माझी कृतज्ञता स्वीकारावी."

स्त्रीपुरुष संबंध हा साहित्यातील सनातन विषय. कोणताही कलावंत हे संबंध न्याहाळतो. आपल्या परीने त्यांना व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. त्या लेखकाचा जीवनविषयक आणि वाङ्मयीन दृष्टिकोन अशा लेखनातून व्यक्त होतो. वामनराव चोरघडयांना कलावंत म्हणून स्त्री-विषयक काही आकर्षण आहे. आपल्या सहवासात आलेल्या अनेक स्त्रियांची विविध रूपे त्यांनी पाहिली. एक पुरुष म्हणून लेखकाला स्त्री-विषयक वाटणारे आकर्षण हा या संग्रहातील प्रमुख अशा आत्मनिवेदनपर

कथांचा गाभा आहे. हे आकर्षण कधी एखाद्या जुन्या मैत्रिणीविषयी– सरोजाविषयी असेल, कधी शेजारच्या प्रौढ स्त्रिया, राधाबाई किंवा द्वारकाबाई यांच्याविषयी असेल, रखमा कौसलसारख्या श्रमजीवी स्त्रियांबद्दल असेल, भानुमती, रेखासारख्या अपरिचित स्त्रियांविषयी अगर स्वत:च्या पत्नीविषयी असेल.

स्त्रीच्या विविध रूपांचे शोध घेणाऱ्या कथाकार चोरघडयांनी आपली लैंगिक आसक्ती; वेळोवेळी मोहग्रस्त होणारे, वासनांनी घोंगावणारे मन यांची कबुली दिली आहे. शेजारच्या राधाबाईंना स्नान करीत असताना पाहणारा लेखक, कौसल या मजुरी करणाऱ्या स्त्रीबद्दल किंवा रखमा या फळवालीबद्दल वाटणारी आसक्ती स्वच्छपणे उघडी करतो. 'अंगे भिजली जलधारांनी' ही या संग्रहातील कथा विशेष उल्लेखनीय आहे. उतारवयात पत्नीबरोबर सहलीस गेल्यानंतर दोघांची होणारी विचित्र मन:स्थिती यांचे नाजूक व हळुवार दर्शन या कथेत होते. आयुष्याच्या सांजवेळी दोघांच्या उत्कट वृत्ती बहरून येतात. त्यांच्या मीलनाच्या क्षणाचे वर्णन लेखकाने पुढील शब्दांत केले आहे. "पण असे ढग भरून आले, गडगड गडगड गरजले; विजांच्या फुलझडया तडतडल्या. पावसाच्या धारा पांघरुणाचा छेद करीत करीत आत घुसल्या.

आडोसा शोधता शोधता निरुपाय होऊन आम्हा उभयतांचे अंग अंग भिजून निघाले !

सतत जलधारा ! सई आणि मी. मी अन् सई ! पण बेरीज नव्हे, वजाबाकी ! ढग बरसताहेत...फुलझडया...उघडी मूठ...हा मी, ही सई ! हा नाही ही नाही. मी अन् सई !"

जीवनानुभव, मग तो कोणताही असो, हाताळण्याची प्रत्येक लेखकाची स्वत:ची शैली असते. कथानुभव संयमितपणे व सूचकतेने व्यक्त करणे हे चोरघडयांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य आहे. यामुळे लैंगिक अनुभवही अकारण फुलविण्याचा प्रयत्न करताना लेखक दिसत नाही. (या संदर्भात पु. शि. रेगे यांच्या 'रेणु' या अलीकडील लेखनाची आठवण होते.) 'पतिव्रता' कथेत सुरुवातीस व मध्यंतरी आलेला समागमाचा निर्देश व पुरुरवा-उर्वशी यांच्या संबंधाचा केलेला उल्लेख यात सूचकता आहे. 'अशी एक द्वारकाबाई' या कथेत बहीणभावांच्या संबंधाचा केवळ उल्लेख आहे. प्रत्यक्ष वर्णन लेखकाने हेतुपुरस्सर टाळले आहे.

मात्र या संयमाला आदर्शवादी दृष्टीची व हळवेपणाची जोड मिळते तेव्हा चोरघडयांची कथा अयशस्वी होते. पात्रांचे स्वत:विषयीचे प्रदीर्घ निवेदन, कृत्रिम संवाद, भडक नाटय, यांच्या लेखकाला होणाऱ्या मोहामुळे कथेचा तोल ढळतो, सुरुवातीपासून रेखीव आकार धारण कारणारी कथा वाङ्मयीन मूल्य हरवून बसते. 'ओढ' कथेत जयश्रीचे शेवटी येणारे निवेदन 'सुवास' व 'उतमात' या

कथांतील संवाद, या दोन्ही कथांची सांकेतिक रचना, विशेषत: 'उतमात'मधील मित्राला लेखकाने जिन्यावरून ढकलून देण्याचा प्रसंग इत्यादींचा उल्लेख उदाहरणादाखल करता येईल. 'हिरण्मयेन पात्रेण' ही कथा लेखकाच्या हळवेपणाने कमालीची ग्रासलेली आहे. कोणते वचन श्यामली ही प्रेयसी मागत आहे हे न विचारात घेता, "श्यामली तेवढीच माझी शक्ती आहे आणि तीच माझी मर्यादा पण;" असे नाटकी उत्तर तो देतो. प्रेयसी श्यामली आणि पत्नी अनुराधा यांनी लेखकाविषयी दाखविलेला समजूतदारपणा हाही लेखकाच्या आदर्शवादी वृत्तीचा निदर्शक आहे.

आत्मनिवेदनपर शैलीतील वरील बारा कथा वगळता 'लागी नही छुटे राम', 'पतिव्रता', 'नाट', 'साहेब' या चार कथा तृतीय पुरुषी निवेदनशैलीत असून संमिश्र स्वरूपाच्या आहेत. 'लागी नही छुटे राम' व 'साहेब' या कथांतील अनुभव खेळकर आहे तर 'नाट' कथा म्हणजे वऱ्हाडी भाषेत झालेला तीन शेतकरी स्त्रियांमधील संवाद आहे लैंगिक जीवनाबद्दल वेगळी अपेक्षा बाळगणाऱ्या नवविवाहिता सावित्रीचे चित्रण हा 'पतिव्रता' या कथेचा विषय आहे.

वामनराव चोरघडे यांनी गेली चाळीस वर्षे कथा हा बराचसा लवचिक वाङ्मयप्रकार कुशलतेने हाताळला आहे. या संग्रहातील लघुकथांत वामनरावांच्या लेखनात पूर्वी आढळणारे दोष आहेत यात संशय नाही. तरीही गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत त्यांनी घेतलेला 'जीवनशोध' अधिक महत्त्वाचा वाटतो. प्रदीर्घकाळ लेखन करणाऱ्या लेखकाने स्वत:चे दोष टाळून पुढे जावे, यात सर्जनशीलतेचे सामर्थ्य दिसते. 'ख्याल' ह्या कथासंग्रहात ते सामर्थ्य निश्चितच जाणवते.

ख्याल : वामन चोरघडे,
कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे
(महाराष्ट्र टाइम्स)

गोखले यांच्या प्रभावी दीर्घकथा; सोनार यांच्या लघुकथेचे सामर्थ्य–

नकोशी

'नकोशी' या अरविंद गोखले यांच्या कथासंग्रहात 'नगण्य', 'निराळी' व 'नवरी' या तीन दीर्घकथा आहेत. या कथा, अपर्णा देशमुख, गौरी चितळे व जेन झिग्लर या नायिकांच्या भावजीवनाशी निगडित आहेत. स्वत:पासून दुरावलेल्या व पुन्हा स्वत:चा शोध घेऊ पाहणाऱ्या या नायिकांच्या दु:खाची जात एकच आहे

अपर्णा देशमुख ही रायगड जिल्ह्यातील समाजकार्यकर्ते रामराव देशमुख व

अनसूयाबाई देशमुख यांची मुलगी. सावळी, तरतरीत, निर्भय, स्वतंत्र जीवन जगू इच्छिणारी. अपर्णा प्रथम आपले आई, वडील– घर, नंतर समाज व शेवटी आपला देश सोडून दूर जाऊ इच्छिते. अशा ठिकाणी जाऊ इच्छिते की, जिथे तिला कोणी ओळखणार नाही, जुन्या कटू जीवनाची आठवण तिला स्वत:ला व इतरांनाही येणार नाही. डॉक्युमेंटरी निर्माण करणाऱ्या राजू दामले या कथानिवेदकाने म्हणजेच लेखकाने आत्मनिवेदनपर पद्धतीने अपर्णा देशमुखची कथा सांगितली आहे.

अपर्णा देशमुखच्या जीवनात प्रथम रशीद हा उमदा मुसलमान येतो. त्याच्याशी विवाह करण्यास वडील विरोध करतात; पण आई संमती देते, कारण आपण प्रगत विचाराच्या आहोत, असे श्रेय आईला हवे असते. या सर्व प्रकाराची अपर्णेला किळस येते. होस्टेलमध्ये असताना आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा लाटकर तिला भेटतो. त्याच्याबरोबर झालेल्या विवाहात अपयश पदरी पडल्यावर तिच्या आतेभावाने आदिवासी भागात सुरू केलेल्या समाजकार्यात झोकून देण्याचा ती प्रयत्न करते. तिथेही तिला निराशाच पत्करावी लागते. शेवटी एका फ्रेंच स्मगलरबरोबर ती परदेशी जाण्याचा निश्चय करते– त्याची तात्पुरती पत्नी म्हणून! पॅरिसला पोचताच तो फ्रेंच माणूस दागिने काढून घेऊन तिचे पैसे परत देणार असतो– नव्या जगात नाहीशी होण्यासाठी तिला मदत करणार असतो. राजू दामलेचे लग्न झालेले नाही हे शेवटच्या भेटीत जेव्हा कळते तेव्हा तिचे सर्व बेत वितळत आहेत, निर्धार ढळत आहेत असे त्याला वाटते, पण निश्चय पक्का करून ती नवी वाट चोखाळण्यासाठी कायमची निघून जाते.

'निराळी' ही दीर्घकथा आहे गौरी मोरेश्वर चितळे ह्या चित्पावन जातीत जन्माला आलेल्या व मुंबईतील सुखवस्तू कुटुंबात वाढलेल्या मुलीची. संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून आलेल्या गौरीला भावना सतत जाणवत असते ती म्हणजे माझी बीजे या मातीत रुजलेली नाहीत. माझे वांशिक नाते ह्या समाजाशी नाही तर दुसऱ्या कुठल्यातरी समाजाशी आहे. आपला केतकी गोरा रंग, घारे डोळे, शारीरिक ठेवण ही महाराष्ट्रातील इतर लोकांशी मिळती जुळती नाहीत. आपण सर्वस्वी वेगळे आहोत. तिच्या जीवनात वामन साने, अनंत आपटे, नकुल मेश्राम हे तरुण येतात. अस्पृश्य समाजातील मेश्राम व चित्पावन साने, आपटे यांची ती तुलना करते. केशवदादाने जातपात न मानता सुरू ठेवलेले कम्युनिस्ट पार्टीचे कार्य, वासंती या बहिणीनं मुसलमान माणसाशी केलेले लग्न, केशवच्या वडिलांनी केशवशी धरलेले कायमचे वैर या सर्वांचा ती विचार करते. मातीच्या ओढीने ती गुहागरला जाते. तिच्या मनात निर्माण झालेली 'निराळेपणा'ची भावना अगदी शेवटपर्यंत कमी होत नाही.

'नवरी' या कथेची नायिका आहे जेन झिग्लर ही पाश्चिमात्य तरुणी.

साहेबराव मोहिते यांच्या सधन शेतकरी कुटुंबातील मुलगा सुरेश वृत्तविद्येच्या शिक्षणासाठी परदेशी जातो. अचानकपणे पमा या आपल्या बहिणीला सुरेश लग्न ठरविल्याबद्दलचे पत्र पाठवितो. पमाचा आधार त्याला अधिक महत्त्वाचा वाटतो. कारण तिनेही जयंता खानोलकर या सारस्वताशी लग्न केलेले असते. प्रारंभी थोडे वादळ निर्माण होते. शेवटी साहेबराव, सुरेशचा भाऊ शिवाजीराव सर्वच नव्या नवरीच्या स्वागताची तयारी करतात. विमानतळावर नवी नवरी ही गोरी अमेरिकन मुलगी नसून काळी निग्रो मुलगी आहे हे पाहताच सर्वांना धक्का बसतो. मोठ्या अपेक्षा बाळगून सुरेश मोहिते या भारतीयाशी लग्न झालेल्या जेन झिग्लरच्या वाट्याला दुःख येते. रूढीत रुतलेल्या भारतीय समाजात वंशवर्णाची श्रेष्ठ-कनिष्ठ भावना किती तीव्र आहे याची तिला कल्पना येते. अमेरिकन गोरी मुलगी यांना श्रेष्ठ वाटते मग आपण एखाद्या शेडचुल्ड कास्टशी लग्न करून इथे यायला हवे काय, असा प्रश्न तिच्या मनात येतो. आपल्याला ही माणसे प्रेमाने वागवीत असली तरी आपण या समाजाशी एकजीव होऊ शकत नाही हे तिला समजते. जेनला दिल्लीला टी. व्ही. वर नोकरी मिळण्याची संधी मिळूनही सुरेश कऱ्हाड सोडायला तयार नाही हे बघून ती अधिकच अस्वस्थ होते. सुरेश अमेरिकेस जायचा प्रयत्न करीत आहे, पण तिथेही आपल्या वाट्याला लाचारीचे जिणे येईल हा विचारही तिला व्याकुळ करतो.

गोखल्यांच्या या तिन्ही दीर्घकथांत स्त्रीचे दुःख हा सनातन विषय आला आहे. या तिन्ही नायिका भिन्न परिस्थितीतील– भिन्न वातावरणातील आहेत. बंदिस्त अवस्थेतून सुटण्याचा प्रयत्न या तिन्ही नायिका करीत आहेत. भारतीय मातीत रुजलेल्या अपर्णेला आपले दुःख टाळण्यासाठी परदेशी– परक्या मुलखात जाऊन स्वतःला हरवून घ्यावेसे वाटते, तर परकीय संस्कृतीत वाढलेल्या जेन झिग्लरला स्वतःची किंवा भारतीय संस्कृती जवळची वाटत नाही. गौरी चितळेमध्ये जी निराळेपणाची भावना निर्माण झाली आहे तीही भिन्न संस्कृतीच्या जाणिवेमुळेच.

'नकोशी' या संग्रहातील तिन्ही कथा या दीर्घकथा आहेत. मराठी वाङ्मयातील अरविंद गोखले यांचे सामर्थ्य व महत्त्व एक यशस्वी लघुकथाकार म्हणून आहे. या कथांतील पहिली कथा आत्मनिवेदनपर शैलीच्या परिणामकारक वापरामुळे आणि नायिकेच्या मनस्वी स्वभावदर्शनामुळे लक्षणीय ठरते. परंतु तिसरी जेन झिग्लरची कथा तिच्यातील प्रसंगप्रधानतेमुळे तितकीशी परिणामकारक ठरत नाही. अमेरिकेतील जेन्सव्हील हे गाव आणि मुंबई-कऱ्हाड या ठिकाणच्या घटनांची निर्मिती दीर्घकथेच्या बंदिस्तपणाला मर्यादा घालते. या तिन्ही कथांत अधिक वेधक ठरते ती 'निराळी' ही गौरी चितळेची मानसिक आंदोलने टिपणारी कथा. या

कथेचा आकार काहीसा मोठा आहे म्हणून तिला दीर्घकथा म्हणायचे. नाहीतर 'निराळी' ही दीर्घकथा गोखल्यांच्या पूर्वीच्या लघुकथेशी नाते जोडणारी एक यशस्वी कथा ठरली आहे.

नकोशी : अरविंद गोखले,
प्रपंच प्रकाशन,
पुणे ३०.

अंगावर अंधार

वा. रा. सोनार मराठी वाचकांना परिचित आहेत ते कवी म्हणून. 'मरुद्-गान' हा त्यांचा ललितलेखसंग्रहही प्रकाशित झाला आहे. 'अंगावर अंधार' या, बारा कथांचा समावेश असलेल्या संग्रहात त्यांच्या हळुवार काव्यात्मवृत्तीचे व संवेदनशीलतेचे दर्शन होते.

जीवनातील भीषण गंभीर अनुभवांचे सर्वच कलावंतांना आकर्षण असते. वा. रा. सोनार यांच्यासारख्या कविप्रवृत्तीचा एखादा कलावंत मात्र असे कलागंभीर अनुभव कृत्रिमतेने व बटबटीतपणे चितारताना दिसतो. त्यांच्या या संग्रहातील काही कथा वाचताना हे विशेषच जाणवते. 'अंगावर अंधार' या पहिल्याच कथेत पती उशिरा येतो म्हणून पत्नीच्या होत असणाऱ्या घालमेलीचे चित्रण आले आहे. पराभव कथेची नायिका आंधळी होण्याची शक्यता आहे. पतीसमवेत लेणी पाहत असताना दोघांच्या मनात निर्माण होणाऱ्या विचारतरंगाचे चित्र 'पराभव' या कथेत आले आहे. 'समाधानानं मरणार नाही' ही कथा एखाद्या हिंदी चित्रपटाची कथा शोभावी इतकी कृत्रिम आहे. वामन या टी. बी. ने आजारी असणाऱ्या आपल्या मित्राच्या जागी या कथेच्या नायकाला नोकरी करावी लागते. वामन आपल्या मृत्यूनंतर पत्नीने– अभयेने– कथानायकाशी विवाह करावा अशी इच्छा प्रदर्शित करतो. पतीला सुखाने व तृप्त मनाने मृत्यू यावा म्हणून अभयाही वामनसमोर शब्द पाळायला कथानायकाला सांगते. पतीच्या मृत्यूनंतर काही क्षणांतच अभया मृत्यू पावते पतीला शांतपणे मृत्यू यावा व पतीच्या मृत्यूनंतर त्याच्या मित्राशी लग्न करण्याची वेळ येऊ नये हे अभयेच्या मनातील हेतू सफल झाले तरी शेवटी कथा भडक ठरते. 'जन्म' या कथेतही दोन दारुड्या मित्रांच्या बेबंद वर्तनाचे वर्णन लेखकाने केले आहे. वा. रा. सोनार यांच्या या कथा ढोबळ आहेत, तसेच व्याजनाट्याने भरलेल्या आहेत.

'पाप', 'गगनी नाथिले आभाळ', 'पुढे-मागे झालो वाटा', 'कथा एका मरणाची' इ. कथांतून कथाकार वा. रा. सोनार यांचे सामर्थ्य दिसून येते. आपणाला दररोज चहा देणारी अविवाहिता सुमित्रा ही वेश्या आहे हे समजताच क्षुब्ध

होणारी आजी 'पाप' या कथेची नायिका आहे. आजीच्या सूक्ष्म मानसिक आंदोलनाचे प्रत्ययकारी आविष्करण हा या कथेचा विशेष आहे. लेखकाची रतन ही बालमैत्रीण निमा हे नाव धारण करणारी वेश्या म्हणून त्याला भेटते. हा प्रसंग 'गगनी नाथिले आभाळ' या कथेतील सूचकतेने व संयमितपणे व्यक्त केला गेला आहे. 'कथा एका मरणाची' या कथेत लेखकाने म्हणजेच कथानायकाने आपल्या आईच्या मृत्युचे व तिच्या मृत्युयात्रेचे वर्णन केले आहे. 'पुढे मागे झालो वाटा' ही एका झोपडपट्टीची कथा आहे. गिरणी बंद झाल्यामुळे बेकार झालेल्या कामगारांच्या उद्ध्वस्त जीवनाची करुण हकीकत या कथेत आली आहे. मराठी कथेत झोपडपट्टीचेही सांकेतिक चित्रण येऊ लागले आहे. ही कथा याबाबतीत अपवाद म्हणावी लागेल.

"खोलीतल्या एकेका वस्तूला आता रेषा सापडतात.", "तो वादळात सापडलेल्या एखाद्या चिरगुटासारखा भासतो तिला.", "चरकातून निघालेल्या उसाच्या पेरासारखा त्याचा हात उंचावला.", "आनंदाचे ऊन पांघरून ती बाहेर येते." अशांसारखी वाक्ये लेखकाच्या परिणामकारक शैलीचा प्रत्यय देतात. अंधार-प्रकाशाच्या प्रतिमांचा वापर हा वा. रा. सोनारांच्या कथा-लेखनशैलीचा एक विशेष आहे.

'अंगावर अंधार' या संग्रहातील काही कथांनी मात्र वा. रा. सोनार यांचे कथालेखनसामर्थ्य स्पष्ट झाले आहे.

अंगावर अंधार : वा. रा. सोनार,
चेतश्री प्रकाशन, अमळनेर.
(महाराष्ट्र टाइम्स)

मानवी संबंधाची कथा–'अनोळखी'

विजया राजाध्यक्षांनी निरनिराळ्या नियतकालिकांतून पूर्वी लिहिलेल्या बारा कथांचा समावेश 'अनोळखी' या कथासंग्रहात झाला आहे. त्यांचे यापूर्वी 'अधांतर', 'टिंबे', 'विदेही' हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'अनोळखी' हा संग्रह वाचल्यावर प्रथम नजरेत भरते ती कथांमधील, अनुभवांतील विविधता. दहा-पंधरा वर्षे कथालेखन करूनही विजयाबाईंच्या कथालेखनातील टवटवीतपणा कायम आहे.

जीवनानुभव गंभीरपणे न्याहाळणे, व्यक्तींच्या अंतरंगात शिरून त्यांना आत्मसात करणे, त्यांच्या परस्परसंबंधांचा शोध घेणे, कथानुभव अकारण न फुलवता संयतपणे आविष्कृत करणे ही राजाध्यक्षांच्या कथालेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

या संग्रहातील एका कथेचे शीर्षक आहे– 'एक संबंधांची गोष्ट'. लेखिकेला कलावंत म्हणून कुतूहल वाटते ते पात्रांच्या विविध प्रकारच्या संबंधांचे. त्यांच्या कथांतील माणसे विविध संबंधांनी बांधलेली आहेत. कधी तो संबंध व्यक्तीव्यक्तीमधील असतो, कधी तो संबंध पुरातन परंपरेशी– भूतकाळाशी निगडित असतो, तर कधी नियतीच्या क्रीडेशी जोडलेला असतो.

कॉन्फरन्सच्या वेळी अनेक व्यक्तींना भेटणारी 'अनोळखी' या कथेची नायिका मिसेस कर्णिक, मोहन पै या होतकरू कलावंताशी जवळिक साधणारे दिग्दर्शक भाई सामंत, नासिक येथील उपाध्यायांकडे वडिलांची सही पाहून मनाने भूतकाळात शिरलेला भावनाप्रधान तरुण विश्वनाथ गोविंद पटवर्धन, चंदिगड येथे एका देखण्या मुलाला पाहताच कवी मर्ढेकरांची आठवण येणारा साहित्यप्रेमी अधिकारी वैद्य, अनैसर्गिक लैंगिक संबंध ठेवणाऱ्या प्रतिभा गोखले व सुशीला पाटील या मैत्रिणी, ट्रीपला गेल्यावर आईच्या आठवणींनी अस्वस्थ होणारा 'देऊळ' या कथेचा नायक, पत्नी व मूल यांच्या आणि स्वतःच्या नात्याचा शोध घेणारा 'मोरपीस' या कथेमधील पिता– ही सर्व पात्रे कुठे ना कुठे बद्ध आहेत. या व्यक्तींबद्दल लेखिकेला व्यक्ती म्हणून कुतूहल आहे; पण त्याहूनही अधिक कुतूहल आहे त्या व्यक्तींच्या इतर घटकांशी असलेल्या संबंधांविषयी– Relationship विषयी. विजयाबाईंची कथा वाचकांना अंतर्मुख बनविते. अनुभवांचा सखोल प्रत्यय देते. कारण ही कथा व्यक्तींच्या विविध संबंधांचा सतत शोध घेताना दिसते.

'अनोळखी', 'माझी गोष्ट', 'बाय बाय', 'मोरपीस' या मला विशेष आवडलेल्या कथा. 'अनोळखी' कथेचा विषय तसा साधाच आहे. कंपनीतील वरिष्ठ अधिकारी आणि यजमान यांच्या विशेष आग्रहामुळे मिसेस कर्णिक एका कॉन्फरन्ससाठी दिल्लीला जाते; या कॉन्फरन्ससाठी भारताच्या निरनिराळ्या प्रांतांतून आलेले अनेक अधिकारी तिला भेटतात. ती सर्वांपासून अलिप्त आणि दूरच असते. फारशी कुणात मिसळत नाही. चाळिशीनंतर स्त्रीमध्ये येणारा निरुत्साहीपणा आणि एकलकोंडेपणा तिला टाळता येत नाही. जमलेल्या सर्व अनोळखी माणसांत पार्थसारथी नावाचा एक अधिकारी असतो. वृत्तीने तो बेफिकीर आणि स्वभावाने अबोल आहे. या अधिकाऱ्याला आपण नीट ओळखतो असे मिसेस कर्णिकला वाटू लागते. कॉन्फरन्स संपल्यावर सर्व परिचितांचे पत्ते ती लिहून घेऊ लागते. ती शेवटी पार्थसारथीकडे येते. खरे म्हणजे आपण शय्यासोबत केल्याशिवाय

एकमेकांना ओळखूच शकत नाही, अशा आशयाच्या त्याच्या विधानाने ती कमालीची हादरते. सर्वांचे घेतलेले पत्ते ती फाडून टाकते. पान कोरे ठेवणाऱ्या पार्थसारथीबद्दल शेवटी तिला कृतज्ञता वाटू लागते. या कथेचा शेवट विजयाबाईंनी पुढील शब्दांत केला आहे– " ती मनातल्या मनात म्हणाली, Thank you, you saved me ! आणखी एक नवी ओळख घेऊन ओळखीच्या पण अनोळखी दिशेला ती जाऊ लागली. खूप जवळ दिसणारे आभाळ सुद्धा ! "

पुरुषी, दांडगट सुशीला पाटील आणि अत्याचारामुळे पुरुषाच्या सहवासाचा धसका घेतलेली प्रभा गोखले या दोन मैत्रिणी पतिपत्नीचे जीवन जगतात; हा 'माझी गोष्ट' कथेचा विषय. 'अनोळखी' आणि 'माझी गोष्ट' या दोन कथांत स्त्रीपुरुष संबंध आणि समलिंगी व्यक्तींना एकमेकांविषयी वाटणारे आकर्षण यांचे चित्रण आहे. या दोन्ही कथांचे विषय हाताळणे अवघड काम होते. कुठेही भडकपणा आणि बटबटीतपणा न येऊ देता अनुभवाला सूचक, संयत आणि हळुवार आकार देण्यात विजयाबाईंना यश मिळाले आहे.

या विधानाचा अर्थ 'अनोळखी' या कथासंग्रहातील सर्वच कथा निर्दोष आहेत असा नाही. 'नियती', 'अजून माती लाल चमकते', 'द्रष्टा', 'मोरपीस' या कथांतील योगायोग आणि नाटचमयता यामुळे या कथांत भडकपणा आला आहे.

'मोरपीस' या कथेत मोरपीस या प्रतिमेचा सूचक वापर लेखिकेने केला आहे. " तासाभरात ऑपरेशन आटपेल आणि एका कोवळ्या लुसलुशीत स्वराने आसमंत भरून जाईल. मोर नाचावा तसा हा स्वर थुईथुई नाचत राहील " या शब्दांत मुलाच्या जन्माचे स्वप्न, तर– " कधी शांत श्रांत, एखाद्या नर्तन संपविलेल्या मोरासारखी, दिसते आहे." या शब्दांत मृत पत्नीचे वर्तन लेखिकेने केले आहे. करुण आणि काव्यात्म लय असलेली 'मोरपीस' सारखी हृदयस्पर्शी कथा तिच्यातील नाटकी प्रसंगामुळे आपला तोल बिघडवून बसते. रानटीपणे उपभोग घेणाऱ्या पतीला पत्नी म्हणते, " यापासून सुख मिळतं तुम्हांला ? आश्चर्य आहे ' मला हा फार पोकळ भविष्यहीन शृंगार वाटतो. ज्यातून अंकुर उगवणार नाही ते बी पेरायचं कशाला ?" पत्नीचे हे उद्‌गार आधीच्या वास्तव आणि कारुण्यपूर्ण अनुभवात कृत्रिम रंग भरू लागतात. अर्थात विजयाबाईंच्या लेखनाची मर्यादा निश्चित करणारी अशी उदाहरणे फार थोडी आहेत.

'अनोळखी' या कथासंग्रहात विजया राजाध्यक्षांच्या स्वतंत्र कथालेखनशैलीचा आविष्कार घडविणाऱ्या कथाच अधिक आहेत. मूळ अनुभवाची बूज राखण्याऐवजी भडक आविष्कारपद्धतीने वाचकांच्या मनावर ठसा उमटवू पाहणाऱ्या अलीकडच्या लेखिकांच्या सामान्य आणि केवळ वाचनीय कथांच्या पार्श्वभूमीवर विजयाबाई राजाध्यक्षांच्या या कथा वेगळेपणामुळे नजरेत भरतात.

आपला ठसा निश्चितच चोखंदळ वाचकांच्या मनावर उमटवून जातात.

अनोळखी–विजया राजाध्यक्ष,
मॅजेस्टिक प्रकाशन.
(आकाशवाणी)

अडचणींतून स्वतःची सुटका- 'प्रवासिनी'

प्र. श्री. नेरूरकर यांनी १९६२ ते १९६५ या तीन वर्षांच्या कालावधीत लिहिलेल्या एकूण बारा कथा 'प्रवासिनी' या कथासंग्रहात समाविष्ट केल्या आहेत. खरे म्हणजे १९४१–४२ च्या सुमारास नेरूरकरांनी आपली पहिली कथा लिहिली. त्यानंतर वीस-बावीस वर्षे काही व्यक्तिगत कारणांमुळे कथा हा वाङ्मय-प्रकार हाताळला नाही. १९६२ नंतर ते पुन्हा कथालेखनाकडे वळले आहेत. 'प्रवासिनी' मधील बारा कथा वाचल्यावर चटकन जाणवते ती वेगवेगळे अनुभव व्यक्त करण्याची लेखकाची ताकद. मध्यंतरीच्या वीस वर्षांच्या काळात ते आपले कथानुभव गोळा करण्याच्या जणू प्रयत्नात होते, असे वाटावे इतकी विविधता या कथांत आहे. कोकणच्या पार्श्वभूमीवरील कथा, शिक्षकांच्या जीवनावरील कथा, सर्कशीच्या वातावरणातील कथा, मानवी मनाचा शोध घेणाऱ्या कथा अशा वेगवेगळ्या प्रकारच्या कथा या संग्रहात आहेत.

आपल्या अनुभवप्रकटीकरणासाठी आत्मनिवेदनाचे माध्यम नेरूरकरांना सोयीचे वाटते. लघुकथेसारख्या संक्षिप्त, एकाग्र आणि आटोपशीर वाङ्मयप्रकारात आत्मनिवेदनपरता कथेला परिणामकारकता आणून देण्यासाठी जास्त सोयीची ठरते. आत्मनिवेदनपर कथा वाचकाच्या अगदी जवळ जाऊन पोहोचते. या संग्रहातील 'कोपरा', 'शोध', 'मी जीनियस', 'एका वाडग्याची न संपणारी गोष्ट', 'कळ','जाळ','एक काळाकुट्ट विदूषक' या सात म्हणजे निम्म्याहून अधिक कथा. आत्मनिवेदनपर शैलीत लिहिलेल्या कथा आहेत. पात्रांच्या चिंतनशील व्यक्तिमत्त्वाच्या आविष्कारासाठी हे आत्मपर माध्यम पूरक ठरले आहे. नेरूरकरांची पात्रे बव्हंशी जीवनचिंतनात रमलेली दिसतात. पांड्यासारखा गडी, काका गुरवासारखा देवळाचा पुजारी, यादवरावासारखा विदूषक, 'जाळ' कथेचा क्षयाने आजारी असलेला नायक कान्त ही सर्व पात्रे जीवनचिंतनात मग्न आहेत.

"जीवन-मरणात मला मरणच जवळ ओढणार होतं. कारण जीवनानं

मला केव्हांच दूर लोटलं होतं. आणि जीवनानं मला दूर लोटलं, हे मी जाणलं तेव्हा मरणानं माझ्या गळ्याभोवती आपले पाश पूर्णपणे टाकले होते. मी जितका जीवनाचा नव्हतो तितका मरणाचा होतो. तितकं मरण माझं होतं." या शब्दांत 'जाळ' कथेचा नायक कान्त जीवनावर भाष्य करतो.

नेरूरकरांच्या प्रतिभेला जीवनातील गूढगंभीर घटना, नियतीचे प्राबल्य, कारूण्य यांचे आकर्षण आहे. 'घंटा घणघणते आहे' ही निपुत्रिक काका गुरवाच्या जीवनावरील कथा केवळ व्यक्तिचित्रप्रधान कथा न राहता नियती आणि दुबळा माणूस यांच्या परस्परसंबंधांची वेधक कथा बनते. 'एका वाडचाची न संपणारी गोष्ट' ही कथासुद्धा अद्‌भुततेचे वलय घेऊन आकाराला येताना दिसते. जीवनाकडे गंभीरपणे पाहणाऱ्या नेरूरकरांच्या पात्रांना सदैव दुर्दैवाने घेरलेले आहे यामुळे 'प्रवासिनी' कथासंग्रहातील पात्रचित्रणाला कारुण्याचा स्पर्श झालेला आहे. काकी गुरविणीचे निपुत्रिकत्व, आवडा भाविणीवर आकस्मिकपणे झालेला अत्याचार, पांडू गडचाचे दुःख, शालूताई या प्रौढ अविवाहित शिक्षिकेची वेदना, यादवराव या विदूषकाची विमनस्कता या सर्वांच्या मुळाशी कारुण्य आहे. क्षयी कांतच्या जीवनावरील 'जाळ' ही कथा संपूर्णपणे कारुण्याने ढवळून निघाली आहे.

प्र. श्री. नेरूरकरांच्या कथेचे यश त्यांच्या निवेदनशैलीत आहे. कोकणाची निसर्गरम्य पार्श्वभूमी, पात्रांच्या मनाची होणारी घालमेल, कॉमनरूममधील गप्पांची उडालेली झोड यांमधून लेखकाचे निवेदनकौशल्य दिसून येते. 'घंटा घणघणते आहे' या कथेतील निसर्गाचे वर्णन–

"साखऱ्या आंब्याची पाळंमुळं खुशाल प्रारंभीच्या इवल्याशा हातभर व पायखोल जलकुंडात थपकल मारून बसल्यासारखी विसावली आहेत. पाचपन्नास पावलांच्या अंतरावर खडकातून दोन ठिकाणी झरे उमटले आहेत. दुसरा झरा खडकातून पण मातीतच उसळत उमटला आहे. माती नव्हेच ती. लाल काळे दगडगोटे व बारीकसारीक सरवारे व जाड साखरेसारखी सुळसुळीत मातड अशी ती जमीन आहे."

"देवळाकडून उजव्या बाजूने रहदारीचा रस्ता देवळाला खेटून उभा आडवा वळत दूरवर लांबलांब होत गेला होता. तांबड्या धुळीचा तो पट्टा चेटकिणीच्या लांब लांबट जिभेसारखा लवलवत होता."

'प्रवासिनी'मधील काही कथा घटनाप्रधान आणि जुन्या पद्धतीने कथानकाची गुंफण केलेल्या आहेत. 'बंगला', 'आवडा' या कथांची उदाहरणे या संदर्भात देता येतील. काही वेळा अशा कथा अकारण पाल्हाळिक बनतात आणि कथेला आवश्यक असणारा बंदिस्तपणा हरवून बसतात. 'शोध', 'कळ' या कथांत अनावश्यक विस्तार आला आहे.

कथाकार नेरूरकरांमध्ये असलेली मानवी मनाचा शोध घेण्याची प्रवृत्ती कलादृष्टचा मोलाची आहे. एखादी शिक्षिका, विदूषक गुरव, क्रांतिकारक यांच्या मनांत खोलवर शिरण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. 'कोपरा' कथेत एका बोक्याच्या प्रणयविव्हळ अवस्थेचे रेखाटन नेरूरकरांनी केले आहे. 'घंटा घणघणते आहे.','बाहुल्या', 'प्रवासिनी', 'जाळ', 'मी जीनियस', इत्यादी कथांत मानवी स्वभावाची विविध रूपे दिसून येतात. 'प्रवासिनी' संग्रहापर्यंत नेरूरकरांचा कथाकार म्हणून प्रवास, ढोबळ घटना, एखाद्या घटनेतील नाटच, जीवनातील आकस्मिकता यांच्या निवेदनापासून मानवी मनातील सूक्ष्म आंदोलनाचे आविष्करण, असा आहे.

लेखकाने स्वत:लाच खोलीत कोंडलेल्या मांजराप्रमाणे अडचणीत टाकायचे असते व त्या मांजरासारखीच त्या विलक्षण अडचणीतून स्वत:ची सुटका करून घ्यायची असते. ही सुटका म्हणजे त्याची स्वत:ची वेगळी 'लघुकथा' असते, असे नेरूरकरांनी प्रस्तावनेत म्हटले आहे. ढोबळ, वस्तुनिष्ठ घटनांपेक्षाही मानवी प्रवृत्तींचा ते घेत असलेला शोध म्हणजेच त्यांनी स्वत:ची करून घेतलेली सुटका आहे, असेच म्हटले पाहिजे. प्र. श्री. नेरूरकरांच्या पुढील समर्थ कथांची बीजे या शोधातच आहेत !

प्रवासिनी– प्र. श्री. नेरूरकर
परचुरे प्रकाशन–मुंबई
(आकाशवाणी)

ज्योत्स्नाबाईच्या निवडक कथा

वीस वर्षांपूर्वी ज्योत्स्ना देवधर यांच्या 'घरगंगेच्या काठी' व 'कल्याणी' या दोन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आणि 'काहीतरी वेगळे देणारी' नवी लेखिका मराठी वाचकांना मिळाली. त्यानंतर वीस वर्षांच्या कालावधीत त्यांनी आणखी अकरा कादंबऱ्या लिहिल्या. १९७९ सालच्या 'पडझड' ह्या कादंबरीत त्यांनी आजच्या कुटुंबसंस्थेच्या विघटनाचे चित्र उभे केले आहे. १९६९ ते १९७९ या काळात 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या' ते 'सायली' या आठ संग्रहांत त्यांनी दोनशे कथा लिहिल्या आहेत. विपुल साहित्यनिर्मिती करणाऱ्या, स्वत:चा वाचकवर्ग असलेल्या ज्योत्स्नाबाई गेल्या दशकातील एक लोकप्रिय व प्रस्थापित लेखिका

आहेत. जेव्हा एखादा लेखक विपुल साहित्यनिर्मिती करतो तेव्हा त्याच्या निवडक साहित्याच्या संपादनाची वाचकांच्या दृष्टीने एक गरज असते. चोखंदळ समीक्षक व संपादक शंकर सारडा यांच्या 'निवडक ज्योत्स्ना देवधर' या संपादनाने ज्योत्स्नाबाईंच्या कथाविश्वाचा परिचय होण्यास साहाय्य झाले आहे.

एकवीस कथांचा समावेश असलेल्या या संग्रहास 'आयुष्याला सामोरी जाणारी लेखिका' या शीर्षकाची विस्तृत प्रस्तावना शंकर सारडा यांनी लिहिली आहे. जोधपूर संस्थानात एका सुखवस्तू कुटुंबात जन्मलेली, जोधपूर-राजस्थानच्या सरंजामदारी वातावरणात वाढलेली कुसुम थत्ते लग्न होऊन पुण्यास येते. आठवी-पर्यंत हिंदीत शिक्षण झालेल्या, विवाहापूर्वी मराठी वातावरणापासून खूप दूर असलेल्या ज्योत्स्नाबाई पुण्यास आल्यावर मराठीच्या पदवीधर होतात. लेखनास प्रारंभ करतात. वैयक्तिक जीवनात काही कसोटीचे क्षण निर्माण झाल्यावर पाँडेचरीस योगी अरविंदांच्या आश्रमाकडे धाव घेतात. माताजींच्या आशीर्वादग्रहणानंतर झपाटचाने त्या त्यांचा लेखनप्रवास सुरू करतात. ज्योत्स्नाबाई देवधरांच्या जीवनविशेषांचा, साहित्यविश्वाचा, बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाचा; अर्थबहुल, चित्रदर्शी, कहाणीवजा भाषाशैलीचा मार्मिक परिचय सारडा यांनी प्रस्तावनेत करून दिला आहे.

'निवडक ज्योत्स्ना देवधर' वाचताना कोणत्या प्रतिक्रिया निर्माण होतात? करुण, नाटचपूर्ण अनुभव व्यक्त करताना कलावंत म्हणून ज्योत्स्नाबाईंना कितपत यश मिळाले आहे, जर अपयश आले असेल, तर ते कोणत्या कारणांमुळे इत्यादी प्रश्नांचा शोध घेतला पाहिजे.

मध्यमवर्गीय समाजातील स्त्री-पुरुषांचे दुःख, वेदना-व्यथा, रितेपणा, अतृप्ती यांचे चित्रण हा देवधरांच्या कथालेखनाचा विशेष आहे. बुद्धिमान अंधशास्त्रज्ञ बापूंची त्यांच्यापासून दुरावलेली कुरूप पत्नी नर्मदाबाई (अंधार), पुजाऱ्यावर आतून छुपे प्रेम करणारी मथुताई (पुरुष), कुटुंबात अडगळ ठरलेल्या गुलमोहरावर जीवापाड प्रेम करणाऱ्या आजारी माई (गुलमोहर), नवरा व मुले यांना जपणाऱ्या सहनशील, सोशिक व कामसू कमळाक्का (कमळाक्का), सुनेचा शृंगार पाहण्याची इच्छा धरणारी अतृप्त सासू (गायीचे डोळे), स्वतःच्या संसारात असमाधानी असणारी व वृद्ध बाबूकाकांकडे आकृष्ट होणारी म्हातारी वसुमती (कॅक्टस) ही ज्योत्स्नाबाईंची पात्रं कमालीची दुःखी आहेत. जीवनात हरलेली आहेत. अतृप्त आहेत. या व्यक्तींच्या दुःखाला आपल्या कथासाहित्यात वाट करून द्यावी असे लेखिकेला वाटते. या 'स्त्रीसृष्टी'शी ज्योत्स्नाबाई विलक्षण समरस झालेल्या आहेत. असे असले तरी या कथांत स्त्रीच्या दुःखाचे कलात्मक चित्रण करण्यात लेखिकेला पुरेसे यश मिळालेले नाही.

कोणताही जीवनानुभव व्यक्त होत असताना कलावंताच्या सर्जनाच्या प्रक्रियेतून तावून सुलाखून निघावा लागतो. जीवनातील कारुण्यात बऱ्याच वेळा नाटचही असते. जीवनातील वास्तव कधी कधी कल्पिताहूनही भयानक असू शकते. मात्र अशा जीवनानुभवांना कलारूप प्राप्त व्हावे लागते. ज्योत्स्नाबाईंच्या कथा काही वेळा केवळ नाटचपूर्ण बनतात, विरोधाचा आधार घेतात आणि आपली कलात्मकता हरवून बसतात. 'कमल', 'बदमाश', 'रखेली', 'नाटक', 'जिद्दी' या कथांतील मूळ कथाबीजावर संस्कार करण्यात लेखिका यशस्वी झालेली नाही. 'कथाकथनकार' लेखक-लेखिकांवर असा परिणाम होणे अपरिहार्य असते. नाटचपूर्ण अनुभवातून कथा फुलवीत जाणे, विरोधी प्रसंगनिर्मितीमधून वाचकांना मधूनच धक्का देणे, अनपेक्षित घटना निर्माण करणे, शेवट अधिक शोकात्म करणे अशी प्रक्रिया 'कथाकथनकारां'कडून जाणूनबुजून व सरावल्यावर सहजगत्या होत असते. ज्योत्स्ना देवधर यांच्या कथेच्या बाबतीत असे घडले असेल का, हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. 'पुरुष' कथेतील सासू व सून यांच्यातील संघर्ष पुढीलप्रमाणे व्यक्त झाला आहे. "सासू बोलत होती, सून ऐकत होती. आतल्या आत आटत होती. शेवटी तापल्या तव्यावर शितोडा पडावा तशी म्हणाली,

"सासूबाई, गर्भाचं बीज विकत मिळतं ? जमीन सुपीक आहे. ओली आहे, बी पडलंच नाही तर ओल्या मातीनं काय आपली ढेकळंच खावी, की स्वत:चाच ओलेपणा शोषावा ?" (पृ.१०)

या उदाहरणातील पहिल्या निवेदनातील लय आणि उत्तराच्या भाषणातील नाटकीपणा सहज जाणवेल. ज्योत्स्नाबाई देवधर अभिव्यक्तीतील नाटकीपणा टाळू शकल्या असत्या तर त्यांच्या कथांना कलामूल्य प्राप्त झाले असते.

ज्योत्स्ना देवधरांची भाषा कधी कधी अनुभवाची तीव्रता प्रकट करताना काहीशी कृत्रिम व नाटकी बनत असली तरी त्या भाषेला स्वत:चेही सौंदर्य आहे. उदा.– "शेजारपाजारच्यांनी तिला डॉक्टरीणबाई म्हटलं की, तिचा चेहरा गाऊन घालून निघालेल्या डबलग्रॅज्युएटसारखा दिसे." (पृष्ठ १५३)

"नंदा पुढे झाली. वडलांच्या पायाजवळ बसून तिनं त्यांच्या पावलांवरून हात फिरवला. मऊसूत पाय पानं ओरबाडलेल्या डहाळीसारखे वाटले."(पृष्ठ २८)

"काकूचे गुडघे कानाला लागले होते. बांगडचा नसलेले वाळलेल्या फांदीसारखे तिचे हात पऱ्याच्या बारक्या डबीत वात शोधीत होते." (पृष्ठ २७)

वातावरण, व्यक्तिचित्र व मानसिक आंदोलने यांच्या प्रकटीकरणाचे हे एक उदाहरण– "मथुताईनं छाती भरून श्वास घेतला आणि सोडला. उदबत्तीचा लाल डोळा मथुताईकडे टक लावून पाहू लागला. मथुताईने आपली कावरीबावरी नजर

मिटून घेतली. मग आपले भुंडे हात पसरून तळहातावरच्या खोल रेषा निरखीत राहिली. 'श्रीराम' लिहिलेली माहेरची अंगठी झिजून गुळगुळीत झाली होती. बोटावर आणखी एक पेर उमटावं अशी दिसत होती. जपाची माळ ओटीपदरातून निसटून भुईवर पडली. मथुताई रुद्राक्षाच्या त्या रखरखीत मण्यांकडे पाहत राहिली. प्रत्येक मण्यावर नवऱ्याचा ओबडधोबड चेहरा जसा चिकटून बसला होता. वाटलं, आपल्या कुशीतून फक्त चेहरेच जन्माला आलेत. काळे, खडबडीत, रुद्र, भावनाहीन, शब्दहीन चेहरे, नुसत्या डोळ्यांनी खाणारे, नुसत्या कानांनी चाहुल घेणारे. नुसत्या नाकानं अनिच्छा, घृणा, तिरस्कार व्यक्त करणारे." (पृष्ठ १–२)

जीवनातील नाट्य, कारुण्य, व्यथा-वेदना यांच्या चित्रणाबरोबरच जीवनानुभवातील हळुवारपणा व उत्कटता जोपासणाऱ्या सूचक कथा या संग्रहात आहेत' विवाहापूर्वीच नियोजित पतीची 'न्यूड' स्वरूपात पाहाण्याची इच्छा पूर्ण केल्यामुळे चैतन्य व स्वत्व हरवून बसलेली राणी (सात घरांच्या सीमारेषा), माहेरची खूप ओढ असलेली पण एका विशिष्ट क्षणी सासर व माहेर या दोहोंपासून मनाने दूर जाऊन खिन्न होणारी नंदा (ओस झाल्या दिशा), भर पावसात आपल्या जुन्या प्रियकराच्या स्मृतीने विव्हल झालेली प्रौढ विवाहिता (चिऊताई चिऊताई, दार उघड) या तिघींच्या चित्रणात सहजता व वास्तवता आहे. पात्रांच्या मानसिक आंदोलनातील सूक्ष्मता, व्याजनाट्याचा अभाव व आशयाची नेमकी अभिव्यक्ती हे या कथांचे विशेष आहेत. 'सात घरांच्या सीमारेषा' या कथेतील नायिकेचे 'संवेदनाशून्य होण' जसे मनाला पटते तसे 'गाईचे डोळे' या कथेतील सुनेचे सासूविषयीचे 'समर्थन' पटत नाही, तार्किक वाटत नाही. आपला एकांतातील शृंगार सासूने पाहिला आहे, हे माहीत झाल्यावर खचून गेलेली, स्वतःचा आत्मा हरवलेली सून स्त्रीचे बाळंतपण डॉक्टर व इतर माणसे पाहतातच ना, असे म्हणून समाधान मानते. ही घटना कथेतील पात्राच्या स्वभावधर्माशी सुसंगत नाही. इथे लेखिकेचा आदर्शवाद पात्रावर लादलेला आढळतो. उलट आधीच्या तीन कथांत ज्योत्स्नाबाईंमधील कलावंतामध्ये असलेल्या तटस्थतेमुळे अनुभव स्वतःचे रूप घेऊन उभा राहतो. म्हणूनच या कथा यशस्वी कथा ठरतात.

जीवनाला सामोऱ्या जाणाऱ्या ज्योत्स्नाबाईंजवळ लेखनाची विपुल सामग्री आहे. जीवनाची बहुविध रूपे त्यांनी आपल्या शोधक नजरेने न्याहाळली आहेत. परंतु समरसतेबरोबरच कलावंताला आवश्यक असणाऱ्या तटस्थतेचा अभाव, अनुभवातील नाट्य आपल्या परीने वास्तविकपणे फुलू देण्यापेक्षा ते अधिक भडक करण्याची प्रवृत्ती, निवेदनाच्या आंतरिक सामर्थ्यापेक्षाही त्यात दिसून येणारी बहिर्मुखता यामुळे ज्योत्स्नाबाईंच्या कथांना अपरिहार्यपणे काही मर्यादा पडल्या आहेत.

निवडक ज्योत्स्ना देवधर, ज्योत्स्ना देवधर,
प्रकाशक : इंद्रायणी साहित्य.
(महाराष्ट्र टाइम्स)

नव्या लेखक कलावंताचा आरंभ आणि अनुबंध

गेल्या आठ-दहा वर्षांच्या कालावधीत साधना कामत व मंगला गोडबोले यांच्या कथा अधूनमधून वाचनात येत होत्या. नवोदित लेखक-लेखिकांच्या कथांपैकी वाचलेली एखादी कथा स्मरणात राहते. पण कलावंत म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण होण्यासाठी कथा संग्रहरूपाने प्रसिद्ध होणे आवश्यक असते. साधना कामत यांच्या 'अनुबंध' व मंगला गोडबोले यांच्या 'आरंभ' या दोन्ही संग्रहांनी त्यांची कलावंत म्हणून एक प्रतिमा निर्माण झाली आहे.

'अनुबंध' मधील लेखिकेचे कथाविश्व हे मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय समाजाच्या जीवनाशी निगडित आहे. तांदुळविक्या गुजराती बाईने फसविणे (ती आणि मी), परपुरुषाबद्दल वा परस्त्रीबद्दल आकर्षण वाटणे (त्रिकोणातून त्रिकोणाकडे, अनुबंध), बरीच वर्षे नोकरी करणाऱ्या मोलकरणीविषयी मालकिणीला सहानुभूती व प्रेम वाटणे (अंतर), खेड्यात बालपण गेलेल्या मुलीला स्वतःचे घरही खेड्यातच असावे असे वाटणे (घर) हे 'अनुबंध' या संग्रहातील विषय सर्वपरिचित असेच आहेत.

कथाकारांची सामग्री सभोवतालच्या जीवनातच असते, मात्र तो विषय कलारूप होण्यासाठी चिंतन व त्या जीवनानुभवात संपूर्णपणे डूब घेणे आवश्यक असते. कलावंतांकडून तसे न घडले तर कथाविषय वरवर हाताळला जातो. केवळ रंजनपर बनतो. गंभीर आशयाला धक्कातिकेचे स्वरूप येते. 'अनुबंध' मधील काही कथांच्या बाबतीत असे घडले आहे. 'पूल' कथेची नायिका आपल्या मृत भावाच्या मित्राला योगायोगाने भेटते व त्याचा परिचय करून घ्यायचे विसरून जाते. तांदुळ विकणाऱ्या बायांच्या लबाडीची पूर्वकल्पना असूनही त्या बाईने लेखिकेला हातोहात फसविणे, देसाई या अविवाहित तरुणाला आकर्षित करून घेणारी एअर होस्टेस हंसा विमान अपघातात मरणे, अशा प्रकारचे विषय लेखिकेने अगदी ढोबळपणे हाताळले आहेत. लेखिकेच्या आदर्शवादी दृष्टिकोनामुळेही काही कथा सांकेतिक ठरल्या आहेत. आपल्याभोवती आदर्शांची जोपासना करणारी माणसे

नसतात असे नाही. अशा माणसांचा काही पीळ असतो, ती मनस्वी असतात. सहजासहजी परिस्थितीला शरण जात नाहीत. अशा मनस्वी व्यक्तींचे चित्रण करण्यात वेगळे सामर्थ्य लागते. कुणाही कलावंतांच्या प्रारंभीच्या लेखनात दिसणारी आदर्शवादी वृत्ती साधना कामत यांच्या लेखनातही दिसून येते. अण्णासाहेब व माई यांनी बांधलेले खेडचातले घर सुनेला आवडत नाही, पण माहेरी आलेल्या मुलीला आवडते. स्वत:चे असेच घर असावे असे तिला वाटते. 'घर' या कथेत दोन व्यक्तींमधील आंतरविरोध लेखिकेने कृत्रिमपणे उभा केला आहे. 'झोकून देणारा माणूस' या कथेचा नायक सौमित्र नायिकेच्या मुलाला आगीपासून वाचवतो, तर एखाद्या विवाहितेप्रमाणे धीरजकडे राहणारी मेनका आर्थिक अडचणीत असलेल्या धीरजला व त्याच्या मुलाला मदत करते. 'झोकून देणारा माणूस' या कथेच्या शेवटी सौमित्र व स्वत:मधील नाजूक भावबंधाचा सूचक उल्लेख लेखिकेने केला आहे. मात्र 'मेनका' ही कथा अगदी सरधोपटपणे सांगितली आहे. त्यामुळेच ती केवळ आदर्शवादी कथा ठरली आहे.

कलावंताला येणारे अनुभव एकपदरी सरधोपट नसतात. त्या अनुभवांत बरीच गुंतागुंत, व्यामिश्रता असते. काही चांगली कथाबीजे असूनही विशिष्ट अनुभवातील जटिलता व्यक्त करण्यात लेखिकेला पुरेसे यश लाभलेले नाही. कथेच्या शेवटी वाचकांना सौम्यसा धक्का देऊन रंजविण्याचे तंत्र लेखिकेने प्राधान्याने स्वीकारले आहे, हे 'नंदादीप', 'ती आणि मी', 'न ये चाँद होगा', 'उलगडा', 'व्रत' इ. कथांमधून स्पष्ट होते.

'अनुबंध' या संग्रहातील काही कथांना मर्यादा पडलेल्या असल्या तरी साधना कामत यांच्या कथालेखनसामर्थ्याची चमक दाखविणाऱ्या कथांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. 'प्रिन्स' ही कथा लेखिकेने अगदी सूचकपणे कुठेही भडकपणा येऊ न देता लिहिली आहे. डेंटिस्ट दस्तुरांचा कुत्रा प्रिन्स व परदेशी गेल्यावर इंग्लिश मुलीशी विवाह करून स्थायिक होणारा मुलगा प्रिन्स यांच्याविषयींच्या हळुवार भावनांची स्पंदने लेखिकेने सूक्ष्मपणे टिपली आहेत. 'व्रत' व 'अनुबंध' या कथांमध्ये काही दोष असले तरी मानवी मनाच्या तळाशी जाण्याचा लेखिकेने केलेला प्रयत्नही महत्त्वाचा आहे. सुरुवातीच्या लेखनात येणाऱ्या दोषांबरोबरच काही निवडक कथा साधना कामत यांच्या कथालेखनसामर्थ्याची जाणीव करून देतात.

'अनुबंध' प्रमाणेच 'आरंभ' हा मंगला गोडबोले यांचा पहिला कथासंग्रह आहे. मंगला गोडबोले यांना कलावंत म्हणून कुतूहल आहे, ते सभोवतालच्या स्त्रीजीवनाचे. आजूबाजूचे स्त्रीजीवन सूक्ष्मपणे न्याहाळून त्याची वास्तव अभिव्यक्ती केल्यामुळे 'आरंभ' मधील कथा अधिक कसदार ठरल्या आहेत.

मंगला गोडबोले यांची कथा ही 'स्त्रीप्रधान कथा' आहे. नवऱ्याकडून मार खाल्यावर त्याला तुरुंगात डांबणारी, माहेरची वाट धरणारी, पण शेवटी हतबल ठरणारी भिमाप्पाची बायको यशोदा (न्याय), बेकार सदूला नवऱ्याच्या वशिल्याने नोकरी लावण्यात असमर्थ ठरलेली नायिका (बेकार), सुखी संसारात परावलंबित्वाचे दुःख भोगणारी 'पांगुळगाडा' या कथेची नायिका, नवरा व मुलगा यांच्या मनस्वी स्वभावामुळे व त्यांच्या भांडणामुळे कोंडीत सापडलेली ताराबाई (मध्यस्थ)-पति-पत्नीमधील विसंवादामुळे व्यथित झालेल्या सुशीलाबाई (करार), अपंगत्वामुळे पतिसहवासाला मुकलेली व शेवटी मृत्यूला जवळ करणारी भग्नहृदया मनीषा (अर्थहीन,) अनाथाश्रमातील मुलाला स्वतःचा मुलगा म्हणून वाढविणारी व शेवटी पश्चात्ताप पावणारी 'अपत्यहीन' या कथेची नायिका, कर्तृत्ववान नवऱ्याच्या दबावामुळे कर्तृत्वशून्यतेचे दुःख भोगणारी सुलू (सख्या रे,) मुलांनी उभारलेले वेगळे विश्व पाहून एककीपणामुळे खंतावणारी शांताबाई (पक्षी अंगणाशी आले) ही विविध स्त्रीरूपे संकलितपणे पाहिली की, मंगला गोडबोले यांच्या कथालेखनातील 'स्त्री-प्रधानता' लक्षात येते.

विविधरंगी स्त्रीसृष्टी चित्रित करणारी 'आरंभ' मधील कथा ही दोषांपासून सर्वस्वी अलिप्त नाही. 'पांगुळगाडा' कथेत कृत्रिमपणे उभारलेला विरोध, 'ओळख' मधील नायिकेच्या स्वभावधर्मात होणारा बदल, यामध्ये तंत्रबद्धतेला लेखिकेने दिलेले प्राधान्य जाणवल्यावाचून राहत नाही. 'अंधारयात्रा' सारखी कथा उगाच आदर्शवादी वळण घेताना दिसते. या कथेतील काही वाक्येच कमालीची कृत्रिम आहेत. "शेवटी डिग्र्या या दारावरच्या पाटीपुरत्या. रात्री दमूनभागून अंथरुणावर टेकणाऱ्या पाठीला माणसांचाच आधार लागतो." (पृ. १०१) "पण मुळात बायकांची आयुष्यं म्हणजे उघडी पुस्तकं. कोणीही कोठूनही वाचायला घ्यावं आणि मनाला येईल तो अर्थ लावावा आणि त्यातही माझ्यासारखीचं आयुष्य म्हणजे तर सुरुवात आणि शेवट गहाळ झालेल्या पुस्तकाची लक्तरं. कुठल्या झुळकेनं कुठले कागद कुठं उडतील कुणी सांगावं ?" (पृ. १०५) 'शरण' ही कथासुद्धा सांकेतिक कथा आहे. सुस्थितीत असलेल्या इंजिनियर रमेशची पत्नी हौस म्हणून लग्नानंतर आठ वर्षांनी प्राध्यापकी पेशा स्वीकारते. रमेशने परवानगी देऊनही ती नव्या जीवनात सुखी होऊ शकत नाही. इतरांच्या वखवखलेल्या नजरा तिला टाळता येत नाहीत. संस्थाचालकांपैकी एकाने अती सलगी करताच तिला पतीलाच शरण यावे लागते. विशाल सामाजिक संदर्भ असलेली ही कथा सूचक व सूक्ष्म न बनता ढोबळ रूप घेते. 'बेकार' किंवा 'पांगुळगाडा' या कथेतील आंतर संघर्षही लेखिकेला ताकदीने उभा करता आलेला नाही.

'आरंभ', 'अर्थहीन', 'करार', 'चिरयौवन' या कथा मंगला गोडबोले

यांच्या लेखनसामर्थ्याचा प्रत्यय देणाऱ्या कथा आहेत. मोठ्या रस्त्यावर असलेल्या एका खेडेगावातील झोपडीवजा हॉटेलात आपल्या आईऐवजी काम करणाऱ्या चंद्री या छोट्या मुलीच्या स्वभावातील विविध छटांचे लेखिकेने बारकाईने वर्णन केले आहे. 'आरंभ' ही कथा आजच्या मराठी कथेत उल्लेखनीय ठरावी इतकी समर्थ कथा आहे. तेरा-चौदा वर्षांची, यौवनाची किंचितशी चाहूल लागलेली पण स्त्री-पुरुष संबंधाची पुरेशी जाण नसलेली चंद्री व तिला भेटलेला ट्रक ड्रायव्हर आणि अकल्पितपणे चंद्रीला आलेला भयानक जीवनानुभव यांचे रेखाटन हृदयस्पर्शी आहे. मालाने भरलेल्या ट्रकमध्ये ड्रायव्हरने अजाण चंद्रीला नेल्यावर घडलेल्या प्रसंगाचे केलेले वर्णन सूचक आहे. "त्याचे तोंड एवढ्या जवळ आल्यावर शर्टाच्या त्या दर्पाची लहर तिच्या अंगाअंगातून गेली. अंगावर उसळून येणारं पाणी दोन्ही हातांनी जिवाच्या करारानं लोटावं तसा तिनं हात हलविण्याचा प्रयत्न केला. पण सगळंच शरीर कुणीतरी जखडलेलं होतं. बेभान लाटांच्या आधीन होण्याखेरीज गत्यंतर नव्हतं. प्रथम काही वेळ ही जाणीव तरी होती. मग तीही लोपली. सगळ्या संवेदना त्या एका संवेदनेत जणू विलीन झाल्या. वीज-पावसांचे आवाज विरले. काही काळ नुसता सन्नाटा आणि नंतर विहिरीत घुमलेला पखवाज !

विस्कटलेल्या मोळीतल्या लाकडासारखी तिनं आपली गात्रे गोळा केली. एक रुपयाच्या पाच नोटा तिच्यासमोर नाचवीत तो म्हणाला, "ये लो और भागो." (पृ. १६)

'अर्थहीन' या कथेच्या नायिकेचे दुःख वेगळेच आहे. मनीषा अपंगत्वामुळे पतिसहवासास मुकते. पती आणि मुले यांच्यापासून शरीराने व मनाने दूर जाते. पतीने शारीरिक सुखास नकार दिल्यामुळे विस्कटलेली मनीषा आपल्या संवेदनाहीन पायांना मेणबत्तीचे चटके देते व झोपेच्या गोळ्या घेऊन स्वतःचे परावलंबी अगतिक असहाय्य जिणे संपवून टाकते. 'अर्थहीन', 'चिरयौवना', 'दुष्टचक्र' या कथांच्या नायिकांच्या मानसिक स्पंदनांचे सुंदर आलेख लेखिकेने उभे केले आहेत.

मंगला गोडबोले यांची निवेदनशैली ही त्यांची स्वतःची शैली आहे. 'जगन्मिथ्या', 'पुत्राचे सहस्र अपराध' या कथांतील संवाद कृत्रिम आहेत. काही वेळा नाटचपूर्णतेचा अधिक वापर केल्यामुळे कथेचा तोल बिघडलेला दिसतो. असे असले तरीही कथा स्त्रीजीवनाचे अनेक पदर संयमितपणे, हळुवारपणे व साधेपणाने उकलीत जाते. लेखिकेच्या प्रत्ययकारी भाषेची काही उदाहरणे सहज देता येतील.

"फार वर्षांपूर्वी यातून सुटका व्हावी म्हणून नोकरीचा प्रयत्न करून पाहिला पण पावसातून बचावण्यासाठी रेनकोट घालावा आणि त्याच्या ओझ्याने आतमध्ये घामाच्या धारा वाहाव्यात तसं काहीसं झालं. सारं घर उगाचच विस्कळित, बखबखलेलं वाटू लागलं." (पृ. ३४)

" माणसांनी ठासून भरलेल्या वातनुकूलित प्रेक्षागृहात वीज गेल्यावर जसे होते तशी साऱ्या घराची कुंद अवस्था झाली होती." (पृ. ३७).

" प्रेताची भीती वाटावी आणि त्याला हातही लावून पाहावासा वाटावा तसे तिच्या मनात त्या फोन करणाऱ्या बाईबद्दल भय आणि कुतूहल दोन्ही दाटून आले." (पृ. ७७).

" पुढचातला रस्ता दुपारच्या जेवणानंतर डुलक्या घेऊ लागल्यासारखा सुस्त दिसत होता." (पृ. ११).

कथासंग्रहाच्या 'आरंभ' या शीर्षकाप्रमाणेच मंगला गोडबोले यांचे कथा-लेखन त्यांच्या प्रारंभीच्या काळातील लेखन आहे, वाचनीय व रंजनपर काही तरी द्यावे अशी भूमिका या लेखामागे नाही. उलट या लेखनामागे जीवन बारकाईने न्याहाळण्याची, त्याला कलारूप देण्याची लेखिकेची वृत्ती आहे. ही वृत्ती पुढे कायम राहिल्यास अधिक सकस कथांची अपेक्षा करावी, एवढ्या मोलाचे हे लेखन आहे.

अनुबंध– साधना कामत, मेनका प्रकाशन.
आरंभ– मंगला गोडबोले, मेनका प्रकाशन
मुंबई 'सकाळ'

माणसांच्या दुरावलेपणाची कथा– 'कवडसा'

'सत्यकथे' सारख्या दर्जेदार वाङ्मयीन मासिकात गौरी देशपांडे, सोनिया उर्मिला सिरूर, पद्मिनी बिनीवाले इत्यादी लेखिकांचे लेखन अधूनमधून प्रसिद्ध होत असते. विजया राजाध्यक्ष किंवा कमल देसाई यांच्या सत्यकथेतील लेखनाला ग्रंथरूप प्राप्त झाल्यामुळे त्यांची कलावंत म्हणून प्रतिमा निर्माण झाली आहे. परंतु सानिया किंवा उर्मिला सिरूर यांचे कथासंग्रह अलीकडेच प्रसिद्ध झाले आहेत. त्या संग्रहावरून त्यांची कलावंत म्हणून काही वैशिष्ट्ये शोधता येतात. १९५६ ते १९७८ या जवळजवळ दोन तपांच्या कालावधीतील एकवीस कथांचा उर्मिला सिरूर यांचा 'कवडसा' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे.

या संग्रहातील कथांत सिरूर याच्या कथालेखनाची, तसेच आजच्या मराठी कथेची वैशिष्ट्ये दिसून येतात. आनंद पाटील यांच्यासारखा सत्यकथेत लेखन करणारा लेखक व्यंकटेश माडगूळकर–आनंद यादव यांच्या प्रादेशिक लेखनाची वाट

चोखाळीत असला तरी स्वतःची लेखनवैशिष्ट्ये प्रकट करताना दिसतो. अस्सल जीवनानुभूती व्यक्त करताना दिसतो. उच्च मध्यमवर्गीय, सुशिक्षित, सुखवस्तू, परदेशी वास्तव्य करणाऱ्या स्त्री-पुरुषांचे जीवन, त्यांचे मानसिक ताणतणाव, त्यांच्या जीवनातील संघर्ष–विरोध हे उर्मिला सिरूर यांच्या कथालेखनाचे विषय आहेत. वेगवेगळी पार्श्वभूमी लाभलेले आनंद पाटील किंवा उर्मिला सिरूर–सानिया यांच्यासारखे कलावंत आपापल्या परीने अस्सल जीवनदर्शन घडविताना दिसतात म्हणूनच ही तुलना.

उर्मिला सिरूर यांची कथा प्रामुख्याने व्यक्तिव्यक्तींमधील दुराव्याची कथा आहे. हा दुरावा पार्वती अम्मासारख्या मोलकरणीला पतीविषयी वाटणारा दुरावा असेल, तर कधी संपन्न, प्रतिष्ठित, सुशिक्षित पति–पत्नीमधील असेल. कुटुंबातील माणसे व एखादी जगावेगळी मुलगी (पतंग), आईवडील व मुलगी (प्रॉमिस), एखादा अधिकारी व त्याच्या हाताखाली काम करणारी मुलगी (घाव) असा पात्रांमधील विरोध सिरूरांच्या कथांतून उभा राहिला आहे. आपल्या अवतीभवती वावरणारी माणसे एका विशिष्ट परिस्थितीत एकमेकांशी बांधलेली असतात, त्यांचे कायमचे नाते असते, ती एकमेकांच्या सहवासात दीर्घकाळपर्यंत राहतातही, तरीही ही सर्व माणसे एकाकी असतात, आतून उद्ध्वस्त झालेली, कोलमडलेली असतात. शरीराने जवळ असली तरी मनाने ती एकमेकांपासून खूप दूर गेलेली असतात. माणसांमाणसांमधील विरोध व अंतर यांचा शोध उर्मिला सिरूर कलावंत म्हणून आपल्या बऱ्याच कथांतून घेताना दिसतात. हा शोध रसिकांना स्तिमित करणारा, अंतर्मुख करणारा, विचार करायला लावणारा आहे. मानवी नात्यातील गूढता व व्यामिश्रता प्रत्ययास आणून देणारा आहे.

'भूमिका' ही पहिलीच कथा लंडन येथे स्थायिक झालेल्या महाराष्ट्रीय जोडप्याची आहे. विक्रम नोकरी करतो तर त्याची पत्नी संतोष एका हॉस्पिटलमध्ये डॉक्टर आहे. आपल्याला मूल नाही म्हणून विक्रममध्ये गंड निर्माण झालेला आहे. तो मद्यपीही बनला आहे. आणि त्याच वेळी संतोषपासून दुरावत चालला आहे. दोघांतील दुरावा नाहीसा करण्याचा आटोकाट प्रयत्न संतोष करते. पण शेवटी अपयशीच ठरते. शेरन वुड या अठरा-एकोणीस वर्षांच्या सुंदर इंग्रज मुलीशी विक्रमचा संबंध येतो. तिला त्याच्यापासून दिवस जातात. आत्महत्येच्या उद्देशाने झोपेच्या जास्त गोळ्या घेतल्यामुळे बेशुद्धावस्थेत शेरन वुडला संतोषच्याच हॉस्पिटलमध्ये आणले जाते. खरे म्हणजे तिला मरायचे आहे. पण संतोषला तिचे मरण म्हणजे आपलेच मरण वाटते. प्रयत्नांची पराकाष्ठा करून संतोष तिला वाचविते. परंतु निर्लेप, निर्विकार विक्रम व सहनशील संतोषमधील अंतर वाढतच जाते. भारतात परतण्याचा ती निर्णय घेते. दोघांमधील वाढलेले अंतर कायमच राहते. घटनांना महत्त्व असलेली

ही कथा सांकेतिक ठरण्याची शक्यता होती. मात्र 'भूमिका' या कथेत तसे घडत नाही. कारण पति-पत्नीच्या परस्परसंबंधातील ताणतणाव, त्यांची सूक्ष्म मानसिक आंदोलने यांच्या चित्रणामुळे ही कथा यशस्वी ठरली आहे.

'चेटूक' या कथेतही पति-पत्नीच्या भावसंबंधाचे नाजुक चित्र आले आहे. नवऱ्याच्या मद्यसेवनामुळे अस्वस्थ झालेल्या, त्याच्यापासून दुरावलेल्या आणि स्वत:चा तोल बिघडवून त्याला दुखावणाऱ्या पत्नीचे चित्रण हा या कथेचा विषय आहे. ही कथा केवळ दोघांच्या संभाषणातून फुलत जाते, हेही या कथेचे एक वैशिष्ट्य आहे.

पात्रांच्या भावसंबंधांचे, त्यांच्यातील ताणतणावांचे, अंतरांचे चित्रण करण्याची उर्मिला सिरूर यांची स्वत:ची अशी पद्धत आहे. कथेत प्रत्यक्ष दोन पात्रे उभी करून त्यांच्यातील विरोध रेखाटण्यापेक्षा तीन पात्रांच्या संपर्कातून, त्यांच्या संभाषणांतून अपेक्षित पात्रांच्या स्वभावातील विरोधलय सिरूर उभ्या करतात. यामुळेच हा विरोध वास्तव, सूचक व कलात्मक ठरतो. 'ओळख' या कथेतील मुक्ता, तिची मैत्रीण अना व पती श्रीरंग, 'लाट' कथेतील शर्वरी, तिची मैत्रीण व शर्वरीचा नियोजित पती, 'झोका' कथेतील सुमी, जया व रेणू या तीन मैत्रिणी, 'अंतर' कथेतील माधव, त्याची पत्नी मेधा व मेधाचे सहकारी डॉ. अनंत याप्रमाणे तीन पात्रांची योजना करून त्यांच्या संभाषणातून, क्रिया-प्रतिक्रियांतून, सूक्ष्म कटाक्षांतून, सूचक उद्‌गारांतून पात्रविरोधाचा अपेक्षित परिणाम लेखिकेने साधला आहे. लेखिकेचे हे कौशल्य विलोभनीय आहे. तिच्या पृथक शैलीचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

'कवडसा' या संग्रहातील सर्वच कथा केवळ एक-दोन माणसांचे नाते सांगणाऱ्या कथा नाहीत. यातील काही कथा 'कुटुंबकथा' आहेत. या कथा गाडगीळ किंवा श्री. ज. जोशी यांच्या कथांची आठवण करून देणाऱ्या आहेत. मात्र त्यांचे 'सिरूरांची कथा' म्हणून एक वेगळे मोल आहे. 'लाव्हा', 'भोवरा', 'प्रॉमिस', 'महाव्रत', 'कोरड' या कथांतील वातावरण कुटुंबातील वातावरण आहे. थंड नवऱ्याशी गाठ पडल्यामुळे संसारात सुखी न झालेली मनुताई माहेरची वाट धरते. छोट्या मुलीला कायमचे सासरी ठेवून काही वर्षे बेछूट, अनिर्बंध जीवन जगते. विशू या कॉलेजात जाणाऱ्या मुलाशी उघडउघड शारीरिक संबंध ठेवते. मुलीच्या लग्नाच्या दिवशी मनुबाई आकस्मिकपणे लग्नघरात येते. सर्वांनी तिरस्कारलेल्या मनुबाईला नातेवाईकांच्या नजरा निखाऱ्याप्रमाणे भाजून टाकणाऱ्या वाटतात. 'महाव्रत' कथेची नायिका नीरजा. हिच्या वाट्याला वेगळेच भोग आले आहेत. निम्मा संसार झाल्यावर, मुलेबाळे झाल्यावर तिच्या लक्षात येते की, आपला नवरा मानसिंग हा समसंभोगी आहे. त्यांच्या मित्राशी त्याचे संबंध आहेत. निदान

मुलांवर तरी असले संस्कार होऊ नयेत म्हणून उन्मळून गेलेली नीरजा मुलांना घेऊन दूर राहते. पण स्वत:च्याच मुलीने शेतावरील कृष्णा नावाच्या शेतकऱ्याच्या मुलीशी संबंध ठेवले आहेत हे समजल्यावर तो पुन्हा उद्ध्वस्त होते. 'प्रॉमिस' कथेची नायिका– अवखळ, अल्लड गीता आईच्या धाकामुळे कमालीची गंभीर बनते. खूप शिकते; पण पुन्हा बेछूट जीवन जगू लागते. ख्रिश्चन मुलाशी लग्न करून परदेशी जाते. नवऱ्याशी न पटल्यामुळे पुन्हा मायदेशी परत येते. तिच्याविषयी सहानुभूती असणाऱ्या वडिलांना वाटते, 'जखमी कबूतर' घरटचात परत आले आहे. आईला आपल्यावर नवीन जबाबदारी आली आहे असे वाटते. आईच्या धाकामुळे दुरावलेली, अकाली गंभीर बनून पुन्हा अनिबंध जीवन जगणारी प्रौढ गीता आपल्या फ्लॅटवर एकटीच रहायला जायचा निर्णय घेते. आईच्या धाकामुळे आयुष्यभर फरपटत गेलेल्या 'गीता' या मुलीची कथा कारुण्याने ओतप्रोत भरलेली आहे.

या संग्रहातील 'पतंग' ही शेवटची कथा परदेशी नोकरी करणाऱ्या शकुन या मुलीची आहे. हुशार, कर्तबगार, निर्भय शकुन परदेशी नोकरी करून कुटुंबाला आधार देते. मात्र तिचे बेबंद व स्वैर वागणे नातेवाईकांपैकी कुणालाच आवडत नाही. मोठ्या कुटुंबातील शकुनचे भावबंध मात्र आईशी आतून कुठेतरी जुळलेले आहेत. आई खूप आजारी आहे असे समजल्यावर शकुन मायदेशी परत येते. तिचा अनिबंधपणा, फटकळपणा, नातेवाईकांना तोडणे, परपुरुषाशी मोकळेपणाने बोलणे, सिगरेट ओढणे घरच्यापैकी कुणालाच फारसे आवडत नाही. पण म्हाताऱ्या आईने तिच्याविषयीचा कोमल भाव सतत जोपासलेला आहे. सर्वांनी नाकारलेल्या शकुनला फक्त तिची आईच स्वीकारते. पूर्णपणे ओळखते. आपल्या इंग्रज मित्रांशी–डीटरशी लग्न करण्याचे आश्वासन शकुन देते. आई मंदपणे हसते. कथेचा शेवट पुढील शब्दांत होतो–

घरघरता आवाज. उचकी शेवटची. मिटलेले डोळे. हाताच्या तळव्यातली धुगधुगी संपतेय. पकडही सैल. पसरलेली निर्जीव केवलवाणी बोटे... तळव्यांकडे ती डोळे ताणून अर्थहीनपणे बघतेय.

" दोरी सपकन् तुटलीय.

भिरभिरण्यातला अर्थ संपलाय. गार तळव्यावर वाकून कपाळ टेकवतेय.

नव्या आयुष्याची वाटचाल...

आईच्या डोळ्यांतले उजळणारे किरण..."

उर्मिला सिरूर यांच्या 'कवडसा' या संग्रहातील कथा विविध जीवनानुभवाचा प्रत्यय देणाऱ्या कथा आहेत. 'कोरड', 'महाव्रत', 'भूमिका' यांसारख्या कथा नाटचपूर्ण घटनाप्रधान रूप घेतात. 'कवडसा','ओळख' या कथांतून हळुवार अनुभवाचा प्रत्यय येतो. 'चौथा' सारखी कथा तर निव्वळ हलकाफुलका विनोदी

प्रसंग विचारते. 'प्रॉमिस', 'भोवरा', 'परमकोडक' या कथांनी व्यक्तिचित्राचा आकार धारण केला आहे, तर 'लाव्हा'सारख्या कथेने जीवनातील दाहकता अनुभवास आणली आहे. सिरूरांच्या कथेत सांचेबंदपणा आलेला नाही. सर्वसाधारणपणे स्त्रियांच्या लेखनाला पडणाऱ्या मर्यादाही या कथालेखनाला पडलेल्या नाहीत. आकारदृष्टचा कधी लहान तर कधी विस्तृत रूप धारण करणाऱ्या, आशयानुरूप बदलते भाषारूप स्वीकारणाऱ्या कथा आपली पृथगात्मता प्रकट करतात.

कवडसा– उर्मिला सिरूर
मौज प्रकाशन, मुंबई
(मुंबई सकाळ)

करुण-गंभीर व नाट्यपूर्ण अनुभवांची गुंफलेली 'माळ'

गेली पंचवीस वर्षे गंभीरपणे आणि मोजकेच कथालेखन करणाऱ्या प्रा. विद्याधर पुंडलिक यांच्या अकरा कथांचा 'माळ' हा चौथा कथासंग्रह आहे. १९६५ ते ७९ या पंधरा वर्षांच्या कालावधीत सत्यकथा, मौज, साधना, प्रपंच, अंजली इत्यादी नियतकालिकांतून या कथा पूर्वी प्रसिद्ध झाल्या आहेत.

पुंडलिक यांची कथा साध्या निवेदनपद्धतीने सांगितली जाते. पात्रांच्या अंतर्मनातील सूक्ष्म विरोध व नाजुक स्पंदने प्रकट करते. तसेच पात्रांच्या बाह्यसंघर्षाला मूर्तरूप देणारी ही कथा जीवनातील करुण-गंभीर, नाट्यपूर्ण, मिष्किल, हळुवार, साधेसोपे, गुंतागुंतीचे अनुभव समर्थपणे व्यक्त करते. या कथेतील विरोधलयीत माणसाचा एकटेपणा, रितेपणा, अगतिकता व दुरावलेपणा व्यक्त होतो. काही वेळा पुंडलिक यांची पात्रे स्वत:शी तर कधी विपरीत परिस्थितीशी निकराने झगडताना दिसतात.

किसन पाळंदे या हुतात्म्याची पत्नी (बोलावणं), केसकर मास्तर व काशीताई (माळ), गोळे मास्तर व प्रा. जोशी (जेव्हा पहाट होते), बुवा (अपार) व 'माझी झोपडी' कथेतील बाळ या सर्व पात्रांच्या अंतर्मनातील विरोधाचे सूक्ष्म चित्रण लेखकाने केले आहे. 'माळ' व 'बोलावणं' या दोन्ही कथा तपशिलाच्या दृष्टीने वेगळ्या आहेत. परंतु दोन्ही कथांतील पात्रांच्या मनांतील संघर्ष पाहण्यासारखा आहे. वारकरी झालेले प्रौढ केसकर मास्तर उतारवयात भगवद्भक्ती करूनही सुखी नाहीत. काशीताईची ओढ त्यांना लागली आहे. नवरा व्यसनी



असल्यामुळे काशीताई पण आपल्या संसारात सुखी नाहीत. पूर्वायुष्यात केसकर मास्तरांकडून कुणा स्त्रीची फसवणूक झालेली असते. पश्चात्तापाने पोळलेले केसकर मास्तर तेव्हापासून वारकरी बनतात. कच्च्या धान्याशिवाय काही खात नाहीत. वारीच्या निमित्ताने केसकर मास्तर व काशीताई ही दोन प्रौढ माणसे एकत्र येतात. एकमेकांना जीव लावतात. थोडीफार सुखावतात. पण शेवटी त्यांच्या वाटाही वेगळ्या ठरतात. दोघांचे प्रेम शारीर पातळीवरचे नाही, लैंगिकही नाही. स्वत:ची मूल्ये जोपासणारी दोन प्रौढ माणसे एकमेकांविषयी आसक्त आहेत, पण संयम पाळणारी आहेत. त्यांच्या संयम ठेवण्यात तडजोडीबरोबरच अगतिकता व हतबलता आहे. 'माळ' या कथेत दोन प्रौढ व दुर्दैवी माणसांचे प्रेम हळुवारपणे व्यक्त झाले आहे.

'बोलावणं' कथेची नायिका गोवा मुक्तिसंग्रामातील हुतात्मा किसन पाळंदे याची पत्नी. मुक्तिसंग्रामात आकस्मिकपणे हौतात्म्य प्राप्त झालेल्या किसनविषयी समाज आदरभावना दाखवितो. खरे म्हणजे हा आदर तिला नको आहे. आपल्या पतीचा आधीचा नादानपणा व निष्क्रियता समाजाला किंवा परिचितांना तिला सांगता येत नाही. स्वत:च्या सुखासाठी ती समाजाच्या दृष्टीने आक्षेपार्ह मार्ग स्वीकारते. तिच्या जीवनात आलेल्या बाबूराव घाटे या गृहस्थांना व्यवहारीपणे स्वीकारते. तिला नवऱ्याच्या हौतात्म्याचा तिटकारा येतो. पतीविषयी वाईट काही बोलता येत नाही. आणि स्वत:च्या नव्या जीवनस्वीकृतीचे समर्थनही करता येत नाही, अशा दुहेरी पेचात ती सापडली आहे. पोर्तुगीज सैनिकांच्या गोळीबाराला साहसीपणे तोंड देणाऱ्या नवऱ्याची हकीकत ऐकून तिची आधीची अस्वस्थता आणखीनच वाढते. तिच्या अंतर्मनातील गुंतागुंत पुंडलिक यांनी प्रभावीपणे 'बोलावणं' कथेत मांडली आहे.

आंतरिक आणि बाह्य संघर्षाला तोंड देणारी, पुंडलिक यांनी निर्माण केलेली पात्रे कमालीची एकाकी आहेत. केसकर मास्तर व काशीताई (माळ), बाळ (माझी झोपडी), पल्लवी व जगदीश (कोनाडा), गोळे मास्तर (जेव्हा पहाट होते), बोलावणं कथेतील नायिका श्रीमती पाळंदे यांचे सामाजिक संदर्भातले विश्व व स्वत:चे भावविश्व यांत खूप अंतर आणि विरोध आहे. 'अपार' कथेतील संगीतकार बुवा समाज, नातेवाईक आणि स्वत:पासूनही संपूर्णपणे तुटलेला आहे. तो केवळ व्यसनी नाही. स्वत:च्या सुरांच्या बेहोशीत जगणारा एक मनस्वी कलावंत आहे. गायिका श्यामाबाई त्याच्याविषयी म्हणते,

" बापू भैय्या ! मी सुरांच्या काठाकाठाने जाणारी. मी काय सांगणार ? पण बुवा बहोत आत आत दूरवर गेलेत. बापू भैय्या, तुझं, माझं, त्यांच्या बायकोचं, सगळ्यांचं जिंदगीवर प्रेम, फार प्रेम आहे. बुवांसारखी माणसं आपल्याला कधी

समजत नाहीत. त्यांची दुनिया वेगळी, आपली वेगळी !" (पृष्ठ १४५)

'कोनाडा' कथेतील जगदीश व पल्लवी हनिमूनसाठी वेलूर हळेबीड म्हैसूर-जवळच्या अपरिचित गावी जातात. शिल्पकलेबद्दल प्रसिद्धी असलेल्या या गावात शिरताच पूर्वी आपण इथे कधीतरी आलो असलो पाहिजे, असा भास पल्लवीला होतो. जगदीशचा अशा गोष्टींवर विश्वासच नसतो. मात्र तेथील देवळात फिरत असताना जगदीशने न पाहिलेला कोनाडा त्याच्या चित्रात रेखाटलेला पाहताच पल्लवीला पुन्हा एक वेळ आश्चर्याचा धक्का बसतो. ती मनातल्या मनात थरारते. आपल्या हातून असे चित्र कसे काढले गेले, याचे जगदीशला केवळ आश्चर्यच वाटत नाही, तर तो कातरही होतो. जगदीशने नकळतपणे चित्रात काढलेला कोनाडा त्याच्या व आपल्या गतजन्माच्या नात्याचा पुरावा आहे, हे समजल्यावर पल्लवी सुखावते. पल्लवीच्या खुषीचे कारण जगदीशला कळलेले नसले तरी त्यांचा हनिमून मस्त रंगतो. शेवटपर्यंत पल्लवी जगदीशला कोनाडयाबद्दल सांगत नसते व पुढेही सांगणार नसते. गतजन्मीच्या नात्यातले 'हळवे नाजूक गुपित' ती मनोमन जपणार असते. तरल आणि भावस्पर्शी अनुभव उत्कटतेने निवेदन करणारी 'कोनाडा' ही या संग्रहातील एक यशस्वी कथा आहे. 'जेव्हा पहाट होते' या कथेत गोळे मास्तर व प्रा. जोशी यांच्या परस्परविरोधी लयीच्या उभारणीतून लेखकाने त्यांच्या मनातील भावस्पंदने फुलविली आहेत.

एकटेपणाप्रमाणेच मृत्यू ही सुद्धा पुंडलिक यांच्या कथेची प्रबळ प्रेरणा आहे. 'गाय' कथेतील आजीचा मृत्यू, 'अपार'मधील संगीतकार बुवांचा मृत्यू, 'बोलावणं'मधील किसन पाळंदेचे हौतात्म्य ही मृत्यूची विविध रूपे आहेत. आजीला आतून कुठूनतरी मृत्यूची ओढ लागली आहे. बुवांची प्रकृती डॉक्टरांच्या मताप्रमाणे अगदी निकोप आहे. त्यांचे एक्स-रेचे रिपोर्ट अगदी व्यवस्थित आहेत. व्यसनी असले तरी मृत्यू त्यांच्या जवळपासही फिरकू शकणार नाही असे त्यांचा तबलजी शिष्य बापू याला वाटते. 'भूप' रागातील नवी चीज बांधताना मृत्यू शेवटी बुवांना गाठतोच. 'बोलावणं' कथेतील एक शिक्षक किसन पाळंदे यांच्याकडे धडाडी, कल्पकता नाही. जात्याच अबोल आणि उदास असलेला किसन आकस्मिक रीत्या प्राप्त झालेल्या आंतरिक बळाच्या जोरावर पोर्तुगीज सैनिकांच्या गोळ्यांना सामोरा जातो. स्वत: बेडरपणे मृत्यूला कवटाळतो. मृत्यू ही जीवनातली अटळ, अपरिहार्य घटना विविध रूपे घेऊन पुंडलिक यांच्या कथांत अवतरते.

गंभीर जीवनानुभव व्यक्त करणाऱ्या पुंडलिक यांना विनोदाचे वावडे नाही. 'शेवटी ऽऽ काय !' ही प्रा. राजे यांच्या जीवनातील एका प्रसंगावर आधारलेली कथा. वर्गातील बरेचसे खेळकर व किंचित गंभीर वातावरण उभे करणारी ही कथा आल्हाददायक आहे. 'लांडगा आला रे आला !' ही कथा हरिभाऊंच्या

'डिस्पेप्शिया' या कथेचे स्मरण करून देणारी मजेशीर कथा आहे. विनायकराव व सुधाबाई यांच्या छोट्या, मध्यमवर्गीय कुटुंबातील एका विनोदी प्रसंगाचे चित्रण या कथेत आले आहे. थोडासा ताप आल्यामुळे व बरगडीत दुखत असल्यामुळे विनायकराव खूप गंभीर होतात. आपल्याला कोणता तरी भयंकर जीवघेणा आजार झाला आहे, असे त्यांना (उगाचच) वाटते. शेवटी ताप जातो. 'लांडगा आला रे आला' अशी गत होते. घाबरट विनायकराव, त्यांची पत्नी, आई व त्यांचे डॉक्टर यांच्या थट्टेचा विषय बनतात. लहान मुलांच्या स्वभावचित्रणात त्यांच्या व प्रौढ माणसांच्या परस्परसंबंधात पुंडलिक यांना विनोदनिर्मितीसाठी भरपूर वाव मिळतो, हे 'गाय' व 'बंट्या' या कथांवरून स्पष्ट होते.

मध्यमवर्गीय प्रौढ स्त्री-पुरुषांच्या चित्रणाप्रमाणेच लहान मुलांच्या व्यक्ति-दर्शनातही पुंडलिक यांना खूप रस आहे. (गंगाधर गाडगीळांच्या बालसृष्टीचे स्मरण व्हावे इतकी परिणामकारकता 'माळ' या कथासंग्रहामधील बालचित्रणात आहे) बेछूट, मिस्कील, प्रेमळ व साहसी असा 'गाय' या कथेतील 'मी', 'बंट्या' या कथेतील धसमुसळी, आडदांड, पुरुषी पण तितकीच हळवी बंट्या, 'माझी झोपडी' कथेचा नायक बाळ ही सर्व 'बालपात्रे' एकरंगी नाहीत. 'गाय'चा नायक समाधानी व प्रेमळ घरातील सुरक्षित, निरागस व लाडका मुलगा आहे. याच्या उलट 'माझी झोपडी' कथेतील बाळ हा मुलगा आहे. आपल्या कुरूप बापाबद्दल, तसेच मारकुट्या आईबद्दल बाळला सतत घृणा व तिरस्कार वाटतो. घरच्या विपरीत वातावरणामुळे आपली संवेदनशीलता, निरागसता, बालसुलभ खेळकर वृत्ती गमावून बसलेला हा एक दुर्दैवी मुलगा आहे. म्हणूनच न आवडणाऱ्या घृणास्पद वास्तव सृष्टीपासून वेगळ्या कल्पित सृष्टीत रमावे– 'आपण मनाने निर्मिलेल्या झोपडीत जावेसे–' त्याला वाटते. 'बंट्या' ही धसमुसळ्या स्वभावामुळे, आडदांडपणामुळे आईला तापदायक झालेली मुलगी आहे. तिला सदैव आईच्या शिव्याच खाव्या लागतात. एके दिवशी तिच्या वडिलांना घरी यायला खूप उशीर होतो. आईपण मनातून अस्वस्थ होते. दरवाजावर मीठ व पाण्याचे भांडे ठेवले की दूर गेलेले माणूस घरच्या ओढीने परत येते, हा संकेत बंट्याला माहीत असतो. आईला या दिवशी या संकेताचे मनावर ताण आल्यामुळेच मुळीच स्मरण होत नाही. बंट्या नेमकी हीच गोष्ट स्वत:हून करते. आधीच कातर झालेले आईचे मन करुणेने व मुलीविषयीच्या मायेने भरून येते. 'बंट्या' कथेतील करुण, हळवे, भावतरल वातावरण केवळ व्यक्तिदर्शन घडवीत नाही, तर कथेची कलात्मक उंची कितीतरी वाढविते. विद्याधर पुंडलिक यांची बालसृष्टी एकसुरी, एकसाची नाही; ती बहुरंगी, सूक्ष्म व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

साध्यासुध्या निवेदनपद्धतीने फुललेली पुंडलिक यांची कथा जीवनातील विविध अनुभव समर्थपणे मांडते. मात्र निवेदनपद्धतीमधील कृत्रिमता कधी कधी मूळ आशयावर कुरघोडी करताना दिसते. संयमितपणे सहजपणे फुलत चाललेल्या कथेत यामुळ विक्षेप येतो. कथाविषय दूर सरकतो. निवेदनातून अप्रत्यक्षरीत्या लेखकच डोकावतो आहे असे वाटते. उदा. 'अपार' मधील तबलजी बापूचे तात्त्विक विचार.

"पण आपण आपलं वेडंवाकडं गाणं गात राहायचं. रियाझ सोडायचा नाही, अरे एक-दोन इंच का होईना, मन तेवढंच वर उचललं जातं, तरंगत राहतं. नाहीतरी बंडू, मातीला, माणसांना, अतिविचारांना चिकटलेलं असतं हे शरीर ! ते थोडं वर गेल्याशिवाय माणसाचं काही खरं नाही." (पृष्ठ १३७)

बंडूला आपले विचार सांगणाऱ्या बापूला बुवांच्या वागण्याचा अर्थ समजत नाही ही 'अपार' कथेतील विसंगती या उद्‌गारांमुळे अधिकच जाणवते. 'बोलावणं' कथेतील मोहनराव व श्रीमती पाळंदे यांच्यातील संवादही नाटकी व मूळ आशयाला धक्का लावणारे आहेत. उदा:

"मोहनराव, थंडीत गार पाण्याची पहिली तपेली घेताना ऊन पाण्याची सवय आपण विसरतो. जगण्याची शरीराला चिकटलेली सवयही अशीच एक क्षण विसरायची, गार पाण्याची ती पहिली शिरशिरी अन् मरणाची ही शेवटची शिरशिरी सारखीच !" (पृष्ठ ५३)

'माळ' संग्रहातील काही कथांत लेखकाच्या निवेदनशैलीतील व्याजनाट्य दिसते, कथेची लय त्यामुळे बिघडते. परंतु त्यांच्या पृथक, साध्या व परिणामकारक शैलीचा प्रत्यय अन्यत्र खूप वेळा येतो. 'कोनाडा,' 'माळ,' 'गाय,' त्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय कथा आहेत. 'माळ'मधील सोपानबाबा यांचे व्यक्तिचित्र व एक निसर्गदृश्य यांचा उल्लेख या संदर्भात करता येईल.

"मध्येच मास्तर एकदम दचकून जागे झाले. कुणाच्यातरी आवाजाने. त्यांनी त्या दिशेनं पाहिलं. कोनाड्यात ठेवलेल्या दिव्याजवळ बसलेले सोपानबाबा अगदी हळूहळू कापऱ्या आवाजात खोकत खोकत 'पांडुरंग पांडुरंग' म्हणत होते. अर्धवट उजेडातली कानटोपी घातलेली त्यांची आकृती, गाठोड्याला मुंडकं फुटावं तशी दिसत होती. त्याचं डोकं डुगडुगत होतं. हातातली माळ थरथरत होती. पण डोळ्यांच्या जागी फक्त अंधाराची भोकं आहेत असं वाटत होतं. भिंतीला टेकून ठेवलेल्या पताकांच्या काठ्यांवर या गाठोड्याची सावली एखाद्या झुलत राहणाऱ्या वेडयावाकड्या अस्वलाप्रमाणे पडली होती." (पृष्ठ ६)

"सकाळी माळशिरसहून वारी पुढे सरकली तेव्हा कुठे पाऊस थांबला. आकाश स्वच्छ झालं. अगदी आतला तळ दिसावा, इतकी त्याची निळाई ओली

आणि तकतकीत दिसू लागली. उन्हामुळे पांढऱ्या ढगांना रुपेरी ओली झिलई चढली. दोन्ही बाजूंना पुरुषभर उंचीच्या उसावरचे फिके जांभळे तुरे थेट डोंगरापर्यंत डुलू लागले. मधूनच हळदीची पिंजर पसरत जावी तसे शेतातले तिळाचे तुकडे दिसत होते.

"वातावरण शांत, प्रसन्न होतं." (पृष्ठ ८)

पुंडलिक यांच्या भाषेला एक लय आहे. या भाषेतून अनुभवातील सूक्ष्मता, नाद, गतिमानता, रंगछटा यांच्या जाणिवेतून समग्र चित्र उभे राहते. पुंडलिक यांच्या प्रतिमासृष्टीने त्यांच्या पृथक शैलीचा प्रत्यय कथा वाचताना येतो. उदा:–

"सबंध आकाश चिखलाच्या पाण्यासारखं दिसत होतं. सूर्य उगवला होता, पण त्याचे किरण ढगांनी झाकले होते. फक्त त्याचा गोल दिसत होता. उदास, फिक्या आणि केविलवाण्या तेजाचा! समोरच्या डोंगरालगतची झाडी मळकट हिरव्या चिरगुटासारखी वाटत होती. एखाद्या वेडयानं गोलगोल फिरून कण्हावं, तसा दीपमाळेभोवती वारा घुमत होता. खालती लांबवर पसरलेली वारी वेगवेगळ्या रंगाचे ठिपके असलेल्या एखाद्या प्रचंड जनावरासारखी वळवळत होती, थरथरत होती." (पृष्ठ ७)

"दारिद्र्यातल्या त्या ल्हाल्हा भुकेनंच एखाद्या फुरशासारखा साऱ्या जीवनाला उलटून दंश केला. आपला असा सूड घेतला." (पृष्ठ १०३)

'माळ' कथासंग्रहातील कथा त्यांच्या आधीच्या कथांप्रमाणे एका बाजूने नव्या कथेशी नाते जोडणाऱ्या कथा आहेत, तरीही त्या कथांचे मूलस्रोत जुन्या कथेत सामावलेले आहेत. 'माळ,' 'गाय', 'जेव्हा पहाट होते', 'अपार' या कथा जुन्या मराठी कथेशी नाते जोडतात. 'बंटया', 'माझी झोपडी' 'कोनाडा' या कथा मनोविश्लेषणपरता व सूक्ष्मता यामुळे एका अर्थी नव्या कथेशी नाते जोडतात. ही 'नातेजोड' केवळ सोयीसाठी. कारण शेवटी कोणतीही कथा ही कलाकृतीच असते. 'माळ' या कथासंग्रहातील कलावंत विद्याधर पुंडलिक यांच्या कथा 'स्वत:'च्या कथा आहेत. कलाकृती म्हणून त्यांना एक मूल्य आहे.

माळ–विद्याधर पुंडलिक
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
(मुंबई सकाळ)

तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा

'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' हा यादव व पाटील यांनी संपादित केलेला तेवीस ग्रामीण कथांचा संग्रह आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण परिसरात गेली काही वर्षे अनेक लेखक कथालेखन करीत आहेत. त्यांच्या कथेचा परिचय न झाल्यामुळे ग्रामीण कथेचे अभ्यासक, समीक्षक दुसऱ्या पिढीपर्यंत थांबत होते. तिसऱ्या पिढीच्या लेखकांचे अस्तित्व मराठी वाङ्मयाच्या इतिहासात नोंदविले जात नव्हते. या ग्रामीण विभागातील लेखकांच्या लेखनाची नोंद व्हावी म्हणून आनंद यादव आणि बाबा पाटील यांनी हे संपादन केले आहे.

आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याची निर्मिती केली आहे. तसेच गेली आठ-दहा वर्षे ग्रामीण साहित्यविषयक टीकात्मक, चर्चापर लेखनही ते करीत आहेत. ग्रामीण साहित्याविषयी त्यांची स्वतःची भूमिका आहे आणि ही भूमिका ते आपल्या लेखनातून व व्याख्यानातून आग्रहपूर्वक मांडीत असतात. 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' या संग्रहास त्यांची विस्तृत प्रस्तावना आहे. १९७०–८० या दहा वर्षांच्या कालखंडातील ग्रामीण लेखकांच्या कथांची निवड करताना आलेले अनुभव प्रस्तावनेत प्रथम नोंदवून नंतर त्यांनी ग्रामीण साहित्य, शहरी साहित्य व दलित साहित्य यांच्या स्वरूपाविषयी तौलनिक विवेचन केले आहे.

मार्च–एप्रिल १९८०च्या सुमारास महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतील दैनिके, साप्ताहिके, मासिके यांना निवेदन पाठवून ग्रामीण परिसरात लेखन करणाऱ्या लेखकांना कथा पाठविण्यासंबंधी त्यांनी निवेदन केले. या निवेदनाला प्रतिसाद म्हणून १६४ लेखकांच्या १८९ कथा त्यांना मिळाल्या. या कथांची जिल्हावार विभागणी करून संपादकांनी काही निष्कर्ष काढले आहेत. परभणी, सोलापूर, सांगली, कराड या शहरांत एकही साहित्यसंस्था कार्य करीत नाही, म्हणून त्यांनी खेद व्यक्त केला आहे. निवड झालेल्या कथाकारांत प्राध्यापक, माध्यमिक व प्राथमिक शिक्षक, कारकून, शेतकरी व गृहिणी अशा समाजघटकातील व्यक्ती आहेत. या लेखकांना मार्गदर्शन होत नाही, त्यांचे वाचन अपुरे असते, साहित्यनिर्मितीचे काम त्यांनी व्रत म्हणून स्वीकारलेले नाही, त्यांच्या लेखनामागे सखोल चिंतनाचा अभाव आहे, भाषेच्या शुद्ध-लेखनाविषयी त्यांना पुरेशी कल्पना नाही, कथेतील भाषेच्या वापरासाठी असणाऱ्या अंतर्मुख वृत्तीचा अभाव नवीन लेखकांच्या लेखनात आढळून येतो, हकीकत सांगावी अशा प्रकारे हे लेखक लेखन करताना दिसतात, आपल्या लेखनावर संस्कार करण्याचा प्रयत्न ते करीत नाहीत, दलित कथेच्या प्रभावामुळे या लेखकांच्या लेखनात साचेबंदपणा येत चालला आहे, इत्यादी निष्कर्ष आनंद यादव यांनी

ग्रं...४

काढले आहेत. नव्याने लेखन करणाऱ्या कथाकारांच्या लेखनाच्या अभ्यासातून काढले गेलेले हे निष्कर्ष स्वीकारार्ह आहेत, कथेच्या लेखकांना व अभ्यासकांना विचार करायला लावणारे आहेत. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागांतून आलेल्या जवळजवळ दोनशे कथांतून तेवीस कथांची चोखंदळपणे निवड करण्याचे मोलाचे कार्य आनंद यादव यांनी केले आहे. मात्र आपल्या प्रस्तावनेच्या उत्तरार्धात त्यांनी मांडलेले, आधीच्या ग्रामीण साहित्याला दोषपूर्ण ठरविणारे, शहरी साहित्य व दलित साहित्य यांच्या मर्यादा स्पष्ट करणारे विचार वादग्रस्त ठरतील असे आहेत.

पहिल्या पिढीतील ग्रामीण साहित्यिकांनी सामाजिक वास्तवाच्या निर्मिती-साठी विनोदी किश्शाचा वापर केला. आपल्या साहित्यात विकृत, अतिशयोक्त व भडक रूप दिले. शहरी साहित्याने कलात्मकतेविषयी भ्रामक कल्पना उराशी धरली. मनोविश्लेषणपर साहित्य कलात्मक आहे, असे म्हणण्याकडे सर्वसाधारण कल निर्माण झाला. व्यक्तिकेंद्रित वृत्तीलाच अधिक प्राधान्य दिल्याने १९६०नंतरचे शहरी साहित्य सामाजिक व्यापक अनुभवांना पूर्णतः पारखे झालेले आहे. पुढार-लेल्या दलित जातीतील पुढाऱ्यांना इतर दलित जातीतील व्यक्तींना आपल्यामध्ये प्रत्यक्षात घेण्यामध्ये अपयश आले आहे. आनंद यादवांचे वरील विचार तर्कसंगत नाहीत. प्रारंभीच्या ग्रामीण साहित्यनिर्मितीचे श्रेय प्रा. श्री. म. माटे यांना दिले जाते. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील यांनी सुरुवातीच्या काळात गंभीरपणे ग्रामीण साहित्याची निर्मिती केली आहे. मनोविश्लेषणपर साहित्य कलात्मक आहे असे म्हणण्यापेक्षा १९६० नंतरच्या साहित्यात मनोविश्लेषणाला महत्त्व आले आहे असे म्हटले पाहिजे. 'मनोविश्लेषणपरता' हा वेगळा घटक शहरी साहित्याचा गुणविशेष आहे की, समग्र साहित्याचा, असाही प्रश्न निर्माण होतो. ('गोतावळा' सारख्या आनंद यादवांच्या कादंबरीत येणारे मनोविश्लेषण प्राध्यापक म्हणून त्यांच्यावर झालेल्या संस्कारातून आले आहे, नव्या साहित्याच्या मूल्य संकल्पनांमुळे आले आहे, की त्यांच्या कलावंत म्हणून असलेल्या सर्जनशील व्यक्तिमत्त्वातून आले आहे, या प्रश्नांचा शोध घ्यायला हवा.) दलित कथाकाराने मांडलेला ग्रामीण जीवनाविषयीचा अनुभव दलित साहित्यात स्वीकारायचा की ग्रामीण साहि-त्यात? प्रस्तावनेत आनंद यादव यांनी प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणीचे पक्षी' आणि लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या पुस्तकांचा उल्लेख दलित कथाकादंबऱ्यांना नव्या दिशेने प्रेरणा देणारी निर्मिती या संदर्भात केला आहे. कैकाडी जातीतील लेखकाच्या जीवनानुभवावरचे पुस्तक आपण 'दलित साहित्य' या प्रकारात स्वीकारलेले आहे. साहित्याचे केले जाणारे वर्गीकरण जुजबी, विवेचनाच्या सोईसाठी केलेले असते. साहित्यातील वाङ्मयीन मूल्यांचा विचार केला असता ही वर्गीकरणे अडचणीत आणणारी ठरतात. ग्रामीण साहित्याविषयीची

स्वतःची वेगळी भूमिका घेतल्यामुळे व तिचे समर्थन करण्याचे निश्चित केल्यामुळे 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा'याच्या प्रस्तावनेत अशा विसंगती आढळून येतात. कोणताही अस्सल व परिणामकारक जीवनानुभव देणारे साहित्य कोणत्या प्रकारात बसते हे पाहण्यापेक्षा साहित्य म्हणून त्याची गुणवत्ता काय याचा विचार केला, की ही विसंगती राहणार नाही.

'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' या संग्रहात आनंद पाटील, बा. ग. केसकर, उत्तम बंडू तुपे, दे. शि. दुबलकर, वामन होवाळ या थोडयाफार परिचित अशा कथाकारांच्या कथांबरोबर अगदी नव्याने लिहिणाऱ्या अपरिचित कथाकारांच्या कथा आहेत.

आनंद पाटील हा सत्यकथेत लिहिणारा लेखक. 'फुगडचा' ही त्याची कथा विशेष उल्लेखनीय आहे. सुशिक्षित प्राध्यापक मुलगा व खेडयात इतर मुलांबरोबर राहणारी त्याची आई यांच्या भावसंबंधातील ताणतणाव हा या कथेचा विषय आहे. मराठी ग्रामीण कथेला नवे आशास्थान आनंद पाटील या कथाकारामुळे मिळाले आहे.

१९७०–८० या दशकात लिहिणारे ग्रामीण लेखक आपल्या बालजीवनाच्या चित्रणात रमलेले दिसतात. सुरुवातीच्या लेखनात आपले खेडयातील भावविश्व (आणि तेही बाल्याशी निगडित) रंगवावे असे त्यांना वाटणे योग्य असले तरी काही कथांच्या एकत्रित वाचनाने त्यांच्या जीवनानुभवातील तोचतोपणा जाणवत राहतो. 'ताण'(शरद मुंजवाडकर), 'सबावाचं यवावं'(अर्जुन शिवराम भोसले); 'काजळरात (प्रकाश विनायक कामत), जांभळ (बबन शिंदे), खुरपं दोरी, (आप्पासाहेब जकाते), 'टोपी'(जयकृष्ण बावनकुळे), 'कावळा'(सुरेश शिंगटे) या कथांतून व्यक्त झालेला अनुभव बालजीवनाशी निगडित आहे.

बदलत्या सामाजिक स्थितीचे, ग्रामीण राजकारणाचे, पंचायतीमधील हेव्यादाव्याचे दर्शन घडविणाऱ्या 'उंटाची चाल'(गोविंद केळकर), 'भोवरा'(रामचंद्र मुंजवाडकर), 'नवी बाँडी' (मोहन पाटील) या कथा वाचनीय आहेत. मात्र या कथांच्या लेखनात चिंतनशीलतेचा अभाव आहे. स्त्रीच्या असहायतेचे, तिच्या शोषणाचे चित्रण हा ग्रामीण तसेच दलित कथेचा एक विशेष आहे. 'कानकोंडी' (बा. ग. केसकर), 'धुगाट' (शंकर सखाराम) या दोन कथांतून स्त्रीची असहायता परिणामकारक रीत्या व्यक्त झाली आहे. विरोधाचा वापर करून कथा पुरविणे, नाटयमयता, अद्‌भुतता व कारुण्य आणून कथा परिणामकारक करणे या कथातंत्राचा वापर विजया जहागीरदार (तुऱ्याचा पाऊस), विजयकुमार नांगरे (प्राक्तन) या लेखक-लेखिकांनी केला आहे.

तिसऱ्या पिढीतील ग्रामीण कथाकारांच्या कथांचे स्वरूप असे आहे. या

संग्रहामुळे नवीन कथाकारांचा, त्यांच्या कथांचा परिचय रसिकांना, अभ्यासकांना होईल. लेखनाच्या प्रारंभावस्थेत दिसणाऱ्या मर्यादा या कथाकारांच्या लेखनातही आहेत. भविष्यकाळात या मर्यादा उल्लंघून अधिक कसदार निर्मिती झाली तर आनंद यादव म्हणतात त्याप्रमाणे केवळ 'ग्रामीण कथे'लाच नव्हे, तर समग्र मराठी कथेला या नव्या लेखकांच्या निर्मितीमुळे देणे मिळेल.

तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा. संपा. आनंद यादव, बाबा पाटील.
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
(मुंबई सकाळ)

'पूर्वज'– गतकालीन व्यक्तींचा घेतलेला कलात्मक शोध

साहित्यनिर्मिती करणारा कलावंत माणूस शोधण्याची धडपड करीत असतो. त्याच्या भोवतालचे जीवन माणसांनी गजबजून गेलेले असते. त्याचा कलाकृतीतील जीवनानुभव माणसांच्या संदर्भातच व्यक्त होत असतो. कलावंताने घेतलेला हा शोध कधी वर्तमानकालीन माणसांचा असेल, कधी ऐतिहासिक काळातील माणसांचा असेल, तर कधी निकटच्या भूतकाळातील सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या माणसांच्या जीवनाचा असेल.' आनंदी गोपाळ' सारखी श्री. ज. जोशींची कादंबरी, 'टिळक–आगरकर'सारखे विश्राम बेडेकरांचे नाटक या कलाकृतीत नजीकच्या भूतकाळातील व्यक्तींचा शोध श्री. ज. जोशी आणि बेडेकरांनी घेतलेला आहे. १८७०–१९२० हा पन्नास वर्षांचा महाराष्ट्रातील कालखंड राजकारण, समाजकारण आणि सांस्कृतिक जीवन यांच्या दृष्टीने महत्त्वाचा कालखंड आहे. हरिभाऊ आपटे, कवी केशवसुत, बालकवी, नाटककार देवल, गडकरी, नटवर्य गणपतराव जोशी, आगरकर, लो. टिळक, रावसाहेब मंडलिक इ. व्यक्ती वरील पन्नास वर्षांच्या कालखंडात आपले कर्तृत्व गाजविणाऱ्या काही महत्त्वाच्या व्यक्ती आहेत. पन्नास–साठ वर्षांपूर्वी समाजमनावर आपला ठसा उमटविणाऱ्या या व्यक्तींविषयी चरित्रपर, अभ्यासपर, बरेच लिहिले गेले आहे. काहींनी आत्मचरित्रपर लेखन केले आहे. अभ्यासपूर्ण लेखनात भूतकाळात होऊन गेलेल्या व्यक्तींची परिपूर्ण माहिती मिळतेच असे नाही. असे लेखन बहुधा भाष्यवजा, विशिष्ट व्यक्तीच्या जीवनाचा, कर्तृत्वाचा आढावा घेणारे असते, काहीसे स्थूल स्वरूपाचे असते. माणूस शोधण्याचा प्रयत्न या प्रकारच्या लेखनात नसतो. गतकालीन व्यक्तींच्या जीवनात अशा

रिकाम्या जागा असतात की काही कलावंतांना त्या ठिकाणी आपल्या परीने रंग भरावेसे वाटतात. ही माणसे आपापल्या क्षेत्रात अलौकिक कर्तृत्व गाजवणारी असली तरीही शेवटी मानवी भावभावना असणारी, विकारवशतेमुळे जनसामान्यांच्या खूप जवळ जाणारी, साधीसुधी स्खलनशील माणसेच असतात. त्यांचे भावजीवन, त्यांच्या जीवनातील ताणतणाव, संघर्ष, रागलोभ, ईर्षा, आशाआकांक्षा काही कलावंतांच्या कुतूहलाचे विषय बनतात. वि. ग. कानिटकर या प्रकारचे कुतूहल असणारे लेखक आहेत. त्यांच्या 'पूर्वज' या कथासंग्रहात हरिभाऊ आपटे, काशीताई कानिटकर (अमित्र), विष्णुदास भावे (पहिले नाटक), विष्णुपंत छत्रे (ग्रँड इंडियन सर्कस), गणपतराव जोशी (चरित्र), पंतप्रतिनिधी (सणंग), भास्करराव बखले (मंथरे, तुला लागले पिसे), रावसाहेब मंडलिक (दत्तक) या व्यक्तींवरील कथा आहेत.

हरिभाऊ आपटे आणि गोविंदराव व काशीबाई कानिटकर यांच्या मैत्रीची माहिती साहित्यप्रेमी रसिकांना स्थूलपणे आहे. 'अमित्र' या कथेत तिघांच्या भावसंबंधातील तणावाचा एक क्षण लेखकाने फुलवला आहे. आपण केलेले 'गीतांजली'चे भाषांतर हरिभाऊंनी प्रसिद्ध करावे असे गोविंदरावांना वाटत असते, पण आकस्मिकपणे हरिभाऊंची प्रस्तावना असलेले, मॅकमिलन कंपनीने प्रसिद्ध केलेले 'गीतांजली'चे दुसऱ्या कुणाचे तरी भाषांतर गोविंदरावांच्या हाती पडते. ते भाषांतर पाहून गोविंदरावांना आश्चर्याचा धक्काच बसतो. आपण 'नवयुगा'त आधीच केलेल्या भाषांतराचा या प्रस्तावनेत उल्लेखसुद्धा नाही, हे पाहून गोविंदराव अधिकच अस्वस्थ होतात. "हा हरिभाऊ वरून दिसतो तसा नाही; आतल्या गाठीचा आहे," हे नारायण बापूजीचे वाक्य आठवल्यावर ते अधिकच अस्वस्थ होतात. चिडतातसुद्धा. काशीताईंना हा सगळा प्रकारच चमत्कारिक वाटतो. आपल्याला लेखनकार्यात उत्तेजन देणाऱ्या या मानलेल्या भावाने असे का वागावे, याचा उलगडा त्यांना होत नाही. त्या हरिभाऊंना चिठ्ठी पाठवितात. हरिभाऊ उत्तराच्या आपल्या चिठ्ठीत सयुक्तिक खुलासा करतात. गोविंदरावांचे आधीचे भाषांतर त्यांना पसंत नसते. गोविंदरावांचे दोष दाखविण्याचे कटू काम त्यांना टाळायचे होते म्हणून ते प्रस्तावनेत त्यांच्या भाषांतराचा उल्लेख करीत नाहीत. गोविंदरावांना क्लेश देणे हरिभाऊंना जमणार नव्हते. ते काशीताईंची सपशेल माफीच मागतात. त्यांच्या पत्रातील शेवटचे वाक्य असे– "रावसाहेबांविषयी माझ्या मनात नितांत आदरच आहे. परंतु स्वभाव उत्तम असलेली विद्वान माणसे काव्य वा कादंबरी उत्तम रचतीलच असे नाही." काशीताई हरिभाऊंच्या पत्रातील सूचनेप्रमाणे चिठ्ठी फाडून टाकतात. त्यांना योग्य आणि स्वत:ला पटणारा खुलासा मिळतो. पण हरिभाऊंचे आणि आपल्या पतीचे संबंध दुरावल्यामुळे ह्या दोघांच्या स्नेहाची धारदार

पाती आपल्याला अखेरपर्यंत रक्तबंबाळ करीत राहणार, या कल्पनेने त्या अधिक दु:खी होतात.

'पहिले नाटक' ही विष्णुदास भावे यांच्या जीवनावरील कथा भाव्यांच्या पहिल्या नाटकाच्या निर्मितीची आणि प्रयोगाच्या वेळच्या वातावरणाचा प्रत्यय देणारी कथा आहे, उलट 'ग्रँड इंडियन सर्कस' ही विष्णुपंत छत्रेंच्या जीवनावरील कथा त्यांच्या धडपडीची, जिद्दीची आणि महत्त्वाकांक्षेची कथा आहे. जगावेगळे छंद जोपासणारा, कसरतीचे वेड असणारा विष्णू छत्रे संस्थानिकांच्या मदतीने स्वत:ची भारतीय सर्कस सुरू करतो. धोंडू जोशी हा त्याचा मित्र त्याला या बाबतीत साहाय्य करतो. सर्कशीत काम करायला शेलाटचा बांध्याची, लवचिक शरीराची चपळ मुलगी विष्णूला हवी असते. लहानपणी खेळ करताना पाहिलेली आवडी डोंबारीण तो शोधून आणतो. कारण गरती बाई या कामासाठी उपयुक्त ठरणार नाही हे त्याला पक्के माहीत असते. सरस्वतीशी आधीच विवाह झालेल्या विष्णूचे आवडीशी असणारे संबंध 'रीती'प्रमाणे नसतात हे धोंडू जोशीच्या लक्षात येते. लोकप्रवादाला विष्णू भीक घालत नाही हे माहीत असूनही धोंडू म्हणतो– "खोकल्याची उबळ आणि बाईचा गैरसंबंध लपून राहात नाही...श्रीमंतांना... हे वाक्य मध्येच तोडून विष्णू म्हणतो–" कळायचे तेव्हा कळू दे. मलाही मुद्दाम माझा व्यवहार लपवायचा नाही. इतरांनी तो समजून घ्यावा एवढीच माझी अट आहे.' धोंडू जोशी गप्प बसतो. आवडीची हकीकत विष्णूची आई आणि पत्नी यांच्या कानी घालायचा बेत तो विष्णूचा क्रुद्ध अवतार पाहिल्यावर रद्द करतो. 'ग्रँड इंडियन सर्कशी'चा पहिला प्रयोग व्यवस्थितपणे पार पडतो !

'चरित्र' आणि 'दत्तक' या दोन कथांत मनोविश्लेषणाला अधिक महत्त्व आहे 'चरित्र'चे नायक गणपतराव जोशी यांनी आपल्या कसदार अभिनयाने तत्कालीन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले, पण वैयक्तिक जीवनात ते अपयशी, दु:खी आणि एकाकी होते. रंगू या त्यांच्या मुलीचा तिच्या नवऱ्याकडून होणारा छळ, प्रथमपत्नी मथू हिचा मृत्यू, दुसरी पत्नी लक्ष्मी वेडसर असणे या सर्व पार्श्वभूमीवर त्यांना दिलासा मिळतो तो अंबू या बालविधवा बहिणीकडून. ती कोकणातून आल्यावरच ते प्राण सोडतात. लक्ष्मणराव जोशींचे 'रामदास' नाटक पडते. गणपतराव नेहमीप्रमाणे दारू पिऊन त्या नाटकात काम करीत नाहीत. कारण त्यांचे नाटचक्षेत्रातील मार्गदर्शक कोकणातील रोडे गुरूजी प्रयोग पाहायला आलेले असतात. 'दारू पिऊन रामदासांची भूमिका करू नकोस' या रोडे गुरुजींच्या आदेशामुळे आपले नाटक पडले हे नाटककार लक्ष्मणराव जोशी यांना अखेरच्या क्षणी गणपतराव सांगतात तेव्हा कथेतील कारुण्य अधिकच वाढते. 'दत्तक' ही तत्कालीन कृतिशील समाजसुधारक रावसाहेब मंडलिक यांच्या जीवनावरील कथा आहे. अपत्यहीन रावसाहेब

सामाजिक प्रतिष्ठा, व्यावसायिक प्रगती आणि अन्नपूर्णेबरोबरचे वैवाहिक जीवन या सर्व गोष्टींनी सुखी आहेत व अपत्यप्राप्तीसाठी दुसरा विवाह करणे सुधारक रावसाहेबांना पसंत नाही. आपली पत्नी, नातेवाईक, हितचिंतक या सर्वांची विनंती ते झिडकारून देतात. शेवटी सुवर्णमध्य काढतात. आपली पत्नी अन्नपूर्णा हिची बहीण कृष्णा पुत्रजन्मानंतर मरण पावते. तिचा मुलगा धोंडू याला दत्तक घ्यायचा निर्णय ते शेवटी घेतात. संवेदनशील, विचारप्रवण रावसाहेबांच्या मनाची घालमेल या कथेत व्यक्त झाली आहे. वक्तशीर, तत्त्वाला जागणारे, करडया शिस्तीचे भोक्ते पण भावनाप्रधान आणि सहृदय असे रावसाहेब मंडलिक या कथेत उभे राहिले आहेत. रावसाहेब आणि त्यांची पत्नी अन्नपूर्णा यांच्या नाजुक आणि भावपूर्ण संबंधाची पार्श्वभूमी या कथेला लाभली आहे.

'सणंग' ही पंतप्रतिनिधींच्या जीवनावरील संस्थानी वातावरण चित्रित करणारी कथा आहे. संस्थानातील माणसे, त्यांचे गैरव्यवहार, स्वैर स्त्रीपुरुषसंबंध, कपटकारस्थाने यांचे दर्शन या कथेत होते.

'मंथरे, तुला लागले पिसे' ही सुप्रसिद्ध गायक भास्करबुवा बखलेंच्या जीवनावरील कथा आहे. विष्णुपंत छत्रे यांच्यावरील कथा आणि ही कथा या दोहोंत साम्य आहे. धडपड करून स्वतःच्या सुप्त गुणांचा शोध घेणाऱ्या दोन मुलांच्या या कथा आहेत. लहान भास्करचे संगीताचे वेड त्याचे वडील रघुनाथराव यांना मुळीच आवडत नाही. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या कंपनीत नाटकात काम करण्यासाठी गेलेल्या भास्करला परत आणण्याकरिता म्हणून ते मुंबईस जातात. पण भास्कराने संगीतात केलेली प्रगती आणि अण्णासाहेब किर्लोस्करांच्या कंपनीतील चांगले व घरगुती वातावरण आणि प्रत्यक्ष अण्णासाहेबांचे विशुद्ध चारित्र्य, त्यांच्या वागण्यातील आदब व दरारा पाहून भारावून जातात. भास्करला घरी न्यायचा बेत बदलून एकटेच परत जातात. भास्करबद्दल सहानुभूती दाखवणाऱ्या नवऱ्याचा हा वेगळा अवतार पाहून त्यांची पत्नी जानकी आश्चर्यचकित होते.

'पूर्वज' कथासंग्रहातील कथा आकाराने छोटया असल्या तरी परिणामकारक आहेत. कथाविषयासाठी निवडलेल्या असाधारण व्यक्तीच्या स्वभावातील एखादाच पैलू फुलविला गेला आहे. त्यामुळे या कथांना एकाग्रता आली आहे.

वि. ग. कानिटकर परिमित आणि नेमक्या शब्दांत वातावरण आणि व्यक्तिरेखा उभ्या करतात. उदा. 'ग्रॅण्ड इंडियन सर्कस' मधील सर्कशीचे वातावरण, अण्णासाहेब किर्लोस्करांच्या नाटचप्रयोगाचे वातावरण, पंतप्रतिनिधींच्या संस्थानातील वातावरण, इत्यादी. 'ग्रॅण्ड इंडियन सर्कस' मधील आवडी, 'दत्तक' मधील रावसाहेब मंडलिक, 'सणंग' मधील दाजीबा, 'मंथरे, तुला लागले पिसे' मधील रघुनाथराव या व्यक्तींचा उल्लेख करता येईल. भास्करबुवा

बखल्यांचे वडील रघुनाथरावांचे वर्णन "डोक्यावर कडांना काळसर झिलई चढलेली पगडी होती. भव्य कपाळावर दुबोटी गंधाचे पाखरू होते. श्मश्रू केलेली नसल्याने पांढऱ्या दाढीचे खुंट चेहऱ्यावर सर्वत्र डोकावत होते. दोन्ही ओठांवर पिकलेल्या मिश्यांचे दाट सुरंवट हनुवटीपर्यंत खाली आलेले होते. गळ्याभोवती उपरण्याचा अपसव्य वेढा होता आणि पैरणीवरून त्याचे एक टोक उजव्या गुडघ्यापर्यंत पोचले होते. कमरेला खोचलेले धोतर उजव्या गुडघ्यापर्यंत एका अंगाने वर होते. तर डावीकडचा सोगा डाव्या पायाच्या अंगठ्यापर्यंत खाली लोंबत होता. रस्त्याच्या कडेने विचारमग्न स्थितीत चालणाऱ्या अशा व्यक्तीकडे कुणाचे लक्ष जाण्याची शक्यताही नव्हती." नेमके, वास्तव वातावरण व सूक्ष्म व्यक्तिरेखा निर्माण करणारे कानिटकर निवेदनाच्या ओघात अगदी बारीक सारीक तपशील पुरवतात. गणपतराव जोश्यांची बालविधवा बहीण अंबू कोकणातून आलेली असते. तिच्याविषयीचा तपशील–"ती आदल्या दिवशीच न्हाव्यापुढे बसून आली असावी. डोक्यावर घेतलेला लाल अलवणाचा पदर त्यामुळे सारखा सरकत होता. चेहऱ्यावर भारीच तुकतुकीतपणा दिसत होता." "रघुनाथराव घाईघाईने धोतराच्या निऱ्या खोचीत आत आले आणि पंचाला जानवे पुसत ऐकू लागले."

"तापलेल्या जमिनीत पाणी पाहता पाहता रिचावे, तशी अलोट गर्दी थिएटरच्या दरवाजातून काही मिनिटांतच खालच्या भागात अदृश्य होत होती."

कथांची भाषा तत्कालीन भाषेशी साम्य असणारी अशीच आहे. हरिभाऊंच्या पत्राचा या संदर्भात उल्लेख करता येईल. पण 'सणंग' कथेतील संवादाची भाषा आधुनिक रूप घेताना दिसते. रावसाहेबांच्या तोंडी आलेला 'अभ्यासिका' हा शब्द त्यावेळी बोली भाषेच्या वापरात होता का, असा प्रश्न मनात येतो. भास्कराच्या संगीताच्या वर्णनाच्या वेळचे 'जसं काही सुरांचं चांदणं कोसळत होतं.' हे रघुनाथरावांचे वाक्य खटकण्यासारखे आहे. 'पूर्वज'–मधील असे काही किरकोळ दोष वगळता तत्कालीन सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यात लेखकाला यश मिळाले आहे. वि. ग. कानिटकर यांनी घेतलेला हा 'व्यक्तिशोध' एका कलावंताचे सामर्थ्य प्रकट करणारा आहे.

पूर्वज–वि. ग. कानिटकर
श्री विद्या प्रकाशन पुणे ३०
(मुंबई सकाळ)

'दिवस सोनियाचे'—स्त्रीजीवनाच्या विविध समस्यांशी निगडित कथा

दीपा गोवारीकरांच्या 'दिवस सोनियाचे' या कथासंग्रहात समाविष्ट केलेल्या चौदा कथा स्त्रीजीवनाशी निगडित आहेत. या कथांना कुटुंबकथाही म्हणता येईल. लेखिकेभोवती वावरणाऱ्या मैत्रिणी, नवविवाहिता, नववधू, गृहिणी, माता यांचे जीवन हा गोवारीकरांच्या कथांचा विषय आहे.

'दरी', 'मायाची आई', 'डोळ्यांत वाच माझ्या' या कथा मैत्रिणींच्या संदर्भातील कथा आहेत. यांतील पहिल्या दोन कथा आत्मनिवेदनपर शैलीत लिहिलेल्या आहेत. 'दरी' कथेतील मैत्रीण विमली एका खेळकर, मनमोकळ्या कुटुंबातील मुलगी, तर लेखिकेच्या घरात कुटुंबातील माणसांत सतत दुराव्याचे वातावरण. विमलीच्या घरातील प्रसन्न वातावरण पाहून निवेदिका सुखावते आणि आपल्या घरातील स्नेहशून्य वातावरणाशी त्या वातावरणाची तुलना करते. दोघींची लग्ने होतात. त्यानंतर मात्र दोन्ही घरांतील परिस्थिती बदलते. विमलीच्या घरची माणसे परस्परापासून दूर जातात. आणि निवेदिकेच्या घरातील माणसांना एकमेकांविषयी आपुलकी वाटू लागते. असे का व्हावे, हा प्रश्न लेखिकेला शेवटी पडतो. 'मायाची आई' ही कथा माया या लेखिकेच्या मैत्रिणीच्या आईचे चित्रण करणारी कथा आहे. मायाच्या आईच्या स्वभावातील कंगोरे स्पष्ट करणारी कथा आहे. बोलभांड, दिखाऊपणे वागणारी मायाची आई तिच्या नवऱ्याच्या अगदी विरुद्ध स्वभावाची आहे, आणि माया तशी नसली तरी अगदी नकळतपणे आईच्या स्वभावातील काही गुण मायामध्ये उतरले आहेत. 'डोळ्यांत वाच माझ्या' ही वाचकांना धक्का देणारी एक कथा आहे. या कथेची नायिका आहे नवविवाहिता नीना. लग्नाच्या वेळी बोहल्यावर चढताना तिला तिचा नवरा प्रेमळ, समंजस, अगदी दयाघन वाटू लागतो. तो आपल्याविषयी वाजवीपेक्षा जास्त समजूतदारपणा, करुणा दाखवीत आहे, असे नीनाला वाटते. मात्र पंधरा दिवसांनी नीना-अजय काश्मीरहून आल्यावर नीना, गीता या आपल्या मैत्रिणीने नवऱ्याविषयी विचारलेल्या प्रश्नावर आपली प्रतिक्रिया पुढील शब्दांत खोडकरपणे व्यक्त करते– 'छे ! दया नाही नि माया नाही. पक्का दुष्ट आहे !' गोवारीकरांच्या या तीन कथा विरोधावर आधारलेल्या, सांकेतिक व ढोबळ स्वरूपाच्या आहेत. वास्तवता आणि कलात्मकतेपेक्षाही त्यांच्यात तंत्रबद्धता अधिक आहे.

अधिक कारुण्य असणाऱ्या, वाचकांना अंतर्मुख करणाऱ्या आणि मनोविश्लेषणपर अशा काही कथा या संग्रहात आहेत. या कथांत आकाराने छोटी पण

आशयघन अशी कथा म्हणजे 'गौर.' ही कथा आत्मनिवेदनपर आहे. लहानपणीची नाचत-बागडत गौर आणण्याची हौस मोठेपणी राहात नाही. तारुण्य-सुलभ प्रवृत्ती-मुळे या गोष्टी करण्याचा संकोच मुलींना वाटतो. लेखिकेचेही तसेच झाले आहे. आईच्या सांगण्यावरून ती गौर आणायला मैत्रिणीबरोबर नदीवर जाते. गौर घेऊन परत येताना तिला गावातील सवाष्ण बाईची प्रेतयात्रा दिसते. तिचे मन चरकते. ती गौर घेऊन हरवल्यासारखी घरी येते. आईला काहीच कल्पना नसल्यामुळे तिला 'आली गौर' 'आली गौर' म्हणण्याचा आई आग्रह धरते. 'आली गौर आली गौर' म्हणत हातातले ताम्हन सावरीत ती रेखलेल्या पावलावरून पावले टाकीत पुढे चालू लागते. सूक्ष्म मनोदर्शन, विरोध, सूचकता या गुणांमुळे 'गौर' ही कथा कलापूर्ण बनली आहे. नवविवाहितेच्या जीवनावरील 'पाचा उत्तरी निष्फळ' हीसुद्धा एक यशस्वी कथा आहे. लग्नानंतरही अप्रसन्न, उदास, अलिप्त व निर्विकार असणारी लीला नवऱ्याने दुसरे लग्न केले तरी तशीच निर्विकार राहते. तिचे मनो-विकार मुळीच बदलत नाहीत. या कथेत लेखिकेने कृष्णामाई (कृष्णानदी)च्या आख्यायिकेचा उचित वापर कथेच्या शेवटी केला आहे. या कथेत नायिकेच्या स्वभावातील गूढता आणि गुंतागुंत शेवटपर्यंत कायम राहिली आहे. 'प्रतीक्षा' कथेला पण कारुण्याची डूब मिळाली आहे. चुलत्याच्या घरी पोरकेपणात काढलेल्या यमुनेला सुदैवाने डॉक्टर नवरा मिळतो. पहिली मुलगी उशिरा होते. दुसरे मूल तिच्या पस्तिशीत, आणि मुलगी बाळंतपणाला माहेरी येते, तेव्हा यमुनेला तिसरा मुलगा होतो. उशिराचा पाळणा म्हणजे किती उशिराचा असावा, असे नातवाच्या बारशाला आलेली यमुनेची विहीण खोचून बोलतेही. यमुनेचा जन्म टोमणे सोस-ण्यातच जातो. आधार फक्त दयाळू व प्रेमळ नवऱ्याचा. संसाराचा रामरगाडा उचलणाऱ्या नाजुक यमुनेला विश्रांती कधी मिळतच नाही. त्यातच डॉक्टरांना हार्ट अॅटॅक येतो. डॉक्टरांच्या मृत्यूची प्रतीक्षा करायला लागू नये, अशी यमुनेची मनोमन इच्छा. डॉक्टरांशी बोलत असताना मृत्यू अगदी अलगदपणे यमुनेला जवळ करतो. तिला मृत्यूची प्रतीक्षा करावी लागत नाही. 'कमल' कथेतील नायिकेचे दुःख यापेक्षा वेगळे आहे. शरदबाबूंच्या कादंबरीविश्वात वावरणारी कमल त्यांच्या नायिकांना आपला आदर्श मानते. त्या नायिकांप्रमाणे वेगळे, बंडखोर, मोकळे जीवन आपण जगावे असे तिला मनापासून वाटते. जगावेगळी कमल प्रियकराच्या लग्नाला उपस्थित राहून ती त्याला 'शेषप्रश्न' कादंबरी भेट म्हणून देते, ती पुढील अर्पणपत्रिका लिहून– 'आवडत्या माणसास, माझ्या आवडीची भेट–कमल.' 'त्याच्या बायकोला काय वाटेल,' या मैत्रिणीच्या हरकतीला कमल ठोकरून लावते. बी. टी. होऊन स्वतंत्रपणे, स्वाभिमानाने पण जननिंदेची, लोकप्रवादाची पर्वा न बाळगता अधिक बेछूट जीवन ती जगू लागते. तिथेही फडणीस नावाचे

विवाहित गृहस्थ तिची फसवणूक करतात. कमलने आपण होऊन ओढवून घेतलेले दुःख संपत नाही. शरदबाबूंची नायिका आणि कमलचे व्यक्तिमत्त्व यांची झालेली अप्रत्यक्षपणे सांधेजोड यात या कथेचे यश सामावलेले आहे. स्त्रीच्या व्यथा, वेदना बोलक्या करणाऱ्या 'गौर','पाचा उत्तरी निष्फळ','प्रतीक्षा', 'कमल' या कारुण्यपूर्ण कथा 'दिवस सोनियाचे' संग्रहातील यशस्वी आणि वैशिष्ट्यपूर्ण अशा कथा आहेत.

कुटुंबकथा लिहिणाऱ्या गोवारीकरांना मुलांचे मानसशास्त्र चांगले अवगत आहे. 'शाळा' कथेत त्यांनी विविध प्रश्नांनी भंडावून सोडणाऱ्या आपल्या मुलीचे मार्मिक मनोरेखाटन केले आहे. आपला गुन्हा बेमालूमपणे लपवणारी, आपण घरातल्या सर्वांनी एकदम देवाघरी जाऊ या असे म्हणणारी, आईचा दांभिकपणाचा बुरखा फाडून टाकणारी, स्वतःचे दोष लपवणारी, क्वचित आईला सुनावणारी, तिच्या वर्मावर नेमके बोट ठेवणारी 'शाळा' कथेतील लेखिकेची लेक लोभसवाणी आहे.

'दिवस सोनियाचे' आणि 'जनरेशन गॅप' या दोन्ही कथा हलक्याफुलक्या आहेत. या कथांत तंत्रबद्धतेला महत्त्व आहे. परदेशी गेलेल्या दोन मैत्रिणी क्रोकरी आणि संसारोपयोगी वस्तू यांची खूप खरेदी करतात. त्यांच्या यजमानांना ही पैशाची उधळपट्टी वाटते. भारतात आल्यावर त्या वस्तू निरुपयोगी म्हणून पडून राहतात. त्यांना खरेदीचे सोनियाचे दिवस आठवतात. मात्र शेवटी, 'आपले नवरे खरेच शहाणेसुरते आहेत की काय', अशी शंका त्यांच्या मनात येत राहते. हलक्याफुलक्या ढंगाने लिहिण्याचा प्रयत्न केलेली ही कथा जमलेली नाही. ती आविष्कारातून विसंगतपूर्ण विनोदाचा प्रत्यय देत नाही. 'जनरेशन गॅप' ही दोन पिढ्यांतील व्यक्तींच्या स्वभावातील विरोध दर्शविणारी कथा. घनश्याम-सुलू या सुखवस्तू पतिपत्नीची कन्या सोनाली हिचे लग्न सुरेशबरोबर ठरते. सुरेशचा यापूर्वी एकदा साखरपुडा होऊन त्याचे लग्न मोडल्याचे घनश्यामला एका नातेवाइकाकडून नंतर कळते. ही माहिती मिळताच घनश्याम-सुलू अस्वस्थ होतात. काळजीत पडतात. सोनाली खुलासा करते की, आधीच्या साखरपुड्याची गोष्ट सुरेशने पहिल्या भेटीतच तिला सांगितली होती. जीवनातील एकाच महत्त्वाच्या घटनेबद्दल दोन पिढ्यांतील माणसांच्या प्रतिक्रिया अशा वेगवेगळ्या असतात. 'दिवस सोनियाचे' आणि 'जनरेशन गॅप' या दोन्ही कथा बेतलेल्या आहेत. म्हणूनच परिणामाच्या दृष्टीने कच्च्या आहेत.

'दिवस सोनियाचे' या संग्रहातील कथा एका गृहिणीने लिहिलेल्या कथा आहेत. या कथांतून व्यक्त होणारा अनुभव मराठी कुटुंबजीवनाशी, त्या जीवनातील स्त्रीच्या प्रश्नांशी, तिच्या दुःखाशी संबंधित आहे. म्हणूनच काही कथा त्यांच्यातील

वास्तवता, कारुण्य, सूक्ष्म मनोदर्शन, परस्परसंबंधातील ताणतणाव यांच्या दर्शनामुळे परिणामकारक ठरतात, तर काही कथा तंत्रबद्धतेमळे वरवरच्या वाटतात, मूळ अनुभवातील सौंदर्य हरवून बसतात.

दिवस सोनियाचे–दीपा गोवारीकर
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०.
(मुंबई सकाळ)

—★—

कादंबरी

चक्र...एक रसग्रहण

जयवंत दळवींच्या 'चक्र'या कादंबरीने महाराष्ट्र राज्य सरकारचे प्रथम पारितोषिक व क. ह. ना. आपटे जन्मशताब्दीनिमित्त सर्वोत्कृष्ट कादंबरीसाठी ठेवलेले पारितोषिक मिळवले आहे. मराठी कादंबरी ग्रामीणतेच्या धौशातून बाहेर पडून एक नवे वळण घेत असता अपरिचित व वेगळचा विषयावर लिहिलेल्या 'चक्र'ला बक्षीस मिळावे ही अभिनंदनीय गोष्ट होय. एखाद्या अपरिचित व नव्या विषयावर लिहिलेल्या कृतीचे मूल्यमापन करताना फसगत होण्याची बरीच शक्यता असते. काही वेळा लेखकाच्या सामर्थ्यापेक्षा तो नवीन विषयच त्याला यश मिळवून देण्यास कारणीभूत होतो. जयवंत दळबी याला अपवाद ठरले आहेत असे म्हटले पाहिजे. त्यांनी अपरिचित विषय यशस्वीपणे हाताळला आहे. तसेच त्यांच्या सकस लेखनाची सर्वच वैशिष्टचे इथे प्रकट झाली आहेत. चक्र एका समर्थ, संमिश्र व वास्तव अनुभवाचे दर्शन घडविते. कादंबरी वाचून पुरी झाल्यावर आपल्यासमोर उभी राहतात ती या कादंबरीतील रेखीव पात्रे, अविस्मरणीय प्रसंग व भेदक वास्तवता.

झोपडपट्टीत राहणाऱ्या समाजाचे चित्तन प्रत्ययकारीपणे करणे हा लेखकाचा हेतू. हा समाज संमिश्र समाज आहे. या समाजाचे स्वतःचे असे भावविश्व आहे. त्याची स्वतःची अशी सुख-दुःखे आहेत, आकांक्षा आहेत. त्यांच्या नीतिविषयक कल्पना पांढरपेशा समाजाच्या कल्पनांपेक्षा वेगळचा आहेत. खरे म्हणजे आपल्या सर्व अंदाजांना त्या तडा देणाऱ्या आहेत.

वेगळा विषय, रेखीव व्यक्तिचित्रे, कथानकाची गतिमानता, आशयानुकूल अशी प्रतीकात्मक भाषाशैली, प्रसंगरेखाटनातून प्रकट झालेली वास्तवता, तिला असलेला माणुसकीचा पदर, तिच्यातून व्यक्त होणारे कारुण्य व हृद्यता ही

'चक्र'ची काही ठळक वैशिष्टये.

बेन्वा, त्याची आई 'अम्मा', लूकादादा, ट्रकवाला, अण्णा ही कादंबरीतील प्रमुख पात्रे. तर म्हातारा पुन्ना, चेन्ना व आयशा या पुन्नाच्या मुली, झाडूवाला सोन्या, बेन्वाची बायको अमली, लक्ष्मी पावरू, नागू, चमन्या, राघूरामा इ. दुय्यम पात्रे. 'चक्र' वाचून संपल्यावर मनावर ठसा ठेवून जातात ती दोन पात्रे–'अम्मा' व 'लूकादादा.' अम्मा ही बेन्वाची आई– मध्यम वयाची– शरीरानं सुटलेली. सावळी पण रूपाने रेखीव अशी बाई. पाँडेचरीहून पोलिसांचा ससेमिरा चुकवून मुंबईस आलेली अम्मा मुलाला दारूच्या धंद्यात पडू देत नाही. पोलिसांच्या छळाची तिला भीती वाटते. ("पोलिसांचं लफडं नको लावूस पाठीला. खूप पाहिलं-भोगलं. आता आणखी पुन्हा नको") स्वतःचे उद्ध्वस्त झालेले घरटे उभे करण्याची तीव्र इच्छा तिला आहे. भूतकाळाच्या आठवणीत रमत असताना ती ट्रकवालाच्या 'अण्णा'ला जवळ करते आणि लूकादादाच्या पुरुषत्वाला शरण जाते. 'अण्णा' पासून गर्भार राहताच घर बांधण्याची तिची इच्छा अधिक तीव्र होते. गर्भारशीच्या स्त्रीसुलभ भावना तिच्या ठिकाणी जागृत होतात. गाभीण कुत्रीला– जनीला– 'अण्णा' लाथ मारीत असता ती म्हणते, "लाथ मारू नका. गाभण हाय ती!" झोपडी बांधून झाल्यावर तिच्या वृत्ती आणखीनच मोहरून येतात. जन्म घेणाऱ्या मुलासाठी स्वेटर व टोपरं करण्यासाठी लोकर पण गुरख्याकडे देते. पण नियतीच्या मनात दुसरेच असते. बेन्वा व पोलिसांच्या झटापटीत एक वर्मी प्रहार तिच्या कुशीत होतो. मातृत्वाच्या उंबरठ्यावर असलेली अम्मा दूर कुठे तरी फेकली जाते.

'लूकादादा' नावाचा 'दादा' असला तरी मनाचा 'माणूस' आहे. आजकाल कोणी चळवळ करीत नाही. मासला अगदी थंड आहे हे त्याला आवडत नाही. 'चूप बैठनेवालो के लिए दुनिया नहीं है।' हे त्याच्या तत्त्वज्ञानाचे सार. बेंन्वाच्या काचवाल्या मालकाला चाकू दाखवून पगार वसूल करणारा लूका आपले आगळे सामर्थ्य प्रकट करतो. भागी नावाच्या वेश्येकडे बेन्वाला घेऊन जात असताना, मी चेन्नाला (पुन्नाच्या मुलीला) व लखनौवाल्या वहिदाला पहिल्यांदाच 'उजवली' असे बिनदिक्कत सांगतो. हद्दपार झालेला 'लूका' झोपडपट्टीत येतो तोसुद्धा युद्धावरून येणाऱ्या सैनिकासारखा ठाक् ठाक् बुटाचा आवाज करीत. हाच रंगेल आणि धाडसी लूका शेवटी एक असहाय माणूस बनतो. मनगटाच्या सामर्थ्यावर जोर असणारे त्याचे तत्त्वज्ञान शेवटी कोलमडून पडते. माणसाला शेवटपर्यंत भेडसावीत असणारा पोटाचा प्रश्न व त्याची लैंगिक वासना त्याचा पिच्छा सोडीत नाहीत. लूका बेन्वाला म्हणतो, "एक सोचनेकी बात है, अगर ये भगवान पेट और पेटके नीचेवाला टुकडा इन्सानको नहीं देता तो साली ये दुनिया बदल जाती!" भणंगपणे जीवन घालविलेला लूका कोवळ्या बेन्वाची वेश्येकडे जायची तयारी पाहिल्यावर

सावध होतो. आपले उद्ध्वस्त झालेले जीवन त्याला आठवते. जुन्या स्मृतींशी चाळा करीत असताना आपण चेन्नाशी लग्न केले नाही याची रुखरुख त्याला लागून राहिलेली असते. स्वत:पासून चेन्नाला राहिलेला गर्भ त्याला आठवतो. बेन्वाचे तसे काही होऊ नये याची खबरदारी आपण घेतली पाहिजे असे त्याला वाटते. तो 'अमली 'शी बेन्वाची 'शादी' निश्चित करतो. (ही घटना कादंबरीच्या अर्थपूर्णतेत अधिकच भर घालते.) एका गुप्त रोगाने पछाडलेला दुबळा लूका शेवटी म्हणतो, 'छोड, गया वो गया. अभी कैसा भी एक एक दिन निकालनेका है' या दोन पात्रांशिवाय इतरही पात्रे कादंबरीत आहेत. आपल्या आईचा दोन पुरुषांशी येणारा संबंध पाहणारा बेन्वा इथे आहे, बाप मेल्यावर दुसऱ्याच दिवशी पोट जाळण्यासाठी 'धंदा करायला' जाणारी आयशा इथे आहे, आपल्या पदरचा चहा पाजून अम्माच्या रेखीव अवयवांचे हावरटपणे पान करणारा सोन्या झाडूवाला आहे, झोपडपट्टीतील पोरे मायेनं पुढचात घेऊन झोपणारा म्हातारा पुन्ना आहे, अम्माची झोपडी स्वत:चं घर आहे असे समजणारा व स्वत:च्या बायकोइतकेच अम्मावर उत्कटपणे प्रेम करणारा ट्रकवाला अण्णा पण इथे आहे. या सर्व पात्रांच्या बारीकसारीक हालचालींचे, त्यांच्या शरीरांच्या ठेवणीचे व लकबांचे वर्णन लेखक सूक्ष्मपणे करतो. उदा. 'तो आपलं तासलेलं खरबरीत मुंडकं खाजवीत राहिला आणि डोक्यावरचा भुसा हवेत तरंगत राहिला', 'त्याच्या बेंबीचा खड्डा सापाच्या बिळासारखा दिसत होता.' इ. या पात्रांच्या बाह्यांगांचे वर्णन करून लेखक थांबत नाही, तर त्यांच्या अन्तर्मनाचे कंगोरेसुद्धा अधिक टोकदार करतो. उदा. 'लग्न करतोस काय ?' असे अम्माने विचारल्यावर हुळहुळणारा सोन्या झाडूवाला, 'कुणी आलं होतं काय ?' असे ट्रकवाल्याने विचारल्यावर चमकणारी अम्मा, लकाने जशी एका वेश्येला– भागीला– नग्न करून उचलून धरली तसे आपणही अमलीला उचलून धरावी असे स्वप्न पाहणारा बेन्वा व कोर्टातहीं 'बादशा' पाहिजे म्हणून हट्ट धरणारा चमन्या. इ.

प्रस्तुत कादंबरीतील पात्रे जशी रेखीव व ठसठशीत, तसेच प्रसंग पण नाट्यमय, अर्थपूर्ण व सच्चे आहेत. लूकाचे झोपडपट्टीतले आगमन, लूका व भागी आणि लूका व अम्मा यांचा संभोगप्रसंग, अम्माचे दिवस गेल्याचे अण्णाला सांगणे, पुन्नाचा मृत्यू, बेन्वाने अमलीला खण देणे, अम्माच्या नव्या घरावर पोलिसांचा हल्ला, झटापट, व अम्मावर झालेला वर्मी प्रहार हे या कादंबरीतील उल्लेखनीय प्रसंग. या प्रसंगांतून आपणाला जाणवते ती भेदक वास्तवता, तिला असलेला माणुसकीचा पदर व तिच्यातून व्यक्त होणारी हृदयस्पर्शिता !

या कादंबरीतील वास्तवतेच्या मागे भेदक हा शब्द मुद्दाम योजला आहे. कारण ही वास्तवता आपले डोळे दिपवून टाकते. आपल्या नीतिविषयक कल्पनांना

जोराचा हादरा देते. "चायला ! आज पाइप खाली करना पडेगा !" हे उफाळलेली भावना व्यक्त करणारे लूकाचे वाक्य, किंवा आधी येऊन गेलेल्या गिऱ्हाइकाबद्दल "हे गेलं ते मेलं पाप्याचं पितर ! मिनटाचा पण दम नाय !" हा भागीने मारलेला शेरा, किंवा "मेल्यानं ओठ ओरबाडून केले कबाब. आणि वर धाची नोट टाकतो, टाक आणखी धा !" असं म्हणणारी भागी जीवनाची एक सच्ची बाजू दाखवितात. या वास्तवतेला असलेला अश्लीलतेचा रंग वास्तवता अधिक गडद करतो तर अश्लीलता अगदी फिकी ! या ठिकाणी आलेली वर्णने वाचताना वाचक मिटक्या मारीत नाही. काहीसा भेदरून जातो. पुन्ना (आयशीचा बाप) ज्या दिवशी मरतो त्याच दिवशी 'आयशी आम्हाला आणून दे' असे म्हणणारे अन्त्या व झिपऱ्या यांचे उदाहरण म्हणजे अतिरिक्त कामवासनेचे दुसरे टोक. पुन्ना मेल्याच्या दुसऱ्याच दिवशी आयशी 'धंदा करायला' जाते हे भेदक वास्तवतेचे आणखी एक उदाहरण.

'चक्र' मध्ये वास्तवतेबरोबरच माणुसकीचे दर्शन होते. झोपडपट्टीत वावरणारी ही माणसे, भिन्न धर्माची, भिन्न प्रदेशातील, भिन्न जातींची व भिन्न वृत्तिप्रवृत्तींची माणसे आहेत. या ठिकाणी ती आपला धर्म व जात विसरतात. त्यांच्यापुढे असतो एकच धर्म– माणुसकी ! लूकासाठी मुरगी कापल्यावर 'अम्मा' बाळंतीण लक्ष्मीसाठी रस्सा घेऊन जाते. लक्ष्मी कामावर बाळंत झाल्यावर टॅक्सीसाठी स्वत:कडचा रुपाया देते ("टॅक्सीचा रुपाया दिला मी. प्रसंगाला द्यायला नको ?") ही माणुसकी दर्शविणारी दोन ठळक उदाहरणे.

'चक्र' वर सतत एक कारुण्याची छाया आहे. ते कारुण्य हृदयाला भेदून जाते. अम्माचे झोपडी बांधायचे स्वप्न व तिचा विस्कटलेला संसार या ठिकाणी ते दिसते. पुन्नाच्या मृत्यूनंतर तिरडी बांधताना सुंभ पाहिल्यावर म्हाताऱ्याने बाजेसाठी सुंभ मागितले होते याची आठवण होऊन बेन्वा व्यथित होतो. नागूला मारल्याबद्दल त्याला पश्चात्ताप पण होतो. आपण बेछूटपणे आयुष्य घालविल्यामुळे जसे बरबाद झालो तसे बेन्वाने बरबाद होऊ नये म्हणून लूकाने त्याची अमलाबरोबर 'शादी' ठरविणे या घटनेला केवढातरी अर्थ प्राप्त झाला आहे. मित्रांना मेजवानी देण्यासाठी बेन्वा कोंबडी कापतो. तिचे पैसे पण देतो. जेवताना त्या कोंबडीची सात-आठ पिले दाराशी येतात. त्यांना पाहिल्यावर मात्र बेन्वाला भडभडून येते. जेवणावरची त्याची वासना उडून जाते. कादंबरीच्या शेवटी उद्ध्वस्त झालेली अम्मा, बेन्वा ही माणसे व तिचे नष्ट झालेले मातृत्व ह्या कारुण्यात आणखी भर घालतात. ही ओंगळ दिसणारी, विकृत वाटणारी क्रूर माणसे स्वत:चे जीवन असहायपणे जगतात; माणुसकीच्या विशिष्ट जीवनमूल्यांची जोपासना

करतात; कधीकधी अगतिक होतात– असहाय होतात– नियतीपुढे वाकतात पण !

हे प्रसंग– ही व्यक्तिचित्रे रेखाटणारी भाषा ही खास दळवींची भाषा आहे. निरनिराळ्या भाषांनी संस्कारित झालेली 'बोली' ही माणसे वापरतात. त्यांची मातृभाषा कोणती हे सांगणे तर फारच कठीण. मराठी ही अस्सल मराठी नाही, तर हिन्दी अशुद्ध स्वरूपातील. मात्र सच्चा अनुभव व्यक्त करणारी ही भाषा तितकीच सच्ची आहे. ती आशयाशी इमान राखणारी आहे. अगदी मोजक्या शब्दांत आशयानुकूल प्रतिमांच्या साह्याने लेखक अनुभव शब्दांकित करतो. उदा० 'गेंड्याने तोंड उघडून जिभेची वळवळ करावी तशी धुराची पट्टी त्या शेडचातून वळवळत होती.' 'रूकाची बायको घुशीसारखी बिळात शिरती', 'बेन्वानं वळकटीवर लाथ मारली आणि मेलेलं जनावर गिधाडांनी पिसडून टाकावं तशा फाटक्या गोधड्यांच्या चिंध्या पसरल्या.' 'हातांतले बूट मारलेल्या उंदरासारखे लोंबवीत तो पुढे गेला;' 'पोतं वाकडंतिकडं हालवावं तसं त्यानं आपलं अंग हलवलं," "तो वीतभर लांबीची लाल चिंधी थुंकला,' व 'दुसऱ्याच क्षणी ती अण्णाच्या कुशीत नाहीशी झाली.' इ.. पोलिसांच्या हल्ल्यानंतर अम्माचा विस्कटलेला संसार व कुशीत झालेल्या आघातामुळे नष्ट झालेले मातृत्व हे सगळे लेखकाने एकाच वाक्यात प्रत्ययकारी शब्दांत सांगून टाकले आहे– 'आता सारं सपाट झालं होतं– खोपट आणि पोट...!' दळवींची भाषा मोजक्या शब्दांत जसा एखादा संमिश्र अनुभव प्रत्ययकारीपणे व्यक्त करते तसेच सूचकताही. लुका दादा बाहेरख्यालीपणामुळे एका गुप्तरोगाने पछाडला जातो. लेखक फक्त त्या रोगाची चिन्हे व लूकाची दुबळी अवस्था यांचे वर्णन करतो, रोगाचे नाव गुप्त ठेवून ! 'चक्र' प्रतीक निरनिराळ्या अर्थच्छटा व्यक्त करते. कादंबरीच्या सुरुवातीला उभारल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे वर्णन केले आहे व शेवटी तिच्या विनाशाचे. इथे चक्राचा फेरा पूर्ण होतो. तसेच परिस्थितीच्या आघातापुढे ही माणसे असहाय्य– अगतिक बनतात. नियतीचे चक्र त्यांना नमविते. 'चक्र'च्या संपूर्ण निवेदनशैलीत एक गतिमानता आहे. निरनिराळी प्रसंगचित्रे निवेदनाच्या ओघात आपल्यापुढून सरकत जातात. एका अपरिचित अनुभवाचा वेग पेलून तो व्यक्त करण्यात जयवंत दळवींना मिळालेले यश खरोखरच कौतुकास्पद आहे !

चक्र– जयवंत दळवी,
मॅजेस्टिक प्रकाशन
(आविष्कार)

सय– नेहमीच्या वळणाची एक कादंबरी

आनंद साधले यांच्या 'सय' या नव्या कादंबरीला नेहमीच्या मराठी कादंबरीसारखे कथानक आहे. राघोबा दादाने उत्तरेकडे स्वारी केली, तेव्हा महाराष्ट्रातून गेलेले राणे कुटुंब तिकडेच स्थायिक झाले. सुरेन्द्र या कथानायकाचे पणजोबा नामदेव राणे यांनी नामचंद राणा अॅण्ड सन्स या नावाने रंगाची एजन्सी सुरू केली. लाहोर येथे स्थिरावलेल्या राणे घराण्यातील सुरेंद्राचे उर्मिला या दिल्लीच्या एका महाराष्ट्रीय कुटुंबातील मुलीशी लग्न होते. फाळणीनंतर राणा मंडळी दिल्लीस येत असता मुसलमान गुंड त्यांच्यावर अत्याचार करतात. उर्मिला भ्रष्ट होते. उर्मिलेच्या उदरी वाढणारा गर्भ हा मुसलमानाचा आहे असे सुरेन्द्रच्या आईला वाटते. मुलीला– मुन्नीला जन्म देऊन उर्मिला मरण पावते. मुन्नीचा द्वेष करणारी आई सुरेन्द्रला लग्नाचा आग्रह धरते. सुरेन्द्र वैतागून दिल्ली सोडतो आणि मुंबईस येतो. मुंबईत त्याची बबी या 'धंदेवाली 'शी गाठ पडते. तो तिच्या आधाराने मुंबईत राहतो. मटक्यावर पैसे लावतो; दारू पितो. पैसे संपल्यावर दहा हजारांची हुंडी करून वडिलांकडून पैसे मागवितो. दिल्लीस गेल्यावर वडिलांशी त्याचे मतभेद होतात. वेश्येशी संबंध ठेवल्यामुळे आपल्या प्रतिष्ठित कुलाला कलंक लागला आहे, असे वाटून ते त्याला हाकलून देतात. तो दिल्लीस येतो. त्याची व्यापारात भरभराट होते. अठरा-एकोणीस वर्षांनी तो पुन्हा मुंबईस येतो. गिऱ्हाईक पटवीत असलेली बबी त्याला दिसते. तिची 'सय' त्याला अस्वस्थ करते.

आनंद साधले यांची 'सय' ही कादंबरी वाचनीय झाली आहे. पण तिला यशस्वी कलाकृती असे म्हणता येत नाही. कादंबरी रंजक आणि वाचनीय होण्यासाठी आवश्यक असणारा आणि मराठी कादंबरीत हमखास आढळून येणारा– असंभाव्य घटना, योगायोग, अपघात हा मालमसाला या कादंबरीत पुरेपूर भरला आहे. मुसलमानांनी उर्मिलेवर केलेल्या अत्याचाराचे वर्णन कादंबरीच्या सुरुवातीस आले आहे. मुंबईस अचानकपणे बबी भेटणे, कंडक्टरशी सुरेन्द्रची मारामार होणे, (या मारामारीचे कारण सुरेन्द्राने बसमध्ये केलेले धूम्रपान हे आहे. बसमध्ये धूम्रपान करता येत नाही हेही या नायकाला माहीत नाही !) त्याच वेळी त्याच बसमधून प्रवास करणारी बबी पैसे आणायला जात असताना टॅक्सीवाल्याने तिच्यावर अत्याचार करणे, प्रथम पुढारी भासणाऱ्या आणि नंतर तो वार्ताहर आहे हे माहीत होणाऱ्या अनोळखी माणसाने सुरेन्द्राला जामीन राहणे, नारबादादा शेवटी आकस्मिकपणे उगवणे इ. घटना वरील विधानाच्या समर्थनार्थ पुरेशा आहेत. सुरेन्द्राच्या टॅक्सीला झालेला 'भयंकर अपघात' आणि त्याचे बरे होणे तर कादंबरीतील भडकपणा वाढविणारे आहे.

'सय'मधील प्रमुख व्यक्तिरेखा बबी ही आहे. व्यक्तिरेखेच्या उठावाकडे कादंबरीकाराचे सर्व लक्ष केन्द्रित झाले आहे. प्रस्तावनेत लेखक म्हणतो– "ही कथा मुंबईतील अथवा कुठल्याही गणिका जीवनाचे प्रतिनिधित्व करीत नाही. बबी ही गणिकांची प्रतिनिधी नाही. वेश्यांची तर नाहीच नाही." "एखादी कथा सत्य असणे हे तिच्या कलात्मक अस्तित्वाचे समर्थन होऊ शकत नाही. तरीही सत्य हे सत्य असते. इतिहास हा इतिहास असतो." लेखकाने प्रस्तावनेत असा खुलासा करण्याची काय आवश्यकता आहे, तेच समजत नाही. कादंबरीतील बबी ही कोण आहे हे तिच्या व्यक्तित्व-विकासातून आपोआप स्पष्ट होण्यासारखे आहे; निदान ते व्हावे. तिच्या संदर्भात 'धंदेवाली' हा शब्द लेखकाने वापरला आहे. "मी मुरलेली आहे. एकाच पुरुषाने मला आनंद होणार नाही," असे ती एका ठिकाणी म्हणते. तर दुसऱ्या ठिकाणी एका बौद्धिक पातळीवरून ती म्हणते, "बाबूजी, उद्या नेहमी अज्ञात असतो. निदान माझा तरी." "आपल्या माणसासाठी दुःख भोगण्यात खरे सुख असते." बबीची व्यक्तिरेखा विसंगत होण्यास आणि लेखकाची द्विधा मनःस्थिती होण्यासही काही कारणे आहेत. बबीचे जीवन हे वेश्येचे जीवन आहे असे लेखकाला ठासून सांगता येत नाही. तिच्या जीवनातील कठोर आणि कारुण्यपूर्ण वास्तवाला सामोरे जाण्याचे सामर्थ्य त्याच्यात नाही. लेखकाचे हळवे स्वप्नरंजनाचे वेड आणि त्याच्या कलादृष्टीला पटणारी आदर्शवादी भूमिका यामुळे या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा साफ कोलमडून पडली आहे. बबीची देहविक्रयाची क्रिया ही लेखकाच्या स्वप्नरंजनाचा भाग बनते, आणि सुरेन्द्राविषयी तिला वाटणाऱ्या पातिव्रत्याच्या भावनेला आदर्शाचे कृत्रिम रंग चढतात !

याशिवाय कादंबरीतील आणखी काही उणिवा लक्षात येतात. मुन्नी स्वतःचीच मुलगी आहे असे समजणारा आणि आईच्या विरोधाला सतत तोंड देणारा सुरेन्द्र बबीच्या सहवासात तिला साफ विसरतो. (कादंबरीच्या शेवटी मुन्नीचे लग्न झाल्याचा फक्त उल्लेख आहे.) प्रसंगी देहविक्रय करूनही सुरेन्द्राची शुश्रूषा करणाऱ्या बबीपासून एका असहाय्य परिस्थितीत सुरेन्द्र स्वतःची सुटका करून घेतो. या वेळचा आंतरसंघर्ष फुलविण्याची संधी लेखकाने वाया घालविली आहे. कादंबरीचा शेवट गुंडाळल्यासारखा झाला आहे. शेवटचा वीस वर्षांचा कालखंड केवळ दोन पृष्ठांत पुरा केला गेला आहे. (कादंबरी क्रमशः प्रकाशित झाल्याचा तर हा परिणाम नाही ना ?)

एखादी कथा सत्य असणे हे तिच्या कलात्मक अस्तित्वाचे समर्थन होऊ शकत नाही, असे विधान लेखकाने प्रस्तावनेत केले आहे. कलाकृतीतील सत्याला अनेक संदर्भ प्राप्त झालेले असतात; काही शक्यता असतात; मानवी मन अस्वस्थ करून सोडणाऱ्या काही पातळ्या असतात; हेही विसरता येत नाही. सत्य केवळ

दृष्टोत्पत्तीस येऊन भागत नाही. कलावंताने आपल्या सर्व सामर्थ्यानिशी त्या सत्याला भिडावे लागते. 'सय' कादंबरीत लेखकाला सत्याला भिडता आलेले नाही.

सय– आनंद साधले
परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई ४.
(महाराष्ट्र टाइम्स)

एका स्पृश्याची डायरी– विशिष्ट जीवनदृष्टीचा कादंबरीवर प्रभाव

लेखकानं घेतलेल्या जीवनविषयक अनुभवाला कोणत्याही कलाकृतीत महत्त्वाचे स्थान असते. कलाकृतीतील अनुभवाचे रूप जेव्हा वाचक न्याहाळतो तेव्हा त्या अनुभवाचे अलौकिकत्व त्याला जाणवत असते. जर हा अनुभव पारंपरिक अनुभवापेक्षा वेगळा असेल किंवा त्या अनुभवाला लेखकाच्या जीवनात वेगळे स्थान असेल तर कलाकृतीच्या दृष्टीने तो अधिक मोलाचा ठरत असतो. 'एका स्पृश्याची डायरी' या कादंबरीतील अनुभव लेखकाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. ब्राह्मण जातीत जन्माला आलेल्या व्यक्तीच्या व्यथा-वेदना हा या कादंबरीचा विषय आहे. चाळीस वर्षांपूर्वी विदर्भातील एका खेडचात जन्माला आलेला कादंबरीचा नायक आत्मनिवेदनपर पद्धतीने आपली जीवनकहाणी सांगत आहे. ब्राह्मण म्हणून जन्माला आल्याची जाणीव अगदी उपहासानेच आपले शिक्षक, वडील आणि समाजातील इतर व्यक्ती कशी करून देतात आणि त्यामुळे आपला कोंडमारा कसा होतो, याचे हृद्य चित्रण या कादंबरीत लेखकाने केले आहे. आपल्या समाज-व्यवस्थेत केवळ 'अस्पृश्यां'च्याच वाटचाला मानहानी, दारिद्र्य आणि दुःख येते असे नाही, तर एखाद्या 'स्पृश्या'चीसुद्धा कशी कुतरओढ होते, हे सांगण्याचा यत्न लेखकाने केला आहे. घरात एकटेपणाची आणि समाजात परकेपणाची जाणीव असलेला संवेदनक्षम आणि चिंतनशील वृत्तीचा स्पृश्य तरुण सदैव पराभूत मनोवृत्तीनेच समाजात वावरताना आढळून येतो. सामाजिक विषमतेतील दुःख जाणवत आहे, पण त्या विषमतेचा प्रतिकार करता येत नाही अशी त्याची स्थिती झाली आहे. 'आज माझं घर असं मला सांगताच येत नाही' असे म्हणणारा कादंबरीचा नायक दुभंगलेला आहे. आपल्या ब्राह्मणत्वाची फाजील जाणीव असलेला आक्रस्ताळचा स्वभावाचा पिता, दारिद्र्यात पिचून निघालेली आई, अकाली गेलेला

नटासारखा सुंदर दिसणारा भाऊ यांच्याविषयींच्या आठवणी या दैनंदिनीवजा लेखनात सांगितल्या आहेत. एखाद्या प्रसंगाचे निवेदन करणे आणि त्यानंतर स्वत:ची प्रतिक्रिया व्यक्त करणे हे असे या कादंबरीच्या लेखनाचे स्वरूप आहे.

आत्मनिवेदनपर लेखनाला बऱ्याच वेळा हुकमी यश मिळत असते. (आज मराठीत लिहिल्या गेलेल्या बहुसंख्य कादंबऱ्यांत हीच निवेदनपद्धती स्वीकारलेली आढळून येते.) या कादंबरीत असे यश लेखकाला मिळाले आहे. सहजसोप्या, ओघवत्या भाषेत केलेले कथन आकर्षक ठरले आहे. या निवेदनात कुठेही संयम सोडलेला दिसत नाही. समसंभोगी मित्राच्या बाबतीत आलेला अनुभव, बालपणीच्या मैत्रिणीबद्दल वाटत असलेली सहानुभूती, मामाचे चांभारणीशी असणारे संबंध, मित्रांचे लैंगिक चाळे इ.चा याबाबतीत उल्लेख करता येईल. वयाच्या पंधराव्या वर्षी लेखकामध्ये झालेला शारीरिक आणि मानसिक बदल, त्याची झालेली बेचैन अवस्था, मनाचा ढळलेला तोल यांचे चित्रण अलिप्तपणे केले गेले आहे. लैंगिक विकृती आज बऱ्याच धीटपणे मराठी वाङ्मयात चितारली जात आहे. कधीकधी हे विकृति-चित्रण फसलेलेही आढळून येते. ही कादंबरी त्याला अपवाद आहे. लेखक अनुभवचित्रणाच्या आहारी गेला नाही. केवळ अनुभव म्हणून कलादृष्ट्या त्याचे मूल्य निश्चित करण्यात त्याला यश मिळाले आहे. स्पृश्य म्हणून समाजात वावरत असताना जे कटू अनुभव आले, ते व्यक्त करीत असताना नेहमीच्या साच्यापेक्षा वेगळी कादंबरी लिहिण्यात लेखकाला यश मिळाले आहे. लेखकाला कलाकृतीच्या दृष्टीने महत्त्वाचा वाटणारा त्याचा कादंबरीतील अनुभव वाचकांना विचार करायला लावतो, ही या कादंबरीची जमेची बाजू.

ही कादंबरी लिहिताना लेखकाने काही संकेत स्वीकारले आहेत का? या संकेतांच्या स्वीकृतीमुळे कादंबरीच्या यशाला काही मर्यादा पडल्या आहेत काय? श्रेष्ठ कादंबरी निर्माण होण्याची शक्यता यामुळे दुरावली आहे काय? असे प्रश्न ही कादंबरी वाचून संपल्यावर मनात निर्माण झाले. या सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी द्यावी लागतात.

कलावंताला येणारा अनुभव त्याच्या स्वत:च्या जीवनाशी निगडित असतो, तसाच तो संमिश्र आणि अनेकपदरी असतो. एकाच वेळी समाजजीवन, कुटुंबजीवन, अनेक सामाजिक ताण, रीतिरिवाज, रूढी आणि संस्कार इ.नी त्याचे जीवन बद्ध असते. जातनिरपेक्ष असे जीवन कुठल्याही व्यक्तीला जगणे निदान भारतासारख्या देशात तरी शक्य नाही. या जातिसापेक्षतेबरोबरच जीवनाची अनेकविध रूपे कलावंताला नजरेआड करता येत नाहीत. वस्तुत: या कादंबरीच्या नायकाला आलेले अनुभव तीस-चाळीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात वावरणाऱ्या कुणाही

व्यक्तीला आले असणे शक्य आहे. (अर्थात तेच अनुभव इतरांना आले म्हणून त्यांचे मूल्य कमी होते असे नाही. उलट कलावंताच्या मनाला ते अधिक तीव्रतेने जाणवलेही असतील.) इथे ते अनुभव जाणवल्याचा प्रत्यय येतो. आणि त्याबरोबरच लेखकाने स्वीकारलेली समर्थनाची भूमिकाही दिसून येते. अस्पृश्यांची त्याने केलेली व्याख्या– 'अस्पृश्य म्हणजे केवळ महार, मांग, हरिजन नव्हे. त्यांना समाजाकडून मिळणारी वागणूक ज्यांच्या नशिबी येते ते लाक्षणिक अर्थाने अस्पृश्यच' अशी केली आहे.

अस्पृश्य आणि अस्पृश्यांचे जीवन जगणारे स्पृश्य हेही अस्पृश्य अशी ही विचारसरणी आहे. यामुळेच, स्पृश्य-अस्पृश्य तुलना खरेच आवश्यक आहे का? लेखकाला जाणवलेले दुःख केवळ ब्राह्मण म्हणून जाणवले का? हे प्रश्न दारिद्र्याचे आहेत की जातिव्यवस्थेचे? स्पृश्यास्पृश्यांचे प्रश्न जातिव्यवस्थेतून निर्माण झाले की पिळवणुकीतून? असे काही प्रश्न या संदर्भात विचारता येतील. लेखकाने स्वीकारलेल्या समर्थनामुळे कादंबरीला एकांगीपणा आला आहे. आई आणि भाऊ यांच्याशी लेखकाचे संबंध, पित्याच्या दुष्टपणाला असलेली मनुष्यत्वाची झालर यांचे नुसते उल्लेखच कादंबरीत आले आहेत. दारिद्र्यात पिचणाऱ्या, सर्व दुःख निमूटपणे सोसणाऱ्या आईचे दुःख किती तीव्र असेल, त्या दुःखापाठीमागचे कारुण्य किती अस्वस्थ करणारे असेल याची केवळ कल्पनाच वाचकाला करावी लागते. आत्मनिवेदनपर पद्धतीच्या स्वीकारामुळे असे घडले. संपूर्ण जीवनपट उभा करण्यात या पद्धतीमुळे विक्षेप येतो.

कादंबरीच्या उत्तरार्धात लेखकाने मुंबईतील जीवन रेखाटले आहे. बँकेतील नोकरीच्या प्रश्नाचे स्वरूपच फक्त जातीय आहे. कामगार चळवळ, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, स्वतःची बेकारी, राहण्याचा आणि शिक्षणाचा प्रश्न या सर्वांना त्याला तोंड द्यावे लागते. उत्तरार्धात असे का घडते? याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मुंबईसारख्या मोठ्या शहरात जातीय समस्येपेक्षा आर्थिक प्रश्नांनाच लेखकाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे प्रारंभी कलावंताचे वाटणारे निवेदन हे शेवटी कलावंताचे निवेदन वाटत नाही. भाष्य आणि प्रतिक्रिया व्यक्त करणारा लेखक साम्यवादी विचारसरणीचा पुरस्कार एखाद्या नेत्याच्या अभिनिवेशाने शेवटी करू लागतो. "अरे ही श्रीमंती आधी नष्ट करा... ही सत्ता उलथून पाडा... सामंतशाहीचे तुकडेतुकडे करा... आणि मग पहा, विकासाच्या, उद्धाराच्या वाटा कशा मोकळ्या होतात... वैर करायचं तर भांडवलशाहीशी वैर करू... अरे कसली अस्पृश्यता घेऊन बसला आहात... म्हणून सांगतो बापहो! पुरे आता हे भेदभाव... भांडवलशाहीचा राक्षस तुम्हा-आम्हाला ग्रासतो आहे." (पृ. ७०)

अशा निवेदनामुळेच पूर्वार्धात कमी कृत्रिम असलेली कादंबरी उत्तरार्धात अधिक कृत्रिम बनली आहे !

" मी फार कठोर लिहितो असं वाटेल. पण लिहिणं तर अपरिहार्यच आहे," (पृ. १०) अशी अपरिहार्यता लेखकाने एका ठिकाणी व्यक्त केली आहे. कलावंत म्हणून जेव्हा एखादी व्यक्ती अनुभव मांडीत असते तेव्हा तिच्या दृष्टीने तो अपरिहार्यच असतो. पण कलावंताने असे वाचकांना जाणवू देणे ही त्याची मर्यादा नाही काय ?

'एका स्पृश्याची डायरी' चे लेखन करणाऱ्या लेखकाला त्याच्या जीवन-दृष्टीला पटणारा, त्याच्या संवेदनक्षम वृत्तीला जाणवणारा एक उत्कट जीवनानुभव सापडला होता. पण विशिष्ट जीवनदृष्टी आणि काही संकेत स्वीकारणाऱ्या विचारवंताने त्या कलावंतावर मात केली आहे. सामाजिक विषमतेतील, दारिद्र्यातील कारुण्य जितके मनाला भिडावे तितके भिडू शकले नाही. सतत वैचारिकतेची छायाच या कादंबरीभर वावरत राहिली. यामुळेच कादंबरीत भव्य समाजपट निर्माण होण्याची शक्यता दुरावली. आजच्या परंपरागत मराठी कादंबरीत वेगळा जीवनानुभव देणाऱ्या आणि लक्ष वेधून घेणाऱ्या कादंबरीची ही एक मोठी मर्यादा आहे.

एका स्पृश्याची डायरी– सदा कऱ्हाडे.
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
(महाराष्ट्र टाइम्स)

काचापाणी– एक असफल सामूहिक प्रयत्न !

मानवी जीवनातील विकृती हा आजच्या ललित साहित्यातील चित्रणाचा प्रमुख विषय होऊ पाहत आहे. 'काचापाणी' कादंबरीचा विषय म्हणजे श्यामा या तरुणीची विकृत मनोवस्था व तिचे विविध भावसंबंध यांचे चित्रण. इंजिनियर नवऱ्यापासून दूर राहणारी श्यामा आपला मृत प्रियकर राऊ याच्या आठवणी सदैव घोळवीत राहते. आपण राऊची विधवा आहोत या भावनेने ती पछाडली गेली आहे. म्हणजेच ह्या कादंबरीचा विषय विधवेचे किंवा परित्यक्तेचे जीवन-चित्रण अशा रूढार्थाने तरी होऊ शकत नाही. बरीचशी विकृत आणि लहरी बनलेली श्यामा स्वतंत्र जीवन जगू पाहते. नेहमीच्या मराठी कादंबरीपेक्षा 'काचा-

पाणी 'मधील चित्रण वेगळे ठरते, ते यामुळेच. पण केवळ वेगळेपणामुळे ती यशस्वी कादंबरी ठरते, असे मात्र म्हणता येणार नाही.

ही कादंबरी वाचल्यावर काही प्रश्न निर्माण होतात. रूढ चाकोरीबाहेरचा विषय कादंबरीच्या यशाला कितीसा साह्यभूत होतो ? श्यामाच्या जीवनातील विकृती खरोखरच अपरिहार्य आहे काय ? श्यामाच्या व्यक्तिरेखेचा इतर पात्रांच्या संदर्भात विचार करता ही कादंबरी कितपत यशस्वी ठरते ?

या प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच मिळतात. श्यामा या व्यक्तिरेखेभोवतीच ही कादंबरी गुंफली गेली असती तर ती अधिक यशस्वी होण्याची शक्यता होती. (अनेक लोकांनी मिळून लिहिल्यामुळे असे झाले नसेल ना ?) श्यामाच्या जीवनातील विकृतीचे समर्थन या व्यक्तिरेखेच्या व्यक्तिकेंद्रिततेमुळे करता येणे सोईचे ठरले असते. श्यामाच्या स्वभावातील विकृतीला एक वाङ्मयीन अर्थ प्राप्त होऊ शकला असता. 'काचापाणी 'च्या बाबतीत वरील सर्व शक्यता नाकारल्या गेल्या आहेत. श्यामा धड घटस्फोटिता नाही, परित्यक्ता नाही, विधवा तर मुळीच नाही. तिच्या वाट्याला आलेले दुःख हे तिचे स्वतःचे दुःख आहे. तिचे हे जिणे सर्वस्वी वेगळे आहे. तिचे एकटीचेच आहे. कादंबरीच्या यशाच्या दृष्टीने अधिक अपेक्षा होती, ती तिच्या एकारलेल्या व्यक्तिमत्त्वातील संपन्नतेची. या कादंबरीतील ही उणीव चटकन लक्षात येते. श्यामाचा कोंडमारा, अगतिकता, सर्वस्वी एकटीच्या असलेल्या दुःखाचा येणारा प्रत्यय यांचा जरी परिणाम मनाला जाणवला तरी ते दुःख अंतःकरण ढवळून टाकू शकत नाही.

श्यामाच्या जीवनाचा (आणि कादंबरीच्या कथानकाचाही) अन्य पात्रांच्या संदर्भात विचार केला असता हे अपयश अधिकच नजरेत भरते. मावशी, मथुरा आणि शेखर या तीन पात्रांशी श्यामाचा संबंध येतो. मावशी या सुखवस्तू विधवा. नुकत्याच दिवंगत झालेल्या पतीच्या आठवणीने त्या बेचैन होतात, तरीही आपले दैनंदिन जीवन सुरळीतपणे चालू ठेवतात. खऱ्या विधवा असणाऱ्या मावशीचे दुःख व विधवासदृश श्यामाचे दुःख यात मूलतः विरोध आहे, परंतु कादंबरीतील हा विरोधसुद्धा शेवटी शेवटी फिका होत गेलेला दिसतो. सहजपणे यशस्वी रीतीने विकसित होणारी श्यामाची व्यक्तिरेखा आणि तिजबरोबर कादंबरीचा होत असणारा विकास यांना मर्यादा पडतात. श्यामाला मावशींनी दिलेली सावधानतेची सूचना ग्रांथिक, कृत्रिम आणि ढोबळ वाटू लागते. या सुखवस्तू समाजातील पात्रांना विरोधी म्हणूनच की काय, या कादंबरीत मथुरा मोलकरणीचे चित्र उभे केले आहे. जावयाशी लागू असणारी, तंबाकू मळणारी आणि कधी कधी गावठी पिणारी मथुरा श्यामाला मार्गदर्शन करते. स्वतःचे असे खास तत्त्वज्ञान ऐकवते. मथुरेच्या सल्ल्यामुळेच श्यामाचा 'हिस्टेरिकपणा' कमी झाला आहे असे भालूदादाचे मत आहे.

श्यामाला मिळालेल्या मथुरेच्या प्रोत्साहनामुळे श्यामा वाहात गेली याच विचाराने मावशी अस्वस्थ होतात.

कादंबरीतील पात्रयोजनेमधून आणखी एक प्रश्न निर्माण होतो. खालच्या समाजातील स्त्री-पुरुषांच्या कामविषयक कल्पना कादंबरीकाराला विरोध म्हणून उभ्या कराव्याच्या आहेत की वस्तुस्थिती म्हणून ? येथे केवळ विरोधी चित्रणाचा हेतू दिसत असल्यामुळे श्यामाच्या व्यक्तिरेखेला कलात्मक यश प्राप्त होऊ शकत नाही. आजच्या सुशिक्षित समाजातील स्त्री-पुरुषांचे विचार खरोखरच इतके अप्रगत आहेत काय, हाही प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाचेही उत्तर नकारात्मक मिळते. शेखर-श्यामा यांचे कादंबरीतील वागणे मथुरेच्या भूमिकेमुळे विसंवादी वा विसंगत वाटते. मथुरेची भूमिका ही मोलकरणीची न राहता मार्गदर्शिकेची राहते, ही गोष्ट प्रत्यक्ष मथुरेची व्यक्तिरेखा आणि अन्य पात्रे यांच्यावर अन्याय करणारी आहे. 'श्यामा-मावशी-मथुरा' या त्रिकोणाचे स्वरूप अगदी ठरीव झाले आहे. त्यामुळेच 'काचापाणी' ही कादंबरी विषयाचा अपवाद सोडला तर फारशी चाकोरीबाहेर जाऊ शकत नाही.

काचापाणी हे शीर्षक प्रतीकात्मक आहे. काचापाण्याच्या खेळाचा उल्लेख कादंबरीत अनेक वेळा केला गेला आहे. त्याचप्रमाणे पिंजऱ्यातील पोपट, निसर्गातील बदलती चित्रे यांनाही प्रतीकात्मक अर्थ आहे. कादंबरीतील ही प्रतीकात्मता पुष्कळच आखीव रेखीव आहे व म्हणून रूढ पातळी स्वीकारणारी आहे.

'काचापाणी' ही एका लेखकाने लिहिलेली कादंबरी नाही. साहित्यक्षेत्रात 'सहकारी तत्त्वावर' यापूर्वी 'आदिमाया' ही याच प्रकाशनाने प्रसिद्ध केलेली एक कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरी एकूण आठ लेखकांनी मिळून लिहिली आहे. श्री. रा. ज. देशमुख यांनी 'एक प्रयोग' या आपल्या प्रास्ताविकात याचा उल्लेख केला असून या सर्व लेखकांशी जमवून घेताना प्रयास पडल्याचे सांगितले आहे. एखाद्या कलाकृतीचा विचार करीत असताना ती कुणी लिहिली आहे अथवा किती जणांनी लिहिली आहे, याला फारसे महत्त्व नाही; निदान असू नये. मात्र अशा पद्धतीने लिहिलेल्या गेलेल्या कादंबरीचे समीक्षण करीत असताना काही अडचणी निर्माण होतात. कोणत्याही कलाकृतीचा केवळ लेखकनिरपेक्ष असा विचार करणे नेहमीच शक्य नसते. त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचे आधीचे लेखन, अनुभव घेण्याची त्याची ताकद या सर्वांचा विचार हा अपरिहार्यपणे केला जातो व त्यामुळे समीक्षा डोळस होते. अगदी अपरिहार्य नसले तरी या बाबींना महत्त्व हे असतेच. ही कादंबरी थोर कादंबऱ्यांत गणली गेली नाही, तरी तिच्या कर्त्यासंबंधीचे गूढ आणि एकंदरीत वेगळे चित्रण यामुळे लक्षणीय ठरावी.

काचापाणी– 'एन्.'
देशमुख आणि कंपनी, पुणे.
(महाराष्ट्र साहित्य पत्रिका)

उभयान्वयी अव्यय– धीटपणाचे कौतुक नको !

'उभयान्वयी अव्यय' ही आपली पहिली कादंबरी श्री. चंद्रकांत खोत यांनी अबकडई प्रकाशनाच्या वतीने स्वतःच प्रकाशित केली आहे. यापूर्वी 'मर्तिक' या त्यांच्या काव्यसंग्रहाला राज्यसरकारचे पारितोषिक मिळाल्यामुळे ते मराठी वाचकांना परिचित झाले आहेत. चंद्रकांत खोत हे आजच्या पिढीतील लेखक आहेत. लिटल मॅगेझिनमधून लेखन करणाऱ्या आजच्या तरुण लेखकांचे फारच थोडे कौतुक प्रतिष्ठितांकडून होत असते. (अर्थात या तरुण लेखकवर्गाला त्याची फारशी फिकीर नसल्याचेही त्यांनी अनेक ठिकाणी नमूद केले आहे.) वाङ्मयाच्या क्षेत्रात असे घडणे स्वाभाविक असते. सहानुभूतिशून्य दृष्टिकोनामुळे नवीन पिढीतील लेखकांवर अन्याय होण्याची शक्यता असते. पूर्वग्रहदूषित वृत्तीमुळे या नवीन साहित्याचे मोजमाप सहानुभूतीने केले जात नाही. कामप्रवृत्तीच्या चित्रणाला प्राधान्य दिले गेल्यामुळे या लेखकांवरील टीका अधिक प्रखर होत असल्याचे आढळून येते. कामजीवनाशिवाय दुसरी कोणतीच अंगे या लेखकांना दिसत नाहीत काय, असा प्रश्न विचारून या टीकेचे दुसरे टोक गाठण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. केवळ नवेपणाचा स्वीकार म्हणून किंवा वाचकांचे व टीकाकारांचे लक्ष चटकन वेधून घ्यावे म्हणून कामजीवनाचे चित्रण नव्या अथवा जुन्या कोणत्याही लेखकाने केले तर त्या चित्रणाचे वाङ्मयीन मूल्य अलिप्तपणे निश्चित केले पाहिजे. 'उभयान्वयी अव्यय' मध्ये कामजीवनाचे परीक्षण केले गेले आहे व ती आजच्या तरुण लेखकांपैकी एका लेखकाने लिहिली आहे म्हणून तिच्या मूल्यमापनाबाबत एकांगी दृष्टिकोन स्वीकारणे योग्य नाही, ही जाणीव मनात बाळगूनच 'उभयान्वयी अव्यय'चे मूल्यमापन पुढे केले जाणार आहे.

कामवासना ही मानवी जीवनातील एक प्रबळ अशी प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती लेखक किंवा सामान्य माणूस कुणालाच टाळता येणे शक्य नसते. प्रत्येक व्यक्ती जरी कामजीवनाचा प्रत्यय घेत असली तरी तो प्रत्यय घेण्याला मर्यादा असतात. मात्र व्यक्तिगत जीवनातील वासनाचित्रणाला कलाकृतीत स्थान मिळते तेव्हा तिला अनेक संदर्भ प्राप्त होत असतात. कामजीवनातील विविध पातळ्यांचे

निरनिराळ्या अंगांनी लेखक दर्शन घडवीत असतो. नेहमीच्या जीवनातील सांकेतिकता व मर्यादा दूर पडून कलाकृतीला शुद्ध स्वरूप प्राप्त होते. उलट या कामजीवनाच्या चित्रणाविषयी एखाद्या लेखकाने काही संकेत निर्माण केले की त्या चित्रणाच्या मर्यादा अपरिहार्यपणे निश्चित होत असतात.

'उभयान्वयी अव्यय'च्या परीक्षणाच्या बाबतीत वरील विचार मुद्दामच मांडले आहेत. कारण 'उभयान्वयी अव्यय' मधील पात्रांच्या परस्परसंबंधांना व कामवासनेच्या चित्रणाला काही संदर्भ प्राप्त झाले आहेत. हे निरनिराळे संदर्भ कादंबरीचा नायक प्रदीप सावंत याच्या निवेदनातून जाणवत आहेत. दिसायला सुंदर असलेला हा नायक दिनकर नावाच्या आपल्या मित्राच्या वासनेला बळी पडतो. शकूताई ही आपली बहीण आहे असे समजणाऱ्या प्रदीपवर एका विशिष्ट प्रसंगी शकूताई मात्र, प्रदीप हा आपला भाऊ आहे, या भावनेने प्रेम करू शकत नाही. कादंबरीतील चवथे पात्र म्हणजे सलमा. सलमा ही एक वेश्या आहे. 'उभयान्वयी अव्यय'मधील ही चार माणसे एकमेकांशी वेगवेगळ्या संदर्भात निगडित आहेत. त्यातल्या त्यात प्रदीप, दिनकर व सलमा यांची जीवने परस्परांशी अगदी निगडित आहेत, तर शकूताई ही केवळ प्रदीपच्या जीवनाशी अधिकच निगडित आहे.

समसंभोगाच्या विकृत सवयीने पछाडलेला दिनकर, परिस्थितीच्या भोवऱ्यात असहाय्य झालेला प्रदीप, विशिष्ट कोंडीत सापडलेली शकुताई व वेश्येचे जीवन जगणारी सलमा या साऱ्यांच्या जीवनातील वास्तव हे कठोर व जीवघेणे वास्तव आहे. या चौघांचे जीवन हे चारचौघांसारखे जीवन नाही. त्यांच्या परस्परसंबंधांना वेगवेगळे ताण प्राप्त झाले आहेत. यामुळेच 'उभयान्वयी अव्यय' कादंबरीतून स्तिमित करणारे, अस्वस्थ करणारे आणि वाचकाला अंतर्मुख करणारे काही निर्माण व्हावे, अशी अपेक्षा निर्माण होणे सहज शक्य आहे. मात्र प्रत्यक्षात तसे घडत नाही, हे या कादंबरीचे एक फार मोठे अपयश आहे.

या अपयशाला काही कारणे आहेत. ती कारणे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित आहेत. चंद्रकांत खोत यांनी जे जीवनानुभव (ज्यांतही पुन्हा कामप्रेरणेला फार मोठे स्थान आहे) व्यक्त करावयाचे ठरविले त्यांची दिशा त्यांनी स्वतःच निश्चित केली आहे. काही आडाखे लेखकाने आधीच मनाशी बांधले आहेत. सलमा या वेश्येला शेर आवडणे, तिने एक जीवननिष्ठा म्हणून प्रदीपशी शय्यासोबत न करणे, प्रदीपने शकूताईशी असलेले संबंध वास्तव पातळीवर न आणता त्यांना आदर्शाचे रूप देणे, इत्यादी घटनांतून व प्रसंगांतून लेखकाचे आडाखे निश्चित झालेले आढळून येतात. चंद्रकांत खोत हे मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजातील लेखक आहेत. आपल्या वाचनातले (ह. मो. मराठे यांची कथा, सत्यकथेचा

अंक इ.) त्यांनी केलेले उल्लेख, सलमा या व्यक्तिरेखेला दिलेले प्रगल्भ रूप, शकूताईविषयी वाटणारे आदर्श, हळवे व भावडे असे प्रेम इ. मधून सुशिक्षित व काही आदर्श जीवननिष्ठा जोपासणारा लेखक दिसतो. काही अंशी लेखक या चित्रणाने सुखावलाही गेला असेल. पण वाचकाच्या नजरेतून खोतांच्या लेखनातील ही विसंगती सुटू शकत नाही. एका बाजूने जीवनातील कठोर व भेदक सत्याचे दर्शन घडवू इच्छिणारा लेखक विरुद्ध दिशेने कमालीचा हळवा, संवेदनाक्षम व भाबडा झालेला आढळून येतो. एखाद्या कलाकृतीमधील पात्राच्या स्वभावातील विसंगती समजावून घेणे शक्य असते. पण कलावंत म्हणून जेव्हा अशा दोन पातळ्या चंद्रकांत खोत एकाच वेळी गाठतात, तेव्हा कलाकृती म्हणून त्यांची निर्मिती सुसंवाद गाठू शकत नाही. 'उभयान्वयी अव्यय' मधील प्रदीप सावंत काही वेळा प्रदीप सावंत आहे, तर काही वेळा तो चंद्रकांत खोत आहे! लेखकाला ही विसंगती जर टाळता आली असती तर 'उभयान्वयी अव्यय' कादंबरीने अधिक वास्तव व प्रत्ययकारी रूप धारण केले असते. दिनकर व प्रदीप, प्रदीप व शकूताई, प्रदीप व सलमा या भावसंबंधांवर वेगळा प्रकाश पडू शकला असता. स्वत:ची जीवनदृष्टी व स्वत:ची काही मते लेखक जेव्हा अन्य पात्रांवर लादण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा सर्वच मामला अगदी तकलुपी व ढोबळ बनतो. अपघात व नाट्यपूर्ण प्रसंगांची निर्मिती हे परंपरागत असे लेखनशैलीचे काही विशेष आहेत. चंद्रकांत खोत या लेखनशैलीच्या मोहातून सुटू शकले नाहीत. मेल प्रॉस्टिटचूट म्हणून गेल्यावर शकूताईशी प्रदीपची झालेली भेट, दादा लोकांची मारामारी, प्रदीपने दिनकराचा सलमाशी थाटून दिलेला संसार या साऱ्या प्रसंगांतून परिणामकारकता वाढविण्यासाठी काही आडाखे बांधून लेखक पुढे जात असताना दिसून येतो. त्यामुळेच 'उभयान्वयी अव्यय' मधील सांकेतिकतेमधून उभारले जाते ते वास्तवाभास निर्माण करणारे वास्तव! सांकेतिक परंपरा सांभाळणारी एक वाचनीय कादंबरी हे रूपही या कादंबरीला घेता आले नाही. आणि कठोर वास्तवदर्शन घडवणारी श्रेष्ठ शोकात्मिकाही इथे निर्माण होऊ शकत नाही. (शकूताईचा मृत्यू कादंबरीच्या शेवटी आहे म्हणून या कादंबरीला शोकांतिका म्हणणे बरोबर नाही.)

श्री. चंद्रकांत खोत यांची ही पहिलीच कादंबरी आहे. प्रारंभीच्या लेखनात दिसून येणारे काही दोष इथे दिसून येतात. तसे ते दिसणे अपरिहार्य आहे. सुरुवातीला मांडलेल्या विचारात नव्याचा धिक्कार करणे वा पुरस्कार करणे या प्रवृत्तींचा निर्देश केला आहे. 'उभयान्वयी अव्यय' बाबतच्या माझ्या प्रतिक्रिया नकारात्मक आहेत. पण त्या सर्वस्वी निराशाजनक मात्र मुळीच नाहीत. कारण या प्रारंभीच्या लेखनात श्री. चंद्रकांत खोत यांच्या शैलीतील सहजपणा, उत्स्फूर्तपणा

चटकन जाणवतो. जीवनानुभव घेतला जाणे व तो तसाच मांडला जाणे हे यशस्वी लेखनशैलीचे गमक असते. 'उभयान्वयी अव्यय' मधील बालजीवनाचे लेखकाने केलेले चित्रण अधिक वास्तव वाटते ते या सहजसुंदर शैलीमुळे. हीच सहजता पुढील भागात– विशेष करून कामजीवनाच्या चित्रणात– यायला हवी होती. या कादंबरीच्या संदर्भात 'धीटपणे केलेले लेखन' म्हणून ही चर्चा केली गेली आहे. कुणाही कलावंताच्या लेखनातील धीटपणाला फारसे महत्त्व दिले जाऊ नये. कारण धीटपणाला एक तात्कालिक मूल्य आहे. भविष्यकाळात कदाचित हा 'धीटपणा' धीटपणाही वाटणार नाही. नवेपणाचे व धीटपणाचे कौतुक कलाकृतीवर व कलावंतावरही अन्याय करील अशी भीती सदैव असते. या धीटपणाच्या बाबतीत लेखक आत्मसंतुष्ट राहिला तर त्याच्या लेखनाची मर्यादित दिशा निश्चित होईल- त्याचा विकासही खुंटेल. 'उभयान्वयी अव्यय' ही कादंबरी लिहिणाऱ्या चंद्रकांत खोत यांच्याकडून अपेक्षा आहे ती अधिक मूलगामी लेखनाची; आणि अशा लेख. नाची काही बीजे 'उभयान्वयी अव्यय' मध्ये निश्चितच आहेत !

उभयान्वयी अव्यय– चंद्रकांत खोत
अबकडई प्रकाशन, मुंबई.
(महाराष्ट्र साहित्य पत्रिका)

'स्फोट' आणि 'बहिष्कृत'– अरुण साधू यांनी हाताळलेले नवे विषय

अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' या पहिल्याच कादंबरीने मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले होते. एका वार्ताहराच्या अनुभवावर आधारलेली व राजकीय वातावरणाची पार्श्वभूमी असलेली ही कादंबरी लोकप्रिय ठरली. त्यानंतर प्रसिद्ध झालेली 'सिंहासन' ही त्यांची कादंबरी राजकीय विषयावर लिहिलेली असून आकाराने मोठी व संथ गती असलेली अशी आहे. 'स्फोट' आणि 'बहिष्कृत' या त्यांच्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांत मात्र त्यांनी राजकीय विषयापेक्षा निराळे विषय हाताळले आहेत. 'स्फोट' कादंबरी म्हणजे वैज्ञानिक विषयावरील एक कल्पनारंजित कादंबरी आहे, फॅण्टसी आहे; तर 'बहिष्कृत' कादंबरी एका सुशिक्षित दलित युवकाच्या अपयशाची करुण कहाणी आहे.

स्फोट कादंबरीचा नायक डॉ. विश्वनाथ सदाशिव मुंजे हा एक नामवंत

वैज्ञानिक आहे. अमेरिकेत २२ वर्षे काम केल्यावर दिल्ली येथे प्रयोगशाळांचा सल्लागार म्हणून तो ५ वर्षे काम करतो. त्यानंतर मळवली येथे स्वतःची प्रयोगशाळा उभारून तो स्वतंत्रपणे संशोधन करू लागतो. त्याचा मुलगा रमेश हा परदेशी वास्तव्य करणारा संशोधक आहे. विधुरावस्थेत मळवलीसारख्या निसर्गरमणीय व शांत ठिकाणी संशोधन करताना त्याच्या जीवनात अचानकपणे क्रांतिकारक बदल होतो. मुंबई येथे झालेल्या पदवीदान समारंभात त्याचा वसुंधरा केमकर या हुशार मुलीशी परिचय होतो. तिची नेमणूक आपली संशोधन साहाय्यिका म्हणून तो करतो. तिच्याशी बौद्धिक मैत्री घडून आल्यावर लग्नही करायचे ठरवितो. वसुंधरा केमकरबरोबर व्ही. टी. स्टेशनवर आला असताना तो तिथली गर्दी पाहून गांगरून जातो. जगातली वाढती लोकसंख्या पुढील काही वर्षांत अनर्थ निर्माण करणार आहे या जाणिवेने तो भयभीत होतो. जगातील १२०० कोटी लोकसंख्या सहाशे कोटींवर कशी आणावी या विचाराने तो बेचैन होतो. जगाची लोकसंख्या पाच मिनिटांत निम्म्याने कमी करण्याचा शोध तो लावतो. तो आपल्या प्रयोगशाळेत असे स्वर्गीय संगीत निर्माण करतो की, ते ऐकताच पन्नाशीच्या वरची माणसे पाच मिनिटांत हृदयक्रिया बंद पडून मृत व्हावीत ! जगातील सर्व राष्ट्रांच्या होणाऱ्या शिखर परिषदेच्या वेळी टी. व्ही. व रेडिओवर कोट्यवधी माणसे परिषदेचा वृत्तांत ऐकत असतात. त्या वेळी डॉ. मुंजे हे संगीत आपल्या प्रयोगशाळेतून सुरू करतात. पाच मिनिटांच्या अवधीत जगाची लोकसंख्या निम्म्याने कमी होते. आपल्या प्रयोगाचे रहस्य त्याने आपली प्रेयसी वसुंधरा व इतर सर्वांपासून लपवून ठेवलेले असते. अधूनमधून रेडिओवर व अन्य उपकरणांवर येणारी अज्ञात ध्वनिलहर कोणती असावी याचा शोध घेणारा डॉ. खन्ना हा गुप्तचर विभागातील संशोधक व त्याला गुपचूपपणे साह्य करणारा नितीन हा डॉ. मुंजे यांचा नातू त्या वेळी प्रयोगशाळेत असतात. या भयानक व क्रूर प्रयोगाचे गांभीर्य वसुंधरा केमकरच्या लक्षात येताच, ती प्रयोगशाळेतील उपकरणे मोडून टाकते. त्या वेळी होणाऱ्या भयंकर स्फोटात ही चौघेही मरून जातात.

'स्फोट' ही एक कल्पनारंजित कादंबरी आहे हे मान्य करूनच ही कादंबरी वाचावी लागते. वैज्ञानिक संशोधनामुळे भावी पिढीचे जीवन कसे बदलून जाणार आहे याचे चित्रण करणारे लेखन इंग्रजीत बरेच केले जाते. त्याच पद्धतीने लिहिलेली 'स्फोट' ही एक कादंबरी आहे. शास्त्रज्ञ सर्व जगाच्या विनाशाचा विचार कसा करू शकतो याचेही उत्तर कादंबरीत दिले गेले आहे. आपण काही राक्षस नाही. मानववंशाविषयी, पृथ्वीविषयी, जीवसृष्टीविषयी आपल्याला अपार प्रेम, सहानुभूती आणि कळवळा म्हणूनच हा प्रयोग करायला प्रवृत्त झालो असे डॉ. मुंजे म्हणतो.

कल्पनारम्यतेपासून दूर असणारी आणि जीवनातील भेदक वास्तवाची जाणीव करून देणारी 'बहिष्कृत' ही कादंबरी अशोक सोकाजी इंगळे या दलित युवकाच्या समस्येशी निगडित आहे. दलित समाजाला मिळणाऱ्या शिक्षणविषयक सोयींमुळे गेल्या काही वर्षांत वेगळ्या सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. विशेषेकरून या समस्या सुशिक्षित व संवेदनशील अशा दलित युवकांच्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेतलेले युवक सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी प्रवाहाविरुद्ध कशी धाव घेतात, प्रखरपणे कसा लढा देतात व शेवटी त्यांची शोकांतिकाच कशी होते, याचे वास्तव चित्रण करणारी 'बहिष्कृत' ही कादंबरी आहे.

अशोक सोकाजी इंगळे आकोला या शहरवजा गावात बी. ए. पर्यंत शिक्षण घेतो आणि रिदगाव या खेड्यात इंग्रजीचा शिक्षक म्हणून येतो. गावात येताच शाळेचे हेडमास्तर कुळकर्णी त्याला भेटतात. ते त्याला घरी घेऊन जातात. जेवणाची तयारी होते. गप्पांच्या ओघात इंगळे हा मराठा नसून महार आहे हे लक्षात येताच कुळकर्णी मास्तर जेवणाची व्यवस्था ओसरीवर करतात. (उकाडा फार होत आहे हे 'नैसर्गिक' कारणही यामागे असते.) हा अशोक इंगळेला बसलेला पहिला धक्का. त्यातही कुळकर्णी मास्तरांच्या मुलीने (सुमित्रेने) व मास्तरांच्या पत्नीने दाखविलेल्या सहानुभूतीने त्याला दिलासा मिळतो. मात्र आपल्या जातीचा व शिक्षणाचा उल्लेख सहानुभूतीने वारंवार का होतो ते त्याला कळत नाही.

अशोक इंगळे हा चांगले इंग्रजी शिकवणारा होतकरू शिक्षक, पण शाळेतील शिक्षकही सदैव त्याला हिणवीतच राहतात. त्याला सर्वांसाठी असलेल्या माठातील पाणीही पिता येत नाही. महारांच्या मुलांना वर्गात पाठी बसविलेले अशोकला आवडत नाही. तो त्यांना पुढे बसायला सांगतो. त्यामुळे पुन्हा उपहास व चेष्टा त्याच्या वाट्याला येते. गावात देशमुखांचे प्रस्थ फार मोठे. त्यांच्या औदार्यामुळे ते दलित व दलितेतर समाजात फार प्रिय. त्या देशमुखांशी अशोकचा परिचय होतो. त्यांनी दाखविलेल्या आदरालाही सहानुभूतीचा व दयेचा वास येतो. अशोक इंगळे आणखी गुदमरून जातो. त्याला राहायला जागाही गावातल्या महारवाड्यातच शोधावी लागते. देशमुखांच्या मुलीला– मीराला शिकवणी ठेवायची असते. अशोक इंगळेचा विचार देशमुख करतात. हुशार मुलगा आहे, चांगले शिकवील म्हणून ते त्याला बोलावणे धाडतात. तो जात नाही, देशमुखीणबाईंना भेटतो. कधीही न मंजूर होणारा प्रस्ताव तो देशमुखीणबाईंपुढे ठेवतो. गावातल्या महारवाड्यातील विहिरीचे पाणी दूषित झाले आहे. महारवाड्यात हगवण सुरू झाली आहे, तेव्हा गावच्या विहिरीचे पाणी हरिजनांना भरू दिले तरच शिकवणी घेईन, अशी सूचना अशोक इंगळे करतो. मोठ्या तालेवारपणे जगणाऱ्या पण मूलतः दयाळू व उदार असलेल्या

देशमुखांच्या स्वाभिमानाला तडा जातो.

'स्फोट' किंवा 'बहिष्कृत' या वेगवेगळ्या विषयांवरील दोन्ही कादंबऱ्या वाचल्यावर प्रथम जाणवते, ती लेखकाची सूक्ष्म अवलोकनशक्ती. ही सूक्ष्मता व्यक्ति-रेखाटनात, प्रसंगचित्रणात, भावनाचित्रणात, निसर्गचित्रणात व स्थलवर्णनात दिसून येते. अशोक सोकाजी इंगळे याच्या अंतर्मनातील बारकावे लेखकाने टिपले आहेत. अशोकच्या आईशी सलगीने वागणारे लोक (विशेषत: मामा), मामाच्या अपघाती मृत्यूचा आईच्या मनावर झालेला परिणाम, सुमित्रा, चवरची पत्नी, देशमुखीणबाई यांच्या संदर्भात अशोकच्या मनात येणारे विचार इ. मधून लेखकाने नायकाचे अंतरंग उलगडून दाखविले आहे. सुमित्रा ही कुळकर्णी हेडमास्तरांची प्रौढ अविवाहित मुलगी. तिच्या व्यक्तिचित्रणाद्वारे लेखकाने मध्यमवर्गीय समाजातील एका अविवाहितेच्या दु:खाला वाचा फोडली आहे. एका दलित तरुणाच्या करुण अशा जीवनकहाणीबरोबर विकसित होत जाणाऱ्या सुमित्रेच्या व्यक्तिरेखेने कादंबरीच्या कक्षा वाढविल्या आहेत. देशमुखांची मुलगी कादंबरीच्या शेवटापर्यंत दृष्टीस पडत नाही. इतर पात्रांचे बोलणे आणि अशोक इंगळे याने उभी केलेली तिची मानसिक प्रतिमा यावरून तिची व्यक्तिरेखा सूचकपणे स्पष्ट होत जाते. ('स्फोट'-मधील डॉ. खन्नाची प्रेयसी मलहोत्रा आणि या कादंबरीतील मीरा या दोन व्यक्ति-रेखांच्या सूचक आविष्कारात साम्य आहे.) या कादंबरीत अशोक इंगळे या प्रमुख पात्राशिवाय कुळकर्णी हेडमास्तर व त्यांच्या पत्नी, शिक्षक चवर व त्याची पत्नी, पाटील मास्तर, पांडे मास्तर, देशमुख व देशमुखीणबाई, ही दलितेतर समाजातील पात्रे आणि सुकड्या, सुकड्याचा बाप, देवराज, रूपा, पंढरीबोवा इ. दलित समाजातील पात्रे अशा अनेक व्यक्तिरेखा आहेत. 'बहिष्कृत' मधील चित्रण हे विदर्भातील रिदगाव या छोट्याशा गावातील सामाजिक संघर्षाचे चित्रण आहे. यामुळेच विदर्भातील बोलीचा वापर लेखकाने बारकाव्यासहित केला आहे. कादंबरीच्या सुरुवातीला आलेले निसर्गाचे सूक्ष्म रूप लेखकाचे अवलोकनसामर्थ्य प्रकट करते. 'बहिष्कृत' कादंबरी म्हणजे अनेक प्रसंगांची मालिका आहे. कुळकर्णीमास्तर व देशमुख यांची अशोकशी प्रथम झालेली भेट, शिक्षकांच्या गप्पा, दलित गावकऱ्यांचे भजन, सुमित्रेची व अशोकची भेट, विहिरीवरील संघर्ष, महारवाड्याची जाळपोळ आणि कादंबरीचा शेवट इ. प्रसंग लेखकाने अगदी सूक्ष्म तपशिलासह उभे केले आहेत. महारवाड्याचा संपूर्ण विध्वंस झाल्यावर विहीर सर्वांना खुली असल्याबद्दलची दवंडी पिटवली जाणे व पोलिसांनी मृतांचे फोटो घेणे या घटनांमागे कारुण्याबरोबरच उपरोधाची छटाही दडलेली आहे.

राजकीय विषयावर दोन कादंबऱ्या लिहून प्रसिद्धीस आलेल्या अरुण साधू

यांनी 'स्फोट' आणि 'बहिष्कृत' या दोन कादंबऱ्यांत वेगळे विषय हाताळले आहेत, पण त्यांच्या लेखनाचे खरेखुरे सामर्थ्य पहिल्या दोन कादंबऱ्यांतच आहे.

स्फोट : अरुण साधू, प्रकाशक : मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई ४.

बहिष्कृत : अरुण साधू, प्रकाशक : मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई ४.

(महाराष्ट्र टाइम्स) २९।१०।७९

'शापित' व 'देवाची घंटा' – वास्तवाचा आभास

अरुण साधू आणि ह. मो. मराठे हे वाचकांना सुपरिचित असणारे दोन आघाडीचे लेखक. आधीच्या कादंबरीलेखनाने या दोघांनीही स्वतःचा असा ठसा उमटविला आहे. परंतु नुकत्याच प्रकाशित झालेल्या अरुण साधू यांच्या 'शापित' व ह. मो. मराठे यांच्या 'देवाची घंटा' या दोन्ही कादंबऱ्यांना पुरेसे यश लाभलेले नाही.

भयानक दुष्काळात वाताहत झालेल्या कुटुंबाची दुःखपूर्ण कथा हा 'शापित–' चा विषय आहे. आपली म्हातारी आई नानी व पैलवान भाऊ तुकाराम यांना बीड जिल्ह्यातील आपल्या गावी सोडून, ज्ञानोबा आपले गाव सोडून पोटापाण्याची सोय बघण्यासाठी गावोगाव भटकतो. त्याच्या सोबत पत्नी सारजा, मुलगे वामन व शंकर आणि मुलगी बायजा असते. शेजारचा सोनबा व त्याची मुलगी रुक्मिणी– पण ज्ञानोबाबरोबर असतात. वाटेत बाप व सोनबा आणि वामन व इतर माणसे यांची चुकामूक होते. आई, सारजा, रुक्मिणी व बायजा या सर्वांची जबाबदारी वामनवर पडते. आजारी असलेली आईही वामनला त्रास होऊ नये म्हणून हेतु-पुरस्सर त्याला सोडून नाहीशी होते. आता रुक्मिणीला घेऊन वामन मुंबईस कुर्ल्याला येतो. मोलमजुरी करून रुक्मिणीबरोबरच राहतो. दिवस बरे जातात. पण एके दिवशी रुक्मिणी गुंडांच्या तावडीत सापडते. ते रुक्मिणीला घेऊन जातात. त्यांच्या हातचा मार खाल्लेला दुबळा 'शापित' वामन या अफाट मुंबईत एकटाच उरतो.

दुष्काळाची पार्श्वभूमी असलेली 'शापित' ही कादंबरी सुरुवातीला खूपच वास्तव वाटते. रुक्मिणी व वामन यांच्या भावसंबंधाचे वर्णन लेखकाने कुशलतेने केले आहे. विशेषतः वामनच्या मनात रुक्मिणीविषयीच्या भावनांची निर्माण झालेली स्थित्यंतरे चित्रित करण्यातील त्यांचे सामर्थ्य विशेष उल्लेखनीय आहे. दुष्काळाची भयानकता, दारिद्र्यामुळे होणारे गोरगरिबांचे हाल, रस्त्याच्या कामावर

अधिकाऱ्यांकडून केली जाणारी मजुरांची पिळवणूक, शहरी जीवनाचे सूक्ष्म तपशील, प्रादेशिक वातावरणाची निर्मिती यांच्या वर्णनात साधूंचे सामर्थ्य जाणवते. ते त्यांच्या आधीच्या लौकिकाला साजेसेच आहे. रुक्मिणी-वामन संबंधांचे कादंबरीच्या उत्तरार्धातील वर्णन, ग्रामीण पात्रांचा शहरी शृंगार यामुळे कादंबरीच्या मूळ रूपात व आशयात विक्षेप निर्माण होतो. पोटाची भूक ही मानवी प्रेरणा असलेला 'शापित' कादंबरीचा विषय सांकेतिक बनतो.

'देवाची घंटा' या कादंबरीचा विषय प्रामुख्याने शारीरिक भूक हा आहे. कोकणातील एका छोट्या गावातील मारुतीचे देऊळ सांभाळणाऱ्या भिक्षुकाची, गोप्या भटाची ही कहाणी आहे. आपले मूळ गाव सोडून गोप्या भट एका गावात येतो. खाजगी मालकीचे मारुतीचे देऊळ सांभाळतो. मालकाच्या मृत्यूनंतर देऊळ पंचांच्या ताब्यात जाते. सुरुवातीला मिळणारे खाजगी उत्पन्न, प्रसादाची फळे, तांदूळ काहीच गोप्याला मिळत नाही. गावात आल्यापासून येसू नावाच्या तेलीण स्त्रीशी त्याचा संबंध येतो. लग्नाच्या बायकोप्रमाणे गोप्या तिला वागवतो. त्याला येसूपासून शंकऱ्या व चंद्री ही मुलेही होतात. गावातील भिक्षुक उघडपणे अनैतिक व्यवहार करतो कसा व गावचे लोक हे चालू कसे देतात असे प्रश्न या संदर्भात विचारू नयेत. असे प्रश्न विचारले गेले तर लैंगिक वासना चित्रित करण्याचे लेखकाचे स्वातंत्र्यच हिरावून घेण्यासारखे आहे! शंभर रुपयांची चोरी करणारा गोप्या भट पकडला जातो. खूप आजारी पडतो. गोप्याचा विद्वान, दशग्रंथी बाप गोप्याला आपल्या गावी घेऊन जातो. येसू उघडी पडते. तिला आश्रय मिळतो तो वासनेने पछाडलेल्या गोगटे वकिलांचा आणि वासूभटजी या गोप्या भटाच्या मित्राचा. दोघांच्या वासनेचा बळी झालेल्या येसूला मुलगी होते. दारिद्र्य आणि विटंबना यांनी असहाय्य झालेली व केळीचा घड चोरण्याच्या प्रयत्नात असलेली येसू विहिरीत पडून मरते. तिचा मुलगा येसूची लहान मुलगी वासूभटाच्या हवाली करतो. वासूभट गोगटे वकिलांकडे पोरीला नेऊन टाकतो. गोगटे वकील पोरीला देवळाच्या थंडगार पाबळीत नेऊन टाकतो. पोरगी मरते. 'देवाची घंटा' मध्ये गोप्या भट-येसू, येसू-वासूभट, येसू-गोगटे वकील यांच्या संबंधांना महत्त्व आहे. किंबहुना त्यांच्या अनैतिकतेचे वर्णन करणे हाच कादंबरीकाराचा प्रधान हेतू आहे. यामुळे सामाजिक संदर्भ आणि अनैतिक संबंधांतील सूक्ष्मता ही कादंबरी हरवून बसली आहे. कादंबरीच्या यशाच्या दृष्टीने बापू झांटये या सूचक व्यक्तिरेखेचा निर्देश केला पाहिजे,

'शापित' आणि 'देवाची घंटा' या कादंबऱ्यांचे विषय पोटाची व शरीराची 'भूक' हे आहेत. पण कोणत्याही कलावंताला आव्हान देणारे हे सनातन विषय अरुण साधू व ह. मो. मराठे यांच्यासारख्या प्रस्थापित लेखकांना समर्थपणे

पेलता आलेले नाहीत. या दोन्ही भुका म्हणजे प्रबळ अशा मानवी प्रेरणा आहेत. त्यांच्यातील गुंतागुंत, गूढता, अनाकलनीयता, तीव्रता साधू व मराठे या दोघांना व्यक्त करता आलेली नाही. असे का घडावे ? जीवनातील कोणताही अनुभव आपण पाहतो तितका सरधोपट, व एकसुरी असू शकत नाही. त्याला अनेक परिमाणे असतात. प्रदीर्घ चिंतनाची या अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी आवश्यकता असते. तो अनुभव निश्चित परिणाम साधण्याच्या दृष्टीने एका कलाप्रकारात सामावताना जे अपयश कलावंताला यायची शक्यता असते, तेच अपयश या कादंबऱ्यांच्या वाटचाला आले आहे. वास्तव अभिव्यक्तीपेक्षा तंत्रबद्धतेने विशिष्ट परिणाम साधण्याच्या अरुण साधू व ह. मो. मराठे यांच्या प्रवृत्तीमुळेच असे घडले आहे. 'शापित' व 'देवाची घंटा' या दोन्ही कादंबऱ्या वास्तवाचा आभास निर्माण करणाऱ्या व वाचनीय असल्या तरी कलामूल्य हरवून बसल्या आहेत.

शापित. अरुण साधू, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
देवाची घंटा. ह. मो. मराठे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
(महाराष्ट्र टाइम्स) १६ एप्रिल १९८१

मुक्या मुलीची बोलकी कहाणी– 'सुखदा'

'कॅलिडोस्कोप' या महाराष्ट्र राज्य शासनाच्या ह. ना. आपटे पारितोषिक विजेत्या कादंबरीनंतर अच्युत बर्वे यांनी लिहिलेली 'सुखदा' ही कादंबरी मुकी मुलगी सुखदा व तिचा पिता माधव यांच्या भावसंबंधाची कहाणी आहे.

बोलता न येणारे, काहीही ऐकू न शकणारे अपत्य वाटचाला येणे ही जीवनातली केवढी भयानक आणि अस्वस्थ करणारी घटना ! अशी घटना कोकणातील माधव बेहेरे या तरुणाच्या जीवनांत येते. पुण्याला कॉलेजात शिकत असताना माधव बेहेरेचे अप्पासाहेब या श्रीमंत गृहस्थाच्या मुलीशी– दुर्गाशी प्रेम जमते. पदवी मिळताच माधव-दुर्गाचे लग्न होते. या लग्नावर घरची माणसे– विशेषत: माधवची आई नाराजच असते. पुन्हा प्रश्न नोकरीचा. स्वत:च्या लहानशा गावातच माधवला शिक्षकाची नोकरी मिळते. त्यातच दुर्गाला दिवस जातात. बस्तान न बसलेल्या मुलाचे अपत्य दुर्गाच्या सासूला नको असते. पण दुर्गाला हवे असते. माधवचे साडू श्रीकृष्ण भावे माधवला एका गुजराती कंपनीत नोकरी मिळवून देतात. त्याला मुलगी होते. सासरे तिचे नाव ठेवतात सुखदा. दहा वर्षांच्या अवधीत

माधवची परिस्थिती खूप सुधारते. जाहिरात व्यवसायात मोठी हुद्द्याची जागा त्याला मिळते. गोरेगावची एक खोली, दादरच्या चाळीतील दोन खोल्या व शेवटी कॅडेलरोडवरचा प्रशस्त ब्लॉक अशी राहण्याच्या जागेत स्थित्यंतरे होतात. कंपनीची गाडीही मिळते. घरी नोकरचाकर असतात. दुःख एकच– बहिरी म्हणून जन्माला आलेली मुलगी सुखदा. माधवची दुसरी मुलगी श्रुती मात्र सर्व प्रकारे सुदृढ असते. सुखदा बोलकी व्हावी म्हणून माधव व दुर्गा जीवाचे रान करतात, पण त्यांच्या प्रयत्नांना यश येणार नसते. माधवच्या घरात पूर्वी घडलेल्या भ्रूणहत्येची हकीकत माधवला सावळेगुरुजी नावाच्या ज्योतिषाकडून कळते. पतिनिधनानंतर माहेरी परतलेल्या माधवच्या बहिणीला दिवस गेलेले असतात. माधवच्या आईला ते जन्माला येणारे मूल नको असते. जन्मलेल्या नातीच्या गळ्याला माधवची आई नख लावते. त्या मृतात्म्याचा तळतळाट सुखदाला बाधतो. दुर्दैवी सुखदा पारंपरिक शिक्षण घेत नाही. पण चित्रकलेतील आवडीमुळे, हिमतीने जी. डी. आर्ट होते. उत्सव ओझा नावाच्या मुक्या गुजराती मुलाशी तिचे प्रेम जमून दोन्ही घराण्यांच्या संमतीने त्यांचा थाटात विवाह होतो. सुखदाला मूल होण्याची चिन्हे दिसू लागताच माधव पुन्हा अस्वस्थ होतो. सुखदाप्रमाणेच तिचे मूल शापित म्हणून जन्माला आले तर कसे होणार, हा प्रश्न त्याला भेडसावतो. माधवच्या ऑफिसमधील नन् होऊ इच्छिणाऱ्या ख्रिश्चन मुलीचे– साराचे शब्द त्या वेळी त्याला आठवतात– "सर, आपल्या प्रत्येकाच्या खांद्यावर एकेक क्रूस दिलेला असतो आणि अखेरपर्यंत– अगदी अखेरपर्यंत तो आपला आपल्याला वाहून न्यावा लागतो. जड झाला तरी खाली ठेवता येत नाही. तो पेलतच आयुष्य चालावं लागतं. धाप लागली तरी, अखेरच्या श्वासापर्यंत....." या निवेदनाने कादंबरी संपते.

'सुखदा' कादंबरी म्हणजे माधवचे आत्मनिवेदन आहे. या निवेदनात एक केंद्रितता आहे. माधवच्या राहण्याच्या जागेत झालेले बदल, नोकरी मिळालेल्या बढत्यांचे उल्लेख, त्याला एकदाच घडलेली परदेशवारी या गोष्टी वगळता कादंबरीचे सर्व निवेदन सुखदा या पात्रावरच केंद्रित झालेले आहे. 'सुखदा' कादंबरी म्हणजे माधव व सुखदा यांच्या भावबंधाची कहाणी होय, ते याच अर्थी. लेखकाच्या निवेदनातून सुखदा व दुर्गा, सुखदा व श्रुती, सुखदा व माधव यांचे भावबंध प्रामुख्याने उभे राहतात. कादंबरीच्या आत्मनिवेदनपरतेमुळे या कादंबरीला सहजता प्राप्त झाली आहे. तसेच निवेदनातील संयम व समरसता विशेषच उठून दिसते. माधवच्या मनःस्थितीची निर्दशक अशी वाक्ये निवेदनाच्या ओघात अकृत्रिमपणे आली आहेत–

'अंगावर चढलेल्या मुंगीनं कपड्याच्या आत क्षणात इथं तर क्षणांत तिथं,

अशी धावाधाव करून, पकडायला गेलं तरी हाताला लागू नये पण त्रस्त करावं तसा अधूनमधून सुखदाच्या विचारानंही मी त्रस्त होत होतो.'
(पृष्ठ ४६).

'तापकरी माणसाला सगळचं कडू लागावं, तसं माझं झालं असावं. शक्य आहे, पण माझा हा ताप न निघणारा होता. दिवसेंदिवस वाढत जाणारा होता.'
(पृष्ठ ७९).

सुखदा वहीत काही लिहिण्याच्या ऐवजी चित्रच काढून ठेवते त्या वेळची माधवची प्रतिक्रिया अशी–

'मी काय समजायचं ते समजलो. दगडी पेन्सिल पाटीवर कुणी कराकरा घासू लागला, की अंगावर शहारे यावेत तसं माझं झालं. पण या बाबतीत मी दुबळा होतो, अगतिक होतो...'

'चांदण्याच्या प्रकाशात सगळं लख्ख दिसावं, पण काही वाचू म्हटलं, तर वाचता येऊ नये, अशी आमची स्थिती होत होती.'
(पृष्ठ १२४).

एखाद्या कादंबरीत तिच्या आत्मनिवेदनपरतेमुळे असा वास्तव आणि परिणामकारक प्रत्यय देता येत असला तरी या निवेदनपद्धतीचे काही तोटेही असतात. संपूर्ण कादंबरीत माधव-सुखदा यांच्या परस्परसंबंधांना जे महत्त्व विस्ताराने व सूक्ष्मतेने दिले गेले आहे त्या मानाने सुखदा-दुर्गा, सुखदा-श्रुती, सुखदा-उत्सव या पात्रांना देता आलेले नाही. 'कॅलिडोस्कोप' या अच्युत बर्वे यांच्याच कादंबरीतील इतर पात्रे आत्मनिवेदनाने कथानायकावर जसा प्रकाश टाकून 'बहुमिती' प्रत्यय देतात तसा प्रत्यय 'सुखदा' या कादंबरीत येत नाही. लेखकाच्या आत्मनिवेदनपर शैलीच्या सामर्थ्याचीच ही अंगभूत मर्यादा आहे.

'सुखदा' कादंबरीत डॉ. लागू, डॉ. आजगावकर, कविवर्य मंगेश पाडगावकर, दत्तप्रसन्न काटदरे, प्रकाश मोहाडीकर या सुप्रसिद्ध व्यक्तींचे उल्लेख झाले आहेत. यामुळे ही कादंबरी सत्यकथा असावी असा अंदाज बांधता येतो. एखाद्या कलाकृतीतील सत्य कधीकधी कल्पितापेक्षाही कसं भयानक असू शकतं, याचं ही कादंबरी म्हणजे एक चांगलं उदाहरण आहे. या पात्रांशिवाय लेखकाने इतर पात्रांचे– माधवचा भाऊ तात्या व आई–यांचे केलेले व्यक्तिरेखाटन उल्लेखनीय आहे. हिशेबी, धोरणी, अलिप्त, कठोर, निर्मळ, निग्रही आई आणि समंजस, परोपकारी, सहृदय भाऊ–तात्या यांच्यातील विरोध लेखकाने उभा केला आहे. मुकी सुखदा व तिचे अस्थिर भवितव्य एवढेच माधवचे दुःख नाही. अपंग मुलांच्या मातपित्यांना चमत्कारिक व अनपेक्षित अशा सामाजिक उपहास-उपरोधाला तोंड द्यावे लागते. शेजारचा बुद्धा सिंधी, चाळीतले शेजारी भागवत व डोंगरे,

लग्नघरात सुखदाच्या मुकेपणाची आणि माधवच्या दुर्दैवाची चर्चा करणारे भटजी. ही सर्व माणसे आपल्या लागट बोलण्याने माधवला अस्वस्थ करून टाकतात. उलट डॉ. आजगावकर, सासरे आप्पासाहेब, माधवचा मित्र डॉ. वणजारा, चित्रकार दलाल, चित्रकार जोशी, मूकशाळेच्या शिक्षिका मैनाताई जोशी, अशी कितीतरी सहिष्णु व दिलासा देणारी माणसे माधवला भेटली आहेत. मुलीच्या प्रवेशाला सौम्यपणे नकार देणारे बाल मोहनचे दादासाहेब रेगे व सहानुभूतीने आपल्या शाळेत प्रवेश देणारे प्रकाश मोहाडीकर यांच्यातील सूचक विरोधही सूक्ष्मपणे पाहिला तर जाणवणारा आहे. सुष्ट-दुष्ट पात्रांचा अच्युत बर्वे यांनी उभा केलेला पट हृदयाला स्पर्श करणारा आहे, 'सुखदा' कादंबरीची ही एक जमेची बाजू आहे.

ही कादंबरी म्हणजे प्रसंग व व्यक्तिचित्रांची आत्मनिवेदनाने साकार होणारी मालिका आहे. हॉर्न न ऐकता सुखदाने ट्रकसमोर जाणे, दादरच्या ख्रिश्चनांच्या दफनभूमीत जाऊन पाकोळ्या गोळा करीत राहून इतरांना भयग्रस्त करून सोडणे, सुखदाच्या जन्माचे रहस्य साबळे ज्योतिषाने उघडे करणे, दुर्गाने सुखदावर चोरीचा आळ घेऊन तिला मारणे आणि त्यानंतर सुखदाने 'अबोल' होणे. पुण्याच्या लग्न-समारंभाला हजर होऊन घरी आल्यावर काही दिवस सुखदाने विमनस्क होणे, इ. प्रसंग कथानकाच्या ओघात सहजपणे आले आहेत. दुर्गा सुखदाच्या मुकेपणावर फारसे बोलत नाही. माधव मात्र आपल्या प्रतिक्रिया सतत व्यक्त करीत असतो. (कदाचित कादंबरीतील आत्मपरतेमुळे तसे घडले असावे.) दुर्गा आपला राग शेजाऱ्यांना तंबी देऊन व्यक्त करते तेव्हा ती खरोखरच 'दुर्गा' बनलेली असते. एकदा दुर्गाच्या नात्यातली एक बाई येऊन 'काय म्हणते तुझी अबोली ?' या बोचक प्रश्नाने सुखदाची चौकशी करते. ती बाई गेल्यावर धुमसणारी दुर्गा कुंडीतली अबोलीची झाडे फसाफस उपटून काढून रस्त्यावर फेकून देते. मुलीचे दुःख पाहून आप्पासाहेबांसारखा बुलंद छातीचा– सह्याद्रीच्या छातीचा– माणूसही ओक्साबोक्शी रडू लागतो, हा प्रसंग किंवा मच्छरदाणीत टाळीचा मोठा आवाज करून सुखदा खरोखरच बहिरी आहे काय हे अजमावण्याचा माधवने केलेला प्रयत्न (पृ. ४५) आणि उत्सव ओझाशी लग्न करण्याचा निर्णय पत्रद्वारा माधवला कळविण्याचा सुखदाचा प्रयत्न (पृ. २३४) असे सर्वच प्रसंग कारुण्याने ओतप्रोत भरलेले आहेत. प्रसंगाच्या वास्तव रेखाटनासाठी अनुरूप भाषा लेखकाने वापरली आहे.

"गेले दोन दिवस मी जाम वैतागलो होतो. अंगात आल्याप्रमाणं दिवसा आणि रात्री पाऊस कोसळत होता." (पृष्ठ ९).

"थंडीच्या दिवसांत बैलाच्या उबेत मांजरानं पाय ताणवून आणि डोळे मिटून पसरावं तसं तर माझं चाललं नव्हतं ?" (पृष्ठ, २४).

"या सगळ्या आठवणी करंड्यातल्या कुंकवासारख्या लाख मोलाच्या होत्या." (पृष्ठ १६२).

"एखाद्याच्या अंगावर एकदम चेंडू फेकावा, तसं मैनाताई आल्या आल्याच मनात खदखदत असलेलं बोलून टाकीत." (पृष्ठ ८४).

साबळे गुरुजींनी सुखदाच्या दुर्दैवी अवस्थेची कारणमीमांसा ज्योतिषशास्त्राच्या आधारे केल्यावर लेखकाची निर्माण झालेली प्रतिक्रिया अशी–"अपराध कुणाचा? आणि त्याची शिक्षा कुणाला ? खिडकीशेजारच्या माडावरच्या अनेक झावळ्यांपैकी एखाद्याच झावळीचं, एखादंच पातं वाऱ्यानं पकडून सतत थरथरत ठेवावं, तसं ते होतं. (पृष्ठ १२८).

आजच्या मराठी कादंबरीत ठराविक विषय थोडाफार वेगळा साज सजवून पुनःपुन्हा मांडले जातात. मुक्या मुलीचे भावचित्रण हा, रूढ विषयांपेक्षा वेगळा विषय लेखकाने एकाग्रतेने फुलविला आहे. 'सुखदा' कादंबरीत अच्युत बर्वे यांनी 'मुक्या' मुलीची वेदना बऱ्याच नेटकेपणाने आणि ताकदीने 'बोलकी' केली आहे.

सुखदा–अच्युत बर्वे.
मॅजिस्टिक प्रकाशन, मुंबई.
(मुंबई सकाळ)

'अकरा कोटी गॅलन पाणी'– खाण-कामगारांच्या जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण

अनिल बर्वे यांनी यापूर्वी लिहिलेल्या 'डोंगर म्हातारा झाला,' 'थँक यू मिस्टर ग्लॅड', 'स्टडफार्म' या कादंबऱ्या त्यांच्यातील विषयांच्या विविधतेमुळे लोकप्रिय कादंबऱ्या ठरल्या आहेत. अपरिचित विषय, नाट्यपूर्ण प्रसंग– रेखाटन, आखीवरेखीव ओघवती भाषाशैली आणि आटोपशीर कथानक या विशेषांमुळे अनिल बर्वे यांची कादंबरी 'स्वतःची कादंबरी' ठरली आहे.

'अकरा कोटी गॅलन पाणी' ही त्यांची अलीकडची कादंबरी. खाण-अपघाताचे चित्रण हा या कादंबरीचा विषय आहे. महाराष्ट्रातील श्रमजीवी वर्गाचे चित्रण असलेले लेखन मराठीत बरेच झाले आहे. पण खाण-कामगारांचे नाही. 'माणसं' सारख्या पुस्तकात हमालांच्या दुर्दशेचे चित्रण अनिल अवचट यांनी

समरसतेने केले आहे. खाण-कामगारांचे जीवन म्हणजे कल्पिता न येणारा जीवनाचा भयानक असा अनुभव. विशेषत: चासनाला दुर्घटनेमुळे कोळसा खाणीत काम करणाऱ्या कामगारांच्या शोकपूर्ण जीवनाची कल्पना जनसामान्यांना आली आहे. खाण-कामगारांचे जीवनचित्रण करणारी ही कादंबरी लेखकाने 'चासनाला खाण-अपघातात बळी गेलेल्या कोळसा खाण-कामगारांच्या स्मृतीला' आदरपूर्वक अर्पण केली आहे.

'अकरा कोटी गॅलन पाणी' कादंबरीतील प्रमुख पात्र आहे निवृत्त इंजिनियर स्वामी. खाणमालक जमनादास मेहता यांच्याकडे इमानेइतबारे दीर्घकाळपर्यंत नोकरी केलेला इंजिनियर स्वामी हा परिस्थितिशरण आणि पापभीरू माणूस आहे. तीस-पस्तीस वर्षांच्या नोकरीनंतर तो निवृत्त होतो. त्याने तयार केलेल्या आराखड्याप्रमाणे 'शैतानी खदान' चे काम सुरू होते. सरकारी सबसिडीचे पैसे खाणमालक स्वत:च्या घशात घालतो. खांबात पुरेशी वाळू भरली जात नाही. काम अर्धेकच्चे राहते. पण खाणीतून खूप कोळसा नंतर काढला जातो. कोळशातून मालकाला– जमनादास मेहताला– खूप फायदा होतो. पण त्याबरोबरच भविष्यकाळात होणाऱ्या दुर्घटनेचा पाया घातला जातो.

अनेक वर्षे गेल्यामुळे अंदाजे अकरा कोटी गॅलन विषारी पाणी खाणीत साठलेले असते. नवीन खाण खोदताना भद्रपूर खाण व शैतानी खदान यांत नकाशामध्ये तीनशे ऐंशी फूट अंतर दाखविलेले असते. पण प्रत्यक्ष अंतर शंभर फूटच आहे, हे फक्त स्वामीला माहीत असते. शैतानी खदानपर्यंत खोदकाम झाले की सगळे पाणी नवीन खाणीत शिरणार आणि भयानक मनुष्यहानी होणार हे ध्यानात येताच हा म्हातारा व निष्पाप इंजिनियर हादरतो आणि हे खोदकाम होऊ नये म्हणून खूप प्रयत्न करतो. मालक जमनादास मेहता, मॅनेजर दिवेचा, कामगार नेता पिंटो, दिल्लीतील सरकारी अधिकारी, पुढारी आणि मंत्री, वर्तमानपत्रांचे संपादक या सर्वांना तो भटतो. पण मालकाची या सर्वांवर जबरदस्त पकड असल्यामुळे तो शेवटी अपयशी ठरतो. होणारी दुर्घटना टळत नाही. चारशेतीस कामगार अपघातात मरतात. स्वामी वेडा होतो. त्याच वेळी वर्तमानपत्रात बातमी येते– "सर जमनादास मेहता यांच्या परोक्ष माहितीशिवाय शैतानी खदानचे खोटे नकाशे दिले गेल्याने व सबसिडीचे पैसे खाऊन वाळू न भरल्यानं ही दुर्घटना घडली व चारशे तीस कामगार बळी गेले. या दुर्घटनेस शैतानी खदानचा भ्रष्ट पैसेखाऊ इंजिनियर-स्वामी हा जबाबदार आहे." मूळ वास्तव घटनेस उपरोधिक डूब देणारी वर्तमानपत्रातील बातमी कादंबरीत शेवटी नोंदून लेखकाने कादंबरीची परिणामकारकता वाढविली आहे.

आकाराने छोटेखानी असलेल्या या कादंबरीत अनिल बर्वे यांनी अनेक व्यक्ति-

रेखा शब्दांकित केल्या आहेत. त्यात जमनादास मेहतासारखा बेरकी, षड्यंत्री खाणमालक, संपन्न व्यक्तिमत्त्व लाभलेला हुशार पण अनुभवी मॅनेजर दिवेचा, जुना कामगार नेता रामप्रसाद, नवीन कामगार नेता लेनिनवादी पिटो, अल्पशिक्षित मंत्री सोनूसिंग बाठे, मत्सरी उद्योगमंत्री काकासाहेब गोडांबे, अपघातात बळी पडलेला भोला आणि आशुतोष मुखर्जी, भोलाचा दुर्दैवी बाप कैची, साहसी खाण कामगार तिवारीचाचा अशी पात्रे कादंबरीत आहेत.

अनिल बर्वे यांच्या शैलीतील उपरोध पुढील वाक्यांत दिसून येतो.–

'राज सकाळी मॉर्निंग वॉकला जाताना जमनादास मेहता प्लॅस्टिकच्या पिशवीतून न चुकता साखर घेऊन जात. वारुळातल्या मुंग्यांना खाऊ घालत. स्वत: पहिला घास खायच्या आधी कबुतरांना दाणे टाकायलाही ते कधी चुकत नसत.' (पृ. १३)

एक मार्मिक वाक्य–

'कोळसा जाळणारे सोन्याचा धूर काढू लागले– कोळसा खणणारे स्वत:चा जीव जाळू लागले... (पृ. ८).

'चालता चालता स्वामी एका पिलरशी थांबला. शेतकरी बैलाच्या पाठीवरून हात फिरवतो, तितक्याच ममतेनं कोळशांच्या भितीवर त्यानं हळुवारपणे हात फिरवला.'

–अशा काही वाक्यांतून अनिल बर्वे यांची पृथक शैली जाणवते.

कादंबरीतील एकूण वातावरणात अनपेक्षितता आहे. त्यामुळे आशुतोष मुखर्जी व भोला यांचे अपघाती मृत्यू खटकत नाहीत. परंतु बानर्जीच्या बायकोने सर्वांसमोर मंत्री मोहनसिंग बाठे यांच्या थोबाडीत देणे अवास्तव वाटते. जीवनातील नाट्यपूर्ण घटनांचे आकर्षण लेखकाला असल्याचे दिसून येते–

कोळसा खाणीतील अपघातावरची ही कादंबरी अनिल बर्वे यांनी झपाट्याने लिहून थोडक्यात संपविली आहे. कोळशाच्या खाणीतील वातावरण नेमक्या आणि तांत्रिक शब्दांत अशा तऱ्हेने उभे केले आहे की, खाणकामगारांच्या दुर्दैवी जीवनाचा प्रत्यय यावा. 'डोंगर म्हातारा झाला' पासून 'स्टडफार्म' पर्यंतच्या कादंबऱ्या एकत्रित वाचल्या की अनिल बर्वे यांच्या कादंबरी-लेखनाचे विशेष लक्षात येतात. ओघवत्या भाषेत तंत्रबद्धतेने साकार केलेल्या कथानक–व्यक्तिरेखातून अनोखा जीवनानुभव अनिल बर्वे यांना व्यक्त करायचा असतो. निवेदनाच्या या पद्धतीमुळे त्यांच्या कादंबऱ्या वाचनीय झाल्या आहेत. पण कलाकृती म्हणून त्या पुरेसे समाधान देऊ शकत नाहीत. चांगला विषय अधिक ताकदीने न हाताळला गेल्यामुळे काहीसे असमाधान वाटत राहते. कादंबरी वाचनीय करण्याचे, नवीन विषय वाचकांपुढे ठेवण्याचे श्रेय त्यांना मिळते. त्यांच्या या यशात सामर्थ्याबरोबरच मर्यादाही

सामावलेल्या आहेत. अनोखा विषय आणि वाचनीयता हे शैलीविशेष चांगली कलाकृती निर्माण होण्यासाठी पुरेसे ठरत नाहीत. खाणकामगारांच्या जीवनातील भयानकता, दारुण दुःख आणि असहाय्यता याचा प्रत्यय कादंबरीतून आला तरी या कादंबरीच्या विषयाचा आवाका खूप मोठा आहे, याचीही जाणीव होते. अधिक सखोल आणि मनाला खूप भिडणारा अनुभव आपल्या कादंबऱ्यांतून साकार करणे या लेखकाला शक्य आहे. 'अकरा कोटी गॅलन पाणी' आणि आधीच्या तीन कादंबऱ्या वाचल्यावर हीच रुखरुख राहते.

अकरा कोटी गॅलन पाणी– अनिल बर्वे.
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव, मुंबई–४.
(मुंबई सकाळ)

'भाकरी आणि फूल' : कोकणातील दलित जीवनाचा शोध

मधु मंगेश कर्णिक यांची 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी १९७२ साली 'माहेर' च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. या कादंबरीच्या निर्मितीला कारणही तसेच घडले. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे प्रसिद्धिअधिकारी म्हणून कर्णिक त्या वेळी काम करीत होते. स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव कसा साजरा करावा, याविषयी विचारविनिमय करण्यासाठी सचिवालयात साहित्यिक, कलावंत आणि पत्रकार यांची बैठक मुख्यमंत्र्यांनी बोलावली होती. त्या वेळी एका साहित्यिकाने पुढील सूचना केली– स्वातंत्र्याची पंचवीस वर्षे चित्रित करणारा एक सुरेख चित्रपट शासनाने तयार करावा आणि त्याचे नाव ठेवावे 'भाकरी आणि फूल.' भाकरी समृद्धीचे आणि फूल संस्कृतीचे प्रतीक ! त्या वेळी कर्णिकांना आपल्या करूळ गावातील महारांचे जीवन आठवले. तिथला कृष्णा, मोन्या महार आणि संपूर्ण महारवाडा यांच्यासाठी भाकरी आणि फूल अप्राप्यच होती. पंचवीस वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर करूळ गावचा महारवाडा आहे तसाच राहिलेला होता. कादंबरीच्या प्रस्तावनेत ही सर्व हकीकत सविस्तरपणे आली आहे. त्या वेळी पंधरा ऑगस्टच्या 'साधने' च्या अंकात राजा ढाले यांचा प्रक्षोभक लेख प्रसिद्ध झाला होता. स्वातंत्र्याच्या प्रतीकाबद्दल दलित मनाला वाटणारी चीड त्या लेखात व्यक्त झाली होती. राजा ढाले यांच्या त्या लेखाने महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील आनंदनेही आपल्या डायरीत तसेच विचार लिहिले होते. त्या संदर्भात कर्णिक लिहितात, "मी जन्माने दलित नसलो तरी दलितांना या

स्वातंत्र्याविषयी काय वाटते, याची खूण माझ्यातील लेखकाला कुठेतरी अंतर्यामी पटलेली आहे. नाहीतर प्रत्यक्षातल्या राजा ढालेचे आणि माझ्या कादंबरीतील आनंदचे विचार एवढे एकसारखे कसे असते ? साहित्यात काय किंवा प्रत्यक्ष जीवनात काय, माणसाचा आत्माविष्कार कसा होतो हे महत्त्वाचे, हेच या निमित्ताने मला मनोमन पटले. माझ्या कादंबरीच्या अस्सलपणाची ती एक जिवंत निशाणीच मी मानली." ही कादंबरी वाचून आपण अस्वस्थ झाल्याचे 'अस्मितादर्श' चे संपादक प्रा. गंगाधर पानतावणे यांनी कणिकांना कळविले. 'भाकरी आणि फूल 'चे पुनर्मुद्रण कणिकांनी दहा वर्षांनी तसेच्या तसे केले. कारण त्यानंतरच्या दहा वर्षांत दलित समाज व दलित साहित्य यांत लक्षणीय बदल झालेला नाही, असे कणिकांचे मत आहे.

आजवरच्या दलित साहित्यात प्रामुख्याने देशावरील दलितांचे चित्रण आले आहे. मधु मंगेश कर्णिकांच्या आधीच्या लेखनात कोकणातील दलित जीवनाचे चित्रण आले आहे. 'मु. पो. देवाचे गोठणे.' लिहिणाऱ्या माधव कोंडविलकरांनी कोकणातील चांभार समाजाची वस्तुस्थिती चित्रित केली आहे. हा एक अपवाद. तरीही कोकणातील महार साहित्यदृष्ट्या तसे वंचितच राहिले आहेत. 'भाकरी आणि फूल 'मध्ये कोकणातील महार समाजाचे सूक्ष्म तपशील आले आहेत. कोकणातील महार समाज व देशावरील महार यांच्यात फरक आहे. कोकणातील महार समाजात शिक्षण, आर्थिक स्थिती याबाबतीत देशावरील महारांच्या मानाने फारसा बदल झालेला नाही. जुन्या परंपरा, रूढींना हा समाज घट्ट चिकटून राहिलेला आहे. दुरवस्था वाटचाला येऊनही कोकणातील महार आपला पीळ न सोडता तीच दुरवस्था निमूटपणे स्वीकारताना दिसतात. ते परिस्थितीला फारसा विरोध करीत नाहीत. " (कोकणात) धर्मांतर धुळीत मिसळून वाऱ्यावरून वाहून गेले होते. " इथले महार धड हिंदूही नव्हते नि बौद्धही नव्हते ! मुंबईला बौद्ध आणि गावी महार अशी साऱ्यांची गत झाली होती. बेळे नि 'पान' हा महारातला पुरातन उच्चनीच भेदही होता तसाच होता." (पृ. १४१) कोकणातील महार आणि देशावरील महार यांच्यात असा भेद असण्याचे कारण देशावरील महार हे 'बलुतेदार' आहेत, तर कोकणातील महार 'मानकरी'! आपले मानकरीपण शाबूत ठेवण्यासाठी हा समाज सतत परिस्थितीला शरण जात राहिला. 'गावकी' च्या दडपणाला बळी पडत राहिला. 'भाकरी आणि फूल' मध्ये दलित समाजाचे आलेले विश्लेषण कादंबरीचे सामाजिक मूल्य वाढविणारे आहे, नव्हे, हा या कादंबरीचा प्रमुख विशेष आहे.

ही कादंबरी करुळ गावचा शिवनाक महार व गोपाळ, पांडुरंग आणि आनंद या तीन मुलांची आहे. ही कादंबरी केवळ 'कुटुंबकथा' च नव्हे, 'समाजकथा' ही



आहे. दलित समाज संपूर्ण एकसंध नाही. तो दुभंगलेला आहे ! सुशिक्षित दलित अशिक्षित समाजापासून, पर्यायाने मूळ समाजापासून तुटतो. खरे म्हणजे सुशिक्षित महार समाजसुद्धा एकसंध नाही. पांढरपेशा बनू पाहणारा, सुखवस्तू जीवन जगू पाहणारा, हस्तीदंती मनोऱ्यात राहू पाहणारा असा एक वर्ग दलित समाजात निर्माण झाला आहे. ॲडव्होकेट निलेकर आणि प्रो. सहदेव माने ही कादंबरीतील दोन पात्रे या दुरावलेल्या सुशिक्षित समाजाची उदाहरणे आहेत. ब्राह्मणी जीवन जगू पाहणारा, आपले स्वतःपुरते पाहणारा, कुटुंबवत्सल दलित वर्ग नव्याने निर्माण झाला आहे. शिवनाक महाराचा मुलगा पांडुरंग हा याचे उदाहरण आहे. दलित नेतृत्वाविषयी आदर व्यक्त करणारा, डॉ. आंबेडकरांना दैवत मानणारा, प्रयत्नशील असणारा पण परिस्थितीला टक्कर देऊ न शकणारा, चिरफळ्या झालेल्या नेतृत्वाकडे विषण्णतेने पाहणारा असाही दलितांचा एक वर्ग आहे. शिवनाक महाराचा मोठा मुलगा गोपाळ अशा वर्गात येतो. भावांना शिकवणारा, समाज बदलण्याची ईर्षा बाळगणारा गोपाळ शेवटी परिस्थितीपुढे वाकतो. तडजोडी करतो. शिवनाक महाराचा तिसरा मुलगा आनंद हा दलितांमधील जहाल कार्यकर्ता आहे. तो कवीही आहे. आजच्या पॅन्थर युवकांत व त्याच्यात काही प्रमाणात साम्य आहे. सचिवालयात झालेल्या सभेत तो म्हणतो, " कशासाठी सामील व्हावं या उत्सवात आम्ही? काय देणं लागतो आम्ही या देशाचं ? कसली भाकरी आणि कसली फुलं ? कसला देश, कसले स्वातंत्र्य आणि कसला आलाय राष्ट्रध्वज ! एक रंगीत क्षुद्र फडकं वाटतं ते आम्हाला." दलित लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यात दलित पात्रांची विविध रूपे उभी राहतात; पण ' भाकरी आणि फूल ' चे वैशिष्ट्य असे की, दलित पात्रांचे अतिशय सूक्ष्म असे स्तरभेद लेखकाने उभे केले आहेत. शिवनाकचे तीन मुलगे सुशिक्षित दलित आहेत. तरीही त्यांचा तोंडवळा एकसारखा नाही. गोपाळ समाजोन्मुख, तर पांडुरंग संपूर्ण ब्राह्मणाळलेला, आपल्या पुरते पाहणारा, स्वयंकेंद्रित तरुण आहे. आनंद म्हणजे आजच्या अस्वस्थ दलित युवकांचा प्रतिनिधी आहे. शिवनाक महार जुन्या परिस्थितीशरण समाजाचा प्रतिनिधी आहे. गाववाल्यांकडून कपड्यांची भीक मागण्यामागे त्याचे स्वतःचे असे तत्त्वज्ञान आहे. आयुष्यात दारिद्र्याने पिचलेला शिवनाक गहिंवरून मुलाला म्हणतो, " लेकरा, ही भीक गोळा करूक आमकां काय सुख वाटतां ? अरे तुमच्यापक्षी आमचे जीव शरमेन नायसो होता... तुमी लवकर समर्थ व्हा, तालेवार व्हा. आमकां सर्व्यांका सुखात ठेवा. मगे कोनाक होयी ही भीक माज्या सोन्या ! " शिवनाकचा समवयस्क मोन्या महार याचे तीन कर्तेसवरते मुलगे एकापाठोपाठ एक मरतात. त्याला मुलाच्या मृत्यूचे दुःख आहे. त्याहूनही अधिक आहे ते मुलाच्या प्रॉव्हिडंड फंडाचे पैसे कसे मिळतील याचे ! गोपाळची पत्नी नलिनी ही व्यक्तिरेखा ' भाकरी आणि

फूल ' मधील उल्लेखनीय व्यक्तिरेखा आहे. ती शिकलेली आहे. देशावरची आहे. कोकणातल्या महारांच्या दुर्दशेबद्दल तिची स्वत:ची अशी कारणमीमांसा आहे. आधीची भाविक, हिंदू देवतांवर श्रद्धा ठेवणारी नलिनी धर्मांतरानंतर डॉ. आंबेडकरांना दैवत मानते. मूल न झाल्यामुळे ती शेवटी सत्यसाईबाबांची भक्ती करू लागते. दलित साहित्यात सांकेतिकपणे येणाऱ्या स्त्रीव्यक्तिचित्रणाच्या मर्यादा नलिनीच्या व्यक्तिरेखेने ओलांडल्या आहेत. ही व्यक्तिरेखा खऱ्या अर्थाने मानवी आहे. दलित समाज हा दुभंगलेला समाज आहे. सवर्णांपासून तो दुरावलेला आहे. तसेच अंतर्गतदृष्टचा शिक्षित दलित माणसे अनागर, अशिक्षित, आर्थिक दृष्टचा दुर्बल अशा समाजापासून दुरावलेली आहेत. गोपाळ, पांडुरंग, आनंद हे तीन भाऊ. तेही काही अंशी एकमेकांपासून दुरावलेले आहेत. गोपाळ आणि पांडुरंग, गोपाळ आणि नलिनी, नलिनी आणि पांडुरंग, शिवनाक आणि त्याचे तिन्ही मुलगे, तिघे शिक्षित भाऊ आणि गावाच्या म्हारकीचे वतन सांभाळणारा भाऊ गोंद्या या सर्वांचे भावसंबंध, त्यांच्या नातेसंबंधांतील ताण, त्यांचे जीवनविषयक आकलन, त्यांची विचारशक्ती, या सर्वांचा मानसशास्त्रीयदृष्टचा विचार करता येईल. या सर्व पात्रांच्या परस्परसंबंधात वास्तवता आणि सच्चेपणा आहे. (मात्र पांडुरंग आणि सुनंदा यांचे भावसंबंध सांकेतिकपणे फुलवले गेले आहेत. जर तसे न घडते तर या कादंबरीतील व्यक्तिचित्रणाला अधिक वेगळे परिमाण लाभले असते.) गेल्या काही वर्षांत दलित लेखकांच्या साहित्यात आलेल्या व्यक्तिचित्रणात सूक्ष्मता आली आहे. दलितेतर साहित्यिकांच्या अवलोकनात न आलेले दलित जीवनाचे अगदी बारीक सारीक तपशील त्यात आले आहेत. ' भाकरी आणि फूल ' मध्ये दलित समाजातील, विशेषत: कोकणातील महार जातीतील वेगवेगळ्या पातळ्यांवर जीवन जगणाऱ्या व्यक्तींचे चित्रण आले आहे. कणिकांसारख्या दलितेतर लेखकाने कादंबरीत घेतलेला ' व्यक्तिशोध ' लक्षणीय आहे.

मधु-मंगेश कर्णिकांची ही सातवी कादंबरी. ' कोकणी ग वस्ती ऽ ऽ ' या कोकणच्या पार्श्वभूमीवरील कथांनी पंचवीस वर्षांपूर्वी ते वाचकांसमोर लेखक म्हणून आले. ' तोरण 'मधील त्यांच्या कथांना कोकणातील मातीचा स्पर्श झालेला आहे. ' भाकरी आणि फूल ' च्या पूर्वार्धात कोकणातील पार्श्वभूमी आहे आणि उत्तरार्धात मुंबई नगरीची. कादंबरीची सुरुवात महारवाडचाच्या वर्णनाने होते.

लेखकाच्या निवेदनाचे कौशल्य स्वातंत्र्यदिनाची प्रभातफेरी, गोपाळच्या आईचे बाळंतपण, देवळातील वारी, वॉर्ड ऑफिसर व पांडुरंग यांची भेट, शिवनाकचे भीक मागण्यामागचे समर्थन, अंबाजी व शिवनाक भेट, किसन नारिंग्रेकराचा मृत्यू इत्यादी प्रसंगांतून दिसून येते. मुद्दाम अट्टाहासाने कोकणी भाषा व बोली वापरण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला नाही. संदर्भानुसार पात्रांच्या बोलण्यात कोकणी

बोली भाषा येते, तर निवेदनात तटी पडणे, आफड होणे असे वाक्प्रचार आणि खऊर (क्षौर), करांदे (कंदमुळे), पाणंद, जोख्या, कुणगा, आयदणे, न्हेवऱ्या (करंजी), हौर (पूर), परशा, खोळ, पड, थोरले (गुराचे मांस) असे काही चपखल शब्द येतात. कधी कधी ही भाषा नेमक्या उपमा-दृष्टांतांनी आशय व्यक्त करते. उदा.' 'सारी आठ-दहा घरे, पण कोंबडीच्या रवणीसारखी एकमेकात खुपसून राहिलेली,. 'उठवणीला आलेल्या बैलासारखा मोन्या स्वस्थ बसला होता ',' पण एरव्ही हडकुळ्या गायीसारखी दिसणारी ती नी मृगाबरोबर हौर आला की मुसंडी मारणाऱ्या बांगर पाडसासारखी डोळे लाल करून शिंगे उगारू लागे.' 'तो पिकलेल्या चिंच्यासारखा दुभंगला ', 'गोपाळ नदी वाहावी तसे वाहत होता ', 'फोड फुटून पू वाहू लागतो तसे, गोपाळचे झाले ', 'कधी कानावर न पडलेले बोलणे त्यांनी ऐकले होते, आणि हरणामागून धावताना रानात हरवावे, तसे त्यांना वाटत होते–'

'भाकरी आणि फूल' ही कादंबरी मधु मंगेश कर्णिक या दलितेतर लेखकाने दलितांच्या जीवनावर लिहिलेली कादंबरी आहे. आपल्या कादंबरीला, 'ही सारी कारागिरी म्हटली जाईल' अशी भीती त्यांनी प्रस्तावनेत व्यक्त केली आहे. आजचे वेगळे दलित साहित्य, त्याचे होत असलेले समर्थन, दलित साहित्याच्या मूल्यमापनाविषयी स्वतंत्र निकषांची मागणी यांचा विचार करता आपल्या कादंबरीविषयीच्या प्रतिक्रियेबद्दल लेखकाला तसे वाटणे स्वभाविक आहे. लेखकाच्या संदेहाचा अधिक मूलगामीपणे विचार केला पाहिजे. दलितेतर लेखक दलित जीवनावर वास्तव आणि उत्तम कलाकृती निर्माण करू शकणार नाहीत, असे म्हणणे संपूर्णपणे बरोबर नाही. एखादा दलितेतर लेखकही दलित जीवनावर उत्तम कलाकृती निर्माण करू शकेल. दलित साहित्यिक स्वतःच्या जीवनातले वास्तव आणि दाहक अनुभव प्रत्यक्ष घेत असला तरीही त्याला यशस्वी कलाकृती निर्माण करता येईलच, असे म्हणता येणार नाही. उत्तम कलाकृती निर्माण करणे कलावंताच्या जातीपेक्षा त्याच्या प्रतिभाधर्मावर अवलंबून असते. शेवटी कोणत्याही साहित्यकृतीत व्यक्त होतो तो रसिकांना अस्वस्थ आणि अंतर्मुख करणारा समग्र आणि व्यापक असा जीवनानुभव. 'दलितत्व' हे त्या जीवनानुभवाचा भाग असते. अशा वेळी दलित साहित्याची संकल्पना फार ताणणे म्हणजे त्या साहित्यालाच मर्यादा घालून घेणे होय. दलित कलावंताने निर्माण केलेल्या साहित्यकृतीचा अवाङ्मयीन भूमिकेतून गौरव करणे जेवढे गैर आहे, तेवढेच दलितेतर कलावंताने निर्माण केलेल्या कलाकृतीला कारागिरी असे म्हणणेही गैर आहे. दलित साहित्याच्या आजच्या प्रारंभावस्थेत त्याचे समर्थन करणे, त्या साहित्याकडे सहानुभूतीने पाहिले जाणे हे समजण्यासारखे असले तरीही दलितेतर लेखकाने दलित जीवनावर लिहिलेल्या साहित्यकृतीचा वस्तुनिष्ठपणे विचार करणेही अपरिहार्य आहे. दलितजीवनविषयक साहित्य, मग

ते दलित साहित्यिकाचे असो वा दलितेतर साहित्यिकाचे असो, साहित्यविषयक गुणवत्तेवरच मापले जावे. कालांतराने दलित साहित्य व दलितेतर साहित्य यांच्या सीमारेषा धूसर होत जाणार आहेत. त्या वेळी कोणत्याही कलाकृतीत मूलभूत मानवी जाणिवांना कितपत स्थान मिळाले आहे, याचा विचार होईल. ती कोणत्या जातीच्या कलावंताने निर्मिली आहे याला महत्त्व राहणार नाही. या व्यापक भूमिकेतून पाहिले असता 'भाकरी आणि फूल' ही दलितेतर साहित्यिकाने निर्मिलेली दलित जीवानानुभव प्रकट करणारी एक लक्षणीय कादंबरी ठरते.

भाकरी आणि फूल– मधु मंगेश कर्णिक,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव नाका, मुंबई ४.
(मुंबई सकाळ)

आत्मकथन-आत्मचरित्र-चरित्र

अलिप्तपणे सांगितलेली 'वडिलांची कीर्ती'

कथाकार व. पु. काळे हे सुप्रसिद्ध नेपथ्यकार पु. श्री. काळे यांचे चिरंजीव. अजूनपर्यंत व. पु. सर्वांना परिचित आहेत ते कथाकार आणि विनोदी लेखक म्हणून. 'सांगे वडिलांची कीर्ती' या पुस्तकाचे स्वरूप त्यांच्या आधीच्या लेखनापेक्षा वेगळे आहे. आपले वडील पु. श्री. तथा अण्णा काळे यांच्याविषयीचे विचार आणि भावना वपुंनी या पुस्तकात मुक्तचिंतनपर आत्मनिवेदनाने व्यक्त केल्या आहेत.

पु. श्री. काळे यांनी नाटच आणि चित्रपटक्षेत्रात आपली सगळी हयात घालविली. १९४२ साली आपल्या वयाच्या चौपन्नाव्या वर्षी त्यांनी राजकमल कलामंदिरात नोकरी धरली. १९६२ साली म्हणजे वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षी ते 'राजकमल' मधून निवृत्त झाले. १९४२ ते ४६ पु. श्री. काळे व्यवसायानिमित्त मुंबईस होते. त्या वेळी लेखक (म्हणजे व. पु) पुण्यात राहत असे. वयाच्या चौपन्नाव्या वर्षी नवीन नोकरी धरणाऱ्या वडिलांच्या आठवणींनी या पुस्तकाची सुरुवात झाली आहे. परंतु या पुस्तकाचे स्वरूप केवळ स्मृतिरूप लेखनासारखे नाही, किंवा आत्मचरित्रपरही नाही. वडिलांच्या आठवणींबरोबरच लेखकाचे चिंतनही निवेदनात मधूनमधून येत राहते. आठवणींच्या संदर्भात लेखकाचे स्वत:चे चिंतन असे या पुस्तकातील लेखनशैलीचे स्वरूप आहे यामुळेच आकर्षक ललित लेखनाचे स्वरूप या पुस्तकाला प्राप्त झाले आहे.

'कलाव्यवसाय निष्ठेने करणारे, मुलाबाळांसाठी खूप कष्ट करणारे, अल्पवेतनात समाधान मानणारे, काहीसे भिडस्त पण समजूतदार वृत्तीचे अण्णा' असे वडिलांचे व्यक्तिचित्र वपुंनी रेखाटले आहे. वडिलांच्या स्वभावातील विनोदी छटाही अधूनमधून दिसतात. अण्णांची प्रकृती बिघडल्यावर कोईयार डॉक्टरांना आणू या असे सुचवितांच 'आणा ना, कोई भी यार लावो' असे म्हणणारे अण्णा,

किंवा आपल्या काळचा रंगावर स्वतःच विनोद करून सुनेला आंघोळीच्या पाण्यात टिनोपॉल टाक म्हणून सांगणारे मिष्किल अण्णा लेखकाने रंगविले आहेत.

आधी सांगितल्याप्रमाणे या लेखनाचे स्वरूप केवळ आठवणीवजा नाही. वडिलांच्या सहवासात राहून, त्यांच्याविषयी खूप काही लिहून आपण त्यांना पुरेसे ओळखू शकलो नाही, याविषयी लेखकाने आपली खंत दोन-तीन ठिकाणी व्यक्त केली आहे–

"अण्णा– एक रूम पार्टनर– मला पूर्णांशानं न समजलेली व्यक्ती. त्यांच्या जीवनात मी डोकावून पाहू शकत नाही. त्यांच्या भूतकाळच्या आठवणीत किंवा मनस्तापात भागीदार होऊ शकत नाही. त्यांच्या-माझ्यामध्ये निर्माण झालेले अंतर खऱ्याखुऱ्या अर्थाने कमी केव्हा होणार ही जाळणारी ओली वेदना माझ्या जवळच."

"अण्णांच्यामध्ये आणि माझ्यामध्ये एक अंतर निर्माण झालं आहे; याची मला वेदना होते, कारण अण्णा बोलणाऱ्या जातीतले नाहीत."

कुणाही जवळच्या व्यक्तीवर लिहिणे धोक्याचे आणि अडचणीचे असते. वर्ण्य व्यक्तीशी अधिक सलगी केली, त्या सलगीचे आविष्करण झाले की लेखनातील कलामूल्ये ढळण्याची शक्यता असते. आणि लेखनात अधिक वस्तुनिष्ठपणा आला की ते लेखन कोरडे आणि रसहीन होण्याची शक्यता असते. 'सांगे वडिलांची कीर्ती' या पुस्तकाच्या बाबतीत तसे घडलेले नाही. 'सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख' असे रामदासांनी म्हटले आहे. केवळ कीर्ती सांगण्याची भूमिका वपुंनी घेतली असती तर हे लेखन दर्जेदार ठरले नसते. या लेखनात आत्मनिष्ठेबरोबरच आलेल्या अलिप्ततेमुळे या पुस्तकाचे वाङ्मयीन मोल वाढले आहे!

सांगे वडिलांची कीर्ती– व. पु. काळे.
निशिगंध प्रकाशन
(आकाशवाणी)

स्नेहांकिता– स्नेहधाग्यांची समर्थनपर गुंफण

स्त्रीपुरुषसंबंधांची मोकळेपणाने चित्रण करणारी बरीच पुस्तके आज मराठीत लिहिली जात आहेत. कुणाही व्यक्तीच्या जीवनातील अनुभवांचा प्रांजल आणि अकृत्रिम शैलीत झालेला आविष्कार त्या आत्मचरित्राला श्रेष्ठ कलाकृतीचे

रूप प्राप्त करून देतो. लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' हे याचे एक बोलके उदाहरण आहे. उलट लेखकाची आत्मप्रौढी, आत्मश्लाघा, अहंकारी वृत्ती, सत्य मांडण्यासाठी आवश्यक असणाऱ्या धैर्याचा अभाव, आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचा लोप यामुळे काही आत्मचरित्रे केवळ वाचनीयच ठरतात. 'माणूस' साप्ताहिकातील स्नेहप्रभा प्रधान यांचे आत्मनिवेदनपर लेख वाचताना खूप अपेक्षा निर्माण झाल्या होत्या.पण संपूर्ण आत्मचरित्र सलगपणे वाचल्यावर त्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. आवेशपूर्ण आत्मसमर्थन, आणि सत्यकथनाला दिलेली बगल यामुळे 'स्नेहांकिता' हे आत्मचरित्र कलादृष्टचा यशस्वी ठरलेले नाही.

'स्नेहांकिता' या आत्मचरित्राचा बराचसा भाग स्नेहप्रभाबाई आणि सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. शिरोडकर यांच्या मैत्रीच्या वर्णनांनी व्यापला आहे. (म्हणूनच या आत्मचरित्राला 'स्नेहांकिता' हे नाव दिले आहे.) नाटचचित्रसृष्टीतील स्नेहप्रभा प्रधान आणि वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. शिरोडकर या दोन्ही व्यक्ती आपापल्या क्षेत्रातील मातब्बर व्यक्ती. साहजिकच त्यांच्याभोवती लोकप्रियतेचे वलय सदैव होते. कधीकधी अशा व्यक्ती एकाकीपणामुळे न्यूनगंडाने पछाडल्या जातात. एकाकीपणा आणि न्यूनगंड यामुळे आपण डॉक्टरांच्या अधिक निकट आल्याचा उल्लेख लेखिकेने केला आहे. "वाळवंटासारख्या माझ्या कोरड्या आयुष्यात डॉकच माझे आई, वडील, भाऊ-बहीण सर्वस्व होते. माझ्या भुकेलेल्या आणि तहानेलेल्या मनाचे अन्नपाणी होते." वैयक्तिक जीवनातील एकाकीपणाच्या दुःखामुळे ही दोन माणसे एकत्र आली. त्यांचे स्नेहबंध वाढत गेले. स्नेहशील,उदार, खेळकर, कलासक्त, आत्मवंचना करणारे, पत्नीची भीती बाळगणारे, पैशाने सर्व सुख मिळते असे मानणारे डॉ. शिरोडकर; तर भावविवश, हळव्या, मनस्वी, मातृसुखाला दुरावलेल्या स्नेहप्रभाबाई यांच्या स्नेहयात्रेचे निवेदन म्हणजे 'स्नेहांकिता' हे आत्मचरित्र होय.

नियतीचे जीवनातील स्थान, जीवनव्यवहारातील विविध प्रश्नांचे स्वरूप, स्त्रीपुरुषांची मैत्री, त्यांचे लैंगिक संबंध, मनुष्यस्वभाव इत्यादींविषयी लेखिकेने स्वतःचे विचार मांडले आहेत; परंपरागत विचारांवर भाष्य केले आहे.

'स्नेहांकिता' मध्ये प्राधान्याने आले आहे ते स्नेहप्रभा प्रधान आणि डॉ. शिरोडकर यांचे स्नेहजीवन. अकस्मात आजारी पडलेल्या स्नेहप्रभाबाईंची ओकारी हाती धरणारे, सुखसमृद्धीची विपुल साधने हाती असतानाही स्नेहप्रभाबाईंसाठी व्याकुळ होणारे डॉ. शिरोडकर आणि त्यांचे अंत्यदर्शनही आपल्या निग्रही स्वभावामुळे न घेणाऱ्या स्नेहप्रभाबाई या दोघांच्या स्नेहसंबंधांचे चित्रण मुळातून वाचण्याजोगे आहे. असे असले तरीही लेखिकेने स्वीकारलेल्या आत्मसमर्थनाच्या भूमिकेमुळे या 'स्नेहचित्रा'त कृत्रिमता आली आहे. डॉ. शिरोडकरांचा पोरकटपणा,

त्यांना पत्नीविषयी वाटणारी भीती, त्यांच्यातील न्यूनगंडाचा त्यांनी केलेला उल्लेख, लेखिकेकडून कधीही घडू शकणाऱ्या 'ब्लॅक मेलिंग'ची त्यांना वाटणारी भीती या बाबींचा या संदर्भात उल्लेख करता येईल. कुणाही सामाजिक प्रतिष्ठा असलेल्या पुरुषाला स्त्रीसहवासाविषयी आतुरता वाटणं, आपण ठेवलेल्या विवाहबाह्य संबंधामुळे (तेही एका नटीशी) पत्नीची भीती वाटणे. साहजिकच होते. स्नेहप्रभाबाईंनी त्याविषयी निवेदन केले म्हणूनही आक्षेप घेण्याचे कारण नाही. मात्र लेखिकेने डॉक्टर शिरोडकरांविषयी लिहिताना आत्मगौरव केला आहे, तो रास्त नाही. आत्मनिवेदनपर लेखनात इतरांचे उल्लेख करताना 'स्व'दूर ठेवण्याचे भान राखावे लागते; असे भान स्नेहप्रभा प्रधान यांनी राखलेले दिसत नाही.

लेखिकेचे आत्मसमर्थन आणि स्वतःच्या चांगुलपणाचे प्रदर्शन नकळतच या आत्मपर लेखनात घडले आहे. आपल्या मैत्रीत शारीरिक आकर्षणाचा भाग नसल्याचे लेखिका आग्रहपूर्वक सांगते. आक्षेपार्ह एकांत नको म्हणून वेगळी जागा घेऊ पाहणाऱ्या शिरोडकरांना तिने विरोधही केला आहे. "माझी जीवनाची चाकोरी सर्वसाधारण खास नाही. पण म्हणून ती अनैतिक स्वरूपाची आहे असेही नाही. अनेक दृष्टींनी माझं आयुष्य रूढ नैतिक कल्पनांपेक्षा अधिक नैतिक आहे." असे लेखिका एका ठिकाणी म्हणते. या नीतिविषयक भूमिकेतही विसंगती आहे. स्वतःची नीतिविषयक भूमिका निश्चित करायची आणि त्या भूमिकेत स्वतःला हवे तसे बसवून घेऊन आपली नैतिकता सिद्ध करायची, असा हा प्रकार आहे.शारीरिक आकर्षण आणि मोकळे लैंगिक संबंध यांचा निषेध करणाऱ्या लेखिकेने आपल्या दुर्बलतेची आणि शारीरिक आकर्षणाची कबुली अजाणतेपणाने देऊन टाकली आहे. उदाहरणार्थ–

'त्यांचा हात प्रेमाने दाबून त्यांच्या गालांना हात टेकून मी म्हणाले, "वा ! वा ! मी नाही देणार इतकी छान वस्तू कुणाला. किती उपयोगाची आहे ही."'

'कितीदा आम्ही एकमेकांच्या मांडीवर डोके टेकविले. कितीदा आम्ही एकमेकांचे अश्रू प्यालो. कितीदा रुसलो. अलग झालो. आणि बिलगलो.'

या वाक्यांवरून स्नेहप्रभा प्रधान आणि डॉक्टर शिरोडकर यांच्यातील बौद्धिक मैत्रीचे स्वरूप स्पष्ट होत नाही. मैत्री केवळ बौद्धिक असावी किंवा दोन व्यक्तींत शारीरिक संबंध असू नयेत, त्यांचे निवेदन केले जाऊ नये असा याचा अर्थ नाही. मात्र अशा प्रकारचे निवेदन केले जात असता वर्ण्य व्यक्तीविषयी निवेदकाने एकांगी भूमिका घेऊ नये. लेखिकेने बऱ्याच वेळा एकांगी भूमिका घेऊन डॉ. शिरोडकरांमधील उणेपणा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. माता, प्रेयसी, कन्या इत्यादी विविध रूपे घेणाऱ्या लेखिकेच्या मौनातून तिची इच्छा नसली तरी वेगळा अर्थ निघणे शक्य आहे. डॉ. शिरोडकरांची टोपणनावांनी आलेली पत्रे छापणाऱ्या

लेखिकेने आपले एकही पत्र छापलेले नाही. हेही काहीतरी 'राखून ठेवण्याच्या' प्रवृत्तीचे निदर्शकच आहे.

स्नेहप्रभाबाई नाट्यचित्रसृष्टीतील उच्चविद्याविभूषित लोकप्रिय अभिनेत्री आहेत. शिक्षणामुळे त्यांची स्वतःची अशी जीवनदृष्टी निर्माण झाली आहे. एखाद्या प्रश्नाचा स्वतंत्रपणे त्या विचार करू शकतात. जीवनातील कटू अनुभवांना त्यांनी धैर्याने तोंड दिले आहे. कलाक्षेत्रातील भलेबुरे अनुभव, कलाक्षेत्रातील चढउतार, त्यांची मीमांसा, घटस्फोटित जिण्यामुळे वाटचाला आलेले ताणतणाव, इ. च्या माहितीची अपेक्षा या आत्मचरित्राकडून होती. परंतु या पैलूंना आत्मचरित्राच्या सुरुवातीस थोडासा स्पर्श केला गेला आहे. हे न घडते, केवळ अठरा वर्षांच्या स्नेह-संबंधाची कहाणी म्हणून 'स्नेहांकिता' या आत्मनिवेदनाला कलात्मक मूल्य प्राप्त होणे शक्य होते. तसे यशही या आत्मनिवेदनाला लाभलेले दिसत नाही. दोन प्रतिष्ठित व्यक्तींच्या स्नेहबंधाची ही कहाणी एकांगीच वाटते. इतरांनी आपणाला कसे समजावून घेतले नाही, आपल्यावर सतत अन्यायच कसा केला गेला याची कैफियत आणि डॉ. शिरोडकरांची मैत्री व त्यांनी दिलेल्या भेटवस्तूंची यादी यामुळे ही 'स्नेहकहाणी' शेवटी शेवटी कंटाळवाणी होते. 'स्नेहांकिता' या आत्मचरित्राला ललितकृती म्हणून सोडाच पण यशस्वी असे आत्मचरित्रही म्हणता येत नाही. डॉ. शिरोडकरांशी असलेल्या अठरा वर्षांच्या मैत्रीचे 'स्नेहांकिता' म्हणजे एक निवेदन, एवढेच स्वरूप या आत्मचरित्राला प्राप्त झालेले दिसते.

स्नेहांकिता– स्नेहप्रभा प्रधान
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
(आकाशवाणी)

सामान्य माणसाचे वेधक आत्मकथन– कैदी नं. ३१४६७

मराठीत आज निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींची आत्मचरित्रे प्रकाशित होत आहेत. साहित्य, कला, राजकारण, समाजकारण इत्यादी विभिन्न क्षेत्रांतील असामान्य व्यक्तीच्या जीवनचरित्राबद्दल जनसामान्यापासून चोखंदळ समीक्षकापर्यंत सर्वांनाच रस असतो. असामान्य व्यक्तीच्या जीवनाभोवतीच मुळातच एक अलौकिकतेचे वलय असते. सामान्य माणसाचे रुक्ष जीवन कलावंताच्या कुतूहलाचा विषय असते. परंतु कलावंत नसलेल्या एखाद्या अगदी साध्यासुध्या माणसाला

आपल्या अनुभवाला (नकळत का होईना) कलारूप देता येणे शक्य असते. जन्मठेपेची शिक्षा झालेल्या नारायण महाडिकांच्या कैदी नंबर ३१४६७ या आत्मचरित्रात त्यांनी आपल्या जीवनाचा शोध अलिप्तपणे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

नारायण महाडिक हे रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वरजवळच्या शई या छोट्याशा खेड्यात १९१९ साली एका मराठा कुटुंबात जन्माला आले. बऱ्याच नवससायासानंतर जन्माला आलेल्या, लहानपणीच मातृसुखाला आचवलेल्या नारायणाचे संगोपन त्याची चुलती करते. गणपतीच्या मूर्ती करणे, पडदे रंगवणे, लाठीबनाटीची कसरत करणे यात नारायण लहानपणीच प्रावीण्य मिळवितो. वयाच्या चौदाव्या वर्षी त्याचे लग्न होते. विसाव्या वर्षी गाव सोडून तो मुंबईस नोकरीला जातो. तिथे सावंत नावाच्या खाणावळ चालविणाऱ्या बाईच्या मुलीशी-निर्मलेशी त्याचे दुसरे लग्न होते. त्यानंतर गावी येऊन तो रेशन दुकान चालवतो. शांता नावाची भंडारी समाजातील एक बालविधवा नर्स प्रेयसी म्हणून त्याच्या जीवनात येते. इथपर्यंतचा लेखकाचा जीवनपट अगदी सरधोपट आहे. आकस्मिकपणे नियतीची चक्रे वेगळ्याच दिशेने फिरू लागतात. देसाई नावाचा लेखकाचा मित्र त्याच्याकडे रॉकेल मागायला येतो. नारायणकडे रॉकेल नसल्यामुळे ते दोघेजण खेडेकर नावाच्या दुसऱ्या व्यापाऱ्याकडे जातात. सुरुवातीला नारायण खेडेकरकडे जाण्यासाठी आढेवेढे घेतो. कारण खेडेकर व महाडिक यांचे पूर्वीपासूनचे वैर असते. बाचाबाची झाल्यावर देसायाच्या हातून खेडेकरचा खून होतो. पण रत्नागिरीच्या हॉस्पिटलमध्ये नेल्यावर पोलिस जेव्हा खेडेकराची मृत्यूपूर्व जबानी घेतात तेव्हा 'महाडिकानं माझा खून केला,' असे खेडेकर आपल्या जबानीत सांगतो. खुनाच्या आरोपावरून महाडिकाला जन्मठेपेची शिक्षा होते. दोन घराण्यांतील आधीच्या वैमनस्याचे उट्टे निघते पण निर्दोष, कुटुंबवत्सल महाडिक मात्र जन्मठेपेचा कैदी बनतो.

कैद्याचे जीवन जगत असता आलेले अनुभव हा या आत्मचरित्राच्या निवेदनातील दुसरा टप्पा आहे. निवेदकाच्या कलागुणांचा तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना झालेला परिचय, त्यांनी त्याच्या कलागुणांचे केलेले कौतुक, आदर्श कैदी म्हणून नारायणाला मिळालेली मान्यता, कैद्यांचे विभिन्न प्रकार, त्यांच्या सवयी आणि स्वभाव, त्यांना मिळणारी वागणूक, दयाळू अधिकाऱ्यांनी कैद्यांना समजावून घेण्याचे केलेले प्रयत्न, इत्यादींचे चित्रण दुसऱ्या भागात येते.

अकरा वर्षांची शिक्षा भोगल्यानंतर लेखक पुन्हा प्रतिष्ठितपणे सुरू केलेल्या स्व-जीवनाविषयीचे निवेदन तिसऱ्या भागात करतो व आत्मचरित्र संपते.

या आत्मचरित्राचे निवेदन मुळात होते तसे ठेवायचा प्रयत्न केल्याचे प्रकाशकांनी नमूद केले आहे. महाडिकांचे अनुभव हे त्यांचे स्वतःचे अनुभव आहेत.भावना

आणि विकार यांच्या आहारी जाणारा निवेदक हाही एक स्खलनशील माणूसच आहे. आपले दोष, भावभावना, विकारवशता, स्त्रीमोह, स्खलनशीलता लपविण्याचा प्रयत्न लेखकाने कुठेही केलेला दिसत नाही. फारसे पतिसुख न मिळताही संसाराचा गाडा हिमतीने रेटणारी नारायणाची पत्नी सावित्री, पहिले आकर्षण नष्ट होताच नारायणाशी फटकून वागणारी निर्मला, नारायणावर खरेखुरे निर्लेप प्रेम करणारी शांती आणि स्वत: लेखक यांच्या भावसंबंधांचे दर्शन सहजसाध्या आणि अकृत्रिम शैलीत होते.

कलासक्त महाडिक एक साहसी गृहस्थ आहेत. जीवनातील भयंकर अनुभवांना सामोरे जाण्याची ताकद त्यांच्याजवळ आहे. भुताटकीचा त्यांना आलेला अनुभव, होडी फुटल्यावर लाटांशी तोंड देण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न, जवळच्या नोटा पाण्यात पडताच त्यांनी निर्भयपणे समुद्रात घेतलेली उडी अशा काही घटनांतून त्यांच्या बेडर वृत्तीचा प्रत्यय येतो. असा हा साहसी लेखक आजूबाजूचे जीवन सूक्ष्मपणे न्याहाळताना दिसतो. एवढेच नव्हे, तर त्याने घेतलेल्या अनुभवांतील सूक्ष्मता त्याच्या निवेदनशैलीतही येते. रत्नागिरी जिल्ह्यातील मराठा समाजाची स्वत:ची अशी संस्कृती आहे. या समाजातील चालीरीतींचे, रूढींचे, प्रवादांचे, विवाहादी समारंभांतील आचारांचे तपशीलवार वर्णन लेखकाने केले आहे. नारायणाच्या दुसऱ्या लग्नानंतर झालेला समाजाचा विरोध, माखजनच्या बामणांच्या शाळेत मराठ्याच्या मुलाला 'येश' मिळते अशी लोकांची असलेली समजूत इत्यादींमध्ये तत्कालीन समाजाच्या मनोवृत्तीचे प्रतिबिंब पडलेले आहे. लेखकाला भूतयोनीबद्दल वाटणारे आकर्षण आणि भुतांचा शोध घेण्याच्या त्याने केलेल्या प्रयत्नांचे वर्णन यामुळे या आत्मचरित्राची रंजकता वाढली आहे. चुलतीचे निधन होताच तिच्या आत्म्याने सूक्ष्म देह धारण करून तुरुंगात निवेदकाला भेटणे, मृत पित्याच्या आत्म्याने लेखकाच्या मुलांचे आणि पत्नीचे अदृश्यरूपाने रक्षण करणे, या घटना वास्तविकपणे अतिरंजित वाटाव्यात अशा आहेत; पण त्या प्रत्यक्ष लेखकाच्या जीवनात घडलेल्या आहेत.

स्वत:मधील उणिवांची जाणीव असणारा, प्रांजलपणे आपल्या स्त्रीविषयक आसक्तीची कबुली देणारा निवेदक जीवनातील चांगुलपणावर श्रद्धा ठेवताना दिसतो. तुरुंगात भेटलेल्या देशपांडे, पुरंदरे, रानडे व अन्य अधिकाऱ्यांबद्दल लेखकाने कृतज्ञतेने आणि आदरपूर्वक लिहिले आहे. कैदी व जेलकर्मचारी आपले वर्तन सुधारत नाहीत म्हणून खंत व्यक्त करून लेखक म्हणतो, "जगात सारीच जर चांगली माणसं झाली तर वाईट कुणी करावं? आणि वाईट झाल्याशिवाय चांगले होत नाही. त्यासाठी वाईट करणारी माणसं हवीतच!" असा हा साधासुधा पण स्वत:चा सिद्धान्त लेखकाने मांडला आहे. हे एक फार मोठे जीवनसत्य आहे,

अशातला भाग नाही; पण एका सामान्य माणसाच्या जीवनानुभवातून व्यक्त झालेली ती एक मार्मिक आणि बोलकी प्रतिक्रिया आहे. तुरुंगातून सुटल्यावर महाडिक आपल्या कुटुंबियांसह पुन्हा प्रतिष्ठेचे जीवन जगू लागतात. एवढेच नाही तर तुरुंगवास संपल्यावर समाजाच्या उपेक्षेचे आणि उपहासाचे बळी ठरलेले कैदी एकत्र आणून त्यांच्या पुनर्वसनाचे प्रयत्न करतात; त्यांना पुन्हा प्रतिष्ठेचे आणि समाधानाचे जीवन प्राप्त करून देण्यास साहाय्य करतात.

रत्नागिरी जिल्ह्यातील छोटचा खेड्यातील एक छोटा पण हरहुन्नरी माणूस अपघाताने जन्मठेपेचा कैदी बनतो. कैदेची मुदत संपल्यावर पुन्हा प्रतिष्ठेचे जीवन जगू लागतो एवढाच खरे म्हणजे या आत्मचरित्राचा परीघ. पण स्वत:कडे आलिप्त-पणे पाहण्याचा प्रयत्न केल्यामुळेच एका सामान्य माणसाची 'कैदी नंबर ३१४६७' ही आत्मकहाणी वाचनीय ठरली आहे.

कैदी नंबर ३१४६७– नारायण महाडिक
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
(आकाशवाणी)

चंदेरी दुनियेत– लीला चिटणीस

कलाक्षेत्रातील व्यक्तीच्या जीवनाबद्दल सर्वांनाच कमालीचे कुतुहल असते. त्यातही ती व्यक्ती स्त्री असेल, तिच्या वैयक्तिक जीवनाबद्दल काही प्रवाद असतील, तर हे कुतुहल अधिकच वाढलेले दिसते. ज्योत्स्ना भोळे यांच्या 'स्वरवंदना' या आत्मचरित्रापेक्षा स्नेहप्रभा प्रधान यांच्या 'स्नेहांकिता' व हंसा वाडकर यांच्या 'सांगते ऐका' या दोन आत्मचरित्रांकडे मराठी वाचकांचे लक्ष अधिक वेधले गेले ते या कारणामुळेच. त्यामुळेच 'चंदेरी दुनियेत' हे लीला चिटणीस या अभिनेत्रीचे आत्मचरित्र प्रथमदर्शनीच लक्ष वेधून घेणारे आहे.

लीला चिटणीस यांचे जीवन एक व्यावसायिक स्त्री, गृहिणी व माता या तिन्ही दृष्टींनी महत्त्वाचे आहे. 'चंदेरी दुनियेत' या आत्मचरित्राच्या निवेदनाची सुरुवात लेखिकेच्या महाविद्यालयीन जीवनापासून होते. त्यानंतर तिच्या वैवाहिक जीवनात झालेले बदल, प्रथम नाटचव्यवसाय व नंतर सिनेव्यवसायात तिला मिळालेली प्रसिद्धी, डॉ. ग. य. चिटणीसांपासून विभक्त झाल्यावर तिच्या जीवनात आलेले वेगवेगळे पुरुष, सिनेसृष्टीत तिला आलेले भलेबुरे अनुभव, चार मुलांची

माता म्हणून विपरीत परिस्थितीशी द्यावी लागलेली टक्कर, शेवटी आपल्या व्यवसायाचे तटस्थपणे केलेले मूल्यमापन, असे या आत्मकथनाचे स्वरूप आहे.

'चंदेरी दुनियेत' या आत्मकथनाला कालमानानुसार सलग असे स्वरूप नाही. महाविद्यालयीन जीवनाच्या परिचयानंतर लीलाबाई डॉ. ग. य. चिटणीसांवरोबरच्या वैवाहिक जीवनाच्या आठवणी सांगतात. राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणारे प्रौढ, गंभीर प्रवृत्तीचे 'रॉयिस्ट' चिटणीस लीलाबाईंना आवडू लागतात. दोघांच्या वयात खूप अंतर असल्यामुळे घरचा विरोध असूनही त्या चिटणीसांशीच विवाह करतात. या अयशस्वी विवाहाविषयीची लेखिकेची प्रतिक्रिया खूपच बोलकी आहे– "आज मला अलिप्तपणे विचार करता वाटतं की, ही त्यांनी फार मोठी चूक केली. त्यांच्या बुद्धीची, ज्ञानाची, व्यक्तिमत्त्वाची जी असामान्य भरारी होती, त्याच तोलामोलाच्या स्त्रीशी त्यांनी लग्न करायला हवं होतं. मी सगळ्याच दृष्टींनी त्यांच्यापेक्षा खूप खुजी होते. माझ्या बुद्धीची, अनुभवाची, माझ्या स्वत्वाची वाढ अजून व्हायची होती. अशी वाढ होण्याच्या दिशेला मी लागले नाही तो डॉक्टरांची माझी भेट झाली." (पृष्ठ १६) 'लीलाताई भविष्यकाळात अभिनेत्री होतील व भरपूर पैसा मिळवतील', या भादुरी नावाच्या राजकीय कार्यकर्त्याने केलेल्या भाकितावर लीलाबाईंचा प्रारंभी विश्वासच बसत नाही. पण. योगायोगाने त्या नाटच व चित्रपटसृष्टीत प्रवेश करतात. दिग्दर्शक विनायकांच्या व्यक्तिमत्त्वाने भारलेल्या लीलाबाईंविषयी चिटणीसांच्या मनात असूया निर्माण होते. एके दिवशी अगदी अकल्पितपणे छोटीशी चिठ्ठी टेबलावर ठेवून आणि तीन मुलांचा भार पत्नीवर सोपवून चिटणीस अगदी सहजपणे त्यांच्यापासून दूर जातात. नंतर लीलाबाई बाबूराव पेंढारकरांच्या निकट येतात. अनेक वेळा विनवूनही बाबूराव त्यांच्याशी विवाह करायला तयार होत नाहीत. त्यांना फक्त सहजीवन हवे असते. एकलेपणा असह्य झालेल्या लीलाबाई पुरुष साहचर्याविषयी स्वत:ची प्रतिक्रिया नोंदवितात– "निसर्गानेच स्त्रीला शाप दिला आहे. भेद्य Vulnerable बनविलं आहे. तिच्या शारीरिक दुबळेपणामुळे, त्याचे परिणाम तिला पुरुष जोडीदाराच्या मदतीशिवाय भोगत राहिल्याशिवाय गत्यंतरच नसतं. वैयक्तिक जीवनात हे शल्य जाचत होतं, एकलेपणाचं. त्याचे ताप सहन करण्याचं. ते ताप वैयक्तिक जीवनापुरते मर्यादित नव्हते. व्यावसायिक जीवनातही त्याचे परिणाम भोगावे लागत होते. त्याची झळ तितकीच तापदायक ठरत होती." (पृष्ठ १०९) गजानन जहागीरदारांशी लीलाबाईंची जवळीक होत आहे ही गोष्ट न आवडलेले बाबूराव एका रात्री मद्यपान करून लीलाबाईंच्या घरी येतात. त्यांनी केलेला पुरुषी अत्याचार लीलाबाई हतबलपणे सोसतात. जहागीरदार व लीलाबाईंमध्ये झालेले अंडरस्टँडिंग मोडून टाकायचे काम ते साधतात. त्यानंतर मात्र बाबूरावां-

कडून लीलाबाईंना त्रास होत नाही. चिटणीसांनंतर लीलाबाईंना बरीच वर्षे साथ देणारा पुरुष म्हणजे गुली किंवा गुलानी हा चित्रपट वितरक. सतत पैशावर नजर असणाऱ्या, स्वार्थी, व दररोज मद्यपान करून घरात धिंगाणा घालणाऱ्या गुलानीच्या सहवासातही लीलाबाई सुखी होत नाहीत. मात्र गुलानीपासून राज हा मुलगा त्यांना होतो. गुलानींबरोबरचे आयुष्य ही एक तडजोडच ठरते. आता चार मुलांचे संगोपन करणाऱ्या लेखिकेच्या जीवनात चंद्रशेखर आर्या हा आंध्रप्रदेशी वैमानिक येतो. एकाकी जीवनात थोडा आधार निर्माण होतो. लीलाबाईंच्या मुलांची देख-भाल करणाऱ्या शेखर आर्याला त्या मुलांचे पितृत्व नको असते. त्याला फक्त एका सुंदर नटीचा सहवास हवा असतो. उलट लीलाबाईंना शेखरचा सहवास हवा असतो आणि त्याबरोबरच स्वतःची मुलेही हवी असतात. यामुळे समाजात वावर-ताना शेखरला कुचंबल्यासारखे होत असते. एका उद्योगपतीकडे आलेला डच पाहुणा डेझिंग लीलाबाईंना याच काळात भेटतो. मुलांचे पितृत्व स्वीकारण्याची तयारी दर्शवून तो लीलाबाईंशी लग्न करायलाही तयार होतो. शेखरच्या गोड आश्वासनांना भुलून लीलाबाई डेझिंगला नकार देतात. शेखरसमवेत राहू लागतात. एके दिवशी अचानकपणे शेखरचे पत्र येते– त्याच्या विवाहाची माहिती देणारे. लीलाबाईंच्या जीवनात पुन्हा पोकळी निर्माण होते. एरिक पारकर या स्वीडिश तरुणाच्या क्षणिक मोहाला बळी पडल्यामुळे निसर्गाने दिलेली शिक्षा लीलाबाईंना पूर्णपणे भोगावी लागते. एक वर्षभर पंगू अवस्थेत काढल्यावर डॉ. बालिगांसारखा निष्णात सर्जन शस्त्रक्रिया करून लेखिकेला 'नवा जन्म' देतो.

अभिनेत्रीचे जीवन सर्वसामान्य स्त्रीच्या जीवनापेक्षा खूपच वेगळे असते. अनेक पुरुषांशी संबंध आलेल्या अभिनेत्रीकडे पाहण्याची समाजाची दृष्टीही फारशी स्वच्छ नसते. लीलाबाईंना भेटलेले हे सर्व पुरुष 'पुरुषी' स्वभावाचे वेगवेगळे नमुने आहेत. आपल्या जीवनातील सत्य घटना न लपविण्यात आत्मचरित्रकाराला लागणारे पुरेसे धैर्यही लीला चिटणीस यांच्याजवळ आहे हे या लेखनात दिसून येते. मात्र हे संबंध वाटते तितके एकपदरी, सरळ व एकसुरी नसतात. डॉ. ग. य. चिटणीस व लीलाबाई यांच्या सहजीवनाचे चित्रण ज्या उत्कटतेने व तीव्रतेने या आत्मचरित्रात येते तेवढी उत्कटता इतर चित्रणांत दिसत नाही. मुळातच या लेखनात सलगता अशी नाही. भूमिकेला फारसा वाव नसलेल्या पात्राने मध्येच रंगमंचावर यावे व अचानकपणे निघून जावे असे इथे घडले आहे. लीलाबाई चिटणीसांचे कलाजीवन व गृहजीवन यांचे निवेदन एकाच वेळी समांतरपणे येते. आणि यामुळेच अशा नात्याबद्दल अपेक्षित असणाऱ्या भावनात्मक प्रतिक्रिया, चिंतन-शीलता, उत्कटता व अनुभवाची तीव्रता या वाङ्मयीन गुणांचा प्रत्यय येत नाही.

अभिनेत्रीच्या जीवनात परपुरुष येणे हा तिच्या जीवनाचा काही वेळा एक

अपरिहार्य भाग असतो. तिचे जीवनचित्र म्हणजे स्त्रीपुरुषसंबंधांच्या वर्णनांची चविष्ट मेजवानी नसते. एकाच वेळी कलेच्या झगमगाटात आपली प्रतिमा सांभाळत दिमाखाने वावरणारा कलावंत नियतिशरण व परिस्थितिशरण असा दुबळा माणूस असतो, सामान्य माणूसही असतो. नायिकेच्या भूमिका करणाऱ्या लीलाबाई आईच्या भूमिका करू लागतात. देव आनंदसारख्या नटाच्या आईची भूमिका करणाऱ्या त्यांना देवानंदच्या ठिकाणी आपला मुलगा अजित दिसू लागतो. अत्यंत सुदृढ प्रकृतीचा, वैमानिकाचा परवाना धारण करणारा लीलाबाईंचा हा मुलगा मद्यपानाच्या आहारी जातो. आणि आपल्या शरीराचे मातेरे करून घेतो. लीलाबाईंमधील खरी आई हादरून जाते. कालांतराने अजितचे मद्यपान सुटते. पण वयाच्या बत्तीसाव्या वर्षी त्याला हृदयविकाराचा झटका येतो. "अंतःकरणाच्या गाभ्यात कुठेतरी टाचणी रुतून राहावी तशी अजितची काळजी आज किती तरी वर्षे माझी सोबतीण झाली होती." (पृष्ठ २७७) या शब्दांत आपली हळुवार प्रतिक्रिया त्या व्यक्त करतात.

'चंदेरी दुनियेत' हे आत्मचरित्र म्हणजे लेखिकेच्या कलाजीवनातील भावनात्मक प्रतिक्रियांपेक्षा एक प्रकारची 'व्यक्तिचित्र मालिका' आहे. मास्टर विनायक, बाबूराव पेंढारकर, चंद्रमोहन, हिमांशू रॉय, गजानन जहागीरदार, उल्हास, प्रल्हाद, विष्णुपंत पागनीस, कुसुम देशपांडे, दिग्दर्शक पराँझ ऑस्टिन, विनोदी नट व्ही. एच. देसाई, शशधर मुखर्जी या कलाक्षेत्रातील व्यक्तींचे संक्षिप्त चित्रण हा या आत्मचरित्राचा विशेष आहे. याशिवाय शेवटच्या भागात अशोककुमार, दिलीपकुमार, राज कपूर, देवानंद, हे त्या काळातील आघाडीचे अभिनेते, व दिग्दर्शक बिमल रॉय व हृषिकेश मुकर्जी यांची मूल्यमापनात्मक व्यक्तिचित्रे लेखिकेने रेखाटली आहेत. अस्खलित मराठी बोलणाऱ्या पुण्यातील ब्राह्मण मुलीवर प्रेम करणाऱ्या, माणुसकीला जागणाऱ्या, आदबशीर, सुसंस्कृत व शालीन दिलीपकुमारचे व्यक्तिचित्र विशेष उल्लेखनीय आहे. दिलीपकुमार व अमिताभ बच्चन यांच्या अभिनयगुणांची तुलना करणाऱ्या लेखिकेने राज कपूरचे केलेले मूल्यमापन मार्मिक आहे. "दिग्दर्शक, निर्माता म्हणून राज जितका चमकला तितका नट म्हणून चमकू शकला नाही. त्याच्या अभिनयात स्वयंभूपणा नाही. त्यात पाश्चात्य नटांची नक्कल दिसते. थोडा क्लार्क गेबलचा, अधिक चार्ली चॅप्लिनचा त्याचा अभिनय प्रदर्शनात्मक." (पृष्ठ ३२८)

१९३५ ते १९८० या प्रदीर्घ कालखंडातील हिंदी चित्रसृष्टी लीला चिटणीस यांनी अगदी जवळून पाहिली. सुरुवातीच्या काळात तर त्या कलासृष्टीतील प्रमुख घटक होत्या. १९३९-४१ या कालखंडातील त्यांचे गाजलेले चित्रपट म्हणजे कंगन, बंधन व झूला हे होत. या चित्रपटांत त्यांच्याबरोबर नायकांच्या भूमिका करणारे

अभिनेते अशोककुमार पुढे अनेक वर्षे नायकाच्याच भूमिका करीत राहिले. १९४९ मध्ये 'शहीद' चित्रपटात दिलीपकुमारच्या आईची भूमिका त्यांना करावी लागली. त्या वेळच्या आपल्या मानसिक अवस्थेचे मार्मिक वर्णन त्यांनी केले आहे. अशोककुमार यांच्या सासूची भूमिका व्यावहारिक दृष्टिकोनातून स्वीकारणाऱ्या लीलाबाईंना अशोककुमार विरोध करतात. प्रेक्षकांच्या मनात निर्माण झालेल्या दोघांच्या आधीच्या प्रतिमेला धक्का लागू नये म्हणून ते आपली नायकाची भूमिकाही सोडायची धमकी फोनवरून लीलाबाईंना देतात. दोन अभिजात कलावंतांच्या भावसंबंधाचे हे चित्रण मनाला स्पर्श करणारे आहे. वास्तविकपणे आपल्या सर्व कलाजीवनाचा आढावा लेखिकेने अशा प्रकारे घेतला असता तर या आत्मचरित्राचे वाङ्मयीन मूल्य वाढले असते, पण याच वेळी लीलाबाईंनी हिंदी चित्रसृष्टीतील स्थित्यंतरे व आपल्या भूमिकांचा क्रमवार उल्लेख यांना प्राधान्य दिले आहे. यामुळेच ना धड स्वतःच्या कलाजीवनाच्या विकासाचा आलेख वा ना धड चित्रसृष्टीचे मूल्यमापन अशी या निवेदनाची स्थिती झाली आहे.

लीला चिटणीस तशा जुन्या जमान्यातील अभिनेत्री. १९३५ ते ४५ या त्यांच्या उमेदीच्या कालखंडातील चित्रसृष्टीने पुढील काळात वेगळे रूप धारण केले. मोहमयी व झगमगाट असणाऱ्या चित्रसृष्टीच्या प्रारंभीच्या काळातील आदर्शवाद, कलावंतांमधील कौटुंबिक जिव्हाळा, समूहप्रवृत्तीने काम करण्याची पद्धत कमी होत चालल्याबद्दल लेखिकेला खंत वाटते. बाँबे टॉकीज, प्रभात, न्यू थिएटर्स या कंपन्यांची कार्यपद्धती व कौटुंबिक वातावरण नाहीसे होऊन नंतरच्या काळात सिनेव्यवसायात अनेक अनिष्ट प्रवृत्ती आल्या. भरपूर भांडवल घालून मोठे कलावंत घेऊन केलेली चित्रनिर्मिती, कलावंतांचे काळचा-पांढऱ्यांचे आर्थिक व्यवहार, एकाचवेळी अनेक निर्मात्यांशी केलेले करार व त्यामुळे अभिनयात येणारा हिणकसपणा, इ. गोष्टी पाहून त्यांना कला म्हणजे इंद्रिये उद्दीपित करणारी घटना वाटते. अप्रामाणिक चित्रपट देऊन पुनःपुन्हा इंद्रिये चाळविणारा निर्माता लीलाबाईंना दारू विकणाऱ्या माणसासारखा वाटतो. (पृष्ठ ३७१) या सर्वांपासून दूर गेले पाहिजे असे त्यांना वाटते. भविष्यात काय होईल ही भीती घेऊनच कलाक्षेत्रातील आपले जीवन लीलाबाई जगत राहिल्या. भीतीचीही भीती वाटू लागल्यामुळे तिच्यापासून दूर जाण्यासाठी भारत देश सोडून त्या अमेरिकेत गेल्या. या घटनेच्या निवेदनाने 'चंदेरी दुनियेत' हे आत्मचरित्र संपते.

'चंदेरी दुनियेत' या लीला चिटणीसांच्या आत्मचरित्रातून त्यांच्या वैयक्तिक जीवनाविषयीच्या जिज्ञासेची काही अंशी पूर्ती झाली तरी त्यांचे स्वतःचे कलाजीवन, व्यक्तिगत जीवनातील प्रखर ताणतणाव, चाळीस वर्षांच्या कालावधीतील चित्रसृष्टीच्या बदलातील सूक्ष्म तपशील या आत्मचरित्रात आलेले नाहीत. सलगतेच्या

अभावामुळेच असे घडले आहे. एकाच वेळी वेगवेगळ्या पातळ्यांवरच्या निवेदनामुळे 'चंदेरी दुनियेत' हे आत्मचरित्र प्रसंग व व्यक्तिचित्रमालिका म्हणूनच शेवटी शिल्लक उरते.

चंदेरी दुनियेत : लीला चिटणीस,
श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
(मुंबई सकाळ)

आत्मचिंतनपर– एक सर्वमंगल क्षिप्रा

'एक सर्वमंगल क्षिप्रा' हे हरिभाऊ मोटे यांचे आत्मनिवेदनपर पुस्तक आहे. मराठीतील एक चोखंदळ प्रकाशक हरिभाऊ मोटे यांनी आपल्या आयुष्याच्या पूर्वार्धात नियतकालिक संपादन, पुस्तकप्रकाशन व चित्रपटनिर्मिती या क्षेत्रांत धाडसाने व स्वत:ला झोकून देऊन जे जे काही केले, त्याचे निवेदन म्हणजे 'एक सर्वमंगल क्षिप्रा' हे आत्मपर पुस्तक होय. काही वेळा आत्मनिवेदन, त्याच्या पुष्टचर्थ काही पत्रे, क्वचित येणारे चिंतन-आत्मप्रकटीकरण, प्रसंगरेखाटन व व्यक्तिचित्रण असा या निवेदनाचा संमिश्र रचनाबंध आहे.

वऱ्हाडातील उमरावती या गावी एका सधन कुटुंबात जन्मलेले हरिभाऊ जीवन समरसून जगले. लहानपणापासून त्यांनी अनेक मित्र मिळविले. वेगवेगळ्या व्यवसायक्षेत्रांत काही खाचखळग्यांच्या व चुकीच्या मार्गाने ते गेले, पण आपल्या अस्थिर जीवनाबद्दल त्यांना खंत वाटत नाही. बेबंद राहणीमुळे जीवनाला एक धार आली असे त्यांना वाटते. या धारेने त्यांना जी नशा व लज्जत दिली तिला ते मनाची समृद्धी समजतात. समृद्धीचा प्रत्यय देणाऱ्या या आत्मनिवेदनाविषयी त्यांची स्वत:ची अशी विशिष्ट भूमिका आहे–

"या रचनेतून माझ्या आयुष्यातील काही छटाच प्रगट होतील. त्या ओझरत्या असल्या तरी जलद गतीने त्या वाचकांसमोरून जाव्यात व या छटांतून व्यक्तीच्या इतिहासापेक्षा तिचे 'मन' अधिक स्पष्टपणे प्रकट व्हावे एवढीच माझी अपेक्षा आहे."

'माझे हे निवेदन प्रसिद्धीसाठी नाही; मी ते स्वत:च्या समाधानासाठी व माझ्या आयुष्यासंबंधी कुतुहल असणाऱ्या काही परिचित व्यक्तींसाठी, या स्वरूपात सादर करीत आहे. हा मजकूर लिहीत असताना माझ्यासमोर माझे काही आप्त, स्नेही व निकटचे परिचित एवढेच आहेत. या साऱ्या सुहृदांना माझ्या आयुष्यासंबंधी

नि:संकोचपणे सांगताना स्वत:लाही न उमगलेल्या अनेक गोष्टी या निवेदनात प्रथमच उमटतील अशी अंधुक आशाही मी मनात धरून आहे, नव्हे; हा सारा खटाटोप त्यासाठीच आहे." (पृष्ठ ५)

मधूनमधून येणाऱ्या पत्रांमुळे या पुस्तकाचा तोल बिघडला गेल्याची जाणीव आज आघाडीवर असलेल्या एका संपादकाने हरिभाऊंना करून दिली, पण हरिभाऊंना भाषेतील चपलता, लिखाणातील कौशल्य व पुस्तकाचा तोल हे सारे दुय्यम वाटते. संबंधितांची पत्रे त्यांनी संपत्ती म्हणून जपून ठेवली होती. त्या पत्रांनी त्यांना समृद्ध केले होते. म्हणूनच ही पत्रे वाचकांपर्यंत जायला हवीत असे त्यांना मन:पूर्वक वाटते. लेखकाची विशिष्ट भूमिका विचारात घेऊन 'एक सर्वमंगल क्षिप्रा'चे मूल्यमापन केले पाहिजे.

'प्रस्थान', 'नवी ओळख', 'छंद-शक्ती', 'चकवा', 'चौकट' अशी पाच शीर्षके देऊन १९१५ ते १९४५ या तीस वर्षांच्या कालखंडातील आपला जीवनपट लेखकाने उभा केला आहे. शेवटी 'चौकट' हे उपसंहाराचे छोटे प्रकरण आहे.

आपले 'मन'च आप्त, सुहृद व वाचक यांच्यासमोर उभे करावे ही भूमिका असल्यामुळे बालपणीच्या स्मृतींना इथे फारसे महत्त्व नाही. वऱ्हाडातील अमरावती येथील एका सधन कुटुंबात हरिभाऊंचा १९०७ साली जन्म झाला. त्यांचे बंधू डॉ. भीमराव मोटे हे विलायतेत डॉक्टर होऊन परतल्यावर अकाली मृत्यू पावतात. या मृत्यूमुळे मोटे कुटुंबाची झालेली हानी, लोकमान्य टिळकांचे शेगाव येथील व्याख्यान, १९१८ साली झालेल्या एन्फ्लुएंझाने हरिभाऊंना कायमचा जडलेला दमा, उज्जयिनी येथील प्रोफेसर बानर्जींच्या 'सर्वमंगल पाठशाळे'त केलेली मॅट्रिकच्या परीक्षेची तयारी, परीक्षेनंतर केलेली काश्मीर सहल, इंदूर येथील होळकर कॉलेजमधील अध्ययनाच्या काळात लेखकाच्या आजारपणामुळे अयशस्वी ठरलेले महाविद्यालयीन जीवन इ. घटनांचे वर्णन 'प्रस्थान' प्रकरणात आले आहे. प्रा. बानर्जींचे व्यक्तिरेखाटन, उज्जयिनीचे व क्षिप्रा नदीचे वर्णन, काश्मीर सहलीच्या वेळी अचानकपणे घडलेली पंडित मदनमोहन मालवीय यांची भेट व वडिलांच्या पैशावर चैन करणाऱ्या हरिभाऊंची मालवीयजींनी घेतलेली हजेरी इ.च्या वर्णनात लेखकाचे लेखनकौशल्य दिसून येते. 'महांकाल' दर्शनासाठी प्रो. बानर्जींबरोबर विद्यार्थी जातात. त्या वेळी बानर्जींनी केलेले क्षिप्रेचे वर्णन लेखकाला आजही आठवते.

क्षिप्रेचे रूप शांत, शीतल तसेच उग्रही आहे. माळव्याची भूमी सुजलाम् सुफलाम् करणारी क्षिप्रा महापुराच्या वेळी सापसुसरी बाहेर भिरकावते. तिचे उग्र रूप पाहून लोक भयभीत झाले तरी क्षिप्रामाता सारी घाण धुऊन टाकते. सारा परिसर नवपल्लवित करते. क्षिप्रा ही सर्वमंगल आहे. अगदी तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना आपल्या आवडत्या शिक्षकांनी केलेल्या वर्णनाने प्रभावित झाल्यामुळे

आपल्या आत्मनिवेदनाला 'एक सर्वमंगल क्षिप्रा' हे शीर्षक लेखकाला सुचले असावे. डॉ. भीमराव मोटे यांच्या मृत्यूनंतर हरिभाऊंना आलेले श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे २० जुलै १९२५ चे पत्र व त्यांच्या वहिनींचे २४ ऑगस्ट १९२५ चे पत्र, अशा दोन पत्रांचा समावेश 'प्रस्थान' या प्रकरणात झाला आहे. पतीच्या अकाली निधनामुळे होणारे तीव्र दुःख, दिराविषयी वाटणारा जिव्हाळा व प्रेम आणि स्वतःच्या मनाची स्वतःच धैर्याने करून घेतलेली समजूत या वेगवेगळ्या भावना पत्रात व्यक्त झाल्या आहेत. अशा पत्रांमुळे निवेदनातील 'तोल' क्वचित गेला असला तरी निवेदनाचे 'मोल' वाढले आहे!

हरिभाऊ मोटे यांचा मित्रपरिवार दांडगा आहे. अगदी लहानपणापासूनचे बेडेकर, शेषराव मोटे, दिगंबर गोपाळ अनगळ, यशवंत श्रीपाद तांबे, पद्माकर रामचंद्र कोल्हटकर, श्रीराम बाळकृष्ण बापट, इत्यादी मित्रांचा परिचय लेखकाने कथनाने व पत्रांनी करून दिला आहे.

कृष्णाबाई खरे पुणे येथील कर्वे विद्यापीठात शिक्षण पूर्ण करून उमरावती येथील मुलींच्या हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून १९२५ च्या सुमारास काम करू लागतात. हरिभाऊंच्या वहिनींची शिकवणी करण्याचे काम स्वीकारतात. इंदूरहून सुट्टीत आलेल्या हरिभाऊंचा त्यांच्याशी परिचय होतो. वाङ्मयविषयक गप्पांच्या माध्यमातून झालेल्या ओळखीचे प्रणयात रूपांतर होते. १९३२ च्या सप्टेंबरमध्ये त्या इंग्लंडला जातात. त्यापूर्वी हरिभाऊ व कृष्णाबाई आपला विवाह ठरल्याचे उभयतांच्या घरी कळवितात. १९३० ते ३४ या चार वर्षांच्या काळात हरिभाऊंनी कृष्णाबाईंना लिहिलेली काही पत्रे 'नवी ओळख' या प्रकरणात आहेत. निसर्ग-प्रेमी, उत्कट संवेदनशील, सहृदय, कधी कधी उफाळून येणाऱ्या दम्यामुळे असहाय्य व हतबल झालेले हरिभाऊ या पत्रात दिसतात. त्यांच्या पत्रातील काही अवतरणे–

'खरेच; प्रेमळ व उदार अंतःकरणाचा हा सारा ओघ जर माझ्या सान्निध्याला नसता तर मी केव्हाच कोसळून पडलो असतो. तुझ्या एका पाशानेच मला कितीतरी जखडून ठेवले आहे.' (२०–१–३१ चे पत्र, पृष्ठ ६५) 'मला या दुर्बलतेची आता अगदी लाज वाटू लागली आहे. घरी चालत येतात त्यांचेपासून स्वतःला लपविता येत नाही. त्यांना भेटून तीव्रता वाढतेच!' (१७–२–३१ चे पत्र, पृष्ठ ६६).

'ती वर्षापूर्वीची पौर्णिमा, त्या दिवशी मित्रकलहात घालविलेली दुपार, ओढ लागलेल्या गोड मनःस्थितीत छोटयाशा प्रवाहात घालविलेली संध्याकाळ व त्याच भारलेल्या गच्चीच्या अंगणात बसून चांदण्यात घालविलेले रात्रीचे काही तास व तुझ्याबरोबर फिरण्यात घालविलेली ती काल्पनिक वाटणारी सकाळ आजलाही मला कल्पनेतलीच वाटते. त्या क्षणाला आपण खरोखर या जगातले

नव्हतोच मुळी. (पृष्ठ ६७).

'तू एखादे वेळी तर सर्व विसरावे असे मला वाटते. तुला मात्र तसे कधीच वाटत नसावे किंवा साधत नसावे.' (१४-४-३१ चे पत्र, पृष्ठ ६८).

'हो, माझ्यासंबंधीच्या तुझ्या भराऱ्यांचे पंख मी जाणूनबुजून कातरले आहेत; तुला त्याची झापडही येऊ दिली नाही. पुढची निराशा टाळण्याचा तो एक माझा निष्ठुर पण सहेतुक यत्न होता. व आजला आहेही, एवढेच मला म्हणावयाचे आहे.' (१-९-३३ चे पत्र, पृष्ठ ७९).

'सारे निमूटपणे सारखे सहन करीत राहण्याच्या तुझ्या सवयीचाच मला फार राग येतो, चीड येते माझ्या पत्राची वगैरे वाट न पाहता, कसलाही विचार न करता तू सरळ निघून का येत नाहीस ? खोल अतिखोल पाण्यात संथ दिसणाऱ्या बोटीप्रमाणेच आपल्या भावनांची स्थिती झालेली आहे. बोटीची गती स्थिरावल्यासारखी वाटते आहे, पण 'मीटर' मात्र वेगाचे प्रमाण कितीतरी वाढलेले दाखवीत आहे !" (२३-१२-३३ चे पत्र, पृष्ठ ८१).

हरिभाऊ व कृष्णाबाई यांच्या भावजीवनातील अनेक हळुवार, मुग्ध, नाजुक, करुण-गंभीर, उदास अशा छटा या पत्रांतून व्यक्त झाल्या आहेत. खरे पाहता, कृष्णाबाई हरिभाऊंना अनुरूप नव्हत्या. त्या गरीब तर हरिभाऊ श्रीमंत, त्या उच्च सुशिक्षित वादपटू पदवीधर, तर हरिभाऊ जेमतेम कॉलेजला गेलेले भिडस्त व बुजरे तरुण, त्या वयाने मोठ्या तर हरिभाऊ वयाने लहान, त्या प्रकृतीने सुदृढ तर हरिभाऊ दम्याने सतत आजारी, अशा विपरीत व विसंगत परिस्थितीत दोघेही एकमेकांकडे ओढली गेली होती. एकमेकांविषयी वाटणारी ओढ हरिभाऊंच्या पत्रात व्यक्त होत असली तरी दोघांच्या हळुवार भावबंधनांना निवेदनात परिपूर्णता आलेली नाही. विवाह ठरविल्यानंतर दोघांच्या कुटुंबियांच्या, इतर समाजघटकांच्या प्रतिक्रिया, दोघांची मानसिक आंदोलने व स्थित्यंतरे, सादपडसाद, प्रणयभावनेच्या उत्कटतेतील चढ-उतार इत्यादींचा इथे मुळीच प्रत्यय येत नाही. (हरिभाऊंच्या शेगाव येथे शेती करणाऱ्या एका भावाने केलेल्या विरोधाचा प्रसंग पृष्ठ ६०-६१ वर वर्णिला आहे. तो अपवाद म्हणून सांगता येईल.) हरिभाऊंविषयीच्या कृष्णाबाईंच्या प्रतिक्रिया अंदाजाने जाणून घ्याव्या लागतात. कृष्णाबाईंची तत्कालीन पत्रे जर समाविष्ट केली गेली असती तर थोड्या फार प्रमाणात का होईना, या भावचित्रणाला परिपूर्णता आली असती. कृष्णाबाईंच्या शांत संकोची वृत्तीचा, अबोलपणाचा सूचक उल्लेख अधूनमधून होताना दिसतो.

उदाहरणार्थ, २०-१-३३ च्या पत्रातील पृष्ठ ७३ वरील उल्लेख– 'आपले 'रोझरी' कादंबरीवर बोलणे चालू होते. त्या वेळी बोलता बोलता तू म्हणालीस,

'हरिभाऊ, तुमचा एस्थेटिक सेन्स उपजतच मला इतका तीव्र असलेला वाटतो की, माझ्यासारखी बेडौल व दिसायला सामान्य अशी मुलगी कारमध्ये तुमच्या साइडला बसलेली सुद्धा तुम्हांला आवडणार नाही.' यामुळेच या पत्रांचे स्वरूप काही वेळा 'नाटचछटे'सारखे वाटू लागते. कृष्णाबाईंच्या भिडस्त स्वभावामुळे, अबोलपणामुळे असे घडले असावे काय ? तसे काहीही असले तरी हरिभाऊ व कृष्णाबाई यांच्या भावसंबंधाच्या निवेदनातील अपूर्णतेमुळे रुखरुख वाटते, एवढे खरे !

हरिभाऊ मोटे यांनी प्रकाशन व्यवसायात केलेल्या धडपडीचे वर्णन 'छंद–शक्ती' या प्रकरणात आले आहे. शिक्षण अपूर्ण सोडल्यावर आता करायचे काय, असा हरिभाऊंपुढे प्रश्न होता. प्रकाशन व्यवसायाविषयी कुतुहल असल्यामुळे आणि प्रकाशन व्यवसायात प्रत्यक्ष अनुभव घ्यावा म्हणून 'किर्लोस्कर'चे संपादक शं. वा. किर्लोस्कर यांना १९३२ च्या सुमारास एक पत्र त्यांनी पाठविले आणि त्या पत्रात उमेदवार म्हणून किर्लोस्कर प्रेसमध्ये काम द्यावे, अशी विनंती केली. पण प्रत्यक्ष पुण्यास आल्यावर ते आर्यभूषण छापखान्यात कंपोझिंग खात्यात काम करू लागले. कामाच्या तिसऱ्या दिवशीच प्रेसचे मॅनेजर वामनराव पटवर्धन यांनी हरिभाऊंना टोपी घालून येण्यास सांगितले. ते नाकारल्यामुळे आयुष्यातील पहिली (आणि बहुधा शेवटची) नोकरी हरिभाऊंना सोडावी लागली. मग मात्र शिक्षण व अनुभव यांची वाट न बघता त्यांनी 'हृदयशारदा' या कमलाबाई टिळकांच्या कथासंग्रहाने स्वतःच्या प्रकाशन व्यवसायास सुरुवात केली. मोटे प्रकाशनाची 'कळचांचे निःश्वास' व 'हिंदोळ्यावर' ही विभावरी शिरुरकरांची पुस्तके तत्कालीन महाराष्ट्रात फार गाजली. टोपणनावाने झालेली प्रसिद्धी व स्त्री-स्वातंत्र्यविषयक क्रांतिकारी विचार यामुळे या पुस्तकांवर महाराष्ट्रभर खूप चर्चा झाली. या चर्चेमुळे लेखिका व प्रकाशक यांना भरपूर त्रास झाला. नंतरच्या काळातील 'इंदू काळे, सरला भोळे', 'कोल्हटकरांचे आत्मवृत्त', 'रणांगण' ही मोटे यांनी प्रकाशित केलेली पुस्तके खूप गाजली. १९३२ ते ८० या काळात हरिभाऊंनी एकूण तीस पुस्तके प्रकाशित केली, १९४०–५७ या कालावधीत त्यांनी एकही पुस्तक प्रकाशित केले नाही. १९३२ ते ४० या आठ वर्षांच्या काळात तेरा पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. त्यात आठ हजार रुपयांचा तोटा त्यांनी सहन केला. असा आतबट्ट्याचा व्यवहार हरिभाऊंनी का केला ? नवे पुस्तक हाती लागल्यावर मित्रांशी चर्चा करण्यात त्यांची अहंता किंचित सुखावत असे. चर्चेतून झालेली विचारांची देवाण घेवाण व त्यातून मिळणारा आनंद ही त्यांच्या व्यवसायाची प्रेरणा होती. व्यक्तिगत आवड हाच त्यांच्या प्रकाशनाचा कायमचा निकष होता. या बाबतीत आपली वृत्ती 'शिकाऱ्या'ची आहे, असे ते 'मनोगता'त म्हणतात. मात्र स्वतःच्या कृतीला विचार किंवा शिस्त नव्हती याचीही त्यांना जाणीव आहे. या स्वैर वृत्तीमुळेच त्यांच्या सर्व आयुष्याचा

पाया भुसभुशीत राहिला असला तरी मराठी प्रकाशन व्यवसायातील त्यांचे कार्य मोलाचे व भरीव आहे.

'छंद–शक्ती' या प्रकरणात हरिभाऊंनी स्वत:च्या प्रकाशन व्यवसायासंबंधी आत्मनिवेदनाने लेखकांची पत्रे जोडून, कधी भाष्य करून बरेच काही सांगितले आहे. प्रकाशन व्यवसायासंबंधी हे लेखन रूढ अर्थाने लालित्यपूर्ण किंवा रोचक असे नाही; लेखकाने जाणूनबुजून तसा प्रयत्नही केलेला नाही. मात्र असे असले तरी या निवेदनातून लेखक-प्रकाशक संबंध, लेखकांचे स्वभावधर्म, त्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती यावर पुरेसा प्रकाश पडतो. 'इंदू काळे, सरला भोळे' कादंबरीचे हरिभाऊ आठशे रुपये मानधन देत असतानाही प्रथम दीडशे रुपये मागणारे व शेवटी अगदी नाइलाजाने पाचशे रुपये स्वीकारणारे वामन मल्हार जोशी, 'कळ्यांचे नि:श्वास'ची प्रस्तावना लिहून देणारे पण त्याचे पैसे घेण्याऐवजी पुस्तक संपल्यावर हरिभाऊंनी ज्ञानकोशाचे खंड स्वेच्छेने घ्यावेत असे सुचविणारे ज्ञानकोशकार डॉ. केतकर, 'मंडईत पुस्तक मागणाऱ्या प्रकाशकाला पुस्तक देणार नाही' असे ठणकावून सांगणारे त्र्यं. शं. शेजवलकर, आपल्या कविता-संग्रहाची प्रत अशुद्ध छापली गेली आहे, हे पाहून रागावणारे व आपली मानधनाची रक्कम शीर येथील लक्ष्मी-केशव मंदिरास द्यायला लावून हरिभाऊंना अप्रत्यक्षरीत्या पराजित करणारे स्वाभिमानी कवी माधव अशा साहित्यिकांची विविध रूपे मोटे यांनी परिमित शब्दांत रेखाटली आहेत.

'प्रतिभा' पाक्षिक हरिभाऊंनी त्या पाक्षिकाच्या दुसऱ्या वर्षापासून म्हणजेच ५ जानेवारी १९३४ पासून स्वत:कडे चालवायला घेतले. प्रतिभेचे मूळ संस्थापक-मालक व संपादक गं. दे. खानोलकर, के. ना. काळे, खं. सा दौंडकर, वि. ह. कुळकर्णी यांना त्यांचे भांडवल अठराशे रुपये व वर्षअखेर झालेला तोटा सातशे रुपये असे एकूण अडीच हजार रुपये मोटे यांनी दिले व 'प्रतिभे'ची मालकी स्वत:कडे घेतली. हे संपादनाचे काम कितपत झेपेल अशी शंकाही प्रारंभी त्यांना वाटत होती. हळूहळू त्यांचा आत्मविश्वास वाढू लागला. लेखकांचे शुद्धलेखन नीट करता येत नाही या संबंधीची खंतही नंतर ओसरली. संपादकीय काम म्हणजे केवळ प्रुफे तपासणे नव्हे. संपादकाला लेखनासंबंधी जाण असणे महत्त्वाचे आहे हे त्यांनी जाणले. विशेषांक प्रकाशित करणे, नवी सदरे सुरू करणे, आधी 'प्रतिभे'त लिहीत नसलेल्या फडके–वरेरकरांना लिहिते करणे, वाङ्मयीन वादांना (नीति–अनीति वाद, कलावाद, नवमतवाद, इत्यादी) प्रसिद्धी देणे. साहित्यिकांच्या छायाचित्रापलीकडे जाऊन गप्तकालीन रेखाचित्रे व गोव्याच्या कलाकारांच्या चित्रांना अवसर देणे इत्यादी वेगळ्या गोष्टी हरिभाऊंनी केल्या. 'प्रतिभेच्या न्यायमंदिरा'त ही 'रामशास्त्री'–(वा.ना.देशपांडे) यांची लेखमाला त्या काळात विशेष गाजली. (नंतर

१९३८साली 'रामशास्त्री' हा लेखसंग्रह त्यांनी प्रकाशित केला. या पुस्तकाच्या १६८-८४ पृष्ठांवरील हरिभाऊ व वा. ना. देशपांडे यांच्यात झालेला पत्रव्यवहार मुळात वाचण्यासारखा आहे.) साडेतीन वर्षे चालविलेल्या या पाक्षिकाच्या व्यवहारात मोटे यांना आठ हजार रुपयांचा तोटा झाला. वैयक्तिकदृष्ट्या प्रकाशन व नियतकालिकाचे संपादन हे दोन्ही व्यवहार लेखकाला आर्थिक अडचणीत आणणारे ठरले. यामुळे त्यांना बराच मनस्तापही सोसावा लागला. 'प्रकाशन व्यवसाय व व्यवहार' या प्रकरणात मोटे यांनी आपल्या परीने या व्यवसायातील यशापयशाचे विवेचन पूर्वग्रह न ठेवता अलिप्तपणे केले आहे. 'छंदशक्ती' हे 'एक 'सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मनिवेदनातील प्रकरण तत्कालीन प्रकाशन व एकूण वाङ्मय व्यवहाराची यथार्थ जाणीव करून देणारा एक 'दस्तऐवज' आहे.

'चकवा' म्हणजे भुलभुलैया. रात्रीच्या वेळी एखाद्या परिचित मित्राची हाक कानी येते आणि माणूस घराबाहेर पडतो. थोड्या वेळाने 'चकवा' अंतर्धान पावतो. घरून निघालेला माणूस झाडाझुडपांना ठेचाळत चोवीस किंवा अठ्ठेचाळीस तास तारवटलेल्या स्थितीत भटकत राहतो. केव्हातरी घरी आल्यावर त्याला जाणवते की आपण खूप थकलेले आहोत. आपले अंग संपूर्ण आंबून गेलेले आहे. हरिभाऊ मोटे यांची सिनेव्यवसाय या 'चकव्या' ने कशी दैना करून टाकली याचे निवेदन 'सर्वमंगल क्षिप्रा' च्या उत्तरार्धात आहे.

वि. चिं. बेडेकरांच्या 'ब्रह्मकुमारी' या 'बलवंत संगीत मंडळी' करीत असलेल्या नाटकामुळे हरिभाऊंचा कलाक्षेत्राशी संबंध येतो. नाटक कंपनी नीट चालत नाही असे पाहून कोल्हटकर-दीनानाथ हे कंपनीचे मालक तिचे 'बलवंत पिक्चर्स' मध्ये रूपांतर करून टाकतात. या कंपनीला मोटे चाळीस हजार रुपये कर्ज देतात आणि नकळत सिनेव्यवसायाकडे ओढले जातात. या कंपनीचा 'कृष्णार्जुनयुद्ध' चित्रपट संपूर्णपणे पडतो. १९३३–३७ या चार वर्षांच्या काळात हरिभाऊ ऐंशी हजार रुपयांचे नुकसान करून घेतात. त्यापेक्षाही प्रकाशन व अनेक गोष्टी सोडाव्या लागल्याचे दुःख त्यांना होते. "पुस्तक प्रकाशन व 'प्रतिभे'चे संपादन हा माझा केवळ छंद नव्हता! माझ्या जीवनात आनंद व चैतन्य निर्माण करणारी ती एक 'जडीबुट्टी' होती. ती हरवल्यामुळे माझे मन एकाकी झाले. मी अस्वस्थ झालो, तो केवळ पैसा गेला म्हणून नाही. ऐन उमेदीची पुढील अनेक वर्षे या चकव्याच्या नादी लागून वाया गेली, माझ्या प्रियजनांना या उपद्व्यापांची तीव्र झळ दीर्घकाळ सोसावी लागली; जतन करून ठेवलेल्या अनेक चांगल्या मूल्यांची राख झाली. या साऱ्या परिणामांमुळे मी व्यथित झालो." (पृष्ठ २१९)

हंस पिक्चर्सचे 'धर्मवीर', 'प्रेमवीर' हे अत्र्यांच्या कथानकांवरील चित्रपट यशस्वी झाल्यावर अत्रे व विनायक यांच्यात मतभेद होतात. अत्रे यांच्या साहाय्याने

हरिभाऊ मुंबईस चित्रपट संस्था काढायचे ठरवितात. सावकाराकडून पैसे जमा करतात; स्टुडिओ उभारतात. 'अत्रे पिक्चर्स 'चे 'पायाचा दास', 'चरणोंकी दासी' (हिंदी) 'घरजावई' हे चित्रपट अत्र्यांच्या सहकार्याने निर्माण होतात. १९४०–४१ पर्यंत प्रगती होते. पण नंतरच्या 'वसंतसेना' चित्रपटाच्या निर्मितीमुळे दोघांनाही जबरदस्त आर्थिक मार खावा लागतो. दुसऱ्या महायुद्धाचा अस्थिरतेचा व महागाईचा काळ, रेंगाळलेली चित्रपटनिर्मिती, सावकारांकडून हाती येणारा अपुरा पैसा यामुळे अत्रे-मोटे दोघेही कमालीचे हवालदिल होतात. सतत सावकारांच्या दारात खेटे घालण्याची नामुष्कीची वेळ त्यांच्यावर येते. त्यातच 'अत्रे पिक्चर्स 'ला मिळालेले सरकारी परवाने तीन लाखांना दुसऱ्याला परस्पर विकायचा घाट अत्रे घालतात. मित्राने आधी दिलेल्या खबरीमुळे आपल्या सॉलिसिटरकडून प्रयत्न करून मोटे अत्र्यांकडून एक लाख रुपये कसेबसे पदरात पाडून घेतात. 'चकवा' या प्रकरणातील चित्रसृष्टीतील व्यक्तीच्या मानसिक घालमेलीचा प्रत्यय या चित्रणात येतो. सिनेव्यवसायातील अनुभव मांडताना (काही अपवाद वगळता) लेखकाने पत्रांचा फारसा समावेश केलेला नाही. तृतीय पुरुषी निवेदनामुळे हा संपूर्ण विषय वेधक ठरला आहे. निवेदनाच्या ओघात येणारी बिलिमोरिया शेठ व कारा शेठ या सिनेनिर्मितीसाठी पैसा पुरविणाऱ्या सावकारांची व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत. सिनेव्यावसायिक अत्रे यांचे व्यक्तिचित्र हरिभाऊंच्या निवेदनातून अजाणतेपणे रेखाटले गेले आहे. काहीसे बेदरकार, स्वत:च्या कर्तृत्वाविषयी जबर आत्मविश्वास असणारे, स्टुडिओत आल्यावर सर्वांशी मैत्रीने वागणारे, सेटवर अतोनात कष्ट करणारे, आर्थिक बाजू कोलमडतेय हे पाहताच भेदरून जाणारे, मोटयांशी मतभेद होताच एका टोकाला जाणारे, मतभेद निवळल्यावर आपले स्वत:चे पुस्तक मोटयांनाच प्रकाशनासाठी देणारे असे विविधरंगी अत्रे लेखकाच्या निवेदनातून नकळत उभे राहिले आहेत. हरिभाऊंनी आपल्या स्वत:च्या पद्धतीप्रमाणे दादासाहेब फाळके यांची काही पत्रे इथे समाविष्ट केली आहेत. १९१३–१४ च्या सुमारास 'सैरंध्री' या पहिल्या मूकपटाची निर्मिती केल्यावर शंभर चित्रपट निर्माण करणारे भारतीय चित्रसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके १९४१–४२ च्या दरम्यान किती विपन्नावस्थेत व आर्थिक ओढगस्तीत दिवस ढकलीत होते याची कारुण्यपूर्ण माहिती या पत्रांवरून मिळते.

'एक सर्वमंगल क्षिप्रा' ह्या आत्मनिवेदनातून उभे राहणारे हरिभाऊ मोटे यांचे व्यक्तिमत्त्व मोठे लोभस आहे.प्रकाशन व्यवसाय व सिनेसृष्टी यांत हजारो रुपये गमावून बसल्याबद्दल त्यांना खेद किंवा विषाद वाटत नाही. परंतु याचा अर्थ पैसे उधळण्यात त्यांना आनंद वाटत होता, असे नाही. प्रकाशन व्यवसायातून मिळणाऱ्या आनंदासाठी ते आसुसले होते, तर चित्रसृष्टीत ते काहीशा अजाणतेपणे ओढले गेले.

आपली स्वैर, स्वच्छंदी व कलंदरवृत्ती, अविचारी व अधीरा स्वभाव, बेशिस्तपणा, बेहिशेबी वृत्ती यांची त्यांना मनोमन जाणीव आहे. आपल्या या दोषांमुळे मित्र, आप्तस्वकीय व विशेषत: पत्नी यांना खूप त्रास झाला आहे याची स्वत:ला बोचणी लागल्याचेही ते नि:संकोचपणे सांगतात.

हरिभाऊ मित्रांचे– सुहृदांचे लोभी आहेत. साहित्यक्षेत्रातील व्यक्तींविषयी तर त्यांना अधिक कुतूहल व प्रेम. "मला ओढ आहे ती या क्षेत्रातील काही व्यक्तींची. त्यांच्या काही कलाकृतींची... त्यांच्या या लेखनाने, माझ्यासारख्या सामान्यालाही 'माणूस' हा 'क्ष' किरणांनी पाहावा तसा पाहता येऊ लागला– तो पारदर्शक झाला." (पृष्ठ ८) माणसे तोडण्यापेक्षा जोडण्याकडेच त्यांचा अधिक कल आहे. यामुळेच माडखोलकर, अत्रे, विभावरी शिरूरकर यांच्याशी प्रसंगी मतभेद होऊनही नंतरच्या परस्परसंबंधात कधीच कटुता व मत्सर येऊ दिला नाही. ज्ञानकोशकार केतकर यांच्या ऋजू व्यक्तिमत्त्वाने भारावून जाऊन त्यांच्यासमोर ते नतमस्तक होतात आपल्या प्रकाशनांना ज्ञानकोशकारांचा आशीर्वाद आहे, अशी श्रद्धा मनी बाळगतात. 'तुतारी', 'वसुंधरा', व 'चित्रा' यांचे संपादन करणाऱ्या मो. ग. रांगणेकरांचे वाङ्मयीन ऋण नम्रपणे मान्य करतात; तर कवी माधवांचे पुस्तक आपल्याकडून नीट छापले गेले नाही याची प्रामाणिकपणे कबुली देतात. कमलाबाई टिळकांनी आपल्या कथासंग्रहाला 'सुधांशु' हे नाव प्रारंभी सुचविले होते, पण 'हृदयशारदा' हे स्वत:ला पसंत असलेले नाव हरिभाऊ कथासंग्रहाला देतात. कमलाबाईंचा त्या वेळी तीन वर्षांचा असलेला मुलगा सुधांशु याच्यावरून त्याचेच नाव संग्रहाला द्यावे असे कमलाबाईंना वाटत होते, हे समजल्यावर मात्र हरिभाऊंना अपराधी वाटते.

'सर्वमंगल क्षिप्रा' मधून हरिभाऊंचे गुणविशेष शोधून काढावे लागतात. कारण स्वत:विषयी मुद्दाम काही लिहावे ही लेखकाची प्रवृत्तीच नाही. १९३४–४२ या आठ वर्षांत त्यांनी राहण्याच्या सहा जागा बदलल्या. त्यांच्या जागा बदलण्याच्या छंदावर पहिला प्रहार केला तो त्यांच्या पत्नीने. पण पत्नीविषयी लिहितानाही लेखकाने कुठेही अभिनिवेश स्वीकारलेला दिसत नाही. आपला जुना मित्र 'अस्थमा' त्याच्याविषयी सुद्धा ते सहानुभूतीनेच लिहितात. या मित्राच्या लेखकाला उद्देशून केलेल्या भाषणाने हे आत्मनिवेदनपर पुस्तक संपते. लेखकाचा हा पुराणा मित्र त्याला म्हणतो–

"लक्ष्मीच्या शक्तिसाहाय्याने तू माझा बीमोड करण्यासाठी सारा देश पायाखाली घातलास. तुझी एकूण वृत्ती या शक्तीचा प्रसाद आहे. कदाचित ही 'लक्ष्मी' स्वकष्टार्जित नसल्यामुळे तू तिची नीट कदर केली नाहीस. ती तुला आज दुरावली असली तरी, तुला प्रसादच देऊन गेली आहे. सौशिक वृत्ती व धीर

हा तिचाच प्रसाद असावा. तुझ्या उलाढाल्या व संभ्रम पाहून मी तुला अनेकदा आवरतो तरी तू नेहमी आपल्याच नादात, म्हणून पुन्हा एकदा माझी ही चेतावणी."

शेवटी माझेकडून 'हो,' नाही, येण्यापूर्वीच मित्राने आपली गस्त फिरून सुरू केली. त्यामुळेच 'जड' होते ते सारे धुऊन गेले.

माझे प्राण मात्र शिल्लक ठेवून माझा मित्र पुन्हा मला घडवायच्या उद्योगाला लागलेला दिसतो." (पृष्ठ–२८३)

'एक सर्वमंगल क्षिप्रा' ह्या आत्मनिवेदनामागे हरिभाऊंचा हेतू आपले मन अधिक प्रकट व्हावे हा आहे. हे लेखन प्रसिद्धीपेक्षाही स्वतःच्या समाधानासाठी व आपली माहिती जवळच्या मित्रांना व आप्तांना व्हावी, या दृष्टीने केलेले आहे. लेखकाच्या दोन्ही हेतूंची पूर्तता या आत्मनिवेदनाने होते; पण त्याबरोबरच महाराष्ट्रातील एका विशिष्ट काळात घडलेल्या प्रकाशन व्यवहार व वाङ्मयकार यांची वस्तुस्थितिनिदर्शक माहितीही मिळते. अगदी सर्वसामान्य नव्हे, पण वाङ्मयीन प्रश्नांविषयी कुतूहल असणाऱ्या अभिरुचिसंपन्न व चोखदळ वाचकांना हे आत्मनिवेदन आवडावे असेच आहे.

एक सर्वमंगल क्षिप्रा– ह. वि. मोटे.
ह. वि. मोटे प्रकाशन
(मुंबई सकाळ)

एक सर्वमंगल क्षिप्रा (भाग-२) -- काहीसे समाधान, बरीचशी खंत

सुप्रसिद्ध प्रकाशक हरिभाऊ मोटे यांचे 'एक सर्वमंगल क्षिप्रा-भाग १' हे आत्मनिवेदन चार वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाले. या आत्मचरित्राचा दुसरा भाग मोटे प्रकाशनाने नुकताच प्रसिद्ध केला आहे.

या दुसऱ्या भागात १९४६ ते ८२ या छत्तीस वर्षांच्या कालावधीतील हरिभाऊंचे जीवन उभे राहिलेले दिसते. हरिभाऊंनी प्रकाशित केलेल्या आचार्य अत्रे यांच्या 'सूर्यास्त' या लेखसंग्रहाच्या सिद्धीपर्यंतचा आपल्या जीवनाचा आलेख या आत्मनिवेदनात हरिभाऊंनी स्वतःच्या शब्दांत उभा केला आहे. हे आत्मचरित्र एका अर्थी इथेच संपते. 'सूर्यास्त'नंतरच्या अठरा वर्षांत हरिभाऊंनी बरीच पुस्तके प्रसिद्ध केली. त्यांच्या प्रसिद्धीची माहिती हरिभाऊंच्या पत्नी कृष्णाबाई मोटे यांनी दिली आहे. 'गावरहाटी', 'स्वनातीत', 'मीच हे सांगितलं पाहिजे.', 'इतक'

लहान इतका महान', 'कुसुमानिल', 'विश्रब्ध शारदा (खंड-१ आणि २)', 'शेजवलकरांच्या निवडक लेखांचा संग्रह' या पुस्तकाच्या सिद्धीची माहिती कृष्णाबाईंनी दिली आहे. दम्याने सतत आजारी असणाऱ्या वृद्ध हरिभाऊंना आपल्या जीवनाच्या उत्तरार्धाचे कथन करण्यासाठी पुरेसे स्वास्थ्य मिळाले नाही. मात्र उत्तरार्धपूर्तीसाठी कृष्णाबाईंनी खूप कष्ट घेतले आहेत. हरिभाऊंनी केलेली टिपणे, कारणाकारणाने त्यांनी स्वतःच्या निवेदनात मांडलेले विचार, समीक्षकांच्या निवेदनातून निवडलेला भाग यांच्या आधारे पुढील मजकुराची बांधणी कृष्णाबाईंनी केली आहे. 'एक सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मनिवेदनाचा दुसरा भाग हरिभाऊ मोटे आणि कृष्णाबाई या उभयतांच्या निवेदनाने तयार झाला आहे.

हरिभाऊ मोटे अमरावतीच्या एका गर्भश्रीमंत कुटुंबातील साहसी आणि जिद्दी तरुण होते. १९३४ साली ते मुंबईस कायमचे स्थायिक झाले. त्यावेळच्या मुंबईचे रम्य चित्र हरिभाऊंनी निवेदनाच्या प्रारंभी उभे केले आहे. यानंतर चित्रपटाच्या मायावी सृष्टीच्या मोहात गुंतून त्यांनी बरेच पैसे घालविले आणि १९४५ साली थोडेसे पैसे साठल्यावर ते पुन्हा चित्रपटसृष्टीकडे ओढले गेले. पहिल्यासारखाच त्यांच्या आयुष्यात जुगार सुरू झाला. जीवनात कौटुंबिक ताणतणाव निर्माण झाले. कृष्णाबाईंशी संघर्ष उडाले. त्यासंबंधीच्या निवेदनातून सोशिक, खंबीर, कणखर आणि कष्टाळू कृष्णाबाईंचे चित्र उभे राहिले आहे. हरिभाऊ आणि कृष्णाबाई यांच्यात झालेल्या संवादांतून दोघांचाही स्वभाव दिसून येतो. "तुमचा व्यापार आणि व्यवहार मला चांगला ठाऊक आहे. गाईचं दूध काढायचं आणि ते कुत्र्याला पाजायचं." "तुमच्या थंड आणि समाधानी वृत्तीचं मला नवल वाटतं. तुमच्या या समाधानाची जातकुळी तरी कोणती आहे? सॉक्रेटिसाची की डुकराची?"

'एक सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मनिवेदनाचा विशेष म्हणजे त्यात आलेली वेगवेगळी व्यक्तिचित्रे. प्रेसमालक बाबूराव सापळे, फाळणीनंतर भारतात आलेला सिंधी रिंदानी, घेणेकरी बोरकर, पेट्रोल पंपाचा मालक रेडीज, हरिभाऊंना स्मगलिंग व्यवसायात गुंतवू पाहणारा हरीशभाई जव्हेरी या हरिभाऊंना त्यांच्या जीवनप्रवासात भेटलेल्या काही व्यक्ती आहेत. हरिभाऊंनी या सर्वांच्या स्वभावच्छटा बारकाव्याने व्यक्त केल्या आहेत. लहानपणी खिळे जुळविण्याचे काम करणाऱ्या बाबूराव सापळे यांनी उत्तरायुष्यात खूप पैसा मिळविला. सापळे हरिभाऊंप्रमाणेच उदार होते. हरिभाऊ आर्थिक संकटात सापडले तेव्हा त्यांना खूप मदत बाबूरावांनी केली. परतफेडीसाठी कधीही तगादा लावला नाही. एकदा बाबूराव सिनेव्यवसायात शिरलेल्या आपल्या नातेवाईकाला पैसे द्यायचे ठरवितात. चित्रसृष्टीत लाखो रुपये घालवून शहाणे झालेले हरिभाऊ 'पैसे देऊ नयेत' असा सल्ला बाबू-

रावांना देतात. परोपकारी, सहृदय आणि तितकेच जिद्दी बाबूराव हरिभाऊंचा सल्ला मानीत नाहीत. शेवटी कर्जबाजारी अवस्थेत मानसिक ताण सहन न झाल्यामुळे बाबूराव सापळे यांचा आकस्मिकपणे मृत्यू होतो. सुदैवाने बाबूरावांचा मुलगा धंद्यात पुन्हा जम बसवितो. सहृदय हरिभाऊंची त्यावेळची प्रतिक्रिया अशी–" बाबूराव सापळे यांच्या कुटुंबाला लाभलेल्या सुस्थितीमुळे मला बरं वाटलं. नियतीच्या या लहरी आणि चंचल वृत्तीला मी मनातल्या मनात नमस्कार केला !" दुसऱ्याविषयी अशी कणव, सहानुभूती आणि आपुलकी असलेल्या हरिभाऊंना पैसे गमावल्यामुळे कोर्टात नादारी पत्करावी लागते. ते कमालीचे हताश होतात. हरिभाऊंनी आपल्या खिन्न, उदास आणि विकल मनःस्थितीचे केलेले निवेदन मनाला भिडणारे आहे.

आयुष्याच्या उत्तरार्धात हरिभाऊंनी प्रसिद्ध केलेले महत्त्वाचे पुस्तक म्हणजे चिंतामणराव कोल्हटकरांचे 'बहुरूपी' हे आत्मचरित्र होय. आर्थिक दृष्ट्या संपूर्णपणे खालावलेल्या हरिभाऊंना 'मौज' चे वि. पु. भागवत स्नेहभावनेने आणि उपकाराचे ओझे न लादता मदत करतात. त्यामुळे 'बहुरूपी' देखण्या रूपात हरिभाऊ प्रसिद्ध करतात. या पुस्तकात वर्‍यापैकी पैसे मिळाल्यामुळे त्यांच्या जीवनात थोडीफार स्थिरता येते. आत्मचरित्रातील 'बहुरूपी'च्या निर्मितीचा इतिहास वाचनीय आहे.

हरिभाऊंच्या 'एक सर्वमंगल क्षिप्रा' या आत्मचरित्राचा पहिला भाग २८३ पृष्ठांचा आहे. १९१५ ते ४५ या पस्तीस वर्षांच्या कालावधीतील आपल्या आयुष्यातील चढउतार, खरे म्हणजे उतारच– याचे विस्तृत असे निवेदन हरिभाऊंनी पहिल्या भागात केले आहे. त्या मानाने हा दुसरा भाग त्रोटक आहे. तो हरिभाऊ आणि कृष्णाबाई यांच्या संयुक्त निवेदनाने तयार झाला आहे. या निवेदनातून हरिभाऊंची साहसी आणि जिद्दी वृत्ती, स्वीकारलेल्या व्यवसायात स्वतःला झोकून देण्याची वृत्ती, आत्मपरीक्षण करण्यातील प्रयत्नशीलता आणि औदार्य हे स्वभावगुण दिसून येतात. प्रस्तुत आत्मनिवेदन संक्षिप्त असले तरीही वाचनीय आहे. हरिभाऊ आयुष्यभर दम्याने ग्रस्त होते. आयुष्याच्या शेवटी त्यांना प्रकृतीचे पुरेसे स्वास्थ्य लाभले नाही. त्यामुळे जीवनाचा उत्तरार्ध ते विस्ताराने उभा करू शकले नाहीत. 'एक सर्वमंगल क्षिप्रा'चा हा दुसरा भाग वाचत असता ही खंत सतत वाटत आहे.

एक सर्वमंगल क्षिप्रा, भाग–२ – हरिभाऊ मोटे
ह. वि. मोटे, प्रकाशन
(आकाशवाणी)

कॉ. डांगे यांच्या तुरुंगवासाची कहाणी : नरकपुरी गवसली

'नरकपुरी गवसली' हे पुस्तक म्हणजे सुप्रसिद्ध कम्युनिस्ट नेते श्रीपाद अमृत डांगे यांनी १९२८ साली लिहिलेल्या 'हेल फाउंड' या छोटेखानी इंग्रजी पुस्तकाचे मराठी भाषांतर होय. डांगे यांच्याबरोबर १९४८ साली नासिक जेलमध्ये असलेले कार्यकर्ते वि. मा. शिर्के यांनी हे भाषांतर केले आहे.

बोल्शेविक कटाच्या आरोपाखाली डांगे यांना तीन मार्च १९२४ रोजी मुंबईत अटक करण्यात आली. २० मे १९२४ रोजी कानपूरच्या सेशन्स कोर्टात कॉम्रेड डांगे, कॉम्रेड शौकत उस्मानी, मुझफ्फर अहमद आणि कॉम्रेड नलिनी गुप्ता या चौघांना चार वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. या खटल्याला 'कानपूर बोल्शेविक कटाची केस' या नावाने वर्तमानपत्रांतून भरपूर प्रसिद्धी मिळाली. डांगे यांनी जेलच्या हॉस्पिटलमध्ये केलेले विशेष कार्य व १९२६ मधील कॉलऱ्याच्या साथीच्या वेळची त्यांची कामगिरी विचारात घेऊन त्यांना ३५६ दिवस आधीच शिक्षेतून मुक्त करण्यात आले. तुरुंगवासाच्या तीन वर्षांच्या कालावधीत डांगे यांनी तत्कालीन कैद्यांचा दुःस्थितीचा, जीवघेण्या आपत्तीचा व हालअपेष्टांचा प्रत्यय घेतला, त्याचे चित्रण या पुस्तकात आले आहे. विशेष म्हणजे १९६९ साली डांगे यांना त्याच सीतापूर येथील तुरुंगात राहावे लागले.

"मी त्या तंद्रीतून बाहेर पडलो आणि लक्षात आले की तुरुंग तोच, आपणही तेच. ब्रिटिश राज्य गेले पण जीवनातील अडथळे तेच असा विचार करीत भूत, भविष्य आणि वर्तमान या तीनही काळांचा सबगोलाकार करून मी झोपलो. नरकपुरीत सुद्धा झोप लागते हे मला पूर्वीच माहीत झाले होते." अशी आपली प्रतिक्रिया संपादकीय पुरवणीत डांगे यांनी नोंदली आहे.

तुरुंगवास भोगणाऱ्या सर्व प्रकारच्या कैद्यांना सोसावे लागणारे दुःख सारखेच असते याविषयी फारसे दुमत होण्याचे कारण नाही. मात्र याच पुस्तिकेच्या प्रस्तावनेत डांगे यांनी मांडलेला विचार वादग्रस्त ठरणारा आहे. गुन्हा आणि गुन्हेगारी यांना हाताळण्याची भांडवलदारी सुधारित पद्धती आणि कामगारवर्गीय अथवा कम्युनिस्ट पद्धती यातील फरक सोदाहरण (पृ. ३) विशद करून भांडवलदारी सुधारित पद्धती दोषपूर्ण आहे असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. कोणत्याही राज्यपद्धतीमधील तुरुंग हा तुरुंगच असतो. कैदी हे कैदी असतात व तुरुंगाधिकारी अधिकारांचा कमीजास्त वापर करीत असतात, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. "खऱ्या अर्थी जेलसुधारणा आणि मानवी श्रमाची प्रतिष्ठा, ही आज कायदे घडविणाऱ्या मालकवर्गाची जागा जेव्हा बहुसंख्येचा श्रमजीवी वर्ग घेईल तेव्हाच प्रस्थापित होईल. आणि संपूर्ण सामाजिक पुनर्रचना साध्य होईल." हे लेखकाचे

विधान स्वीकारता येणे शक्य नाही.

स्वत: डांगे यांना आलेले अनुभव आणि कैद्यांच्या दुरवस्थेचे चित्रण असे या पुस्तकाचे दुहेरी स्वरूप आहे. 'सोशलिस्ट' साप्ताहिकाला लेख देऊन बाहेर पडता पडताच डांगे यांना सीआयडी अधिकारी थोडीफार फसवणूक करून अटक करतात. अधिकारी डांग्यांशी नम्रतेने वागतात पण रात्रीच्या भोजनासाठी दिलेले चार आणे डांगे स्वीकारीत नाहीत. उलट "ज्या साहेबाने ते नाणे दिले आहे ना, त्यालाच ते परत कर आणि सांग की त्याच्या सरकारची तिरडी बांधायला मी दिलेली ती वर्गणी आहे" असा शांतपणे जवाब देतात. डांगे यांना स्टेशनवर निरोप द्यायला आलेल्या भयग्रस्त मित्रांची ते मिष्किलपणे टिंगल टवाळी करतात लेखकाने कैद्यांविषयी केलेल्या वर्णनात त्यांची सहृदयता दिसते, तर व्यक्तिगत स्वरूपाच्या लेखनात सहकाऱ्याविषयी आदरभावना, सूक्ष्म विनोदबुद्धी, व बहुश्रुतपणा यांचा प्रत्यय येतो. कॅप्टन सिक्लेअर, व्हिक्टर ह्यूगो, चार्लस् डिकन्स, अलेक्झांडर ड्यूमा इ. पाश्चात्य लेखकांच्या साहित्याचे संदर्भ अधूनमधून या लेखनात येत असतात. योगायोगाची गोष्ट म्हणजे गुहेसारख्या जागेत वंदिवास भोगण्याची पाळी येते तेव्हा कॅप्टन सिक्लेअरची 'हेल' ही कादंबरीच डांगे वाचीत असतात. सीतापूरच्या प्रवासात बग्गीत बसावे लागते. तो अनुभव सांगताना बग्गीचे केलेले वर्णन उपरोधिक शैलीचा नमुना म्हणावा लागेल.

'तुरुंगातील अन्नचोर', 'जेल हॉस्पिटलची चित्तरकथा', 'छळाचे आणखी काही मार्ग', 'कैदी म्हणजे घाण्याचे बैल नव्हेत' या शेवटच्या चार प्रकरणांत ब्रिटिश राजवटीतील तुरुंगातील कैद्यांच्या दुर्दशेचे सबळ पुरावे देऊन लेखकाने वर्णन केले आहे. कच्ची व कचरा असलेली रोटी कैद्यांना देणे, त्यांना पशूंप्रमाणे निर्दयपणे मारहाण केली जाणे, वॉर्डरने कैद्यांकडून पैसे घेऊन नातेवाइकांची भेट घडवून आणणे, एखाद्या कैद्याची मानसिक विकृती लक्षात न घेता त्याचा छळ करणे, मध्यरात्रीच्या वेळी कैद्यांची गिनती घेणे, तुरुंगातील डॉक्टरला डॉक्टरकीशिवाय अन्य कामे करावी लागणे, सुपरिंटेंडन्टच्या घरी गाईचे दूध परस्पर पोचते होणे. इ. चे मर्मभेदक वर्णन लेखकाने केले आहे. तत्कालीन विधानपरिषद सदस्य व सन्माननीय पाहुणे व अन्य अधिकारी तुरुंग तपासणीनंतर आपला अहवाल कसा 'जपून' लिहीत असत याचे निवेदनही डांगे यांनी खोचक शैलीत केले आहे. उदा. काझी हबीब अशरफ यांचा अभिप्राय–

"मी रसोईखान्यात काही अवधी घालविला आणि स्वयंपाक करण्याची पद्धती पाहिली. सर्व काही स्वच्छ होते. रोटीचा एक तुकडा मोडून मी त्याची चव घेतली. त्यात कचरा असल्याचं आढळलं. भाकरी भाजण्याच्या पद्धतीतही थोडी सुधारणा होणं आवश्यक आहे." जेलर व सन्माननीय पाहुणे यांच्यात होणारा

विसंगतिपूर्ण संवाद डांगे यांच्या विनोदी व वक्रोक्तिपूर्ण शैलीचे उदाहरण आहे.

ब्रिटिश राजवटीतील तुरुंगव्यवस्थेचे चित्र उभे करणारे 'नरकपुरी गवसली' हे छोटेखानी पुस्तक कैद्यांच्या अमानुष छळाची माहिती देते आणि कॉम्रेड डांगे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखन-शैलीचाही प्रत्यय देते.

नरकपुरी गवसली– श्री. अ. डांगे
अनुवाद– वि. मा. शिर्के
अभिनव प्रकाशन

स्वानुभवाचा जिवंत प्रत्यय देणारे 'कसोटीचे क्षण'

श्रीधर प्रधान हे मुंबईचे पोलिस महानिरीक्षक म्हणून १९७३ साली निवृत्त झाले. निवृत्तीनंतर फुरसतीच्या वेळात आपल्या जीवनातील कसोटीचे क्षण त्यांना आठवू लागले. त्या स्मरणातून शब्दबद्ध झालेले जीवनानुभव म्हणजेच 'कसोटीचे क्षण' हे आत्मनिवेदनपर पुस्तक.

आत्मचरित्रपर सांकेतिक लेखनात चरित्रकाराच्या जीवनातील घटना क्रमवार आणि सुसंगतपणे येत असतात. त्या अर्थी कसोटीचे क्षण हे आत्मचरित्र नाही. आपल्या पोलिसखात्यातील नोकरीतील विविध अनुभव दहा प्रकरणांत लेखकाने कथन केले आहेत.' पोलिस प्रशिक्षण शाळा' या पहिल्याच प्रकरणात, आपले पूर्वज, बालपण, महाविद्यालयीन जीवन आणि पोलिस प्रशिक्षण शाळेत झालेली निवड यांची साररूपाने माहिती दिली आहे.' कायदा आणि सुव्यवस्था' या दुसऱ्या प्रकरणातील निवेदन म्हणजे प्रधान यांच्या पोलिस अधिकारी म्हणून कुशलतेने केलेल्या प्रशासकीय कार्याचे वेधक वर्णन होय. प्रधान यांना अधिकारी म्हणून काम करताना हिंदू-मुसलमानांचे भिवंडी, मालेगाव, अहमदाबाद, गोध्रा या गावात झालेले दंगे शमवावे लागले. समयसूचकता, खंबीरपणा, अचूक आणि त्वरित निर्णय घेण्याची शक्ती, विधायक दृष्टीचा स्वीकार आणि अंगभूत संयम ही प्रधान यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये या प्रकरणात दिसून येतात.

'नामवंत व्यक्तींच्या सहवासात' हे या पुस्तकातील प्रकरण अधिक लालित्यपूर्ण उतरले आहे. बंदोबस्ताचे आणि अन्य प्रशासकीय काम करताना प्रधान यांचा भारतातील अनेक राजकीय व्यक्तींशी संपर्क आला. या व्यक्तींना माणूस म्हणून ते जवळून पाहू शकले. लेखकाला चांदीचे रक्षापात्र भेट म्हणून देणारे पहिले राष्ट्रपती,

उपजत विनोदबुद्धी असलेले मुंबईचे ब्रिटिश गव्हर्नर, गोंदिया येथील वयोवृद्ध स्वातंत्र्यसैनिक वामनराव मुकादम, पं. नेहरूंना पपयाची भेट देणारे चरित्रकार डी. जी. तेंडुलकर, गुप्तचर विभागाचे अहवाल वेळेवर येत नाहीत म्हणून आपण ते वाचत नाही असे लेखकाला परखडपणे सांगणारे लालबहादूर शास्त्री, प्रारंभी गैरसमज करून घेणारे आणि नंतर प्रधानांची कार्यक्षमता लक्षात येताच दिलखुलासपणे त्यांची प्रशंसा करणारे मोरारजी देसाई, सकाळी प्रधानांना विमानतळावर भेटल्यानंतर बेळगावाला रात्री आकस्मिकपणे निधन पावलेले नाथ पै इत्यादी अनेक व्यक्तींच्या सहवासात प्रधान कारणपरत्वे आले. त्यांच्या छोटया छोटया व्यक्तिरेखा विविध प्रसंगांतून साकार झाल्या आहेत. पंडित नेहरूंच्या भेटीच्या वेळी कराव्या लागणाऱ्या पोलिस बंदोबस्ताचा नेहमीच ताण पडत असे. पोलिसांच्या, पोलिस अधिकाऱ्यांच्या वागणुकीकडे नेहरूंचे बारीक लक्ष असे. एखाद्या पोलिसाने गर्दीला मागे रेटण्यासाठी काठी उगारली की नेहरू रागावत आणि त्वरित त्यांचा राग नाहीसा पण होत असे. 'कसोटीचे क्षण' या पुस्तकातील व्यक्तिविषयक लेखनात पं. नेहरूंबद्दलचे उल्लेख जास्त आहेत. अलियावर जंग हे मंबईचे राज्यपाल एक खानदानी,आतिथ्यशील आणि सुसंस्कृत गृहस्थ.त्यांच्या शयनगृहातील कपडयांच्या चोरीची माहिती ते प्रधान आणि रमाकांत कुलकर्णी यांना देतात. राष्ट्रवादी अलियावर जंग यांच्यावर यापूर्वीही जातीय मुसलमानांनी हल्ले करण्याचा प्रयत्न केला होता. त्याची माहितीही ते देतात. 'या पुराणमतवाद्यांना मी भीत नाही. पण शक्य ती उपाययोजना करणे शहाणपणाचे आहे.' हे राज्यपालांचे उद्‌गार त्यांच्या स्वभावाचे निदर्शक आहेत. यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक हे दोघे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. स्वतःच्या मुलीच्या आत्महत्येच्या प्रकरणात वसंतराव नाईक अतिशय तटस्थ आणि अलिप्त राहतात. प्रधान आणि त्यांचे सहकारी यांना, मुख्यमंत्री असूनही कोणताही दबाव न आणता पोलिस तपासासाठी ते सहकार्य देतात. पुणे नगरपालिकेने बांधलेल्या राम गणेश गडकरी सभागृहाचे उद्‌घाटन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते व्हावयाचे असते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात सुरू असते. महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणात एक प्रकारचा ताण निर्माण झालेला असतो. उद्‌घाटनापूर्वी सभागृहात निदर्शक गोंधळ निर्माण करतात. त्यांना बाहेर घालवून पोलिसांनी सभागृहात शांतता प्रस्थापित केल्यावर यशवंतराव आपल्या भाषणाची पुढील वाक्याने हसत हसत सुरुवात करतात– "इतक्या नाटचपूर्ण पार्श्वभूमीवर जगातील कोणत्याही नाटचगृहाचे उद्‌घाटन झाले नसेल." पुढे अनेक वेळा यशवंतराव प्रधानांच्या सहवासात आले. पण खुल्या नाटचगृहाचे उद्‌घाटन करणारे निर्भय यशवंतरावच त्यांना अजूनही आठवतात.

श्रीधर प्रधान कसलेले लेखक नाहीत. पण लहान लहान प्रसंगांतून त्यांनी राजकीय क्षेत्रातील अनेक व्यक्तींना शब्दांकित केले आहे. त्यांच्यातील हाडामांसाच्या माणसांचे दर्शन घडविले आहे.

श्रीधर प्रधान यांनी महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांतील निरनिराळ्या विभागांत अधिकारी म्हणून काम केले आहे. पोलिस हा जनतेचा शत्रू नसून मित्र आहे ही भूमिका त्यांनी सतत बाळगली आहे. ते जिथे जिथे गेले तेथील समाजाशी, लोक-जीवनाशी समरस झाले एखाद्या कलावंताला समाजजीवनाविषयी जे कुतुहल असते तसे कुतुहल प्रधानांना आहे. 'आदिवासीसंबंधी' या प्रकरणात त्यांनी गुजरातमधील कोळी,भिल्ल, आदिवासी यांच्या चालीरीतींची माहिती दिली आहे. विरामगावच्या आसपास असलेल्या चुमाळिया कोळीजमातीत लग्न करण्यापूर्वी कोळी तरुणाला एक तरी शिक्षा व्हावी लागते. दोहद येथील भिल्ल तरुण-तरुणी प्रेमविवाह करतात. प्रौढ माणसे लटका विरोध दाखवून त्यांच्या लग्नाला संमती देतात. भिल्ल जोडपी लग्न झाल्यावर (आजच्या उच्चवर्णीयांप्रमाणे) स्वतंत्र राहतात. सर्वांत धाकट्या मुलाला आईवडिलांना सांभाळावे लागते. त्यासाठी एकूण इस्टेटीतील आईवडिलांच्या हक्काचा जादा हिस्सा त्याला मिळतो. ("अशा तऱ्हेची पद्धत जर आपण तथा-कथित सुधारलेल्या मंडळींनी अवलंबिली तर आज या महागाईच्या दिवसांत म्हाताऱ्या आईबापांची जी परवड होते ती तरी होणार नाही." या शब्दांत आपली प्रतिक्रिया प्रधानांनी व्यक्त केली आहे.) भिल्ल स्त्री-पुरुष समूहाने दारू प्यायला जातात तेव्हा त्यांच्यातील एक पुरुष मात्र दारू पीत नाही; कारण इतरांना सांभाळून नेणे ही सामाजिक जबाबदारी त्याला पार पाडायची असते ! सांशी जातीचे गुन्हेगार आपल्या नातेवाइकांना नॉटपेड पत्रे पाठवितात. कारण ती पत्रे रजिस्टर पत्रांपेक्षा जास्त सुरक्षिततेने मिळतात. खेडा जिल्ह्यातील पेटलाद-जवळचे वाघरी जमातीचे चोर बारीकसारीक चोऱ्या करीत नाहीत. एक वयस्क वाघरी लेखकाला म्हणतो. "साहेब, रागावू नका. आम्ही चोऱ्या जरूर करतो व चोऱ्या करण्यासाठी थेट मद्रास व कलकत्त्यापर्यंत जातो. आणि आम्ही पन्नास-साठ हजारांच्या चोऱ्या करतो. चाळीस हजारांच्या खालची चोरी असेल तर तुम्ही आमचा संशय पण घेऊ नका."

गुन्ह्याचा पोलिसांनी केलेला तपास ही आपल्याला रंजक गोष्ट वाटत असली तरी त्यांना ते एक आव्हानच असते. प्रधानांनी अनेक गुन्ह्यांचे तपास केले त्यांतील काहींचा वाचनीय तपशील 'पोलिस तपासाचे नमुने' या प्रकरणात आला आहे. गुहागर येथील पोलिस इन्स्पेक्टर कामत यांचा मृत्यू, वऱ्हाणपूर नगरपालिकेतील सफाई कामगार बाबू बिहारी याचा मृत्यू, वाडे येथील कुटुंब-नियोजन केंद्रावरील फिल्ड वर्कर कमल वैद्य यांचा खून, चंबा येथील विष्णुमूर्तीची चोरी, कम्युनिस्ट

पुढारी कृष्णा देसाई यांच्यावरील प्राणघातक हल्ला, पारशी कुटुंबियांची फिरोझ दारूवाला याने केलेली निर्घृण हत्या या सर्व गुन्ह्यांचा तपास प्रधान यांनी कुशलतेने आणि चातुर्याने केला. या सर्व तपासांचे वर्णन उत्कंठा वाढविणारे असले तरी त्यात रहस्यकथेचा सनसनाटीपणा नाही.

प्रधान हे विधायक दृष्टी असणारे पोलिस अधिकारी आहेत. 'कसोटीचे क्षण' या पुस्तकात हिंदू-मुसलमानांच्या जातीय दंगलीचे विश्लेषण लेखकाने केले आहे. दोन्ही जमातींत परस्परसामंजस्य राहावे म्हणून ते प्रमुख व्यक्तींना भेटून शांततेसाठी आवाहन करताना दिसतात. मालेगावसारख्या बहुसंख्य मुसलमान असलेल्या गावात मौलाना नोमानीसारखा शांतताप्रिय माणूस भेटतो. दोन्ही बाजूंनी कोंडी झालेला हा सुसंस्कृत मौलाना 'प्रधान साहेब, तुम्ही हो सर्व परिस्थिती सरकारच्या कानावर घालून हे दंगे थांबवलेच पाहिजेत.' असे उद्‌गार डोळ्यांत अश्रू आणून काढतो. आपला पोलिसखात्यातील कामाचा अनुभव विचारात घेऊन प्रधान यांनी शासनाला महत्त्वाच्या सूचना वेळोवेळी केल्या आहेत. संबंधित मंत्र्याशी सलोख्याचे संबंध ठेवून आपल्या योजना अमलात आणण्यासाठी त्याचे सहकार्य घेतले आहे. १९४८ साली नव्याने झालेल्या सांबरकाठा जिल्ह्याच्या बांधणीचे काम गृहमंत्री मोरारजीभाई देसाई त्यांच्याकडे देतात. आधी संस्थानी राजवट असलेल्या त्या विभागात अशिक्षित भिल्ल आदिवासीमधून कार्यक्षम पोलिसदल निर्माण करून प्रधान मोरारजीभाईंना आश्चर्याचा धक्का देतात. आणि त्यांच्याकडून शाबासकीही मिळवतात. पोलिसखात्यातील गैरव्यवहाराचे अनेक तपशील प्रधानांनी दिले आहेत. चांगल्या खानसाम्याला इन्स्पेक्टरची जागा मिळून तो खानसाम्याचेच काम निझामी राजवटीत करीत असे. पैशाचा लोभ कनिष्ठ दर्जाच्या नोकरांनाच असतो असे नाही, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही असतो, हे लेखकाने स्पष्टपणे नमूद करून खोटे भत्ते, बिल लावणाऱ्या अधिकाऱ्याचे उदाहरण दिले आहे. तीस वर्षांपूर्वी दारूबंदी विभागाचा उपआयुक्त म्हणून प्रधानांनी काम केले. एका सामाजिक सुधारणेसाठी आपण या विभागाचे काम केले, पण ही सामाजिक सुधारणा केवळ कायद्याने कधी होऊ शकली नाही व पुढे केव्हा होईल असे त्यांना वाटत नाही. दारूबंदी विफल होण्याचे कारण म्हणजे पुढाऱ्यांनी किंवा कार्यकर्त्यांनी या प्रश्नाचा काहीच विचार केला नाही हे होय. दारूबंदीऐवजी मितपानावर जर भर दिला असता तर कदाचित या कार्यक्रमाला जास्त यश मिळाले असते असे लेखकाला वाटते. आयकराची कडक आकारणी व दंड हाच चोरट्या दारूच्या धंद्याला व जुगाराच्या धंद्याला एकमेव प्रतिबंधक उपाय आहे असे प्रधानांना वाटते. यामुळे 'कसोटीचे क्षण' हे पुस्तक लेखकाच्या जीवनातील घटनांचे केवळ रंजक चित्रण करणारे राहात नाही, तर विधायक दृष्टिकोन व्यक्त करणारे पुस्तकही ठरते.

कोणत्याही आत्मनिवेदनपर लेखनात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होत असतो. कथा-कादंबऱ्यांसारख्या ललितकृतीत होणारा आत्माविष्कार आणि स्वतःच्या जीवनानुभवाच्या शब्दरूप दर्शनातून होणारा आत्माविष्कार यांत स्तर-भेद आहे. गुणात्मक भेद आहे. 'कसोटीच्या क्षणा'चे निवेदन करणारे श्रीधर प्रधान हे कार्यक्षम पोलिस अधिकारी आहेत. साहस, समयसूचकता, खंबीरपणा, सहृदयता, समरसता, जिद्द, चिकाटी हे त्यांच्या स्वभावाचे ठळक विशेष आहेत. सर्वसामान्य माणसाला भय वाटावे अशा कोरडचा पोलिसी खात्यात काम करणाऱ्या प्रधानांमध्ये भावनांचा आणि सहृदयतेचा ओलावा आहे. म्हणूनच ते सुभाष काकडे या पोलिस हवालदाराच्या मुलाला अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी आर्थिक साह्य मिळवून देतात. इतर सहकारी तांत्रिक अडचणींमुळे यापासून त्यांना परावृत्त करीत असताना मदत म्हणून मिळालेली रक्कम आयुक्त म्हणून स्वतः स्वीकारून तिच्या सुभाषकडून होणाऱ्या परतफेडीची हमी देतात. प्रशासकामधील 'माणूस' हचा घटनेत आपल्याला दिसतो. हीच घटना कथा-कादंबरीसारख्या ललितकृतीत कदाचित वेगळचा तऱ्हेने फुलवली गेली असती. आत्मनिवेदनपर लेखनातील प्रांजलपणामुळे इतर ललितकृतीतून होणारा आत्माविष्कार आणि आत्मनिवेदनपर लेखनातील आत्माविष्कार यांमध्ये गुणात्मक भेद राहतो. 'कसोटीचे क्षण' सारखे पुस्तक त्याच्यातील अनलंकृत, अकृत्रिम आणि सहजसुंदर निवेदनशैलीमुळे वेधक ठरले आहे. गेल्या दहाबारा वर्षांत कलावंत म्हणून प्रसिद्ध नसलेल्या अनेक व्यक्तींची आत्मनिवेदने प्रसिद्ध झाली आहेत. एखाद्या श्रेष्ठ कलाकृतीचे मोल त्यांना नसेलही, पण अनुभवाचा जिवंतपणा त्यांच्यात निश्चितच आहे. 'कसोटीचे क्षण', हे श्रीधर प्रधान यांचे आत्मनिवेदनपर लेखन स्वानुभवातील जिवंतपणाचा प्रत्यय देणारे लेखन आहे.

कसोटीचे क्षण– श्रीधर प्रधान
मनोरमा प्रकाशन मुंबई–४०० ०१४.
(मुंबई सकाळ)

सामान्य माणसाचे मनोरंजक आत्मकथन– 'उलगा-उलग'

श्रीपाद जोशी मराठी वाचकांना परिचित आहेत ते बहुभाषी लेखक म्हणून. मराठीप्रमाणेच हिंदी, गुजराती, उर्दू व बंगाली भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे. १९३३ साली त्यांनी काकासाहेब कालेलकरांच्या 'ब्रह्मदेशचा प्रवास' या मूळ गुजरातीतील पुस्तकाच्या अनुवादाने आपल्या लेखनाला सुरुवात केली. त्याच वर्षी त्यांनी 'मराठी हिंदुस्तानी' शब्दकोशाचे काम पूर्ण केले. त्यानंतरच्या गेल्या चाळीस वर्षांच्या कालावधीत बालवाङ्मय, ललित निबंध, चरित्र, कथा, कादंबरी, शब्दकोश, अशी विविध प्रकारची निर्मिती त्यांनी केली आहे. श्रीपाद जोशींनी विशेषत्वाने हाताळलेला वाङ्मयप्रकार म्हणजे प्रवासवर्णन. गांधीवादी विचार-सरणीचा प्रभाव असलेल्या श्रीपाद जोशी यांनी आणीबाणीतील विनोबा भावे यांच्या सरकारधार्जिण्या भूमिकेबद्दल परखडपणे वैचारिक स्वरूपाचे लेखन केले आहे. मुरगूड, वाई, वर्धा, कोल्हापूर, गारगोटी या ठिकाणी त्यांचे जीवन व्यतीत झाले आहे. जवळजवळ तीस-पस्तीस वर्षे त्यांनी पुण्यात वास्तव्य केले आहे. 'उलगा-उलग' या आत्मचरित्राची प्रकरणे लेखकाने वास्तव्य केलेल्या गावांशी निगडित आहेत. त्यांच्याच भाषेत सांगायचे झाल्यास, 'त्यांचे जीवन सर्वसामान्य पांढरपेशा माणसाच्या आयुष्यासारखे गेले आहे.' ज्याचा बिल्ला करून छातीवर मिरवावा असे कोणतेही घवघवीत, चकचकीत नेत्रदीपक यश प्रयत्न करून त्यांना मिळालेले नाही. ज्यांच्या वाहत्या जखमा जगाला दाखवून त्याची सहानुभूती प्राप्त करता येईल असे अमानुष घावही त्यांना सोसावे लागले नाहीत. मात्र श्रीपाद जोशी यांना काही थोर वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तींच्या सहवासात राहण्याची संधीच मिळाली. त्यांचा स्नेहभाजन होण्याचा दुर्मीळ लाभ लेखकाला मिळाला. यात त्याच्या जीवनानुभवाचा आगळेपणा साठलेला आहे आपल्या जीवनातील या आगळ्यावेगळ्या पैलूंचे दर्शन काही प्रमाणात वाचकांना आकृष्ट करील एवढीच माफक अपेक्षा लेखकाने बाळगली आहे. सामान्य माणसाच्या आयुष्यातील अज्ञात कप्पे किंवा पैलू पाहणे वाचकांना मनोरंजक वाटेल अशी मर्यादित अपेक्षा लेखकाने प्रस्तावनेत व्यक्त केली आहे. आपल्या आत्मचरित्रात लोकप्रिय आत्मचरित्रांचा मालमसाला नाही, तसेच ललितरम्य, मोहक शैलीने वाचकांना भारून टाकण्याचे सामर्थ्य आपल्या लेखणीत नाही याची जाणीव लेखकाला आहे. सामान्य माणसाच्या दृष्टीतून लिहिलेल्या या आत्मचरित्राचे 'उलगा-उलग' हे शीर्षक मात्र अपरिचित आहे. उलगा उलग, उलगा-मालगी या शब्दाचा संबंध 'उलगणे' या क्रियापदाशी असून त्याचा अर्थ आवराआवर, निरवानिरव, उपसंहार असा

आहे. आत्मचरित्र हे एका अर्थाने आयुष्याची आवराआवर करण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊलच असते. शिवाय या शीर्षकातून लेखकाला हवा असणारा एक अर्थ ध्वनित होतो, तो 'उलगडणे' या क्रियापदाशी संबंधित आहे. वास्तविकपणे 'उलगणे' व 'उलगडणे' या दोन क्रियापदांच्या अर्थात बराच फरक आहे. तरीपण ही दोन्ही क्रियापदे संस्कृत उद्+लग या धातूंपासून बनलेली आहेत. त्यामुळे त्यांच्यात एक आंतरिक सूक्ष्म धागाही आहे. लेखकाच्या आत्म-निवेदनामागील हेतू स्वत:ला जाणून घेण्याचा प्रयत्न करणे हा आहे. तसे करताना अनेक घटनांचा उलगडा स्वत:च्या दृष्टिकोनातून करून घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. आजवर घडी करून ठेवलेले आपले जीवनवस्त्र आपण उलगडून पाहतो आहोत व इतरांनाही भीतभीत, कौतुकानं दाखवतो, अशी लेखकाची भूमिका निवेदनाच्या मुळाशी आहे. त्या दृष्टीने हे शीर्षक लेखकाला अन्वर्थक आणि समर्पक वाटले आहे.

श्रीपाद जोशी यांचे बालपण जुन्या कोल्हापूर संस्थानच्या कागल जहागिरी-तील मुरगूड या लहानशा गावी गेले. १९२०–३१ ही अकरा वर्षे ते मुरगुडास होते. श्रीपाद जोशी एका भिक्षुक घराण्यात जन्माला आले. घरचे ब्राह्मणी संस्कार व वातावरण आणि सभोवतालचा तत्कालीन बहुजनसमाज यांचे त्यांनी मार्मिक वर्णन केले आहे. तत्कालीन सामाजिक चालीरीती, सणवार, उत्सव, व्रतवैकल्ये, लोकभ्रम इ. ची निवेदनाच्या ओघात आलेली माहिती वास्तव ग्रामजीवनाचा पट उभा करते. लेखकाच्या बालपणी त्याच्यावर प्रामुख्याने संस्कार झाले ते जवळच्या नातेवाइकांचे. आई, वडील, आजी चंद्राबाई, आजोबा गणूकाका, मामा गुळवणी महाराज, बहीण अक्का, या सर्वांची लेखकाने रेखाटलेली चित्रे मनोरम आहेत.

श्रीपाद जोशींचे पुढील आयुष्य वाई, वर्धा, गारगोटी, कोल्हापूर व प्रामुख्याने पुणे या गावी गेले. गांधीवादी विचारसरणीने प्रभावित झालेले जोशी वर्ध्यास गेले आणि म. गांधी, काकासाहेब कालेलकर, आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या निकट सान्निध्यात आले.या वेगवेगळ्या गांधीवाद्यांच्या स्वभावविशेषांचे लेखकाने सविस्तर-पणे निवेदन केले आहे. शिवाय सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व बालमानसतज्ज्ञ नाना आठवले, हिंदी कवी वियोगी हरी, यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये त्यांनी सांगितली आहेत. आपल्या कुटुंबजीवनाचे निवेदन हा आत्मकथेचा एक प्रमुख विशेष आहे. पत्नी माणिक, कन्या माया, जावई सुबय्या यांच्याबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया लेखकाने नोंदविल्या आहेत. उच्च शिक्षणाचा लाभ न झालेल्या श्रीपाद जोशी यांनी कालप्रवाहात वेगवेगळ्या भूमिका स्वीकारल्या आहेत. हिंदी प्रचारक, बहुभाषी लेखक, अनुवादक, कोशकार, अध्यापक,संशोधन-साहाय्यक अशा या भूमिका आहेत. आपल्या व्यवसायासंबंधी लिहीत असताना संपर्कात आलेल्या काही प्रमुख व्यक्तीं-

विषयी प्रतिक्रिया व्यक्त करणे; आपल्या साहित्यनिर्मितीची व कौटुंबिक जीवनाची माहिती देणे; स्वत:च्या स्वभावाविषयी प्रतिपादन व समर्थन करणे अशी या आत्मचरित्राच्या निवेदनाची पद्धत आहे.

कोणत्याही आत्मचरित्रात प्रांजळपणा नसेल, ते अनुभव–सत्य प्रकट करीत नसेल, लेखकाच्या निवेदनात केवळ समर्थनच असेल तर ते आत्मचरित्र कलादृष्टचा फारशी उंची गाठू शकत नाही. श्रीपाद जोशी यांच्या मुरगुड येथील वास्तव्यातील निवेदनात जो प्रांजळपणा आहे, तो पुढेपुढे कमी होत गेला आहे. पत्नीविषयीची त्यांची सहानुभूतीची भूमिका, तिच्याशी वागण्यातील दाखवले गेलेले औदार्य याविषयी त्यांची कन्या माया हिने त्यांचा चांगलाच समाचार घेतला आहे. वैज्ञानिक विचारसरणीतून जी शिस्त माणसाला लागते, तिचे शिक्षणच आपल्या पित्याला मिळाले नसल्यामुळे प्रत्येक गोष्टीच्या दुसऱ्या बाजूचे आकलन त्याला होऊ शकले नाही. यामुळेच लेखकाची पत्नी मणिक हिची जीवनात जी कुचंबणा झाली त्याचे फारसे निवेदन आलेले नाही. मुलाच्या लग्नानंतर आपले कुटुंब एकत्र राहिले याचे श्रेयही श्रीपाद जोशी आडपडद्याने आपल्याकडे घेतात, हेही तितकेसे बराबर नाही असे त्यांची कन्या माया हिचे मत आहे. कुणाही व्यक्तीच्या आत्मनिवेदनातील सत्य– विशेषत: कौटुंबिक संबंधातील सत्य– आत्मसमर्थन आहे की निर्भेळ सत्य आहे हे तपासून पाहता येणे शक्य नसते. 'उलगा–उलग' मध्ये मात्र श्रीपाद जोशी यांनी आपली कन्या आणि रवींद्र केळेकर किंवा मोहनराव शहाणे या स्नेह्यांच्या प्रतिक्रिया अगदी स्पष्टपणे नमूद केल्यामुळे या आत्मनिवेदनातील मर्यादा अधिकृतपणे सिद्ध झाल्या आहेत. म. गांधींनी वर्णिलेले स्वत:चे कामजीवन हा लेखकाला कलादृष्टचा महत्त्वाचा घटक न वाटता एक 'प्रमाद' वाटतो. म. गांधींना ब्रह्मचर्याचे 'ऑब्सेशन' होते. यामुळे कर्मजीवनाबरोबर कामजीवनाचे वर्णन करण्याचा मोह त्यांना आवरता आला नाही. उलट आपले कामजीवन इतके सुरस आणि चमत्कारिक आहे की, त्याचे वर्णन करताना मी भलतीकडेच वाहात गेलो असतो, असे श्रीपाद जोशी लिहितात. "त्या जीवनाचे मोकळचा मनाने दर्शन घडविण्याचा धीटपणा जेव्हा माझ्यामध्ये निर्माण होईल तेव्हा मी त्यासंबंधी अवश्य लिहीन," या शब्दांत ते आश्वासन देतात. प्रत्येक आत्मचरित्रात कामजीवनाचे मोकळेपणाने निवेदन आलेच पाहिजे असे नाही, पण कामजीवनाचे निवेदन (ते सुरस चमत्कारिक असूनही) न करता आश्वासन देणे, यातच लेखकाची मर्यादा स्पष्ट होते, कारण आपले आत्मचरित्र निर्मळच असावे अशी लेखकाची भूमिका आहे. या भूमिकेच्या स्वीकृतीमुळे त्याने 'साडेतीन टक्के' संस्कृतीचा निषेध करणाऱ्यांवर अकारण वाक्ताडन केले आहे. वस्तुत: आत्मनिवेदन, मग ते कोणत्याही 'टक्क्या'च्या गटातील लेखकाचे असो, त्यातील प्रांजलपणामुळे वैशिष्टचपूर्ण आणि कलादृष्टचा सरस ठरत असते.

'स्मृतिचित्रा'सारखे आत्मचरित्र शाश्वत ठरते ते लक्ष्मीबाईंनी स्वीकारलेल्या अकृत्रिम भूमिकेमुळे– निवेदनातील सहजतेमुळे ! कलादृष्टचा आवश्यक असलेला अकृत्रिमपणा, प्रांजलपणा या आत्मचरित्रात नाही. तरीही वेधक व्यक्तिचित्रण, वास्तव ग्रामजीवनचित्रण, साधी अनलंकृत भाषाशैली, मार्मिक समाजदर्शन इ. वैशिष्टचांमुळे 'उलगा–उलग' हे आत्मचरित्र मनोरंजक व वाचनीय ठरले आहे.

उलगा–उलग–श्रीपाद जोशी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पुणे–४११३०.

प्रेरणादायी 'पहाडातील पाऊलवाटा'

"संस्थेत काम करताना मी घडचाळाकडे कधी पाहिले नाही. कठोर परिश्रमाला पर्याय नाही हे खरे; पण श्रमप्रतिष्ठा ही जीवनात यावी लागते. माझ्या कार्याची उभारणी मी श्रमनिष्ठेवर केली. संस्था अंतर्बाह्य अत्यंत स्वच्छ ठेवली. कोणावरही अन्याय होऊ दिला नाही. व्यक्तिगत हितसंबंध आणले नाहीत. गोखले एज्युकेशन सोसायटीला अभिमान वाटावा असे हे केंद्र मी स्वच्छ ठेवले. हे सर्वांनाच जमते असे नाही. पण मला मात्र जमले."

वरील उद्‌गार गोखले एज्युकेशन सोसायटीतर्फे जव्हार येथे चालविल्या जाणाऱ्या के. व्ही. हायस्कूलचे प्राचार्य अनंतराव पाटील यांचे आहेत. ठाणे जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित केल्यावर दादर येथे झालेल्या सत्कार समारंभप्रसंगी त्यांनी आपले मनोगत वरील शब्दात व्यक्त केले आहे.

प्रा. अनंत पाटील वसईच्या न्यू इंग्लिश स्कूलचे माजी विद्यार्थी. शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर रेल्वेत नोकरी करून मुंबईच्या रूपारेल महाविद्यालयातून ते पदवीधर झाले. शासकीय सेवेत आयुष्य घालवायचे नाही असा त्यांनी आधीच निश्चय केलेला होता. शिक्षण पूर्ण होताच गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कोसबाड येथील ट्रेनिंग कॉलेजमध्ये ते प्राध्यापक म्हणून काम करू लागले. १९७३ मध्ये संस्थेने त्यांची जव्हार येथील के. व्ही. हायस्कूलचे प्राचार्य म्हणून नेमणूक केली. १९८२ पर्यंत म्हणजे दहा वर्षे प्रा. पाटील जव्हार हायस्कूलचे प्राचार्य होते. १९४८ सालापासून जे प्राचार्य त्या हायस्कूलमध्ये काम करून गेले त्या सर्वांत जास्त काळ काम करण्याची संधी पाटील यांना मिळाली. प्रा. पाटील चार भितीच्या

आत राहून केवळ शैक्षणिक कार्य करणारे अध्यापक–प्राचार्य नाहीत. त्यांचा मूळचा पिंड समाजसेवकाचा आहे. आदिवासींच्या प्रश्नांबद्दल त्यांना मनःपूर्वक आस्था आहे.

सूर्यानगर येथील नवीन शाळेची सुरुवात करणे, जव्हारच्या आसपास राहणाऱ्या आदिवासींचे प्रश्न वर्तमानपत्रांतून मांडणे असे विविध प्रकारचे काम प्राचार्य पाटलांनी दहा वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत केले. 'पहाडातील पाऊलवाटा' हे पुस्तक त्यांच्या कार्याचा परिचय करून देणारे एक साधे, सोपे, छोटेखानी पुस्तक आहे. के. व्ही हायस्कूलतर्फे दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या 'जव्हारिका' या वार्षिकांकातील लेख, आदिवासी टाइम्स, मुंबई सकाळ या नियतकालिकांतील लेख यांचे संकलन म्हणजे 'पहाडातील पाऊलवाटा' हे पुस्तक.

प्राचार्य म्हणून काम करीत असताना पाटील तेथील आदिवासींच्या जीवनाशी समरस झाले. आदिवासींचे शिक्षण, त्यांच्या आर्थिक समस्या यांच्यावर त्यांनी 'आदिवासी टाइम्स' मध्ये लेख लिहिले. पुस्तकी शिक्षणापेक्षा नवा माणूस निर्माण करण्याचे शिक्षण आदिवासींना दिले पाहिजे सद्यःस्थितीत आदिवासी समाज नव्या पद्धतीने बांधावा लागेल. दलित समाजाला जसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा समर्थ नेता मिळाला तसा नेता आदिवासींना मिळाला तर आदिवासी समाज बदलू शकेल, अशा आशयाचे विचार लेखकाने मांडले आहेत. 'मुंबई सकाळ'मध्ये 'गोंदा घाट स्टेट हायवे' या रस्त्याचे महत्त्व विशद करणारा लेख लिहून त्यांनी शासनाला आवाहन केले. या रस्त्यामुळे जव्हार–नाशिक अंतर पंचवीस मैलांनी कमी होईल, आणि जव्हार परिसराचा सामाजिक व आर्थिक विकास कसा होईल या-संबंधीचे स्पष्ट चित्र त्यांनी उभे केले.

सामाजिक प्रश्नाची आच असणारे प्रा. पाटील हाडाचे शिक्षक आहेत. के. व्ही. हायस्कूलचे प्राचार्य म्हणून काम करीत असताना त्यांनी शाळेच्या विकासासाठी कितीतरी नवीन योजना राबविल्या. शासनाच्या अल्पबचत योजनेचे स्वागत करून आपल्या शाळेतील आदिवासी समाजातील व अन्य विद्यार्थ्यांकडून बचत योजनेसाठी जवळजवळ पंचेचाळीस हजारांची ठेव संचयिकेत जमा केली. याच काळात के व्ही. हायस्कूलचा शाळासमूह योजनेत समावेश केला गेला. रोजगार हमी योजनेखाली शाळेचा ॲप्रोच रोड शासनाच्या सहकार्याने बांधून पूर्ण केला. जव्हार एस. टी. स्टॅण्डची स्वच्छता योजना, वृक्षारोपण योजना, आदिवासींच्या समस्यांवर परिसंवादाचे आयोजन, शारदीय व्याख्यानमालेचे संयोजन इत्यादी उपक्रम प्राचार्य पाटलांनी सर्व संबंधितांचे सहकार्य मिळवून यशस्वी केले.

वसईच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य चंपूताई म्हापणकर, आचार्य भिसे, रूपारेल महाविद्यालयातील प्राध्यापक या सर्वांचा ठसा प्रा. पाटील यांच्यावर उमटला

आहे. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांकडे ज्या आस्थेने आणि जिव्हाळ्याने पाहिले आहे. त्याला तोडच नाही. विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणीत त्यांच्याशी समरस होऊन, तन्मयता दाखवून जो क्रियाशील राहतो तोच खरा प्राचार्य. प्राचार्य पाटील या वर्गातले प्रशासक आहेत. जव्हार तालुक्यातील जाई सहारे या आदिवासी विद्यार्थिनीला त्यांनी आर्थिक साहाय्य मिळवून देऊन तिच्या पुढील शिक्षणाची सोय केली. शरीफ कुरेशी या अपघातामुळे अपंग झालेल्या विद्यार्थ्याला मदतीसाठी वर्तमानपत्रातून आवाहन करून पाच हजार रुपयांची मदत मिळवून दिली. बाबा आमटे यांनी अनाथ मुलांसाठी 'गोकुळ' प्रकल्प सुरू केला आहे. प्रकाश मोहाडीकरांसारख्या झपाटलेल्या शिक्षकाने या प्रकल्पाच्या मदतीसाठी आवाहन केले. त्याला प्रतिसाद म्हणून आपल्या शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांकडून पाचशे एकावन्न रुपयांचा निधी पाटलांनी जमवून दिला. या वेळी आनंदवनातून विकास आमटचांनी लिहिले– "दुःखाशी स्वयंस्फूर्तीने नाते जोडण्याचा आपला उपक्रम अभिनव आहे."

अनंतराव पाटील पुस्तकी अभ्यासाबरोबरच सभोवतालचे जीवन पाहता पाहता विकसित झालेले अध्यापक आहेत. आचार्य भिसे, त्यांच्या शिक्षिका चंपूताई म्हापणकर, वार्ताहर आणि इतिहासाचे अभ्यासक श्री. रा. टिकेकर यांच्याविषयी ते जिव्हाळ्याने लिहितात. जव्हार संस्थानाशी संबंधित अशा प्रा. गं. बा. सरदार, नाशिकचे डॉ. सुधीर फडके, जव्हारचे राजे यशवंतराव मुकणे, जव्हारचे सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मुळे, नानासाहेब ओक यांच्याविषयी पाटलांनी अत्यंत ममत्वाने लिहिले. रत्नागिरीचे गांधीवादी कार्यकर्ते तात्यासाहेब शिखरे यांच्याशी लेखकाचा प्रत्यक्ष परिचय नव्हता. जव्हार तालुक्यातून शालांत परीक्षेत पहिल्या आलेल्या जाई सहारे या आदिवासी विद्यार्थिनीची वर्तमानपत्रातील माहिती वाचून शिखरे यांनी पाटलांचे अभिनंदन केले; एवढेच नव्हे, तर तिच्या पुढील शिक्षणाच्या काळात तिला दरमहा दहा रुपयांची मदत पाठविली. समिरा ही अपंग मुलगी तिचाकीवरून शाळेत येते हे म. टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेले चित्र पाहून तिचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत दहा रुपयांची मदत तात्यासाहेब शिखऱ्यांकडून येत राहिली. अपघातात सापडलेल्या शरीफ कुरेशी या मुलालाही ते मदत पाठवतात. प्रा. पाटलांच्या विद्यार्थिप्रेमाने भारावलेले तात्यासाहेब शिखरे आणि पाटील यांचे जे सूर जुळतात त्यांचे मनोज्ञ वर्णन वाचताना दोघांच्याही स्वभावावर प्रकाश पडताना दिसतो.

प्राचार्य अनंतराव पाटील समाजोन्मुख भूमिका घेणारे एक क्रियाशील अध्यापक व प्रशासक आहेत; ललितलेखक तर मुळीच नाहीत. तरीही त्यांच्या लेखनात सहजता, कळकळ आणि आत्मीयता आहे. आपल्या व्यवसायाचे चिंतन करून काही मूल्यमापनात्मक आत्मनिवेदनपर लिहावे अशी त्यांची भूमिका आहे. प्रसंगोपात झालेल्या लेखनाचे हे संकलन आहे. या लेखनातून त्यांच्या व्यक्ति-

मत्त्वाचा परिचय होत जातो. जव्हार हे लहानसे गाव. लहान गावातील संस्था नेहमीच गावात चर्चेचा विषय असतो. ही चर्चा टाळावी म्हणून त्यांनी यशवंत सार्वजनिक वाचनालयात संध्याकाळी जाऊन वाचनात वेळ घालविण्याचे ठरविले. ते लिहितात– "शाळेविषयी अनावश्यक चर्चा थांबली. कोण माझ्याविषयी काय बोलतो हेही ऐकू येईनासे झाले. बरे झाले ! थोडे मानसिक स्वास्थ्य लाभले. लोकांना माझे क्वचित दर्शन होई. फिरणे, बोलणे कमी झाले, हे सर्वांनाच जाणवले."

नेटाने काम करणारे पाटील सदैव उत्फुल्ल आणि आशावादी आहेत असे नाही. त्यांच्यासमोरसुद्धा काही प्रश्न आहेत; त्यांच्या स्वतःच्या व्यथा, वेदना आहेत. "शाळेचा शैक्षणिक विकास कसा होईल त्याचे चिंतन नेहमी चालू असते. चिंतनातून मार्ग सापडतो. मार्ग सापडला की त्याला प्रयत्नांची जोड मिळते. माझ्या कामाची ही पद्धत आहे. शासनाला व संस्थेला नव्या योजना मी सुचवीत असतो. प्रत्येक वेळी स्पष्ट बोलतो. या स्पष्ट बोलण्याने माझे फारसे कल्याण होत नाही हे मलाही समजते. अंतर्यामी मी दुःखी आहे. शिक्षणक्षेत्रातील अनिष्ट गोष्टी मला स्वस्थ बसू देत नाहीत, ही माझी खरी व्यथा ! माझी निर्भीडता व निर्भयता ही या व्यथेतून साकार होते..."

'पहाडातील पाऊलवाटा' मध्ये असा निराशेचा सूर क्वचितच दिसून येतो; परंतु अधिक जाणवते ते, श्रमांवर निष्ठा असणाऱ्या एका समाजसेवी प्रवृत्तीच्या अध्यापकाच्या आत्मविश्वासपूर्ण प्रयत्नांतील यश. असे प्रयत्न करू पाहणाऱ्या कुणाही अध्यापकाला या लेखनातून खरोखरच प्रेरणा मिळेल.

पहाडातील पाउलवाटा– प्रा. अनंत पाटील.
प्रकाशक– गोखले एज्युकेशन सोसायटी, मुंबई
मुंबई सकाळ

शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक : एक लालित्यपूर्ण चरित्र

समाजसुधारक प्रार्थनासमाजी मातापित्यांच्या पोटी जन्माला आलेली मुलगी पासष्ट वर्षांपूर्वी सर्वांचा विरोध पत्करून स्वतःला आवडत्या तरुणाशी विवाह करते. समृद्ध आणि प्रसन्न वैवाहिक जीवनाच्या आरंभी तिला मुलगी होते. पण पतीच्या व्यसनी आणि स्वैर स्वभावामुळे तिच्यावर गृहत्याग करण्याची पाळी येते.

मोठ्या जिद्दीने ती बाल शिक्षणक्षेत्रात उतरते आणि कौटुंबिक संकटे आणि सामाजिक उपेक्षा यांना तोंड देऊन शिक्षणक्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविते. वेडाचे झटके येणाऱ्या मुलीची दारुण आत्महत्या, विभक्त झालेल्या पण तिच्यावर खूप प्रेम असलेल्या पतीचा बेवारशी अवस्थेत झालेला करुण अंत, दोनदा हृदयविकाराचे झटके आल्यानंतर आणि साठी उलटल्यानंतर वयाच्या एक्याऐंशीव्या वर्षापर्यंत आदिवासी समाजात शिक्षण व समाजसुधारणा यांचे केलेले प्रचंड कार्य, उशिरा आमंत्रण मिळाल्यामुळे पद्मभूषण सन्मान स्वीकारण्यासाठी न जाण्याचा घेतलेला जगावेगळा निर्णय, अशा घटना या स्त्रीच्या जीवनात घडतात. केवळ विस्मयकारकच नव्हेत तर कपोलकल्पित वाटाव्यात अशा या घटना आहेत. बालशिक्षण क्षेत्रातील तिच्या कार्याचा, आयुष्यातील उत्तरार्धाचा महाराष्ट्रातील बहुसंख्यांना थोडाफार परिचय आहे. सौ. पद्मजा फाटक यांनी 'शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक' या विस्तृत चरित्रग्रंथात ताराबाई मोडकांचे विफल कौटुंबिक जीवन आणि अनेक संकटांशी झगडून बालशिक्षण व समाजसुधारणा यांच्या कार्यात मिळविलेले देदीप्यमान यश यांचा वास्तवपट उभा केला आहे.

ताराबाईंच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांतील कार्याचा परिचय करून देणे एवढेच या चरित्राचे उद्दिष्ट नाही. उलट 'माणूस' शोधण्याची लेखिकेची धडपड आहे. ताराबाई, त्यांचे पती के. व्ही. मोडक आणि मुलगी प्रभा ही हाडामांसांची माणसे होती. मानवी मनोविकार, दुर्बलता व उणिवा यांच्यावर विजय मिळविणे सर्वसामान्य माणसांप्रमाणे त्यांनाही जमले नाही. नियतीच्या प्रभावामुळे त्या तिघांची जीवने काही वेळा एकमेकांकडे आकृष्ट होत, तर काही वेळा परस्परविरोधी दिशांनी धाव घेत सतत फिरत राहिली. पुरुषी कर्तृत्वाच्या ताराबाईंमध्ये केव्हींची एक सखी, पत्नी आणि प्रभाची माता अशी तीनही रूपे एकवटलेली होती. मातृत्वाने उसळी घेतली की त्यांच्यातील मातेचे मन प्रभाच्या भवितव्याच्या विचारांनी काळवंडून जाई. त्या कमालीच्या अस्वस्थ होत. अशा वेळी केव्हींचा दुरावा त्यांना तीव्रतेने जाणवे. त्यांच्यातील पत्निरूप प्रबळ ठरले की त्या आपले नियोजित जीवनकार्य सोडण्याचा विचार करीत. केव्हींकडे धाव घेत आणि अपेक्षाभंग झाला की निराशेने पुन्हा आपल्या कार्याकडे वळत. ताराबाई स्त्रीसुलभ भावनेने प्रथम केव्हींकडे आकृष्ट झाल्या तेव्हा त्या नुकत्याच पदवीधर झालेल्या, प्रार्थनासमाजी वातावरणात वाढलेल्या बंडखोर तरुणी होत्या, तर केव्ही रुबाबदार व्यक्तिमत्त्व लाभलेले बुद्धिमान तरुण व निष्णात वकील होते. विवाहानंतर थोडचाच दिवसांत केव्हींचे स्वैर, बेबंद व व्यसनी जीवन सुरू झाले. अमरावतीत नव्याने आलेल्या डॉ. सुलोचना जावळे यांच्याशी असलेल्या संबंधामुळे केव्ही व ताराबाई यांच्यातील दुरावा आणखीनच वाढतो. यामुळे ताराबाई, केव्ही यांची जीवने विस्क-

टून जातात, तसेच सुलोचनाबाईही पूर्णांशाने सुखी होत नाहीत. कारण केव्हींचे मन ताराबाईंकडे सतत ओढलेले राहते. त्यातही ताराबाईंना आकर्षण आहे ते कलासक्त, बेहिशेबी पण दिलदार केव्हींचे. त्यामुळे केव्हींना त्या त्यांच्या दुर्गुणासह स्वीकारण्याचा आपल्या आयुष्यात दोनदा प्रयत्न करतात. केव्हींच्या स्वैरपणाचा कळस झाल्यावर मात्र त्या कायमच्या पराभूत होतात. केव्ही अमरावती येथे कपूर-मामा नावाच्या एका माणसाच्या गॅरेजमध्ये राहत असतात. त्या जागेच्या भाड्याच्या बदल्यात त्याच्या मुलीला इंग्रजी शिकवितात. कपूर कुटुंब दोन दिवस बाहेरगावी गेले असता कधीतरी केव्ही मृत्यू पावतात. केव्हींनी प्रेमाने पाळलेले कुत्रेच त्यांच्या देहाची दुर्दशा करतात. नेहमीप्रमाणे ताराबाईंनी केव्हींना पाठविलेली मनीऑर्डर परत येते तेव्हा त्यांना चौकशीअंती त्यांच्या मृत्यूची बातमी खूप उशिरा कळते. त्यावेळची ताराबाईंची प्रतिक्रिया–

"फार दुःख सोसावं लागलं होतं त्यांना. सुटले बिच्चारे! बरं झालं... माझ्या डोळ्यांसमोरून मात्र आज माझं जीवन चित्रपटासारखं पसार होत आहे." दुसऱ्या दिवसापासून त्या नित्यक्रमाप्रमाणे कामाला लागतात. त्यांनी पतीविषयी शेवटी चौकशी केली. त्या पत्रात 'केव्हींचा अंत्यविधी कोणत्या पद्धतीने झाला, एवढे कृपा करून मला कळवा...' हे वाक्य असते. कर्तृत्ववान ताराबाईंच्या वैवाहिक जीवनाची ही अशी दारुण शोकांतिका आहे.

जी गोष्ट केव्हींची तीच प्रभाची. वडिलांसारखीच हुशार, बरीच हळवी, काहीशी एकलकोंडी आणि छानछोकीची आवड असलेली प्रभा चमत्कारिक कोंडीत सापडलेली आहे. विशिष्ट परिस्थितीमुळे पित्यापासून दुरावलेल्या पण मनापासून पित्याचीच ओढ असणाऱ्या प्रभाला आईचे 'जाडेभरडे त्यागी जीवन' आवडत नाही. ती आईला संपूर्णपणे स्वीकारू शकत नाही की वडिलांसमवेतही राहू शकत नाही. प्रभाला अधूनमधून वेडाचे झटके येत राहतात. निग्रहाने वेगळी वाट चोखाळणाऱ्या, मन मारून गृहत्याग करणाऱ्या व आवडीच्या क्षेत्रात आपले कर्तृत्व फुलवू पाहणाऱ्या ताराबाई प्रभापुढे कधीकधी कमालीच्या हतबल आणि असहाय्य ठरतात. प्रसंगी प्रभाचे उपरोधिक बोलणे सहन करणे, प्रभाच्या तोंडून केव्हींचा होणारा गौरव ऐकून घेणे, काही वेळा तिच्या हातून मारही खाणे या गोष्टी ताराबाईंनी निमूटपणे स्वीकारलेल्या आहेत. प्रभाची आत्महत्या हा ताराबाईंचा कौटुंबिक जीवनातला दुसरा पराजय. प्रभाच्या मृत्यूनंतर निरवानिरव करून घरी परतलेल्या ताराबाई सरलाताई देवधरांना भजने म्हणायला सांगतात. पण त्याच वेळी आपले अश्रू मात्र त्यांना आवरता येत नाहीत. ताराबाईंच्या मनोधैर्यावर प्रकाश टाकणारा एक प्रसंग चरित्रात यापुढे आला आहे. अविवाहित प्रभाच्या ट्रंकेत कुटुंबनियोजनाची साधने आढळून आल्यावर करणाऱ्या ताराबाईंच्या एका शिष्येला मिळतात. त्या-

वेळी स्वत:शी बोलल्याप्रमाणे त्या म्हणतात, "मला कल्पना होती, पण इतकी नव्हती मात्र. तिचं फार काही चुकलं असं मला वाटत नाही. तेव्हाही वाटलं नाही...प्रभा अखेर शूर ठरली. तिचा तिनेच अखेर निर्णय घेतला. एरव्ही तिच्या आयुष्याचं गणित होतंच कठीण!" ताराबाईंनी आपल्या मनोरुग्ण मुलीला कोणतीही सामान्य आई समजून घेऊ शकणार नाही इतक्या पराकोटीच्या पातळीवरून समजून घेतले होते.

केव्ही आणि ताराबाई यांच्या चरित्रातील व्यक्तिदर्शनात वास्तवता आहे. ताराबाई खरे म्हणजे या चरित्राच्या नायिका, पण केव्हींच्या व्यक्तिमत्त्वातील दोषदर्शनामुळे केव्हीच्या व्यक्तिचित्रात कुठेही उणेपणा आलेला नाही. आणि ताराबाईंच्या रेखाटनात खोटी उदात्तता आणलेली नाही. उलट ताराबाई व केव्ही यांच्या जीवनात, नियती केवढा जीवघेणा खेळ खेळत असते याचाच प्रत्यय चरित्रात सतत येत राहतो. केव्ही मोडक म्हणजे प्रार्थनासमाजाचे संस्थापक, एल्फिन्स्टन हायस्कूलचे पहिले हिंदी प्राचार्य आणि इंग्रजी अमदानीतील मोठे समाजसुधारक वामन आबाजी मोडक यांचे चिरंजीव. वडिलांच्या बुद्धिमत्तेचा वारसा लाभलेले केव्ही अमरावतीत वकिली करू लागले तेव्हा त्यांच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वामुळे त्यांना अमरावतीतील लोक 'बॅरिस्टर मोडक' असेच आदराने म्हणत. केव्ही जितके दिलदार उदार, कलासक्त, बुद्धिमान होते, तितकेच बेहिशेबी कलंदर व कमालीचे मद्यपी होते. सुरुवातीच्या काळात वकिलीवर हजारो रुपये मिळविणाऱ्या केव्हींनी उत्तरायुष्यात केवळ एका बाटलीच्या मोबदल्यावर कज्जे लढवायला सुरुवात केली. केव्हींनी आपल्याला विद्यार्थीदशेत भरघोस मदत केल्याचे 'दैनिक हिंदुस्थान' च्या संपादकांनी नमूद केले आहे.

रा. भि. जोशींनाही विद्यार्थिदशेत केव्हींनी मदत केली होती. बी. ए. झाल्यावर रा. भि. नोकरीसाठी मुंबईस जातात तेव्हा केव्ही त्यांना 'मौलिक उपदेश' करतात. 'केस फार वाढवू नकोस, भांगबिंग पाडू नको. आणि एक लक्षात ठेव, कोकणस्थाला कमीपणा येईल असे काही करू नकोस.' रा. भि. ना. त्यांची कळकळ जाणवली. तसेच युरोपियन पद्धतीचा पोषाख करणाऱ्या केव्हींच्या उपदेशामागील विसंगतीही जाणवली. केव्ही मोडकांच्या व्यक्तिमत्त्वात असे परस्परविरोधी खूप पैलू होते.

मृत्यूपूर्वी त्यांनी आपला देह मेडिकल कॉलेजला अवघ्या पंचवीस रुपयांना विकला होता.

अशा लोकविलक्षण व्यक्तीच्या सहवासात ताराबाई आल्या आणि त्यांचे जीवनही अनपेक्षितपणे बदलती आव्हाने स्वीकारीत, वेगवेगळी वळणे घेत पुढेपुढे जात राहिले. ताराबाईंच्या व्यक्तिमत्त्वामध्येही आकर्षक सुखवस्तू गृहिणी व त्यागी

समाजसेविका अशी दोन वेगवेगळी रूपे आहेत. मुंबईहून अमरावतीत मोडकांच्या पत्नी म्हणून आलेल्या ताराबाई म्हणजे त्या काळात दुर्मीळ असलेली अशी एक प्रगतिशील पदवीधर तरुणी होती. अध्यापनाची त्यांना मनापासून आवड होती. पण त्या वैभवसंपन्न घराण्यातील एक गृहिणी होत्या. केव्हींपासून दूर गेल्यावर व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करू लागल्यावर त्यांच्या स्वभावात निग्रह, बाणेदारपणा, सोशिकपणा,त्याग,जिद्द या गुणांचा आढळ झाला.आणि या गुणांचा विकासही झाला. त्यांच्यातील मूलभूत व प्रबळ महत्त्वाकांक्षेमुळे पुढील काळात कर्तृत्ववान ताराबाई निर्माण होऊ शकल्या. मात्र इतक्या गुणसंपन्न स्त्रीची कौटुंबिक आघाडीवर सतत फरपटच होत राहिली.ताराबाई,केव्ही आणि प्रभा यांच्या भावसंबंधाचे आणि मानसिक तणावांचे चित्रण सूक्ष्म, कारुण्यपूर्ण तसेच मानवी आहे. कमालीचे हृद्य आहे.

ताराबाईंचे वडील सदाशिवराव केळकर हे प्रार्थनासमाजाचे क्रियाशील कार्यकर्ते होते. सुरुवातीपासूनच ताराबाईंचा कल आपल्या वडिलांप्रमाणे समाजसुधारणेकडे होता. डॉ. काशीबाई नवरंगे यांचा आदर्श त्यांच्यासमोर होता. त्यांच्या सहवासाचा लाभही ताराबाईंना झालेला होता.'त्यांच्यासारखी (काशीबाईसारखी) शीक आणि समाजसेवा कर' हे उद्गार आपल्या नकळत कानी पडत आणि डोक्यात उतरत, असे ताराबाईंनी ऐंशीव्या वाढदिवशी केलेल्या भाषणात नमूद केले आहे. परंतु केव्हींशी विवाह झाल्यावर अमरावती येथील सुखासीन आणि संपन्न जिणे त्यांच्या वाटचाला आले. गृहत्यागाचा निर्णय घेतल्यावर राजकोट येथील फिमेल ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्यपद त्यांना मिळाले. खरे म्हणजे यापुढचे सर्व जीवन केव्हींपासून विभक्त राहून का होईना, पण सुखात जाण्याची शक्यता होती. प्रभाच्या मॉंटेसरी शिक्षणाच्या निमित्ताने त्यांना भावनगरहून जवळ असलेल्या दक्षिणामूर्तीची 'बालमंदिर' शिक्षण संस्था पाहायला मिळते. परंपरागत पद्धतीने शिक्षण देण्यापेक्षा ह्या पद्धतीने शिक्षण दिले तर मुलांचा सर्वांगीण विकास सहजपणे होतो हे पाहून त्या भारावून जातात. या संस्थेत आल्यावर त्यांच्या आयुष्याची संपूर्ण दिशाच बदलून जाते. गांधीवादी गिजुभाई बधेका चालवीत असलेल्या या संस्थेत ताराबाई नऊ वर्षे निष्ठेने काम करतात. त्यांच्या भावी आयुष्यातील बालशिक्षण कार्याचा पाया दक्षिणामूर्तीच्या 'बालमंदिर' संस्थेत घातला जातो. मध्यंतरी काही दिवस केवळ प्रभा व केव्ही यांच्यासाठी त्या अमरावतीस येऊन राहतात. नंतरची दोन वर्षे बडोद्याजवळील बांसदा संस्थानच्या महाराजांच्या मुलांना शिकविण्याचे काम करतात. ही संस्थानी नोकरी पुन्हा सुखासीन जीवनाच्या वाटेने नेणारी,पण प्रभाची मनोरुग्णावस्था व ढासळती प्रकृती विचारात घेऊन त्या बांसदा सोडून मुंबईस येतात. दादरच्या हिंदू कॉलनीत बारा वर्षे शिशुविहार चालवितात.

चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी बालशिक्षणाचा प्रसार मुंबईच्या उच्च मध्यम,

वर्गीय समाजातही करणे म्हणजे एक भयंकर दिव्यच होते. परित्यक्तेचे भोग वाट्याला आलेल्या ताराबाईंच्या कार्यात नाही म्हटले तरी जननिंदेची भर पडतेच. हे शहरी कार्यक्षेत्र अपुरे वाटल्यामुळे स्वत:च्या आंतरिक प्रेरणेमुळे आणि महात्मा गांधींच्या 'खेडचात जा' या आदेशाला प्रतिसाद म्हणून त्या ठाणे जिल्ह्यातील बोर्डी येथे शिशुमंदिर सुरू करतात. दादरचे शिशुमंदिर चालविताना सुशिक्षित समाजाकडून झालेली उपेक्षा व बोर्डी येथील बहुजन समाजाकडून मिळालेला असहकार यामुळे निराश न होता, खचून न जाता ताराबाई बालशिक्षणक्षेत्रातील कार्य नेटाने व निष्ठेने करीतच राहतात. त्यांचे प्रयोगशील मन त्यांना स्वस्थ बसू देत नाही. आता त्यांना ठाणे जिल्ह्यातील वारली व आदिवासी समाज आव्हान देत उभा राहिलेला दिसतो. महागडी मॉंटेसरी पद्धत भारतीय खेडचात उपयुक्त ठरणार नाही या प्रवादाला उत्तर देण्यासाठी खेडचातील साधनांनीच बालशिक्षणाचे कार्य करावे असे त्यांना वाटते. कोसबाड टेकडीवर 'विकास वाडी' उभी राहते.

एव्हाना दोन हृदयविकाराचे झटके येऊन गेलेले असतात. साठी उलटलेली असते, प्रभा व केव्ही दोघेही हे जग सोडून गेलेली असतात. निकटवर्ती सहकाऱ्यांना या नव्या प्रकल्पाची खात्री नसताना, किंबहुना त्यांचा बराचसा विरोध असताना ताराबाई कोसबाड टेकडीवर पाय रोवून निर्धाराने उभ्या राहतात. पाळणाघर बालवाडी, अंगणवाडी, प्राथमिक शाळा, रात्रशाळा, औषधोपचार योजना हे उपक्रम सुरू होतात. सकस आहार योजना, दोन पूरक अन्नयोजना, छापखाना, प्रकाशन संस्था यांची जोड त्या आपल्या शैक्षणिक कार्याला देतात. एक गरज म्हणून पूर्व-प्राथमिक प्रशिक्षण विभाग, वसतिगृहे यांचीही निर्मिती होते. ताराबाईंची कुरण-शाळा त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे स्फुरण आहे. 'आमची विकासवाडी योजना आपल्या देशात मागास जमातीची नवरचना करण्याचे एक प्रभावी साधन ठरेल' असे त्या म्हणत. एक शिक्षिका म्हणून ताराबाईंनी परिस्थितीवशात शिक्षणक्षेत्रातील आपल्या कार्याला सुरुवात केली. उदंड कार्यशक्ती, जबर आंतरिक प्रेरणा, प्रबळ आत्म-विश्वास आणि अपार कष्ट यांच्या जोरावर त्यांनी केवळ बालशिक्षणाचेच कार्य केले असे नाही, आपल्या शिक्षणक्षेत्रातील कार्याला समाजसेवेची जोड देऊन स्वत:च्या कार्यक्षेत्राच्या कक्षा विस्तृत केल्या, सर्वांना स्तिमित करून टाकणारा एक चमत्कार महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात करून दाखविला.

पद्मजा फाटक आपल्या 'गर्भश्रीमंतीचं झाड' या पुस्तकामुळे ललितलेखन करणाऱ्या एक लेखिका म्हणून परिचित आहेत. 'शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक' हा चरित्रग्रंथ त्यांनी खूप माहिती गोळा करून मोठ्या साक्षेपाने लिहिला आहे. त्यांच्या लेखनात कमालीची समरसता आहे. प्रार्थना समाजाचे कार्य करणाऱ्या सुधारणावादी व्यक्तींचा परिचय, मुंबईच्या मोकळ्या वातावरणात ताराबाईंच्या

स्वभावाची झालेली जडणघडण यांच्या प्रारंभीच्या निवेदनाने मनाची पकड घेतली जाते. ताराबाईंचे कौटुंबिक जीवन व शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्य यांची सांधेजोड ही सुसंगतपणे घातली गेली आहे. ताराबाई, केव्ही, प्रभा या प्रमुख व्यक्तींबरोबरच प्रिन्सिपॉल वामन आबाजी मोडक, ताराबाईंचे बंधू माधवराव व तात्या, ताराबाईंचे वडील सदाशिवराव केळकर व आई उमाबाई केळकर, डॉ. काशीबाई नवरंगे, अनुताई वाघ, सरलाताई देवधर यांचीही छोटेखानी व्यक्ति-रेखाटने प्रसंगपरत्वे निवेदनात आली आहेत. गिरिजाशंकर तथा गिजुभाई बधेका हे ताराबाईंचे बालशिक्षण कार्यातले गुरू. गिजुभाई बधेका यांची ठसठशीत व प्रत्ययकारी व्यक्तिरेखा ही या चरित्राचा एक लक्षणीय विशेष आहे.

वास्तवाशी फारकत न होऊ देता हे चरित्र लालित्याच्या पातळीवर राहिले आहे. ताराबाई, केव्ही, प्रभा यांच्या वास्तव जीवनात ललितलेखनाला अनुकूल असे नाटच व भावस्पर्शत्व आहे. चरित्रलेखनात ते अधिक कृत्रिम, काहीसे भडक बनण्याची शक्यता होती, पण लेखिकेने मूळ आशयातील उत्कटता व हळुवारपणा यांना बाध येऊ न देता लालित्य शेवटपर्यंत टिकविले आहे. ताराबाईंचे शिक्षणक्षेत्रातील कार्यही ठरीव तपशील देऊन रुक्षपणे केले जाण्याची शक्यता होती. इथे तसे घडत नाही. उलट दादरच्या शिशुविहारमधील बालशिक्षणाच्या प्रयोगातील अनुभवाचे रंजक कथन, बोर्डी येथील बदलत्या जीवनाचे वास्तव निवेदन व कोसबाड टेकडी-वरील आदिवासी समाजाचे सूक्ष्म चित्रण इत्यादींमध्ये लेखिकेची सहृदयता, संवेदन-शीलता आणि समरसता दिसून येते. कोसबाड टेकडीचे चित्रदर्शी वर्णन शैक्षणिक कार्याविषयीच्या निवेदनात चपखलपणे येते.

"बोर्डीसारखा समुद्र येथे हाकेच्या अंतरावर नव्हता... दूर क्षितिजावर आवाज न करता लोळत पडल्यासारखी समुद्रघडी, तिच्या काठावर ताडाची, नार-ळाची मुग्ध वने. सूर्यास्ताच्या वेळी पश्चिमेचा हा पाणकाठ उन्हाने चमकत राही. मधल्या भागात मग अजगरासारखी सुस्त पडलेली लांबटतांबट टेकाडे आणि हिरव्या वनश्रींचे पुंजके आलटूनपालटून कोसबाड टेकडीच्या मागे, पुढे आणि भोवती पसरलेले. कुठे सुन्न रान, कुठे शेतमळे आणि कुठे कच्च्या मातीच्या खोप-टांचे पुंजके. वरच्या सलग निळ्या आकाशाशी सारे रान खजुरीच्या, पळसाच्या, सागाच्या भाषेत काही काही बोलत असे. मधूनच त्यातून खाऱ्या वाऱ्याच्या काही लकेरी उमटत. दिवसातून मोजक्या वेळा रानातून धिटुकलेपणाने लपाछपी करीत जाणारी तांबडी बस आणि झाडापलीकडून पश्चिम लोहमार्गावरून जाणाऱ्या आग-गाडीची केव्हातरी ऐकू येणारी अणकुचीदार शीळ, हे दोनच काय ते सुधारलेल्या जगाशी ठळक दुवे."

ताराबाईंचा मृत्यू मुंबईस फडके नर्सिंग होममध्ये झाला. आपला अंत्यविधी

कोसबाडला व्हावा, आपल्या अंत्यविधीच्या वेळी भाषणे नकोत, अनुताईंनी आपल्याला अग्नी द्यावा अशा तीन इच्छा ताराबाईंनी मृत्यूपूर्वी व्यक्त केल्या होत्या. अग्नी देण्याचे धाडस अनुताईंच्याने झाले नाही. चरित्राचा शेवट परिणामकारक शब्दांत होतो– 'ताराबाईंचा अचेतन देह घेऊन एक खास बस मुसळधार पावसात रानातल्या कोसबाडच्या दिशेने निघून गेली.

टेकडीवर ज्या ठिकाणी ताराबाईंचे दहन झाले तेथे आज एका साध्याशा समाधीवर एक तुळशीचे रोपटे डुलत असते...'

(मात्र अशा आकर्षक निवेदनाच्या ओघात इंग्रजीचे प्राध्यापक व मराठी लेखक रा. भि. जोशी नि व्याकरणकार रा. भि. जोशी यांची गल्लत केली गेली आहे. प्रभाच्या मृत्यूच्या दोन वेगळ्या तारखा दिल्या गेल्या आहेत. अर्थात या चुका तशा नगण्य आहेत.)

पद्मजा फाटक यांनी ताराबाईंचे जीवनचित्र उभे करण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. खरे म्हणजे प्रत्येक चरित्रकार आपल्या कुवतीप्रमाणे चरित्रनायक वा नायिकेचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न करीत असतो. या चित्राला अनेक रंग असतात. चरित्रनायकाची मानसिक घडण, त्याचे कुटुंबजीवन, तत्कालीन समाजजीवन, त्याच्या कार्यातील यशापयश अशा विविध रंगांनी ते चरित्रचित्र उभे राहते. चरित्रकार केवळ भाबड्या भक्तिभावाने लिहू लागला तर एक फसवे 'श्रद्धाचित्र' उभे राहते. तो चरित्रनायकाचे कठोर आणि परखड मूल्यमापन करू लागला तर तर्ककर्कशपणे उभा केलेला जीवनपट, एवढेच मूल्य चरित्रग्रंथाला उरते. चरित्रकाराने जंत्रीवजा माहिती दिली तर चरित्र म्हणजे केवळ एक ऐतिहासिक दस्तऐवज ठरतो. चरित्रनायिकेच्या मनोभूमिकेचा सूक्ष्मपणे वेध घेण्याचा प्रयत्न, तिच्या कौटुंबिक जीवनातील ताणतणावांचे व भावनात्मक आंदोलनाचे आविष्करण, वर्ण्यविषयाविषयी असलेली समरसता, ताराबाईंचे व्यक्तिगत जीवन आणि शिक्षणक्षेत्रातील कार्य यांचा सुसंगतपणे घातलेला मेळ, सत्याचे ठेवले गेलेले भान हे या चरित्रग्रंथाचे ठळक विशेष आहेत. पद्मजा फाटक यांच्या लालित्यपूर्ण निवेदनशैलीमुळे ताराबाई मोडक यांचे हे चरित्र कलापूर्ण घाट असलेले 'जीवन चित्र' ठरले आहे!

शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक– सौ. पद्मजा फाटक,
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
(मुंबई सकाळ)





दलित साहित्य

पारंपरिक संकेत मोडणाऱ्या दोन कलात्मक दीर्घकथा

'हकिगत' आणि 'जटायू' या प्रा. केशव मेश्राम यांनी लिहिलेल्या दोन दीर्घकथा किंवा लघु-कादंबऱ्या आहेत.

हकिगत या दीर्घकथेला कथानक असे फारसे नाही. अकोला शहरातून मुंबईस एका गृहस्थांकडे शिकण्यासाठी आलेला मुलगा (म्हणजेच कथानायक) पुन्हा आपल्या गावी परत जातो. प्रतिकूल परिस्थितीला टक्कर देत शिकतो. त्यासाठी त्याला खूप कष्ट करावे लागतात. कोळशाची वॅगन खाली करणे, भुशाच्या भट्टीचे काम करणे, तेलघाणीवर काम करणे, कैचीया चढविणे, रिक्षा चालविणे अशी निरनिराळी कष्टाची कामे तो करतो. शाळेत भेटणाऱ्या पांढरपेशा समाजातील मुलांकडे कुतूहलाने पाहतो. रूढीने जखडून गेलेला, दारिद्र्याचे चटके सोसणारा आपला समाज आणि सुखासीन उच्चभ्रू समाज यांतील अंतर त्याला जाणवते. शिक्षणाने संस्कारित झालेले त्याचे मन चिंतनशील बनते. विषम परिस्थितीतही 'हकिगत' चा नायक बंड करून उठत नाही. उलट स्वतःच्या व्यक्तित्व-विकासाला तो अधिक महत्त्व देतो. अकोला येथील लेखकाच्या घरी नेहमी येणाऱ्या एका मित्राकडे, त्याच्या खेडचात लेखक जातो. शहरापेक्षा लहानशा खेडचात जातिबंधने अधिक तीव्र असतात. त्या मित्राच्या घरी मिळणारी तुटकपणाची वागणूक आणि सकाळ होण्यापूर्वीच घरी परतण्याची त्याच्याकडून मिळणारी सूचना ऐकून निवेदक म्हणतो, "हा प्रसंग इतका मनात रुतला आहे, पण कधी मोकळेपणाने सांगता आला नाही. जाहीर रीतीने आपला उद्रेक व्यक्त करावा असे विद्रोहाचे विचार कितीदा तरी येऊन गेले होते. पण मनाला अडसर घातला. इच्छा असूनही ह्याचे उत्तरवजन जिभेला साहवत नाही. एखाद्या बंदिस्त त्रिकोणात एखादे प्रमेय अडकावे तसा, वेताळाच्या शवासारखा, हा प्रसंग अडकून पडला आहे. जीभ आठवणीनेच कडूकडू होते, मुकी बनते."

"या शहरात असले काही जाणवत नाही. यंत्राची जीवघेणी लगबग माणसाला विचार करायला वावच देत नाही. माणूस यंत्रासोबत धावतो आहे. इथे तत्त्वज्ञानाच्याही ठिकऱ्या उडतात आणि वाळूचीही साखर बनते."

अकोला येथे सात-आठ वर्षांच्या कालावधीत आलेले भले-बुरे अनुभव 'हकिगत'च्या कथानायकाने आत्मनिवेदनपर पद्धतीने सांगितले आहेत.

वऱ्हाडातील एका शहरातील (बहुधा अकोला) 'सिद्धार्थनगर' या वस्तीतील अभिमन या मांग मुलाची कहाणी हा 'जटायू'चा विषय. जटायू या दीर्घकथेत तृतीय-पुरुषी निवेदनपद्धतीचा स्वीकार लेखकाने केला आहे. मावजी मांगाचा मुलगा अभिमन शाळेत शिकतो. वस्तीतील इतरांपेक्षा आपण निराळे आहोत असें त्याला सदैव वाटते. धर्मांतराच्या वेळी अनुपस्थित राहणारा मावजी इतर मांगांपेक्षा अधिक नीटनीटकेपणाने राहतो. असे असले तरी काही परंपरागत मूल्ये तो सांभाळतो. अन्जाबाबा या आपल्या गुरूवर मावजीची अपार श्रद्धा आहे. मावजीची सासरी गेलेली मुलगी चौथ्या बाळंतपणानंतर मरते. खरे म्हणजे सासरची माणसेच छळ करून तिचा बळी घेतात. मांग कुटुंबात जन्माला आलेल्या, पण शिक्षण घेत असलेल्या अभिमनचे जीवन एकाच वेळी निरनिराळ्या व्यक्ती आणि प्रसंग यांनी व्यापलेले आहे. सभोवतालची विषम परिस्थिती, वस्तीमधील आणि जातीतील लोकांची मत्सरवृत्ती, नैतिक दृष्ट्या अधःपतित ठरलेले पण वडिलांचे श्रद्धास्थान असलेले अन्जाबाबा, आपल्या हळव्या स्वप्नमयतेला आणि कोवळ्या व आदर्श शृंगारशीलतेला प्रतिसाद न देणारी संस्कारहीन पत्नी सोना, या सर्वांनी अंतर्मुख वृत्तीच्या अभिमनचे जीवन घेरून टाकले आहे. अंतर्यामी कुढणारा हा नायक सर्वांमध्ये वावरून शेवटी एकाकी आहे. परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेल्या अभिमनला अनेक वेळा हार खावी लागते. जातपंचायतीने बहिष्काराची भाषा काढताच बहिणीच्या नादान नवऱ्यापुढे त्याला शरणागती पत्करावी लागते. अभिमनचे आई-वडील यात्रेला गेले असता अचानक अन्जाबाबा आपल्या शिष्यांसह येतात. एका महत्त्वाच्या कामासाठी अभिमनला दुसऱ्या गावी घेऊन जातात. त्या गावातील श्रीमंत मळेकऱ्याच्या पाचव्या बायकोचे भूत उतरविण्यासाठी अन्जाबाबा अभिमनची मदत घेतात. भूत उतरविण्याचा पाशवी आणि किळसवाणा प्रकार पाहिल्यावर चिडलेला अभिमन घरी परत येतो. रेल्वेचे नेमणुकीचे पत्र त्याला मिळते. त्यापाठोपाठ पोलिसांची जीप त्याच्या दाराशी उभी राहते. खुनाच्या कामात मदत केल्याच्या आरोपावरून अभिमनला अटक करण्यात येते. अभिमनची स्थिती पंख तुटलेल्या जटायूसारखी होते !

प्रा. केशव मेश्राम यांच्या या पहिल्याच दीर्घकथा असल्या तरी त्यांचे प्रसंग

आणि पात्ररेखाटनाचे सामर्थ्य जाणवते. आजोबांचा मृत्यू, वॅगन रिकामी करण्याचा प्रसंग, एन्. सी. सी. कॅम्पला गेल्यावर काळोखात नदी पार करण्याचा लेखकावर आलेला प्रसंग, अघोरी साधूला झालेली विषबाधा, काही रेल्वे अपघात हे 'हकिगत' मधील; आणि अन्जाबाबाची भेट, मळेकऱ्याच्या बायकोवरील भूत उतरविण्याचा प्रसंग, पत्नीशी पहिल्या दिवशी झालेली भेट हे 'जटायू'मधील प्रसंग यांतून लेखकाचे प्रसंगरेखाटनकौशल्य दिसून येते. व्यक्तिरेखाटनाच्या दृष्टीने आजोबा, आजी, नाना, नानी आणि मावजी, अन्जाबाबा या अनुक्रमे 'हकिगत' आणि जटायूमधील पात्रांचा उल्लेख करता येईल.

अकोला येथे बालपण घालविलेल्या लेखकाने दलित समाजाच्या जीवनातील भदक वास्तव उभे केले आहे; मात्र काही वेळा त्याची स्वप्नाळू वृत्ती, शिक्षणाने निर्माण झालेली आदर्शाची ओढ कथाविषयाला कमकुवत बनविते. 'हकिगत' मधील प्रेम-प्रकरणाचा अस्पष्ट उल्लेख, अभिमनला मैत्रिणींविषयी वाटणारे कुतूहल या घटनांमध्ये लेखकाची स्वप्नाळू वृत्ती दिसते, तर कथानायकाने केलेली सर्वांगीण (ड्रॉइंग परीक्षा, हिन्दी शिक्षक सनद परीक्षा, मराठी साहित्य विशारदची परीक्षा, एन. सी. सी. आणि खेळातले प्रावीण्य इ.) प्रगती, आपल्या वाचनाचे दिलेले असंख्य संदर्भ यामधून आदर्श चित्रणाची लेखकाची आवड दिसून येते. काही वेळा लेखकाच्या चिंतनशीलतेत पुढील वयातील प्रगल्भ आणि परिपक्व वृत्तीच्या छटा दिसून येतात. लेखकाला या प्रकारचे दोष टाळता आले असते, तर या दोन्ही दीर्घकथांना अधिक कलात्मक पातळी गाठता आली असती.

'हकिगत' आणि 'जटायू' या दोन्ही दीर्घकथांचा परिसर अकोला आहे. असे असले तरी या कथांना प्रादेशिक स्वरूपाच्या कथा असे मर्यादित विशेषण लावता येत नाही. 'हकिगत'चा नायक महार जातीतील तर जटायूचा नायक अभिमन हा मांग समाजातील आहे. हे दोघेही नायक एकाच वयोगटात (पंधरा ते अठरा वर्षे) मोडतात. दोन्ही नायकांसमोरील प्रश्न आणि समस्या जवळजवळ सारख्याच आहेत. दोघांच्या विचारांची धारणाही स्थूलमानाने सारखीच आहे. या दोन्ही नायकांना आलेले अनुभव स्वत: लेखकाने थोड्याफार फरकाने घेतले असावेत, असेही म्हणता येणे शक्य आहे. दलित समाजात जन्माला आलेल्या– युवावस्थेच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या– नायकांचे जीवन आणि त्यांच्या अंतर्मनातील विचारविकारांना महत्त्वाचे स्थान या कथांत आहे. परंतु या दीर्घकथा केवळ 'दलित वाङ्मय' किंवा 'प्रादेशिक साहित्य' या वर्गीकरणात मोडणाऱ्या नाहीत. कारण दलित जीवनाकडे पाहण्याची प्रा. केशव मेश्राम यांची दृष्टी कलावंताची दृष्टी आहे. या लेखनात अभिनिवेश, आग्रहीपणा किंवा आक्रस्ताळेपणा आलेला नाही. वाङ्मयीन जाण असलेल्या कलावंताचे हे लेखन आहे. म्हणूनच काही

पारंपरिक संकेत मोडण्यात 'हकिगत' आणि 'जटायू' या दीर्घकथांनी यश मिळविले आहे.

'हकीगत' आणि 'जटायू' : प्रा. केशव मेश्राम
पी. पी. एच्. बुक स्टॉल, मुंबई.
(महाराष्ट्र टाइम्स)

दलित अनुभूतीचा सहज आविष्कार– 'मुक्काम पोष्ट : देवाचे गोठणे'

"पुस्तकात जीव बरा रमतो– माणसांपेक्षा ! एखादं नकोसं वाटलं, तर टाकता येतं– माणसांचं तसं नाही."

"माझं दुःख कोणाला तरी सांगावंसं वाटतंय– पण या गावात, माझ्या जन्मभूमीत माझ्या दुःखाशी समरस होणारा कोणी नाही– मी तळमळतोय."

"मला दुसरं काही नको. फक्त पुस्तकं मिळावीत."

"सध्या तरी मी निराश आहे ! येत्या पाचपन्नास वर्षांत हे सारं बदलेल, असं आज तरी मला काही दिसत नाही."

"पुस्तकं घेणं परवडत नाही; पण करणार काय ?"

"एकदा वाटतं, सारी पुस्तकं विकून टाकावीत. किमान दोनतीनशे मिळतील. आणि हा वाचनाचा नाद सोडून द्यावा. काय उपयोग आहे याचा ?"

"सालं या पुस्तकांच्या नादानंच भिकारी झालो."

"मी मनात म्हटलं, गावोगावचे सगळे चांभारवाडे असेच पेटून उठतील का ? आपल्या हक्कांसाठी झगडतील का ? अन्यायाविरुद्ध भांडतील का ?"

माधव कोंडविलकरांच्या दैनंदिनीतील ही काही वाक्ये. रत्नागिरी जिल्ह्यातील देवाचे गोठणे या गावी चर्मकार कुटुंबात जन्माला आलेल्या आणि व्यवसायाने शिक्षक असलेल्या कोंडविलकरांनी १९६९ ते ७७ या आठ वर्षांच्या कालावधीत जे अनुभवले, कटू परिस्थितीला तोंड देत जे निमूटपणे सोसले त्याची दैनंदिनीवजा कहाणी 'मुक्काम पोष्ट : देवाचे गोठणे' या पुस्तकात सांगितली आहे.

माधव कोंडविलकर हा परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेला सवेदनाक्षम मनाचा दलित तरुण आहे फायनलची परीक्षा पास झाल्यावर त्याची जिल्ह्यातील एका गावात शिक्षक म्हणून नेमणूक होते. काही दिवसांनी स्वतःच्या गावात त्याची

बदली होते. एकलकोंड्या स्वभावामुळे, वाचनाच्या वेडामुळे, फुरसदीच्या वेळात चांभारकाम करण्यास नकार दिल्यामुळे आईवडिलांच्या मनात त्याच्याविषयी अधिकच अढी निर्माण होते. वडील जुन्या परंपरा मानणारे, परिस्थितीला सदैव शरण जाणारे, तर आई सोशिक, प्रेमळ पण नवऱ्याचीच री ओढणारी. त्यामुळे घरात असूनही माधव मनाने घरापासून दूरच राहतो. स्वतःच्या गावात बदली झाल्यावर घरातला विरोध आणि ग्रामस्थांकडून होणारी उपेक्षा वाढतच जाते. माधव घरात 'घुम्यासार्का बसान्' राहतो. म्हणतो, "घरच्यांनी म्हणायचं, फुकट गेला– बाहेरच्यांनी म्हणायचं, पुढं गेला. खरं म्हणजे कच्ची रापवणी झालेल्या चामड्यागत आपली नासवणूक मात्र झाली." (पृ. २७) नवीन शाळेत नेमणूक झाल्यावर पहिल्याच दिवशी हेडमास्तर शिक्षक हजेरीसाठी त्याला नाव व माहिती विचारतात. त्यावर लेखकाची प्रतिक्रिया अशी– "प्रश्न तसा काही नवीन नव्हता! जिथं जावं तिथं हा प्रश्न सतावीत आला आहे. टाक्यात टाकलेल्या चामड्याला चुना–रंग चिकटावा, तशी ही जात मला जन्मल्यापासून चिकटलेली आहे. आता ती जा म्हटल्यास जाणार नाही. जोपर्यंत ही जात आहे तोपर्यंत हा प्रश्नही आहे!" (पृ. ३)

'मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे' मधील दैनंदिनीवजा लेखनात माधव कोंडविलकरांच्या जीवनातील अनेक प्रसंग शब्दबद्ध झाले आहेत. गावच्या शाळेतील मुलांनी लेखकाचा विटाळ झाला म्हणून शाळा सुटल्यावर आंघोळ करणे, लहानपणी वर्गातील मुलांनी जातीवरून चिडवितांच बसल्या जागीच भीतीमुळे व असहायतेमुळे निवेदकाला चड्डीतच लघवी होणे, भावाबरोबर मृत जनावरांची कातडी साफ करण्याचे प्रसंग, लग्नाच्या वेळी होणारा लेखकाचा कोंडमारा, पत्नीच्या बाळंतपणाच्या वेळी लेखकाची होणारी केविलवाणी स्थिती, स्वतःच्या जातभाईंकडून लेखकाला होणारा त्रास, सत्यनारायणाच्या पूजेच्या वेळी पाळला गेलेला जातिभेद, आईवडिलांशी उडालेले खटके इ. सर्व प्रसंगांच्या मुळाशी कारुण्य आहे. मात्र अशा अनेक प्रसंगांचे निवेदन करीत असता लेखकाने त्यावर कुठेही फारसे भाष्य केलेले नाही. न्हाव्याने लेखकाची हजामत करताना पाळलेला जातिभेद व पांडुरंग या कोकणी चांभाराने कोल्हापूरच्या ढोर चांभारांना हलके समजणे, हे जातिभेदाचे तपशील मार्मिक आहेत.

'देवाचे गोठणे' मधील माधव कोंडविलकरांची भाषाही त्या अनुभवांना कलात्मकता प्राप्त करून देणारी साजेशी भाषा आहे. मधु मंगेश कर्णिकांच्या कथासाहित्यात येणाऱ्या मालवणी बोलीपेक्षा ही वेगळी बोली आहे. राजापूरच्या परिसरात महार, चांभार, कुणबी इ. जातींमध्ये बोलली जाणारी 'राजापुरी बोली' लेखकाने वापरली आहे. आई-वडिलांच्या प्रदीर्घ निवेदनात संपूर्णपणे 'राजापुरी

बोली ' लेखकाने स्वीकारली आहे. मर्नारीन (मृत बहीण), रांड्, रसगस, पावनेर, माच्या, घानवडा, हल्वा (हळुवार), लाँव (अंगावरची लव), सोरगत (सोयरीक) सुकवार जीव, बुलका कसब इ. शब्द, भरान् पडणे, काडवड करणे, अयोगती जाणे, भुशान सोगणे, सावसीतपणे देणे हे वाक्प्रचार आणि जवाचं घव तवाच्या पोल्या, गरम्यास अब्रू नाय थंडीस अब्रू हाय, सू तिकडं घागा, खायल तेवडा थोडा नि हगंल तेवडा माँप इ. वाक्प्रयोग उदाहरणे म्हणून देता येतील. दलितत्वाच्या अभिव्यक्तीसाठी म्हणून बोलीचा वापर असा प्रयत्न इथे नाही. उलट ग्रांथिक भाषेतील लेखकाचे (अर्थात सुशिक्षित व संस्कारित लेखकाचे) चिंतन व परिस्थितीशरण आई-वडील व अन्य नातेवाईकांची प्रादेशिक बोलीतील भाषणे हा विरोध लक्षणीय आहे.

माधव कोंडविलकरांचे व्यक्तिमत्त्व विपरीत परिस्थितीमुळे कोंडीत सापडलेले, दुभंगलेले व विस्कटलेले व्यक्तिमत्त्व आहे. आजच्या दलित लेखकाचे व्यक्तिमत्त्व बऱ्याच वेळा त्याच्या अनुभवांवर कुरघोडी करताना दिसते. त्यामुळेच त्या अनुभवांत कधी आक्रस्ताळेपणा, खोटा आवेश आणि भडकपणा येतो. अशा लेखनातील ' मी ' कलावंतावर उगाचच मात करताना दिसतो. माधव कोंडविलकरांच्या लेखनात तसे घडत नाही. या लेखकाचे व्यक्तिमत्त्व एक संयत व्यक्तिमत्त्व आहे. कोणत्याही तऱ्हेची फारशी कुरकूर न करता वाटचाला आलेले भोग स्वीकारीत हा लेखक पुढे जाताना दिसतो. आणि स्वत:ला आलेले अनुभव आग्रही वृत्ती टाळून कृत्रिमता तसेच व्याजनाट्य टाळून हलके हलके मांडत राहतो. अनुभव व्यक्त करण्यातील लेखकाची सहजता आणि त्याने जपलेली संवेदनशीलता खरोखरच मन थक्क करून टाकणारी आहे. मात्र सहजपणे व्यक्त होणाऱ्या अनुभवातील कारुण्य, वेदना व अगतिकता यांचा प्रत्यय येताच वाचकाने अंतर्मुख व्हावे, असे या लेखनाचे स्वरूप आहे.

अगदी सुरुवातीच्याच कोंडविलकरांच्या लेखनाला असे स्वरूप का प्राप्त व्हावे ? जीवनानुभवाकडे तटस्थपणे पाहण्याची कलावंताची प्रवृत्ती या लेखकात मुळातच आहे. आजवरचे सगळे जीवन खेडयातच गेल्यामुळे अन्य सामाजिक-राजकीय प्रभावापासून हा लेखक अजाणतेपणे दूर राहिला आहे. म्हणूनच आत्मसमर्थन करणे, हक्कांची जाणीव व्यक्त करणे, विद्रोही भावना व्यक्त करणे इत्यादी हेतूंनी केलेल्या लेखनापेक्षा या लेखनाचे स्वरूप निश्चितच वेगळे ठरले आहे. माधव कोंडविलकर हा दलित युवक ' लेखक ' कोंडविलकरांवर वर्चस्व गाजवीत नाही. उदाहरणादाखल पुढील नोंदी दाखविता येतील–

आई म्हणते,

" पुस्तकात पैसा घालण्यापेक्षा एकादी आंगटी करूची व्हती ! "

तिचं काहीच चुकत नाही. खरं म्हणजे तिच्याच अंगावर एखादा दागिना

घालायला हवा होता !

उषाचं मंगळसूत्र अजून बँकेतच आहे.

तसे खूप प्रश्न आहेत–अनिर्णित. (पृ. १६२)

स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या पूजेच्या वेळी मखराची सजावट लेखक करतो. प्रसाद घेतेवेळी लोकांची कुजबूज ऐकू येते. तेव्हाची त्यांची प्रतिक्रिया–

मी विचार करतोय–म्हणजे हे सारं आम्ही केलं, म्हणून यांचा हा बहिष्कार तर !

देशभक्तीच्या नावावर सारे ढोंग करीत होते. माणसं स्वतःला फसवीत होती. देशाला फसवीत होती. हा सारा फसव्यांचा बाजार !

पूजा–आरती कधी संपली, मला कळलंही नाही. आज खूप थकवा आलाय. (पृ. १०२–३)

१५ ऑगस्ट १९७२ रोजी केलेल्या या नोंदीत कुठेही भाष्य नाही, कठोर प्रतिक्रिया नाही, कसलीही कटुता नाही. माधव कोंडविलकरांच्या लेखनातील संयम आणि अलिप्तता त्यांच्या लेखनाचे मोठे बळ आहे.

गेल्या पंधरा-वीस वर्षांत 'दलित साहित्य' म्हणून साहित्याच्या वेगळ्या कप्प्याचा निरनिराळ्या प्रकारे विचार करण्यात आला आहे. सोयीसाठी तसे वर्गीकरण केले जाणे अपरिहार्यच होते. किंबहुना काळाची ती गरजच होती. या पंधरा-वीस वर्षांच्या कालावधीत दलित साहित्याच्या विभागात प्रामुख्याने कविता, कथा, व काही प्रमाणात कादंबरी या वाङ्मयप्रकारांचीच निर्मिती झाली. मात्र गेल्या दोन वर्षांत दलित जीवनानुभवाचे अस्सल आणि वास्तव चित्रण करणारी आत्मनिवेदनपर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'आठवणींचे पक्षी' या प्र. ई. सोनकांबळे यांच्या पुस्तकात बालपणीच्या भेदक आणि सुन्न करून टाकणाऱ्या आठवणींचे महारी भाषेतील प्रत्ययकारी चित्रण आहे; तर शहरी वातावरणात वाढलेल्या दया पवारांनी दगडू मारुती पवार या व्यक्तीकडे म्हणजे स्वतःकडेच अलिप्तपणे पाहण्याचा प्रत्यय 'बलुतं' मध्ये केला आहे. 'मुक्काम पोष्ट : देवाचे गोठणे' हे याच परंपरेतील पुस्तक आहे. माधव कोंडविलकरांच्या या आत्मनिवेदनपर लेखनाने दलित साहित्यात जाणवणाऱ्या सांकेतिकतेवर मात केली आहे. दलित लेखकाची अनुभूती सहजपणे कसे कलारूप घेते, याचे मुक्काम पोष्ट : देवाचे गोठणे हे एक चांगले उदाहरण आहे.

मुक्काम पोष्ट : देवाचे गोठणे– माधव कोंडविलकर.
मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई
(ललित)

अस्वस्थ करणारे आत्मनिवेदन– 'उपरा'

प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' व माधव कोंडविलकरांचे 'मुक्काम पोष्ट: देवाचे गोठणे' या दोन पुस्तकांनी मला झपाटून टाकले होते. त्याच आत्मनिवेदनपर पद्धतीचा स्वीकार करणारे, पण या दोन पुस्तकांपेक्षा तपशीलदृष्टचा वेगळे ठरणारे लक्ष्मण माने यांचे 'उपरा' हे पुस्तक हाती पडले आणि पुन्हा एकदा अस्वस्थ झालो. उपरा हे आत्मकथन म्हणजे लक्ष्मण माने या कैकाडी जातीतील तरुणाची करुण कहाणी आहे. प्रस्तावनेत लेखकाने आपले मनोगत व्यक्त केले आहे.

"जे जगलो, जे भोगलं, अनुभवलं, पाहिलं ते ते तसंच लिहीत गेलो. पुन्हा एकदा तेच जिणं जगत गेलो. कुणावर दोषारोप ठेवणं हा हेतू कधीही नव्हता. पिढचान्‌पिढचा बिऱ्हाडं पाठीवर घेऊन गाढवाचं जिणं जगणाऱ्या मंडळींच्या वेदना समाज समजावून घेऊ शकला तर खूप झालं."

गेल्या वीस वर्षांत कविता, कथा व कादंबरी या वाङ्मय-प्रकारांतून दलित समाजाच्या जीवनातील व्यथावेदनांना वाचा फोडली गेली. उलटसुलट चर्चा होऊन या साहित्याचे वाङ्मयीन मूल्य निश्चित करण्याचा प्रयत्न झाला. या साहित्यातील प्रखर वास्तवता काही समीक्षकांना कलादृष्टचा हिणकस वाटली, तर काहींना या साहित्यातील खोटा अभिनिवेश, आक्रस्ताळेपणा यामुळे या संपूर्ण साहित्याला एक भडकपणा आलेला आहे असे वाटले. या पार्श्वभूमीवर आठवणींचे पक्षी, देवाचे गोठणे हे काही ठळक अपवाद मानून या पुस्तकांची चर्चा झाली. असे असले तरीही महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त समाजाच्या जीवनचित्रणाला मराठी साहित्यात फारसा वाव मिळालेला नाही. डॉ. अनिल अवचटांसारख्या सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या लेखकाने या भटक्या समाजाचा केवळ 'सामाजिक वास्तव' या दृष्टीने नव्हे, तर कलादृष्टचा महत्त्वाचा असा शोध 'माणसं' या पुस्तकात घेतला आहे. 'माणसं'चे लेखन केवळ वृत्तांतवजा केलेले लेखन नव्हे, एका संवेदनशील व्यक्तित्त्वाने सहृदयतेने टिपलेली समाजजीवनाची ती स्पंदने आहेत. डॉ. अनिल अवचट यांनी परिचय करून दिलेल्या कैकाडी जातीतील लक्ष्मण माने या तरुणाचे 'उपरा' हे आत्मकथन म्हणजे विपरित परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेला युवक व त्याचा समाज यांचा वास्तव आणि भेदक आलेख आहे.

गाढवाच्या पाठीवरून गावोगाव आपले बिऱ्हाड घेऊन जाणाऱ्या निरगुडी या गावच्या कैकाडचाचा मुलगा लक्षा बापाच्या आग्रहावरून पण अनिच्छेनेच शाळेत जाऊ लागतो. मुळापासून त्याला शाळेत जायची आवड नाही. त्यात त्याला शाळेत अभ्यास समजत नाही. बरोबरीची उच्चवर्णियांची मुले सतत हेटाळणी व टिंगल-

टवाळी करतात. शाळा नकोशी वाटते. सहावीपर्यन्त शाळेत गेल्यावर बापच शाळा सोडायला सांगतो. खरे म्हणजे आता अभ्यासाची गोडी लक्ष्मणला लागलेली असते. एवढ्यावरच भागत नाही. जातीच्या रिवाजाप्रमाणे घरची माणसे लक्ष्माच्या लग्नाचा घाट घालतात. लक्ष्मण घर सोडून फलटणला पळून जातो. हॉटेलात काम करून, बटर-पाव विकून मित्रांच्या आधारावर कसाबसा मॅट्रिक होतो. कोल्हापूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या कॉलेजात मित्रांच्या आधाराने पदवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय होते. पण कुणातरी हितशत्रूने कागाळी केल्यामुळे कॉलेजात अर्धवट मिळणारे कामही बंद होते. कॉलेजात असताना एका ब्राह्मण मुलीवर प्रेम बसते. पण लक्ष्मण 'मराठासुद्धा नाही' म्हणून ती त्याला नकार देते. पुढे एका मराठा मुलीवर लक्ष्मणाचे प्रेम बसते, पण मराठा समाजातील मित्रांना ही गोष्ट न आवडल्यामुळे तेही त्याच्यापासून दुरावतात. पण काही सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने मुलीच्या (नि अर्थात स्वत:च्याही) घरातील माणसांच्या विरोधात हे लग्न पार पडते. पुन्हा नोकरीसाठी वणवण फिरावे लागते. जातीबाहेरच्या मुलीशी लग्न केल्यामुळे जात पंचायतीला तोंड द्यायची पाळी येते. पंचायतीची माफी मागून लग्न केलेल्या मराठा मुलीबरोबर 'पुन्हा' बोहल्यावर चढावे लागते. जातवाल्यांचे समाधान होते; तरीही निवेदक उपराच राहतो. उपराच्या कथानिवेदकाचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व सतत हेलपटत चाललेले, दुभंगलेले; कुटुंब, जात, समाज यांच्यापासून दुरावलेले आहे. 'उपरेपणा'च्या दु:खाशिवाय या निवेदकाच्या वाट्याला दुसरे काहीही येत नाही.

लक्ष्मण माने याचे हे आत्मनिवेदन एकपदरी नाही. एका बाजूने ते त्याचे कुटुंबजीवन व जातिबांधव यांच्याशी निगडित आहे. पदवीधर झाल्यावर त्याचा संबंध आपल्या संपूर्ण समाजजीवनाशी येतो. उपरामधील कुटुंबजीवन व समाजजीवन म्हणजे कैकाडी समाजाचे प्रातिनिधिक असे जीवनचित्र आहे. मेहनती, दारुड्या, अंधश्रद्ध असा बाप; कष्टाळू, प्रेमळ, सोशिक अशी आई आणि आईबापाबरोबर भटके जीवन जगणारी समी, पुष्पी, लाली, किसन्या, इंदी ही भावंडे. म्हणजे लेखकाच्या शब्दांत 'बिनभिकार माणसे' आहेत. या कुटुंबचित्राबरोबरच येणाऱ्या कैकाडी समाजजीवनाचे चित्र तितकेच प्रत्ययकारी आहे. गावोगाव पाले मांडून तात्पुरता मुक्काम ठोकणारे, जातवाल्यांना दारू-मटणाचे जेवण देणारे, उच्चवर्णियांकडून उपेक्षिले जाणारे, प्रत्यही त्यांच्या अत्याचारांचे बळी ठरणारे, खूप कष्ट करूनही अर्धपोटी राहणारे, नागर संस्कृतीपासून खूप दूर असणारे असे हे कैकाडी लोक. त्यांच्या जीवनाचे सूक्ष्म तपशील 'उपरा' मध्ये आले आहेत. सतत भ्रमंती करणाऱ्या या समाजाला स्वत:ची अशी संस्कृती आहे. गावोगाव होणाऱ्या जत्रा, जत्रेत दिले जाणारे कोंबड्या-बोकडांचे बळी, अंगात वारे येणारी माणसे, जमातीत होणारे न्यायनिवाडे, विष्ठेचे फुटके मडके वाहून नेण्याची दिली

जाणारी शिक्षा; पाचवी, देवधर्म, साखरपुडा, लग्न इत्यादी विधी या सर्वांचे या पुस्तकात आलेले वर्णन आजवरच्या मराठी साहित्यात नवीन आहे.

देवीची जत्रा किंवा एखादा सण वगळता या समाजाचे जीवन सदैव हाल-अपेष्टा, दुःख व कारुण्य यांनी भरलेले आहे. मारतीमामाच्या बायकोवर झालेला पाशवी अत्याचार व त्यामुळे वेड लागून तिचा झालेला मृत्यू, गजरा कैकाडणीचे स्वैर वागणे व त्यामुळे तिच्या कुटुंबाची झालेली दुर्दशा, म्हाताऱ्या डोंबाऱ्याच्या मुलीचा– शारदीचा गूढ व आकस्मिक मृत्यू, लेखकाच्या पत्नीसमोर कुटुंबियांनी केलेला निषेधपर आक्रोश, जीवघेणी भूक लागली असता उष्टचा पत्रावळीवरील अन्न घेण्याचा लेखकाला झालेला मोह, विपरीत परिस्थितीमुळे असहाय अवस्थेत टिक ट्वेंटी घेऊन जीवन संपविण्याचा लेखकाच्या मनात आलेला विचार, या सर्वच घटना कारुण्याने भरलेल्या आहेत. चोरी केल्यामुळे लेखकाच्या आईवडिलांना झालेली मारहाण, त्यामुळे लक्ष्मणाची होणारी कातर अवस्था आणि पाटलाच्या मुलीची छेड काढल्याच्या आरोपामुळे लेखकाचीच नव्हे, तर सर्व कुटुंबाची होणारी फरफट यांचे चित्रण हृदयद्रावक आहे. आपल्या बरोबरीच्या गावातल्या मुलांबरोबर लक्ष्मण परगावी एका लग्नाला जातो. ओळखणारा माणूस त्याला पंगतीतून बाहेर काढतो, त्यावेळची त्याची प्रतिक्रिया व्यक्त होते :

"आन् भरल्या ताटावरनं उटलो. कुनी काही बोललं न्हाय. जीवाला लागलं हुतं. जवळनं नीरा नदी वाहत होती. पान्याचा शांत प्रवाह चालला हुता. डोळ्यांच्या टिपांनी सदरा वला झाला हुता. मुकाट्यानं जाऊन जानवसं घरी झोपलो. कुनी इचारलं न्हाय की पुसलं न्हाय. आता गावात गेलो की आपलं मराण जवळ येणार, येवढाच इचार सारका मनात असायचा. आन् राहून राहून डोळ्यांना पाणी याचं." (पृष्ठ ७६) लक्ष्मणचे दुःख एवढ्यावरच संपत नाही. नाल असलेल्या पायातल्या वाहाणेने बाप लक्ष्मणाला आणि मध्ये पडणाऱ्या लक्ष्मणाच्या आईलाही बदडून काढतो.

लक्ष्मण माने कैकाडी जातीतील बिनभिकार माणसांपैकी एक. आपल्या कुटुंबातच वावरल्यामुळे बालपण कैकाडी जातीची बोली बोलण्यात गेलेले. पुढे मात्र शिक्षणाचे संस्कार होत गेल्यामुळे लेखकाची भाषा बदललेली दिसते 'उपरा'–च्या निवेदनाची भाषा ही ओघवती, कथनपर अशी लेखकाची स्वतःची भाषा आहे. कैकाडी बोलभाषा–प्रादेशिक बोली व शेवटी मराठी प्रमाणभाषा असे भाषेचे त्रिविध स्वरूप आहे. कैकाडी बोलभाषा मराठीतील प्रमाणभाषेपेक्षाच नव्हे, तर मराठीच्या अन्य बोलींपेक्षा वेगळी बोली आहे. म्हणूनच लेखकाने अशा वाक्यांपुढे ग्रामीण बोलीत तर कधी मराठीत भाषांतर दिले आहे. उदाहरणार्थ–अय, गाला लवकर, पराद अड्डा वाईर. (अग, उरक, म्हार आडवा येईल.) (पृष्ठ १०) निना

कै किरका क्याल ? (तुझा हात हाय, का दगड ?) निन लक्षांनक ख्वालरा, आपू निनक नला वाटीकर. शतु तर नळा आगर. (तू लक्षाला मारून टाक, जाळून टाक म्हंजी तुला बर वाटंल. ह्यो शिकतुया आन् हापीसर होतुया !) (पृष्ठ ५) अया स्वाडमा खेद नाडलाच पार. सारका काल म्हिनकच पिडक्याचं. (अग काकी, गाढवानं पाय धरला बघ. सारखं लंगडत होतं.) (पृष्ठ १४).

उत्तरार्धातील निवेदनात लेखकाने प्रमाण भाषेचा वापर केला आहे. पंगतीतून उठविल्यानंतरची बालपणीची प्रतिक्रिया प्रादेशिक भाषेत व्यक्त होते, तर युवावस्थेतील तगमग आणि असहायता वेगळ्या शब्दांत व्यक्त होते. "चारी बाजूला अंधार दाटलेला-रुळाच्या पट्टीनं चाललो होतो. दिसत नव्हतंच. हातात बॅग फक्त होती. पायाला गती आली होती. आणि डोक्यात विचारांनी काहूर माजवलं होतं. आपण कुठून आलो इथपासून या व्यवस्थेवर मुतावं इथवर गेलो होतो; जी व्यवस्था आपल्याला माणूस मानायला तयार नाही, पोरीची इच्छा असताना आणि कायद्यानं परवानगी असताना आपल्या लग्नाला ही मंडळी तयार होत नाही. जात ! जात !! सगळ्या आयुष्याचा कोंडवाडा झालेला. पेटून उठलो होतो. एकदा वाटे सरळ तिच्या घरी जाऊन तिला घेऊन यावं. मग जीव गेला तरी हरकत नाही. इथपर्यंत मजल गेली होती; पण असहायपणे डोळ्यांतून पाणी काढण्यापलीकडं काही करू शकत नव्हतो." (पृष्ठ १३७)

आजच्या विषम समाजरचनेबद्दल, राजकीय परिस्थितीबद्दल लेखक क्वचित प्रसंगी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसतो. सगळ्या प्रतिष्ठितांचे बुरखे फाडून टाकावेत असेही एखाद्या वेळी त्याला वाटते. परंतु अभिनिवेशाने प्रतिक्रिया व्यक्त करणे, निषेध नोंदविणे, धिक्कार करणे हा या लेखनाचा हेतू नाही. 'उपरा'-चे संपूर्ण रूप पाहिल्यावर तसा निष्कर्ष निश्चितच काढता येतो. फक्त ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणे हाही या लेखनाचा हेतू नाही. गाढवाचे जिणे वाट्याला आलेला कैकाडी समाज आणि त्या समाजालाही भारभूत व तिरस्करणीय वाटावा अशा 'उपऱ्या'च्या मनाची स्पंदने व्यक्त करणे हा या लेखनाचा हेतू आहे. यामुळेच प्रादेशिक किंवा दलित अशा वर्गीकरणाच्या साच्यात न बसणारे असे हे लेखन आहे. मानवी दुःखाची तीव्रता कमीअधिक असली तरी ते दुःख केवळ ग्रामीण घटकाचे, दलित व्यक्तीचे असू शकत नाही. ते शेवटी एका 'माणसा'चे दुःख असते. खरेखुरे मानवी दुःख असते. 'उपरा' मध्ये सनातन मानवी दुःखाचा, कारुण्याचा प्रत्यय येतो.

'उपरा' या आत्मकथनपर लेखनात अस्सल जीवनानुभूतीचे अनेक रंग मिसळलेले आहेत. ते कधी करुण-गंभीर आहेत, कधी विदारक वास्तवाची जाणीव करून देणारे आहेत, कधी विषम समाजरचनेचे दर्शन घडविणारे आहेत, कधी

मानवी जीवनातील हतबलता-असहायता, तर कधी क्रौर्य सूचित करणारे आहेत. कैकाडी जातीतील एका युवकाची ही आत्मकहाणी आजच्या मराठी साहित्यात आशयाच्या व अभिव्यक्तीच्या दृष्टीने वेगळी ठरणारी आहे. तसेच प्रत्ययकारी जीवनामुळे अंतर्मुख व अस्वस्थ करून सोडणारीही आहे.

उपरा–लक्ष्मण माने,
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
(ललित)

दलित कथेचे वेगळे रूप– 'पड'

'अमिताभ' हे गोंडस टोपणनाव धारण करणाऱ्या दलित समाजातील लेखकाचा 'पड' हा पहिला कथासंग्रह आहे. आजवर निर्माण झालेली दलित कथा दलितांच्या व्यथा-वेदनांची ठरीव कथा होती. गेल्या दहा वर्षांतील कथा प्रामुख्याने दलित जीवनातील दुःख, कारुण्य, असहायता, विटंबना या भावनांच्या चित्रणाची कथा होती. आत्मपरता हे या कथेचे बळ होते आणि मर्यादाही. दलित कथेचा परीघ असा मर्यादित का राहिला यालाही काही कारणे आहेत. नव्याने लेखन करणारा दलित लेखकांचा वर्ग आपल्या बालपणातील, खेड्यातील विदारक जीवनाचा अनुभव घेऊन पुढे आलेला होता. त्या जीवनचित्रणात त्याला रस होता. कोणत्याही थरातील लेखकाची विद्रोहाची– विरोधाची भावना सुरुवातीच्या लेखनात व्यक्त होणे अपरिहार्य होते. पण अमिताभ यांच्या कथेने दलित कथेचा पूर्वपरीघ ओलांडला आहे. जीवनातील अनुभव केवळ ढोबळपणे व्यक्त करून ही कथा थांबत नाही. लेखकाच्या संवेदनशीलतेची बैठक असणारी ही कथा अधिक सूक्ष्म, अंतर्मुख करणारी, दलित जीवनाच्या विविधांगांना स्पर्श करणारी, व्यक्ति-जीवनाबरोबरच समूहजीवनाचा वेध घेणारी आहे. आजचे दलित समाजाचे जीवन एकारलेले– एकसंध नाही. दलितवर्गात एक नवा मध्यमवर्ग निर्माण होत आहे. त्यांच्याही काही समस्या आहेत. राजकीय वातावरण व दलित समाजाच्या राजकीय दृष्ट्या झालेल्या चिरफळ्या आणि त्यातून आलेले दुभंगलेपण हाही या समाजाचा एक विशेष आहे. अमिताभ यांच्या कथेने आजवर न स्पर्शिलेल्या कित्येक घटकांना स्पर्श केला आहे (याचा अर्थ ही कथा दलित-कथा-साहित्यात सर्वस्वी नवीन आहे असा मात्र नाही.)

दलित चित्रणात महत्त्वाचे स्थान आहे ते दलित स्त्रीच्या। शोषणाला- 'सत्यकाम वल्द जाबाली', 'जन्ते तिचीच तान्ते', 'तल्खी...तल्खी' या कथा दलित स्त्रीच्या वेदनाचित्रणाच्या कथा आहेत. उदा. अत्याचाराला बळी पडलेली असहाय विधवा जाबाली, संसारात पिचलेली धुरपती, मुलांच्या पोषणासाठी देह-विक्रय करणारी 'तल्खी'मधील माय इ. या स्त्रियांचे दुःख केवळ दलित स्त्रीचे दुःख म्हणून व्यक्त झालेले नाही. कुणाही शोषित स्त्रीचे ते चित्र ठरू शकते. दलित-त्वाच्या मर्यादा अमिताभ यांच्या या कथांनी सहजपणे ओलांडल्या आहेत. 'भिका-ऱ्याले ओकाऱ्या!' 'सहाऱ्याच्या वावरात', 'सुटे गिऱ्हाण!' या कथा दलित चित्रणाच्या परंपरागत स्वरूपाच्या कथा आहेत.

दलित समाजात जन्मलेला 'अमिताभ' हा लेखक उच्चशिक्षित आहे. नागर संस्कृतीशी त्याचा अगदी जवळचा संबंध आहे. नागर व अनागर संस्कृतीतील विरोध यामुळेच त्याला सूक्ष्मपणे टिपता आला आहे. पांडुरंग कृष्णाजी बोरकर या सवर्ण मित्राकडून लग्नाच्या जेवणाच्या निमंत्रणाची पत्रिका मिळताच त्या मित्राच्या सहवासातील बालपणाच्या कडू आठवणी झरझर लेखकाच्या नजरेसमोर येऊ लागतात आणि 'वळणाचे पाणी!' या कथेला आत्मनिवेदनपर घाट प्राप्त होतो. आपल्या डॉक्टर हरिजन मित्राला जेवायला बोलावणारे डॉ. जोशी व त्यांच्या पत्नी हरिजनांना मिळणाऱ्या सवलतींची जेवताजेवताच चर्चा करतात. वरकरणी अस्पृश्यता न मानणारे डॉ. जोशी 'जन्मखूण' विसरत नाहीत हे या कथेत सांगितले गेले आहे. 'वळणाचे पाणी!' व 'जन्मखूण!' या दोन्ही कथांतील अलिप्ततेने या कथांची उंची वाढविली आहे.

गेल्या काही वर्षांत दलितांनी केलेली आंदोलने व रिपब्लिकन पक्षात पडलेली गटबाजी यांना दलित लेखनात फारसे स्थान नव्हते. (केशव मेश्राम यांच्यासारखा कथाकार दलित पँथर चळवळीतील युवकांवर एखादी कथा क्वचित लिहिताना दिसतो.)'ब्रीज नंबर टेन' ही या संग्रहातील नामांतर प्रश्नावरील कथा आहे; तर महेशची बहीण संघमित्रा हिचे निश्चित झालेले लग्न रिपब्लिकन पक्षातील गटबाजीमुळे कसे मोडते हे सांगणारी 'तडा' ही कथा आहे.

'पड' या कथासंग्रहात वेगळ्या आशयामुळे लक्ष वेधून घेणारी कथा म्हणजे 'हरिजन मास्तर!' दगडू धोंडू भगत हा दलित मुलगा फादर परेरा यांच्या साहाय्यामुळे शिकतो. शिक्षक बनतो. दगडू भगतऐवजी पायस पुरोहित हे नाव लावून तो गांधी प्रतिष्ठानच्या शाळेत अध्यापन करू लागतो. गांधीवादाच्या प्रभावामुळे तो आंबेडकरी चळवळीपासून दूर जातो. म. गांधी हेच त्याचे परम-दैवत बनते. एका बाजूने दलित समाजाकडून बहिष्कृत ठरलेला आणि गांधीवाद्यां-कडून अस्वीकृत राहिलेला हा शिक्षक कोंडीत सापडला आहे. चेंडके वकील,

ब्रह्मचारी महाराज, हरिकिसनदास शेठ राठी इत्यादी छोटया-छोटया व्यक्तिरेखातून विरोध-उपहासाचे जाळे कथेत विणले गेले आहे. गांधीवाद्यांची ढोंगी, दिखाऊ वृत्ती आणि आंबेडकरवाद्यांची मनस्विता व विद्रोहीपणा यांपैकी कोणतीही गोष्ट स्वीकारू न शकणारा या कथेतील हरिजन मास्तर हा भारतीय समाजव्यवस्थेचा बळी ठरतो. जीवनाच्या विविध पातळयांना स्पर्श करणारी, अलिप्ततेने शब्दांकित झालेली 'हरिजन मास्तर' ही 'अमिताभ' यांची 'स्वतंत्र' कथा आहे.

'पड' मधील कथा एकसुरी निवेदनाने लिहिलेली नाही. 'तडा' व 'ब्रीज नंबर टेन'मध्ये संवाद, 'तल्खी ..तल्खी', 'पड' या कथांत वातावरणनिर्मिती यांना महत्त्व मिळाले आहे. वृत्तान्त निवेदनाचे (रिपोर्टाजचे) रूप घेऊन आलेली 'पड' ही कथा वास्तव वातावरणनिर्मिती करणारी कथा आहे मृत जनावराचे (पड) मांस आणायला गेलेल्या स्त्री-पुरुषांची धावपळ, गोंधळ, उत्सुकता, हपापलेपणा, स्वार्थीपणा इत्यादींचे सूक्ष्म वर्णन या कथेत आले आहे. शब्द, विशेषणे, क्रियापदे यांच्या पुनरावृत्तीने आशयाची परिणामकारकता या कथेत वाढविली गेली आहे.

'रंगपंचमी खेळल्यागत रक्ताच्या रंगानं सारे रंगले होते. केस रंगले होते. हात रंगले होते. पाय रंगले होते. अंगावरचे फाटके, मळके कपडे रंगले होते. तोंड, नाक, कान रंगले होते. सारे एकाच रंगात रंगले होते.' 'मग प्रत्येकजण घराकडे निघाला. डोक्यावर, काखेत, हाती, फडक्यात, मडक्यात, गंजात, घमेल्यात, दवडीत, टोपलीत, धोतरात, जमेल तेथे रक्ताळलेलं ताजं ताजं मांस...मांस घेऊन निघाले.' 'मग कावळयांना, घारी, गिधाडांना चेव आला. कुत्र्यांना जाग आली–'(पृष्ठ१४)

'पड' मधील 'अमिताभ' यांची कथा दलित कथेला नवे परिमाण देणारी कथा आहे. जीवनातील वास्तवता नेटकेपणाने आणि अलिप्तपणे व्यक्त करण्याची ताकद या नव्या लेखकात निश्चितपणे आहे. आता त्याच्याकडून अपेक्षा आहे ती याहूनही अधिक कसदार अशा कथानिर्मितीची.

पड– 'अमिताभ'
अभिनव प्रकाशन
(मुंबई सकाळ)

'विटाळ' : दलितत्वाच्या मर्यादा ओलांडणाऱ्या कथा

दया पवार हे नाव ऐकले की 'बलुतं' या गाजलेल्या आत्मनिवेदनपर

पुस्तकाचे स्मरण होते. त्यापूर्वी ते दलित कवी म्हणून 'कोंडवाडा' या काव्यसंग्रहामुळे परिचित झाले होते. दया पवार यांनी कवितांच्या मानाने कथा कमी लिहिल्या आहेत. त्यांच्या दहा कथांचा समावेश असलेला 'विटाळ' हा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. या संग्रहाच्या प्रस्तावनेत ते लिहितात– "हाताच्या बोटावर मोजाव्यात, एवढ्याच कथा मी लिहिलेल्या. तसे पाहिले तर 'कथाकार' म्हणून मला मराठीत कुणीच ओळखत नाही. 'कोंडवाडा' व 'बलुतं'च्या बोलबाल्यामुळे 'माझ्या कथांना अंग चोरून बसावे लागले...' सावत्र मुलाला जसा दुरावा वाटयाला येतो तसे थोडेसे माझ्या कथेच्या संदर्भात झाले. हा 'विटाळा'चा भोगवटा भोगत असताना माझ्या मनात काही प्रश्न डोकावतात. एक तर, आपणास कथा लिहिता येत नसावी, अगर आजवर जिला दलित कथा म्हणून संबोधली जाते, किंवा मराठी कथेचा जो साचा आहे, त्या पठडीत ही कथा बसत नसावी, असा काहीसा संभ्रम माझ्या मनात आजही ठसठसत असतो."

'विटाळ' या कथासंग्रहात दलित जीवनानुभवाचे आणि अन्य जीवनानुभवाचे असे दोन प्रकारचे चित्रण करणाऱ्या कथा समाविष्ट झाल्या आहेत. 'फिडेल', 'पंख', 'विटाळ', 'एका झाडानं टकरावं किती', या दलित जीवनानुभवाचे दर्शन घडविणाऱ्या कथा आहेत. 'फिडेल' ही एका दलित पँथरच्या जीवनावरची कथा आहे. संघटनेवरची पकड ढिली झाल्यावर त्याची मनोवृत्ती कशी बनते याचे वास्तव दर्शन या कथेत आहे. 'पंख' ही लेखकाने रोमँटिक प्रवृत्तीतून सुटल्यावर दलित जाणिवेतून लिहिलेली पहिली कथा आहे. मास्तरांनी केलेल्या उपहासगर्भ टीकेला तोंड देणारा, मामाने दिलेले फॅशनेबल कपडे घालून शाळेत येणारा हतबल वामन हा या कथेचा नायक आहे.

दारूच्या नशेत मामाने दिलेले कपडे त्याला मामाच्या दबावामुळे नाकारता येत नाहीत आणि आपले दुःखही शिक्षकांना सांगता येत नाही. अशा कोंडीत तो सापडला आहे. 'केवढे हे क्रौर्य' या कवितेतील पंख छाटलेल्या पक्षिणीसारखी त्याची स्थिती होते. 'विटाळ' ही कथा १९७२ सालच्या 'साधने'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेली कथा आहे. 'काळा स्वातंत्र्यदिन' असा दलितांना अग्रक्रम देणारा विशेषांक अनिल अवचट यांनी संपादित केला होता. या अंकातील झेंड्यावरील राजा ढोले यांचा सनसनाटी लेख गाजला, पण (काही जाणकारांचा अपवाद वगळता) 'विटाळ' ही कथा दुर्लक्षित राहिली. कथालेखक म्हणून आपला स्वतःचा शोध या कथेमुळे लागला, असे दया पवार म्हणतात. हाउसिंग बोर्डाच्या कॉलनीत राहात असताना शेजारच्या उच्चवर्गीय देशमुख बाई लेखकाच्या पत्नीने दिलेला फराळ परत करतात आणि लेखक अस्वस्थ होतो. त्याच्या गतायुष्यातील खेडेगावात आलेले, बोर्डिंगमध्ये आलेले आईच्या संदर्भातील 'विटाळ'चे अनेक

प्रसंग आठवतात. त्या प्रसंगांच्या मालिकेतून 'विटाळ' ही कथा निर्माण होते. सय्यद इब्राहिम हा मुसलमान शिक्षक लता कांबळे या दलित मुलीवर बलात्कार करतो आणि त्यामुळे त्या मुलीचे जीवन कसे बरबाद होते, हे सांगणारी 'एका झाडानं किती टकरावं?' ही कथा 'रिपोर्टाज'च्या पद्धतीची कथा आहे. (अनिल अवचट सामाजिक विषयावर ज्या पद्धतीचे लेखन करतात त्या धाटणीने ही कथा लिहिली आहे.) दलित जीवनात येणारे हे सर्व अनुभव दया पवारांनी स्वतः घेतले आहेत. 'पंख' कथेतील वामन, 'विटाळ' कथेचा आत्मनिवेदक या दोघांचे अनुभव आणि 'बलुतं' मधून व्यक्त होणारे जीवनानुभव ह्यांत खूपच साम्य आहे. वेगळेपणा आहे तो कथा आणि आत्मपर लेखन या दोन माध्यमांचा. दया पवारांनी केवळ दलित जीवनानुभवांचेच निवेदन केले आहे, असे नव्हे. अन्य अनुभवांचे चित्रणही त्यांच्या कथेतून येते, काही वेळा ती पात्रे मात्र दलित समाजातील (उदा. ससाणा मधील सपबाय, वधस्तंभ...वधस्तंभ... वधस्तंभ... मधील कामगार नेता सदा इ.) असतात एवढेच.

'भूक' 'ससाणा', 'आमदार', 'साहेब दीदी गुलाम', 'वधस्तंभ', 'घुसमट' या कथांतील अनुभव दलित व दलितेवर कुणाही लेखकाला येणारे अनुभव आहेत. पात्रे दलित समाजातील असतात एवढेच. घराशेजारच्या मैदानात उतरलेल्या निर्वासित भटक्या कच्छी लोकांसाठी लेखक अन्नपाण्याची सोय करतो, हा 'भूक' या कथेचा विषय आहे. 'ससाणा' कथेतील सयबाय ही खेड्यात जमीन बाळगून असणारी निराधार विधवा. पुतण्यावर तिचा विश्वास असतो. गावचा पाटील जमीन विकत द्यावी म्हणून तगादा लावीत असतो. एके दिवशी मुंबईचा पुतण्या येतो. जमिनीचे बक्षिसपत्र तिला करायला सांगतो. आधी जमिनीचे बक्षिसपत्र मग आईबापाच्या दिवसांचे महारवाड्याला हजार रुपये खर्चून जेवण असा हिकमती बेत तो रचतो. महारवाड्याला दिवस घालून हजार रुपयांची जमीन पदरात पडणार या कल्पनेने पुतण्या खूष होतो, आणि सयबायच्या डोळ्यांसमोर आपण गावात घरोघर भीक मागत फिरतोय असे चित्र उभे राहते. 'ससाणा' ह्या कथेतील अनुभव हे कोणत्या अर्थी वेगळा असा दलित साहित्यातील अनुभव आहे असा प्रश्न निर्माण होतो. या कथेत अधिक मूलगामी समस्या निगडित आहे ती मानवी मनोवृत्तीशी आणि सनातन दारिद्र्याशी. 'आमदार' व 'साहेब दीदी गुलाम' या दोन कथा आणि काही मर्यादेपर्यंत 'घुसमट' ही कथा, या तिन्ही कथा लेखकांच्या मित्राशी संबंधित कथा आहेत. खूप प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेल्या लटपटया हरहुन्नरी मित्राची केवळ नावाच्या आमदाराची आयुष्यात परफट कशी होते, याचे दर्शन 'आमदार' कथेत होते, तर पैसेवाल्या मोहन या आपल्या मित्राची कोठीवरची बाई कसा अपमान करते, हा 'साहेब दीदी गुलाम' या कथेचा विषय.

'घुसमट' कथा खरे म्हणजे लेखकाची तृतीय पुरुषी निवेदनातील कथा आहे. तिथे मित्र येतो तो पार्श्वभूमीदाखल. सकाळी घराबाहेर पडताना नायकाची बायको वीस रुपये उसने घेऊन यायला लेखकाला सांगते. अचानक भेटलेल्या मित्राबरोबर अनिच्छेने का होईना लेखकाला पार्टीला जावे लागते. पार्टी संपल्यावर तो कसातरी तोल सांभाळीत घरी येतो. बायको विचारते, "वीस रुपये आणलेत?" कथेचा शेवट होतो–"बायकोच्या प्रश्नाने त्याची नशा खाडकन् उतरते. एखाद्या धंदेवाल्या बाईने प्रश्न विचारावा, असे त्याला वाटते. त्याची सारी गात्रे बर्फासारखी थंडगार पडतात. शरीराचे मुटकुळे करून तो बाजूला जाऊन पडतो. गर्भाशयात मूल झोपावं तसा तो दिसत असतो." 'वधस्तंभ' ही कथा परिस्थितीला शरण न जाणाऱ्या एका ध्येयवादी कामगाराची– सदाची कथा आहे. जीवनातला त्याचा पराजय त्याच्या मनस्वीपणामुळे घडून आला आहे. तो खालच्या जातीतील आहे, हे केवळ एक निमित्त. दलितेतर जीवनाचे चित्रण करणाऱ्या या कथा अधिक प्रत्ययकारी आहेत.

'विटाळ' या संग्रहाला लिहिलेल्या 'विटाळांच्या पलीकडे' या प्रस्तावनेत कलावंत म्हणून आपल्या मनात निर्माण झालेल्या संभ्रमाचा दया पवार यांनी प्रारंभी उल्लेख केला आहे. या संभ्रमाचा संबंध दलित साहित्याच्या एकूण प्रक्रियेशी आहे. दलित जीवनाचा अनुभव हाच केवळ दलित साहित्याचा विषय ठरू शकेल काय, दलित जीवनाचा अनुभव दलित लेखकानेच व्यक्त केला पाहिजे काय, दलित साहित्यिकाने दलितेतर जीवनानुभवाचा आविष्कार केला तर ते साहित्य कोणत्या प्रकारात टाकायचे अशा तऱ्हेचे काही प्रश्न कदाचित दया पवारांसारख्या कलावंताला सतावीत असले पाहिजेत. त्यांच्या मनात निर्माण झालेल्या संभ्रमाचे उत्तर त्यांनी स्वत: शोधून काढण्याचा प्रयत्न प्रस्तावनेच्या शेवटी केला आहे. लेखन करायला लागल्यावर त्यांचा संबंध समांतर साहित्याच्या चळवळीशी आला. भारतातील विभिन्न भाषांत लिहिलेल्या साहित्याने– प्रेमचंद, कमलेश्वर, सुहिद, जितेंद्र भाटिया इ. कथाकारांच्या कथांनी– त्यांच्या अनुभवविश्वावर संस्कार केले आहेत. कलावादी साहित्यात अनुभवाच्या विकृतीवर भर असतो, तर सामाजिक बांधिलकी मानणारे लेखक अनुभवाच्या उदात्तीकरणाचा सोस धरतात. या दोन्हींचा समन्वय ह्याचाच अर्थ खरे वास्तव आहे. कुठल्याही गोष्टीचे एकाटलेपण हा कथेचा आत्मा विद्रूप करण्यासारखे आहे, असे लेखकाला वाटते.

अगदी थोडचा कथा लिहून स्वत:चे कथालेखक म्हणून स्थान चाचपडत निश्चित करू पाहणाऱ्या दया पवारांनी निर्माण केलेले प्रश्न कुणाही दलित लेखकांना पडू शकतील असे प्रश्न आहेत. त्यांनी त्या प्रश्नांची उत्तरे सोडविण्याचा जो प्रयत्न केला तसा प्रयत्न अन्य दलित लेखकांनी केला तर भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या दलित साहित्याची कक्षा निश्चितपणे विस्तारणार आहे. दलित आणि

दलितेतर साहित्यातील अंतर बुजण्यास साहाय्य होणार आहे कलावाद, सामाजिक बांधिलकी, दलित साहित्याची वेगळी वैचारिक भूमिका इत्यादींची चर्चा वैचारिक मंथनासाठी उपयुक्त ठरणारी असली तरी खरेखुरे कसदार साहित्य या सर्वांच्या पलीकडे असते. कमी कथा लिहूनही त्याची जाणीव दया पवार यांना झाली आहे. दलित साहित्यिक म्हणून त्यांचा उल्लेख होत असला तरी त्यांच्या कथेने दलित-त्वाच्या मर्यादा ओलांडल्या आहेत. त्यांच्याकडून अपेक्षा आहे ती याहूनही अधिक कसदार लेखनाची.

विटाळ– दया पवार
मेहता पब्लिशिंग हाऊस
(मुंबई सकाळ)

दलित साहित्यात नवी भर– 'रस्ता'

डॉ. मुल्कराज आनंद इंग्रजी भाषेत लेखन करणारे भारतीय लेखक म्हणून इंग्रजी जाणणाऱ्या वाचकांना परिचित आहेत. चाळीस वर्षांपूर्वी त्यांनी भारतीय समाजाच्या तळागाळातील दलितांचे व शोषितांचे दारुण जीवन आपल्या 'दि अनटचेबल' आणि 'कूली' या कादंबऱ्यांतून रंगवले होते. 'अखिल भारतीय पुरोगामी लेखक संघाशी' एक क्रियाशील कार्यकर्ता म्हणून त्यांचा पूर्वीपासून संबंध होता. १९४३ सालापासून मराठीतील एक लेखक प्र. श्री. नेरुरकर यांचा डॉ. आनंद यांच्याशी परिचय आहे. डॉ. मुल्कराज यांच्या सामाजिक जाणिवेने प्रभावित झालेल्या लेखनाने प्र. श्री नेरुरकर यांना आकृष्ट केले होते. डॉ आनंद यांच्या 'रोड' ह्या कादंबरीचे मराठी भाषांतर १९७७ साली आपल्या 'आयुध' या नियतकालिकाच्या दिवाळी अंकात त्यांनी प्रसिद्ध केले होते.

'रस्ता' ही कादंबरी पंजाब-हरियानातील दलित आणि शोषित समाजाच्या जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी आहे. लंबरदार धूलिसिंग रस्ता बांधण्यासाठी गावातील दलित श्रमिकांचे साहाय्य घेतो. त्या दलितांमध्ये लक्ष्मीचा मुलगा भिकू हा एक युवक आहे. गावातील रस्त्याच्या दगडांना अस्पृश्यांचा स्पर्श झाल्यामुळे भ्रष्टाचार झाला म्हणून गावचा सरपंच जमीनदार ठाकुरसिंग अस्वस्थ होतो. गावच्या देवळाचा पुजारी सूरजमणी त्याला साथ देतो. दलित विरुद्ध ठाकुरसिंग

असा प्रथम असलेला संघर्ष पुढे वेगळे रूप घेतो. आता ठाकुरसिंग व धूलिसिंग या दोन सवर्णाच्या संघर्षाला सुरुवात होते. भिकू आणि त्याच्यासारख्या इतर दलितांना एकत्र आणून त्यांना सहानुभूतीने वागवणे म्हणजे ठाकुरसिंगाला धूलिसिंगाचा पापाचार वाटतो. ठाकुरसिंग-धूलिसिंग संघर्षाला पुन्हा एक कौटुंबिक बाजू आहे. ठाकुरसिंगची मुलगी रुक्मिणी धूलिसिंगचा मुलगा लछमन याला द्यायची असते. तर ठाकूरसिंगाचा मुलगा सजनू याचे लग्न धूलिसिंगची मुलगी माला हिच्याशी होणार असते. दलितांच्या प्रश्नावरून निर्माण झालेल्या या संघर्षात रुक्मिणी आणि लछमन या प्रेमिकांची मात्र कुतरओढ होते. लछमन आणि सजनू हे दोघेही मित्र. ठाकुरसिंग आणि सूरजमणी यांच्यासमोर दलितांच्या वरचढपणाविषयी बोलणे झाल्यावर लछमन आणि सजनू मनाच्या एका कमकुवतक्षणी दलितांच्या झोपडचा जाळून टाकतात. धूलिसिंगचे वागणे सहन न होऊन त्याची पत्नी सप्ती आणि मुलगी माला आपले घर सोडून देवळात राहायला जातात. बेघर दलितांना धूलिसिंग आपल्या घरासमोर राहायला तात्पुरती जागा देतो; कपडे देतो. त्यांच्या साहाय्याने पुन्हा रस्त्याचे काम सुरू करतो. आपल्या कृष्णकृत्याचा पश्चात्ताप झालेले लछमन, सजनू रस्त्याच्या कामावर येतात. सप्ती व मालाही घरी येतात. परंपरेने प्रतिष्ठितपणाचा वारसा प्राप्त झालेला सजनू मात्र आपल्या बापाकडे– ठाकुरसिंगाकडे जातो. ठाकुरसिंगाचा निरोप मिळालेला भिकू ठाकूरसिंगाच्या घरी गेला असताना पितळी पेल्याला त्याने स्पर्श केला आहे, हे पाहून सजनू भिकूचा अपमान करतो. अपमानित झालेला भिकू घराकडे जात नाही. जिथे जातपात मानली जात नाही त्या दिल्ली शहराच्या दिशेने नव्याने बांधलेल्या रस्त्याने तो मनाने पुढे जात राहतो.

आजवरच्या मराठी दलित साहित्यात येणाऱ्या अनुभवांपेक्षा वेगळचा अनुभवाचे चित्रण डॉ. मुलकराज आनंद यांनी 'रोड' या कादंबरीत केले आहे. 'रस्ता' या प्रतीकात्मक शीर्षकातून अर्थाची अनेक वलये प्रकट झाली आहेत. उदा. गावात नव्याने बांधला जाणारा रस्ता, दिल्लीकडे जाणारा मोठा रस्ता, भिकूच्या मनातील वेगळी दिशा सूचित करणारा रस्ता, परंपराप्रिय जमीनदार ठाकुरसिंगाच्या मनात रुळलेला जुना रस्ता, रुक्मिणी आणि लछमनच्या प्रणयी जीवनाला वेगळे फाटे फुटलेला रस्ता, जातिभेदाचा निषेध सूचित करणारा आशावादी रस्ता इ. 'रस्ता' कादंबरीत उभारलेला संघर्ष केवळ दलित-सवर्ण असा सांकेतिक संघर्ष नाही; उलट त्या संघर्षातून निर्माण झालेला सवर्ण-सवर्ण (ठाकुरसिंग, धूलिसिंग) संघर्ष यामुळे कादंबरीला एक व्यापक परिमाण प्राप्त झाले आहे. केवळ बहात्तर पृष्ठांची ही कादंबरी खरे म्हणजे दीर्घकथाच आहे. या छोटेखानी कादंबरीत पात्रांचे भावसंबंध डॉ. आनंद यांनी समर्थपणे फुलवले आहेत. उदा. रुक्मिणीला भिकू या दलित तरुणाविषयी वाटणारी सहानुभूती, लछमनविषयी वाटणारे प्रेम आणि दोन घराण्यांच्या

संघर्षात तिची होणारी ओढाताण; परंपरा पाळणारी भिकूची आई लक्ष्मी हिची वेगवेगळी भावस्पंदने, तिच्या स्वभावातील दुबळेपणा, असहाय्यता, समजूतदारपणा, सोशिकपणा, इ.या भावच्छटांमुळे 'रस्ता' कादंबरी दलित साहित्यात येणाऱ्या आक्रस्ताळेपणा, बटबटीतपणा आणि सांकेतिकता या दोषांपासून अलिप्त राहिली आहे. ही कादंबरी म्हणजे व्यक्तिचित्रे आणि प्रसंगचित्रे यांची छोटी मालिका आहे. मंदिरासमोर होणारी खेचाखेच, लक्ष्मीचा असहाय्य आक्रोश, मंदिरातील ठाकुर व सूरजमणी भेट, दलितांच्या झोपडचांची जाळपोळ, त्यांचे उद्ध्वस्त जीवन, त्यानंतर लक्ष्मीला होणारा भास, सजनू-लछमन संघर्ष, सजनू-भिकू संघर्ष, ठाकुरसिंगाची हतबलता या सर्वांचे मुळात प्रत्ययकारी असणारे वर्णन प्र. श्री. नेरुरकर यांनी मराठीत समर्थपणे अनुवादित केले आहे. इंग्रजीतील दलित जीवनावर लिहिलेल्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या डॉ. मुल्कराज आनंद यांच्यासारख्या लेखकाच्या यशस्वी कादंबरीचा आता अनुवादरूपाने मराठी वाचकांना परिचय होत आहे, ही स्वागतार्ह घटना आहे.

कोणत्याही परभाषेतील कलाकृतीचा यशस्वी अनुवाद ही अवघड गोष्ट असते. त्यातही इंग्रजीपेक्षा एखाद्या भारतीय भाषेतील ग्रंथाचा अनुवाद तुलनात्मक-दृष्टचा सोपा म्हटला पाहिजे. आशयानुरूप नेमकी भाषा वापरून मूळ भाषेचा रंग तिच्या सूक्ष्म छटांसह अनुवादात आणणे, अनुवाद हा अनुवाद आहे असे वाचकांना भासू न देणे, यात अनुवादकाचे कौशल्य असते. (अनंतमूर्ती या कन्नड लेखकाच्या 'संस्कार' या कादंबरीचा र. शां. लोकापूर आणि वि. ग. कानिटकर यांनी केलेला मराठी अनुवाद किंवा चंद्रकांत बक्षी यांच्या गुजराथी भाषेतील 'पॅरालिसिस' या कादंबरीचा मोहन वेल्हाळ यांनी केलेला मराठी अनुवाद हे दोन उत्तम मराठी अनुवाद आहेत. गुजराथी भाषेचा आभास निर्माण व्हावा म्हणून गोपाळराव विद्वंस यांनी वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्यांची भाषांतरे करताना मूळ शीर्षकेही काही वेळा बदलून टाकली आहेत. 'हिरवा चाफा' गुजरातेत फारसा प्रसिद्ध नाही म्हणून गुजरातीत त्या नावाचा शब्दशः अनुवाद न करता नायिकेचे नाव 'सुलभा' हे कादंबरीचे शीर्षक म्हणून अनुवादात स्वीकारले आहे)

प्र. श्री. नेरुरकर यांनो 'रस्ता' या मूळ इंग्रजी कादंबरीतील काही पात्रे व प्रसंग कुशलतेने अनुवादिली आहेत. उदा. रुक्मिणीची व्यक्तिरेखा 'वाऱ्याने हलणाऱ्या रोपटचासारखी रुक्मिणीच्या देहाची लयबद्ध हालचाल झाली.' 'त्या वाडचाच्या परसात काळजीपूर्वक जोपासल्या जाणाऱ्या सूर्यफुलासारखी ती होती' 'गुरे हंबरत होती. ती त्यांना साथ देत होती. तिला जाणवलं तिच्या डोळचांच्या पापण्या उघडत होत्या आणि मिटत होत्या. तिचे ओठ थरथरत होते. तिचं अतरंग उचंबळत होतं. आपल्या भावी पतीला भेटावं अशी इच्छा तिला झाली होती.

काळोखात तिला भास होत होता.' 'तिने दीर्घ उसासा टाकला. कल्पनेची भरारी ही एक वेगळी गोष्ट होती, पण ती ज्या जमिनीवर बसली होती तिचं सत्यस्वरूप वेगळं होतं. खिडकीचे गज तिला भेडसावीत होते. तिला वाटलं, आपण पिंजऱ्यात अडकून पडलोत...'

असे सहजतेने भाषांतर करणाऱ्या अनुवादकाने कधी कधी मात्र इंग्रजी वाक्ये, वाक्प्रचार, शब्दसमूह, आज्ञार्थी वाक्ये यांचे शब्दशः भाषांतर केले आहे. उदा.– 'टॅमोटो नाक्या' ठाकुरसिंग, 'जाडनाक्या' धूलिसिंग, 'कुक्कुटनेत्र' रामानिवास या शब्दांमधील सामासिक शब्द ही शाब्दिक भाषांतरे आहेत.

काही वाक्ये– 'तुझ्या स्वतःच्या वासराचे दात तुला सोनेरी वाटतात.', 'माणूस माणसाकडे येतो. डोंगर डोंगराकडे येत नाही.', 'त्या पवित्र विहिरी-भोवतालचा भाग मृताप्रमाणे निःशब्द होता.', 'त्यांच्या ढोलकीवर त्यांनाच संगीत शिकवलंत!', 'ती कुत्री बदमाश आहेत. शिकारी कुत्र्यांच्या टोळक्यासारखी!', 'तो कोठीच्या बाहेर एखाद्या रात्रचोरासारखा बाहेर आला.' पुढील आज्ञार्थी वाक्ये शब्दशः भाषांतरे आहेत. मराठी बोलीभाषेत ती तशी वापरली जात नाहीत– 'तुला मरण येवो! भिकू कधीच कधी तुझी भरभराट न होवो.'

डॉ. मुल्कराज आनंद यांच्या इंग्रजी कादंबरीचा हा अनुवाद प्र. श्री. नेरुरकर यांनी दलित साहित्य व स्त्रीमुक्ती चळवळीत सामील झालेल्या तरुण लेखक-लेखिकांच्या आग्रहावरून पुस्तकरूपाने प्रसिद्ध केला आहे. या अनुवादामुळे मराठी दलित साहित्यात भर पडली आहे. दलित साहित्याला अधिक व्यापक आशय प्राप्त करू इच्छिणाऱ्या दलित साहित्यिकांना या अनुवादामुळे एक वेगळी दिशा मिळणार आहे.

रस्ता– मूळ इंग्रजी कादंबरीचे लेखक– डॉ. मुल्कराज आनंद.
मराठी अनुवाद– प्र. श्री. नेरुरकर
श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०.
(मुंबई सकाळ)

व्यक्तिविशेष

काही क्षण शब्दांकित केलेली व्यक्तिचित्रे

'चेहरे मोहरे' हा मधुकर केचे यांचा व्यक्तिचित्रणपर लेखांचा संग्रह आहे. आपल्या सहवासात आलेल्या व्यक्तींच्या जीवनात डोकावणे ही व्यक्तिचित्रणवजा लेखनामागील एक प्रमुख प्रवृत्ती आहे. या लेखनाद्वारे परिचित वा अपरिचित व्यक्तींच्या अंतरंगात सहज डोकावता येते. काही वेळा अशा व्यक्तींची थोडीफार माहिती आपणास आधी झालेली असते–तिचे दर्शन कुठे ना कुठे झालेले असते. पण व्यक्तीचा हा शोध कधीच संपत नाही. वि. द. घाटे किंवा पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या जातिवंत लेखकांनी जिवंत केलेल्या माणसांना आपण विसरू शकत नाही. याचे कारण त्यांनी स्वतःच्या पद्धतीने अन्य व्यक्तींचा घेतलेला तो एक शोध असतो. व्यक्तिचित्रणपर लिखाण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सोपेही असते. लेखकाला त्याच्या यशाची हमी आधीच मिळू शकते. कारण त्याने वर्णिलेल्या व्यक्तींविषयीच्या कुतूहलाची थोडीफार पूर्ती झाली, तरी वाचक पुरेसे समाधान मिळवू शकतो. मात्र याबरोबर काही धोकेही अशा तऱ्हेचे लेखन करू पाहणाऱ्या लेखकांच्या मार्गात असतात. लेखकाची भाबडी वृत्ती, त्याच्या स्वभावातील भावविवशता, स्तुती करण्याचा त्याला सतत होणारा मोह, यामुळे व्यक्तिचित्रणपर लेखन कृत्रिम व सांकेतिक ठरण्याचा संभव असतो. लेखकाने दुसऱ्या व्यक्तीचा शोध घेण्याऐवजी, तिच्या अंतरंगाचे थोडेफार का होईना दर्शन घडविण्याऐवजी त्याचे लिखाण हा केवळ स्तुतिपाठ ठरण्याची दाट शक्यता असते. निकटच्या मित्रांवर लिहिणेही काहीवेळा कठीण होत असते ते यामुळेच. वर्ण्य व्यक्ती जितकी जास्त जवळची तितकी लेखकावरील जबाबदारी वाढलेली असते. म्हणून लेखकाला आवश्यक असणारी अलिप्तता व्यक्तिचित्रणपर लेखनाचे वाङ्मयीन मूल्य वाढवीत असते.

'चेहरे मोहरे' या संग्रहात नऊ व्यक्तिचित्रे आहेत. यांपैकी पाच व्यक्तिचित्रणे बालकवी सोटे, राम शेवाळकर, जांबुवंतराव धोटे, कवी ग्रेस व बाजीराव पाटील यांची–म्हणजे केचे यांच्या जवळच्या मित्रांची आहेत. ह्या पाचजणांच्या रेखाटनामागे बराचसा मोकळेपणा आढळून येतो. केचे यांचे महाविद्यालयीन जीवन आणि त्यांचे हे मित्र यांचेही एक नाते आहे. त्यामुळेच महाविद्यालयीन जीवनातील विमुक्तपणा, बेछूटपणा, रंगेलपणा, खास वऱ्हाडी खादाडपणा, स्वप्नाळू वृत्ती या सर्वांचे दर्शन इथे होते. मधुकर केचे यांच्या मित्रांवरील या लिखाणात राम शेवाळकराचे व्यक्तिचित्र बरेच रेखीव आणि समतोलपणे उभे केले गेले आहे. कवी ग्रेस (माणिक गोडघाटे) बद्दल काहीशा भाबडेपणाने केचे यांनी पुढील शब्दांत आपली भावना व्यक्त केली आहे : लोकांना नेहमी दिसणारा तिरसट, तापट व एकलकोंडा माणिक मला नेहमी ऐकू आला, दिसला मात्र कधीच नाही. माझा

माणिक, माझ्या वाटघाला आलेला माणिक हा एखाद्या लेकरासारखा निरागस होता.' मित्राबद्दल भावना व्यक्त करताना प्रेयसीचे वर्णन करावे इतकी ती येथे हळवी झाली आहे. जांबुवंतराव धोटे हे लेखकाचे एक जुने मित्र. या जुन्या मित्रांच्या समवेत घालविलेल्या एका दिवसाचे वर्णन, असे 'जांबुवंतरावाचा एक दिवस' या लेखाचे स्वरूप आहे. वरकरणी जहाल तितकेच हळुवार, संवेदनाक्षम आणि सोशिक असे जांबुवंतरावांचे व्यक्तिमत्त्व या लेखात प्रतीत होते.

बाबा आमटे, सोपानदेव चौधरी, वि. द. घाटे आणि मराठीत शेर लिहिणारे श्री. पाटणकर या केचे यांनी जवळून पाहिलेल्या आणखी काही व्यक्ती. वि. द. घाटे यांच्या सहवासात घालविलेल्या चार दिवसांचे वर्णन 'पांढरे केस-हिरवे मन' या लेखात आहे. घाटेंसारख्या ज्येष्ठ साहित्यिकाविषयी (वस्तुतः कवीविषयी) वाटणारे कुतूहल आणि अल्पावधीत त्यांच्या स्वभावाचे झालेले आकलन यांना या लेखात स्थान मिळाले आहे. बाबा आमटेंसारख्या कर्मयोग्याकडून महारोग्यांची होत असलेली सेवा पाहून व त्यांच्या कार्यप्रणालीने प्रभावित होऊन निर्माण झालेल्या प्रतिक्रिया 'अपंगशाहीचे पंतप्रधान' मध्ये नोंदविलेल्या दिसून येतात. बाबा आमटे व वि. द. घाटे या दोघांवरील लेखांत केचे त्यांच्यापासून दूर राहून निरीक्षण करीत आहेत. तरीही या व्यक्तिचित्रदर्शनात फरक आहे. घाटे यांच्या रेखाटनात केचे घाटेंच्या जवळ असूनही त्यांच्या जवळ गेले आहेत असे वाटत नाही ! उलट बाबा आमटे यांच्या सेवाशील व्यक्तिमत्त्वाचे चित्र उभे करताना केचे त्यांच्या निकट गेले आहेत. महारोग्यांच्या सहवासात राहून आमटे यांनी जे नंदनवन निर्माण केले, त्याने केचे कमालीचे प्रभावित झाले आहेत. महारोगी जगत असलेले समृद्ध जीवन पाहून वाचकही आश्चर्यचकित होतो.

'चेहरे मोहरे' मधील या गद्यलेखनामागे मधुकर केचे यांचे व्यक्तिमत्त्व सतत उभे असलेले दिसते. जीवनातील मांगल्य व भव्यता यांच्या ठिकाणी नतमस्तक होणारे, स्वतःच्या जीवननिष्ठा जोपासणारे, भावूक आणि चिंतनशील असे केचे इथे दिसतात. सैल आणि गोष्टीवेल्हाळपणा हा त्यांच्या शैलीचा विशेष आहे. बाजीराव पाटलांच्या व्यक्तिचित्रणाच्या वेळी त्यांनी सांगितलेले किस्से गमतीदार आहेत. काहीवेळा सहजपणे एखादे विनोद वाक्य केचे लिहून जातात. उदा.-विदर्भात साधा सँडो बनियन जर नवा खरेदी केला तर तो सदऱ्याच्या आत न घालता बाहेर घालण्यात येतो. नवी वस्तू सर्वांना दिसेल अशी नाही पेहरली तर घ्यावयाची कशाला ? हे भाष्य किंवा या देशात मिडल स्कूल टीचर आणि राष्ट्रपती या दोन जागांना प्रमोशन नाही, हे विधान असले हास्य निर्माण करणारे आहे. 'शेवाळकर एक आहे फक्त', 'पांढरे केस-हिरवे मन,' 'तो आज कवी राजकवी' 'बाजीराव (शंभर टक्के)पाटील,' इ. शीर्षकेही समर्पक आहेत. अनुभवांतील विरोध केचे यांच्या

शैलीत जेव्हा उभा राहतो, तेव्हा ती त्यांचीच खास शैली असते. महारोग्यांच्या श्रमातून निर्माण झालेले भाज्यांचे ढीग पाहिल्यावर ते लिहितात–'त्या समृद्धीच्या जनकाने मला नमस्कार केला तेव्हा त्याच्या हातांना बोटेच नाहीत, हे माझ्या ध्यानात आले. एका ढिगाऱ्याकडून दुसऱ्या श्रीमंत ढिगाकडे जाताना जरा सावध चालला तेव्हा त्याचे तुटलेले पाय मला दिसले. देवाने दोन पाय, दोन हात अगदी शाबूत, सुदृढ दिलेल्या जगाचा मी प्रतिनिधी त्या अवयव हरवलेल्या प्राण्याकडे पाहत होतो...मी त्यांच्या थोटक्या हाताची कीव करावी ? कीव मी माझ्या सुदृढ देहाची केली...ते थोटे हात तर नंदनवन निर्माण करीत होते...मला तेथे शब्द गवसला 'अपंगशाही'! काही वेळा केचे भाषेकडे दुर्लक्ष करतानाही आढळतात. उदा. 'बाबा आमटे काही काळ नादुरुस्त होते;' 'अर्थात माणसाला मंगळसूत्र नसल्यामुळे माणिक विवाहित आहे की नाही ते मला कळले नाही.' या वाक्यात 'माणसाला' या शब्दाच्या ठिकाणी 'पुरुषाला' हा अब्द अभिप्रेत आहे. लेखकाच्या सैल शैलीतून निर्माण झालेला हा एक दोष आहे.

'चेहरे मोहरे' या व्यक्तिचित्रांच्या संग्रहात केचे यांच्या परिचयातील व्यक्तींचे अंतरंग जसे दिसते त्याचप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही रंग पण. अशा व्यक्तिचित्रांचे लेखन यापूर्वी पुष्कळदा पुष्कळांनी अनेक प्रकारे केले आहे. वाङ्मयीन व्यक्तीच्या सहवासातले लेख, राजकीय पुढाऱ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारे लेख,असे स्वैर लेखन मधून-मधून होतच असते.त्या दृष्टीने 'चेहरेमोहरे' हा अशा संग्रहांपैकी एक संग्रह म्हणायला हवा. अशी व्यक्तिचित्रे व संपूर्ण चरित्रे यांत काही साम्य दिसणे अपरिहार्य आहे. ही व्यक्तिचित्रे चरित्रांच्या हेतूने लिहिलेलीच नसतात. जसा निबंध व लघुनिबंध हे वरवर सारखे शब्द दिसले, तरी त्यांची जातच वेगळी असते, तसेच चरित्राचे व व्यक्तिचित्राचे असते. व्यक्तिचित्रे ही वैयक्तिक प्रतिक्रिया असते. वैयक्तिक अनुभव असतो. त्यामुळे व्यक्तिचित्रे ललितशैलीने लिहिली जाणारी ललितचरित्रे ठरतात. 'चेहरेमोहरे' ही ललित शैलीने लिहिलेली ललितचरित्रे आहेत. या चरित्रात काही क्षणच शब्दांकित करण्याचा यत्न असतो. म्हणून अशा पुस्तकाचे यश ते क्षण नेमके पकडून त्यांना शब्दरूप देण्यात असते. असे शब्दरूप देण्यात 'चेहरेमोहरे' या व्यक्तिचित्रांच्या संग्रहात मधुकर केचे यांना यश मिळाले आहे.

चेहरेमोहरे– मधुकर केचे
किर्लोस्कर प्रकाशन, पुणे.
(आलोचना)

हृदयस्पर्शी व्यक्तिचित्रण– वसंत बापटांचे 'जिकुनि मरणाला'

सुभाष अवचट यांचे सुंदर मुखपृष्ठ व ना. ग. गोरे यांची मर्मग्राही प्रस्तावना असलेले प्रा. वसंत बापट यांचे 'जिकुनि मरणाला' हे व्यक्तिचित्रणपर लेखांचे पुस्तक आहे. यातील काही लेख मृत्यूलेख आहेत आणि काही लेख व्यक्तिविशेषांवर आहेत. या लेखासंबंधीची निवेदनातील भूमिका अशी–

"या पुस्तकातले सर्व लेख व्यक्तिविशेषांवर लिहिलेले आहेत, केवळ व्यक्तीवर नव्हेत. म्हणून तर ते वेळोवेळी 'साधना, 'लोकसत्ता' अथवा 'महाराष्ट्र टाइम्स' अशा पत्रांतून प्रसिद्ध झालेले आहेत. लेखविषय झालेली माणसे मला जवळची खरी, पण ही सगळी माणसे मोठी होती आणि त्यांच्या व्यक्तित्वाचा ठसा माझ्यावर उमटला तसा आणखीही किती एक माणसांवर उमटला असेल. पण यातही एक गंमत अशी असते की 'ठसा' उमटला तरी तो एकाकार, एकरूप एकरंग नसतोच. किंवा असेही म्हणता येईल की या सर्व मोठ्या माणसांकडे मी माझ्या चष्म्यातून पाहिलेले आहे."

वसंत बापटांना त्यांच्या आयुष्यात भेटलेली ही माणसे वेगवेगळ्या थरांतील, क्षेत्रातील स्वत:चे खास सामर्थ्य असलेली आहेत. लेखकाने स्वत:च्या चष्म्यातून त्यांना पाहिले असले तरी ती शब्दबद्ध होताना वेगवेगळी रूपे घेताना दिसतात. या मर्मस्पर्शी व्यक्तिरेखांत महात्मा गांधींसारखा युगात्मा आहे. माटे-नारळकरांसारखे अध्यापक आहेत. बालगंधर्वांसारखा नटसम्राट आहे, बॅरिस्टर नाथ पैंसारखा लेखकाचा मित्र व युवा नेता आहे, आबाबेन देशपांडेंसारखी राष्ट्रसेवादलाच्या कलापथकातली निकटवर्ती सहकारी व मैत्रीण आहे. सेनापती बापट, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, डॉ. वसंतराव अवसरे यांच्यासारख्या स्वत:ला जीवनसंग्रमात झोकून देणाऱ्या मनस्वी व कलंदर व्यक्ती आहेत. आचार्य अत्रेंसारख्या चतुरस्त्र व बलदंड माणूस आहे. आणि साने गुरुजींसारखा मातृहृदयी जीवनसाधक आहे.

वसंत बापटांनी जवळून पाहिलेल्या या व्यक्तींशी असलेले त्यांचे नाते एकाच प्रकारचे नाही. तसेच विशिष्ट हेतू ठेवून लेखन केल्यामुळे काही व्यक्तिचित्रणात सापेक्ष फरक पडला आहे. साने गुरुजींवरील 'साने गुरुजींची जीवनसाधना' हा लेख गुरुजींच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा लेख ठरला आहे. 'अखेरचे पर्व' हा लेख महात्मा गांधींवरील लेखात फाळणीपूर्वीच्या राजकारणात अगदी एकाकी पडलेल्या युगात्म्याच्या दु:खद अंताची करुण कहाणी आहे. माटे-नारळकरांच्या शिक्षकी व्यक्तिविशेषांचा परिचय करून देणाऱ्या लेखकाने 'एका गाणाऱ्या राजहंसाची गोष्ट' या बालगंधर्वांवरील लेखात मराठी नाट्यसृष्टीचा धावता आढावा घेतला आहे. प्रसंगपरत्वे लिहिलेल्या या लेखांची उद्दिष्टे वेगळी

असल्यामुळे असे घडले असावे. 'अखेरचे पर्व' हा लेख 'युगात्मा' या संपादित पुस्तकासाठी मागवून घेतलेला लेख आहे. या लेखाच्या स्वीकृतीसंबंधी निवेदनात म्हटले आहे, 'व्यक्तिशः गांधीजी मला जवळचे होते का...या प्रश्नाचा निर्णय मी विचारान्ती केलेला आहे. मला वाटते, माझ्या पिढीमधल्या असंख्याकांचे गांधीजी निकटवर्ती आप्तच होते.' नैमित्तिकतेमुळे या संग्रहातील काही लेखांचे स्वरूप काहीसे वस्तुनिष्ठ राहिले आहे.

प्रा. वसंत बापटांनी १९४२ साली ऐन तारुण्यात स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आसुसलेल्या त्यांच्या युवामनाने ती बेहोशी पुरेपूर अनुभवली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रसेवादल व साधना साप्ताहिकाच्या प्रकाशनाच्या कार्यात मनापासून भाग घेतला. या वीस-पंचवीस वर्षांच्या काळात रावसाहेब पटवर्धन, बॅरिस्टर नाथ पै, आवाबेन देशपांडे, डॉ. अवसरे, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, सेनापती बापट ह्या व्यक्तींना जवळून पाहण्याची संधी त्यांना मिळाली. या सर्व व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वास स्वतःचे असे कंगोरे आहेत. स्वतःचे गुणदोष, मते व आग्रह, आवडी-निवडी, हर्ष-खेद असलेली हाडामांसांची माणसेच आहेत. त्यांच्या-जवळ गेल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कधी नाजूक, उग्र-कठोर तर कधी सूक्ष्म आणि भावस्पर्शी पैलू कलावंत बापटांना जाणवले. या सर्व व्यक्तींवरील लेख म्हणजे लेखकाचे 'हृदयीचे गुज' आहे. त्यातही नाथ पै व आवाबेन देशपांडे ही दोन माणसे म्हणजे लेखकाच्या 'जीवींचे जिवलग.'

'प्रिय मित्र नाथ' हे रूढ अर्थाने व्यक्तिचित्र नव्हेच. अकाली गेलेल्या या मित्राशी लेखकाला त्याच्या बेदरकार प्रवृत्तीबद्दल हजेरी घेण्यासाठी खूप भांडायचे होते. पंचवीस वर्षांत तसे भांडायला जमत नाही म्हणून त्याच्या मृत्यूनंतर केलेला हा 'स्वगतपत्रा' चा प्रपंच. हा पत्ररूप लेख म्हणजे कवी बापटांचा गद्यकाव्यात्म आविष्कार आहे. तर 'चैतन्याची पुतळी हरपली' हा आवाबेनवरील लेख एका जवळच्या मैत्रिणीचे विविध प्रसंगांतून रेखाटले गेलेले सजीव व्यक्तिदर्शन आहे. जाईल तेथे आपले सिंहासन बरोबर घेऊन जाणारा व आपली 'स्वयमेव मृगेंद्रता' जपणारा, राजकारणात राहूनही मनातला 'माणूस' सांभाळणारा, माणसांचा हव्यास बाळग-णारा पण लोकसंग्रहाचे बेरकी अंदाज न बांधणारा, थोरपणात पोरपण न जपणारा, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातल्या वादळाला न जुमानणारा, कॅप्टन ओ कॅप्टन कर्तव्य... करीत देह ठेवणाऱ्या मुलासारखा मृत्यूला कवटाळणारा लेखकाचा मित्र नाथ मैफल सोडून सभेला जायचा, असे हे जग आकस्मिकपणे सोडून जातो. मध्यरात्री फोन खणखणला की अजूनही लेखकाच्या छातीत धस्स होतं आणि त्याला वाटतं, पलीकडून कुणीतरी म्हणेल, 'नाथ गेला!'

पारशी कुटुंबातील आवा सेवादलातल्या परिचयामुळे वासू देशपांडेशी लग्न

झाल्यानंतर आवाबेन देशपांडे होते. आवाबेन म्हणजे मूर्तिमंत चैतन्य. जबरदस्त आत्मविश्वास असलेली, कुशलतेने माणसे जोडणारी, पुरुषी अहंकारापुढे नमते न घेणारी, भांडण होऊनही थोड्याच वेळात अगदी निर्लेपतेने खळाळून हसणारी, सासरच्या माणसांचे सर्व करून देशपांडेंच्या मराठी कुटुंबाशी पूर्ण सायुज्य साधणारी, रक्ताच्या नात्यात व स्नेहाच्या नात्यात फरक न करणारी लेखकाची ही मैत्रीण एका सकाळी अकल्पितपणे हे जग सोडून जाते. 'ईश्वर नाही' या आवाच्या श्रद्धेला आवाच्या व्याधीने बळकटी आणली, असे लेखकाला वाटते आणि तो प्रश्न विचारतो, "जर ईश्वर असता तर त्यानं आवाला कर्करोगाचा शाप कसा दिला असता? केवळ कर्तुमकर्तुंसत्ता असलेल्या विराट अंधशक्तीला माणूस ईश्वर म्हणत नाही." या हृद्य व्यक्तिचित्राचा शेवट होतो– "अंध आणि अतर्क्य नियतीनं आवाला उचलून नेलं. आयुष्यभर उंच उसळत राहिलेलं कारंजं अखेर कोसळलं. एका शानदार सूर्यफुलाचे नियतीनं हालहाल केले, पाकळी पाकळी सावकाश खुडून टाकली. अशी रोशनी मिटवणारे हात ईश्वराचे खास नव्हते; असले तर आवा त्यालाही खडसावीत असेल, "तुम्ही असा कारभार करता?"

आचार्य अत्रे म्हणजे महाराष्ट्रातील एक वादळी व्यक्तिमत्त्व. अत्रे-बापटांमधील एकेकाळचे सख्य व नंतरच्या काळातील दुरावा महाराष्ट्रातील साक्षेपी वाचकांना पूर्णपणे ज्ञात आहे. अत्रेंच्या कठोर लेखणीचा बळी झालेल्या बापटांनी 'एक वटवृक्ष उन्मळला' या अत्रेंवरील लेखात त्यांच्या महान गुणसंपदेबरोबर त्यांच्यातील दोषांची जाणीव करून दिली आहे. लेखकाचे औदार्य प्रकट करणाऱ्या लेखाचा शेवट विरोध लयीतून होतो. 'आपला निर्भय आणि समर्थ कैवारी गेला ह्या भावनेने मराठी जनतेत दुःखाचा हलकल्लोळ उडावा हे स्वाभाविक आहे. आघात मोठाच आहे.' 'एक फुलझाड कोमेजले; नाही, एक वटवृक्ष उन्मळला, एक खांब कलथला; नाही, एक पिरॅमिड उद्ध्वस्त झाला. एक युगंधर निघून गेला आणि काही काळ मराठीचिये नगरीला भग्न विजयनगरची कळा आली.' (पृष्ठ १०४)

वसंत बापट मूळचे कवी. गद्यलेखनातही आपली काव्यात्म वृत्ती जपणाऱ्या त्यांच्या शैलीत ओघ, वक्तृत्व नाटचपूर्णता, सूचकता, चित्रदर्शित्व, खटकेबाजपणा, व विरोध, उपरोध, उपमा–उत्प्रेक्षा-रूपकादी अलंकार यांचे मिश्रण झाले आहे. 'एक वडील पुरुष गेला', 'एका गाणाऱ्या राजहंसाची गोष्ट' 'राऊसाहेब– पहिले आणि शेवटचे', 'चैतन्याची पुतळी हरपली', 'डॉक्टर नावाचा कवी', 'संन्याशाचा संसार संपला' या शीर्षकांतून वर्ण्य व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व उभे राहते. (साहित्यसम्राट न. चिं. केळकरांवरील लेखाला 'रसिकांचा राजा गेला' ह्या प्रा. माटे यांनी दिलेल्या अर्थपूर्ण शीर्षकाचे इथे स्मरण होते.)

प्रा. वसंत बापटांचे हे बारा 'चरितनिबंध' प्रस्तावनाकार ना. ग. गोरे यांनी दार्जिलिंगच्या लोपचू पत्तीचा चहा घ्यावा तसे घुटके घेत घेत वाचले. चहा ढोसायचा नसतो. जिभेने, नाकाने चाखायचा असतो. डोळ्यांनी कुरवाळायचा असतो. हे लेख वाचत असताना गोरेंच्या शरीरावर पुराणे रोमांच पुन्हा शहारले, पुराणी आसवे पापण्यांवर ओथंबली. कोणत्याही लेखनाने मन पुलकित झाल्याचा अनुभव आला की त्या लेखनाच्या यशस्वीतेची वेगळी पावती देण्याचे कारण नाही असेही गोरेंना वाटते.

ना. ग. गोरे हे बापटांच्याच परिवारातले. त्यामुळे या लेखनाने त्यांना पुलकित केले. किंबहुना अधिक तीव्रतेने पुलकित केले यात आश्चर्य नाही. परंतु 'जिकुनि मरणाला' मधील मर्मस्पर्शी लेख सर्वच सहृदय वाचकांना पुलकित करणारे, आनंद देणारे आहेत.

जिकुनि मरणाला–वसंत बापट
साधना प्रकाशन
(मुंबई सकाळ)

उत्कट भावबंध जोपासणाऱ्या दोन मित्रांची भावगाथा– 'खांडेकर : मित्र आणि माणूस'

वा. रा. ढवळे आणि सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर चाळीस वर्षांचे मित्र. वा. रा. ढवळे 'ज्योत्स्ने' चे संपादक होते त्या वेळी त्यांचा खांडेकरांशी लेखक संपादक म्हणून परिचय झाला आणि या परिचयाचे पुढे गाढ मैत्रीत रूपांतर झाले. वि. वा. शिरवाडकर यांनी १९६८ साली वा. रा. ढवळे यांना वि. स. खांडेकरांचे चरित्र लिहिण्याची विनंती केली. परंतु खांडेकर आपले चरित्र लिहीत आहेत हे माहीत असल्यामुळे ढवळेंनी खांडेकरांचे चरित्र लिहिले नाही. वा. रा. ढवळे यांनी प्रसंगविशेषी खांडेकरांवर विविध नियतकालिकांतून आणि गौरवग्रंथातून लिहिले होते. खांडेकरांच्या निधनानंतर हे सर्व लेख संकलित-संपादित करावे असे ढवळेंना वाटले आणि त्यातूनच 'खांडेकर : मित्र आणि माणूस' या पुस्तकाची निर्मिती झाली. 'प्रवेशद्वारावर' या प्रस्तावनेत ढवळे लिहितात– "मात्र भाऊसाहेबांच्या निकट सान्निध्यात येण्याची संधी जवळजवळ चाळीस वर्षांत अनेकदा लाभलेली असल्यामुळे त्यांच्या ऋजू, सात्विक व ध्येयवादी स्वभावाची जी

छाप माझ्यावर पडली होती, तिचा आलेख रेखाटण्याचा एक अल्पसा प्रयत्न 'खांडेकर : मित्र आणि माणूस' या प्रस्तुत पुस्तकात मी केला आहे. पर्यायाने श्री. खांडेकरांचे चरित्रही स्थूलमानाने त्यात आले आहे."

या पुस्तकात संग्रहित झालेले सर्वच लेख व्यक्तिरेखाटनावर नाहीत. काही लेखांत खांडेकरांच्या वाङ्मयीन कामगिरीचा परिचय करून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे पुस्तकातील लेखांच्या शेवटी वि. स. खांडेकरांनी वा. रा. ढवळे यांना पाठविलेली चौदा पत्रे समाविष्ट केली आहेत.

खांडेकरांना जवळून पाहिलेल्या लेखकाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक गुण-विशेष शब्दबद्ध केले आहेत. ज्योत्स्नाचे प्रमुख संपादक असूनही खांडेकरांनी आपला अधिकार कधीही गाजविला नाही. केवळ पत्रातून अतिशय नम्रतेने आणि ऋजुतेने ढवळेंना काही सूचना त्यांनी केल्या आहेत. खांडेकरांनी सामाजिक प्रगतिपर विचार आपल्या लेखनातून मांडले नाहीत तर प्रत्यक्ष आपल्या जीवनात त्यांचा स्वीकार केला. सावंतवाडीसारख्या लहानशा गावात साठ-सत्तर वर्षांपूर्वी जातिभेद पाळला जात असे. खांडेकरांच्या स्नेह्यांत अ. बा. वालावलकर हे कुडाळदेशकर ब्राह्मण होते तसेच वेदपाठशाळेचे प्रा. अळवणी यांचे चिरंजीव चिंतामणी हेही होते. चिंतामणीच्या लग्नाच्या वेळी झालेल्या भोजन समारंभात सर्व मित्र एकत्रच जेवायला बसले. तेव्हा सावंतवाडीच्या शाळेचे मुख्याध्यापक बाबा बाकरे यांना हा 'भ्रष्टाचार' सहन झाला नाही. ब्राह्मणवर्ग प्रक्षुब्ध झाला असतानाही अल्पवयीन खांडेकरांनी दाद दिली नाही. आपल्या मित्राला पंक्तीत घेण्याचा आग्रह धरला. या घटनेवर 'उद्यान' मासिकात लेख लिहिला आणि अब्रुनुकसानीच्या खटल्यास तोंड दिले. वरवर दुबळ्या वाटणाऱ्या खांडेकरांमधील आंतरिक शक्तीचा आणि निग्रहाचा प्रत्यय देणारा प्रसंग लेखकाने वालावलकरांच्या लेखी पुराव्यानिशी उभा केला आहे. खांडेकरांना लेखक म्हणून प्रसिद्धी मिळाल्यावर ते पहिल्यासारखेच कुटुंबवत्सल, प्रेमळ सद्गृहस्थच राहिले. यशाची नशा त्यांना चढली नाही. नवीन प्रयोग करणारे म्हणूनच लेखक, संपादक, प्रकाशक, या सर्वांना मदतीचा आणि सहकार्याचा हात ते सतत देत राहिले. त्यांनी मानधनासाठी कधीही घासाघीस किंवा खळखळ केली नाही. ललितलेखक असणारे खांडेकर टीकाकारही होते. आपल्या आस्वादपूर्ण टीकेने त्यांनी अनेक नवोदित प्रतिभावंतांना दिलासा दिला. लेखक आणि वाचक यांना ग्रंथपरिचयाद्वारे जवळ आणले. आगरकर, शि. म. परांजपे, केशवसुत, कोल्हटकर, केळकर, वा. म. जोशी, दिवाकर कृष्ण, भा. रा. तांबे, यशवंत, कुसुमाग्रज, बोरकर यांच्यापासून तो गंगाधर गाडगीळ, कुसुमावती देशपांडे यांच्यासारख्या अलीकडच्या लेखक-लेखिकांच्या वाङ्मयाचे जे रसग्रहण आणि मूल्यमापन केले ते त्यांच्या चिरतरुण व उत्साही मनाच्या आस्वादक रसिक-

तेचे द्योतक म्हटले पाहिजे. वा. रा. ढवळे यांनी खांडेकरांच्या रसिकतेची विपुल उदाहरणे दिली आहेत. ज्योत्स्नाच्या अगदी सुरुवातीच्या काळात कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाची सर्व प्रकारची आर्थिक जबाबदारी पत्करून त्यांनी तो प्रसिद्ध करविला, एवढेच नव्हे तर त्या संग्रहाला सुंदर प्रस्तावनाही लिहिली. या घटनेत खांडेकरांची सहानुभूती, रसिकता आणि दिलदारपणा दडलेला आहे. वा. रा. ढवळे आणि वि. स. खांडेकर यांच्या मैत्रीचे स्वरूप केवळ वाङ्मयीन स्वरूपाच्या मैत्रीचे नव्हते. दोघांच्या भावसंबंधात अकृत्रिम जिव्हाळा, आपलेपणा आणि परस्परांविषयीची मन:पूर्वक कळवळ होती. म्हणूनच कोल्हापूर सोडताना खांडेकर आवर्जून भुईमुगाच्या शेंगांची पिशवी ढवळचांना पाठवून देतात, ढवळचांच्या मुलांची, कुटुंबियांची चौकशी करतात. खांडेकर प्रकृतीची पत्रातून केवळ विचारपूस करीत नाहीत, तर काळजीही घ्यायला सांगतात. इतरांविषयी वाटणारी कणव हा खांडेकरांच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. कवी माधवराव पटवर्धनांचा आजार केवळ साधासुधा काविळीचा आजार नाही हे लक्षात येताच, खांडेकर त्यांना मिरजेला डॉ.भडकमकरांकडे घेऊन जातात. खांडेकरांच्या पत्नीचे– उषाबाईंचे १९५८ साली रक्तदाबाच्या विकाराने अकाली निधन होते. त्या वेळी खांडेकरांना साठ वर्षे पूर्ण झालेली असतात. मुलाबाळांना संभाळायची जबाबदारी वाढलेली आणि स्वत:च्या मनाला एकाकीपणा व उदासीनता आलेली असते. अशा अवस्थेत ते वा. रा. ढवळचांना लिहितात– "मुलांचे संगोपन पिता नि माता या दोन्ही नात्याने मलाच केले पाहिजे. मीच धीर सोडला तर मुलामुलींचे सांत्वन कोण करील ?" तर एकदा ते म्हणतात–"वामनराव, पत्नी असली म्हणजे आपल्या शरीराला कुठे दुखते, मनाला काय खुपते हे तिला मोकळेपणाने सांगता येते. पण आपल्या मुलांजवळ ते बोलता येते काय ?" मराठीतील एका श्रेष्ठ लेखकामधील दु:खाने कातर आणि व्याकुळ झालेला एक पिता या उद्‌गारातून शब्दबद्ध झाला आहे. खांडेकरांना जसा अकृत्रिम जिव्हाळा ढवळचांविषयी वाटतो तसाच जिव्हाळा ढवळचांना खांडेकरांविषयी वाटतो. बुद्धिमान असलेल्या खांडेकरांना त्यांच्या शिक्षणाच्या वेळी अलीकडच्या काळात जशी शैक्षणिक मदत मिळते तशी मिळाली असती, तर त्यांच्या बुद्धिमत्तेचे चीज झाले असते, असे स्वत:चे मत ढवळचांनी नमूद केले आहे. खांडेकरांविषयी परिचय होण्यापूर्वी एक वाचक म्हणून ढवळे त्यांचे चाहते होते. १९३१ साली यशवंत मासिकात लेखकांच्या नावाचा उल्लेख नसलेल्या कथा प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यातील खांडेकरांची कथा ढवळचांनी बरोबर ओळखली होती. यात ढवळचांच्या साक्षेपी रसिकतेचा प्रत्यय येतो. वयोमानामुळे काहीसे विकल झालेले हे दोन मित्र शेवटी शेवटी एकमेकांची खूप काळजी वाहताना दिसतात. खांडेकरांची प्रकृती बिघडल्यावर, अंगावर रॅश उठू लागल्यावर आणि

ते परावलंबी झाल्यावर आपल्या पत्नी शांताबाई यांना शुश्रूषेसाठी कोल्हापूर येथे पाठवून द्यावे काय, असे ढवळे पत्रातून खांडेकरांना विचारतात. वस्तुतः उतारवयीन ढवळचांनाही शांताबाईंचे मुंबईत असणे आवश्यक असते. एक मित्रकर्तव्य बजावण्याचा ते प्रयत्न करतात आणि खांडेकरही त्यांच्या भावना न दुखावता अतिशय ऋजू शब्दात ढवळचांना हा पर्याय पुढे ढकलण्याविषयी सुचवितात.

वा. रा. ढवळे यांचे खांडेकरांशी प्रथम नाते एक वाचक, सहकारी संपादक, लेखक आणि समविचारामुळे आणि आंतरिक ऊर्मी यामुळे निर्माण झालेला जवळचा मित्र असे आहे. १९३५ नंतर वि. स. खांडेकरांना साहित्यक्षेत्रात अमाप प्रसिद्धी मिळाली. अनेक मानसन्मान त्यांच्या वाटचाला आले. साहित्यप्रेमी वा. रा. ढवळे आणि कलावंत वि. स. खांडेकर यांचे नाते समानधर्मामुळे शेवटपर्यंत केवळ मैत्रीचेच राहिले.

खांडेकर-माडखोलकरांच्या पिढीतील लेखक-संपादक एकमेकांना विस्तृत पत्रे पाठवीत. वि. स. खांडेकर आणि वा. रा. ढवळे यांचा पत्रव्यवहार जवळजवळ चाळीस वर्षे सातत्याने चालू होता. 'दीपगृह' या पत्रसंग्रहात वि. वा. पत्की यांनी खांडेकरांची वाङ्मयासंबंधीची निवडक पत्रे घेतली आहेत. वा. रा. ढवळे यांनी आपल्या पुस्तकात 'मित्र आणि माणूस' या दृष्टीने खांडेकर कसे दिसतात, हे सूचित करणारी पत्रे निवडली आहेत. खांडेकरांचा कौटुंबिक जिव्हाळा आणि माणसांसंबंधी स्नेहादर कशा स्वरूपाचा हे व्यक्त करणे, हा या पत्रांच्या निवडीमागे लेखकाचा हेतू आहे.

खांडेकरांनी अनेक समकालीन स्नेही, रसिक, जिज्ञासू, वाचक, अभ्यासक यांना मनःपूर्वकतेने विस्तृत पत्रे लिहिली. या विविध पत्रांत त्यांनी आपली सुखदुःखे, आजार यांची चर्चा केली आहे. तसेच आपले वाङ्मयीन संकल्प, वाङ्मयीन प्रश्न यांचे विवरण मोकळेपणाने केले आहे. प्रांजलपणा, पुरोगामी विचारांचे प्रतिबिंब, सौंदर्यलालसा आणि निरागस मनाचा आविष्कार ही खांडेकरांच्या पत्रलेखनाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. अमरावतीचे शरदचंद्र सिन्हा पन्नास हजार रुपये खर्च करून खांडेकरांवर माहितीपट काढणार होते. हा माहितीपट कलादृष्ट्या यशस्वी झाला असता तरी व्यावहारिकदृष्ट्या फसला असता, अशी खांडेकरांची ठाम खात्री होती. या माहितीपटासाठी साहित्य संघाला आर्थिक संकटात टाकण्याची त्यांची इच्छा नव्हती म्हणून या माहितीपटाच्या योजनेला नम्र व ऋजू स्वभावाच्या खांडेकरांनी पत्रातून परखडपणे नकार दिला.

या पुस्तकातील पत्रे १९७१–७६ या पाच वर्षांच्या कालावधीतील आहेत. या काळात ज्ञानपीठ पारितोषिक आणि इतर सन्मान त्यांच्या वाटचाला आले असले तरी शारीरिक व्याधीमुळे ते पुरते जर्जर झाले होते. यामुळे या काळातील

पत्रात आपल्या क्षीण प्रकृतीचा उल्लेख ते वारंवार करतात. १९५० नंतरच्या साहित्याचा टीकाकार म्हणून विशेष अभ्यास नसल्यामुळे आपण परिसंवादात भाग घेऊ शकत नसल्याचा उल्लेख त्यांनी एका पत्रात केला आहे. डॉ. पटवर्धन चालवीत असलेले अमरावतीचे 'विदर्भ महारोगी सेवा मंडळ' ही खांडेकरांच्या समाजप्रवण मनात स्थान असलेली, त्यांना आवडणारी एक संस्था. पन्नाशीच्या आधी ही संस्था पाहता आली असती तर तेथील स्त्रीजीवनावर आपण कादंबरी लिहू शकलो असतो. पण ते न जमल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली आहे. एका कार्यक्रमाद्वारे ५८२ रु. ची रक्कम या संस्थेला देणगी म्हणून त्यांनी पाठवून दिली आहे. मुंबई महानगरपालिकेने सत्कार केला तेव्हा त्यांच्या जाण्या-येण्याची व्यवस्था केली गेली नाही या घटनेच्या बाबतीत वा. रा. ढवळे यांनी त्यांना केवळ विचारले म्हणून केलेला खुलासा खूपच बोलका आहे. "तुम्ही विचारलेत म्हणून मी लिहिले. अन्यत्र कुठेही बोललो नाही. बोलण्याची जरुरी नाही. आपले सार्वजनिक जीवन अजून फार उथळ, याची जाणीव पहिल्यापासूनच आहे." प्रकाशक देशमुखांनी त्यांची नेण्या-आणण्याची व्यवस्था केली. या संदर्भात ते पुढे लिहितात "देशमुख पती-पत्नींनी घरच्या गाडीने येऊन खर्च घेणे परवडणार नाही. मलाही ते गैर वाटते. सध्याचा जमाना निराळा आहे हे मी जाणतो. पण आयुष्याच्या या शेवटच्या प्रहरात प्रवाहपतित होणे मला जागेपणी काय स्वप्नातही आवडणारे नाही. साहित्य संघाकडूनही माझी काही अपेक्षा नाही. तेव्हा ही गोष्ट तुम्ही आपण दोघांमध्येच ठेवावी. तिची वाच्यता होण्यापासून कुठलाच फायदा नाही. तुम्ही विचारले म्हणून हा खुलासा केला. अशा गोष्टी आपल्या सामाजिक नीतीवर प्रकाश टाकू शकतात एवढेच!"

या पुस्तकातील आधीच्या लेखांचे नंतर संकलन झाल्यामुळे काही लेखांत पुनरावृत्ती झाली आहे. तरीही या लेखनाचे मूल्य नाकारता येत नाही. वा. रा. ढवळे यांच्या व्यक्तिचित्रणपर लेखात खांडेकर जसे दिसतात तसेच ढवळचांच्या स्वभावाचे काही पैलूही दृग्गोचर होतात. पुस्तकातील निवेदन एक मित्राविषयीचे, एका माणसाविषयीचे निवेदन राहत नाही, उत्कट भावबंध जोपासणाऱ्या दोन मित्रांची, दोन सुहृदांची, दोन माणसांची ती वेधक 'भावगाथा' बनते!

खांडेकर : मित्र आणि माणूस– वा. रा. ढवळे,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे– ३०
(मुंबई सकाळ)

'न पुसणारे ठसे'– वेधक व्यक्तिचित्रे

प्रमिला संघवी समाजवादी पक्षातील कार्यकर्ते प्रभुभाई संघवी यांच्या पत्नी. सामाजिक कार्याची, विशेषकरून अध्यापनाची आवड असलेल्या प्रमिलाबाई ह्या लेखिका नाहीत. तरीही प्रसंगपरत्वे गेल्या बारा-तेरा वर्षांत त्यांनी व्यक्तिचित्रणपर लेखन केले. या लेखनाचा संग्रह म्हणजे 'न पुसणारे ठसे' हे पुस्तक.

या पुस्तकात कस्तुरबा गांधी आणि सरोजिनी नायडू यांच्या व्यक्तिरेखा आहेत, त्याचप्रमाणे त्यांनी जवळून पाहिलेले 'अण्णा' म्हणजे एस. एम. जोशी, बाईंचा मोठा भाऊ बाबा, सासूबाई बा, सेवादलातला सहकारी भास्कर आठल्ये, मैत्रीण मालूताई वडके, लीलाधर हेगडयांचे मोठे बंधू बाबूराव हेगडे, परिचित मुख्याध्यापिका मुळचेबाई, भारतात स्थायिक झालेले जर्मन मिशनरी फादर प्रॉक्ट (फादर प्रकाश) इत्यादींची व्यक्तिचित्रे आहेत.

'कस्तुरबा– एक समर्पित जीवन' आणि 'भारताची बुलबुल' या दोन व्यक्तिचित्रांत फरक आहे. सरोजिनी नायडूंचा परिचय असे 'भारताची बुलबुल' या लेखाचे स्वरूप आहे, तर कस्तुरबांचे व्यक्तिचित्र म्हणजे कस्तुरबा आणि बापूजी यांच्या भावजीवनाचा हळुवार आलेख आहे. पतीच्या इच्छेखातर आपल्या कौटुंबिक जीवनाच्या कोषांचे तंतू कस्तुरबांनी कसे तोडून टाकले, आपल्या व्यक्तिजीवनाचा समाजजीवनाशी सांधा जोडताना त्यांनी समजूतदारपणा आणि अलौकिक क्षमाशीलता कशी दाखवली, याचे हृद्य चित्र या स्वभावरेखेतून उभे राहते. कमोड साफ करताना बापूंच्या रागाला बळी पडलेल्या, बापूंच्या उपोषणकाळात जवळच्या सर्व चीजवस्तू गरिबांना वाटून टाकणाऱ्या, त्यांची सेवाशुश्रूषा करणाऱ्या, सौभाग्याच्या काळजीने बेचैन होणाऱ्या, धर्मांतर करणाऱ्या आपल्या मुलाला 'तू चांगला मुस्लिम हो,' असे आर्ततेने सांगणाऱ्या, आयुष्याच्या उतरणीवर बापूंबरोबर पाचव्या इयत्तेतील कविता म्हणणाऱ्या कस्तुरबा अशी कस्तुरबांची विविध रूपे या लेखात साकारली आहेत. "माझ्या बाहुपाशात शेवटचा श्वास सोडण्याची कस्तुरबांची इच्छा पूर्ण झाली. परंतु तिच्याशिवाय मी माझ्या जीवनाचा विचारच करू शकत नाही," या महात्माजींनी त्यांना वाहिलेल्या श्रद्धांजलीत कस्तुरबांच्या समर्पित जीवनाचे सार आलेले आहे.

प्रमिलाबाईंच्या सर्वच व्यक्तिरेखाटनांना कारुण्याची लय आहे. त्या सेवादलातील भास्कर आठल्ये किंवा मालूताई वडके यांच्याबद्दल, स्वत:च्या भावाबद्दल किंवा सासूबाईंबद्दल लिहितात, तेव्हा त्यांचे व्यक्तिचित्रणपर लेखन कारुण्याने ओतप्रोत भरून येते. 'बाबा गेला, माझी भाऊबीज रिक्त करून!' या वाक्याने 'रिक्त भाऊबीज' या व्यक्तिरेखेचा शेवट झाला आहे. सासूबाई या संस्थेबद्दल

विवाहापूर्वी सशासारखी भीती बाळगणाऱ्या प्रमिलाबाई विवाहानंतर सासूबाईंशी पूर्ण समरस झाल्या आहेत. 'बा'च्या मृत्यूचे वर्णन पुढील शब्दांत येते– "आतापर्यंत बांनी अनेकवेळा प्रवासाचं प्रस्थान ठेवलं होतं व आम्ही त्यांना त्या वेळी मोठ्या आनंदानं निरोप दिला होता. कारण त्या वेळी ती थकली पावलं आपल्या घरट्याकडं परतणार आहेत हा दिलासा आमच्या मनाला होता, परंतु त्या संध्याकाळचं ते प्रस्थान मात्र परत कधीही न येण्यासाठी होतं. जगड्व्याळ व्यापारातील हा जीवनबिंदू ओघळला होता व आम्ही वेडचासारखे तो सोडलेला बिंदू पकडण्याची वृथा धडपड करीत होतो... सारं सारं संपलं होतं. आमच्यावर वात्सल्याचा वर्षाव करणारे ते नेत्र नेत्रपेढीची वाट चालू लागले होते. बांच्या चेहऱ्यावरच्या त्या नेहमीच्या हास्यात मिटल्या पापण्यांनी थोडीसुद्धा उणीव भासत नव्हती. एक जीवनपुष्प मिटलं होतं व आम्ही त्या समर्पित जीवनाला निरोप देत होतो– अश्रूंच्या अंजलीने." मालूताईंच्या मृत्यूनंतर लेखिकेच्या भावना शब्दबद्ध होतात. "गेल्या अनेक वर्षांची साथ सुटली. आला माणूस राहत नाही हे तत्त्वज्ञान मला पाठ आहे. पण जाणारी व्यक्ती उरलेल्यांच्या हृदयाला कायमची घरे पाडून जाते. उरलेल्यांना हे भळभळतं हृदय घेऊनच दैनंदिन जीवनाच्या रथाला जुंपून घ्यावं लागतं. कारण तोही जीवनाचा एक अपरिहार्य भाग असतो. पण मन आक्रंदत असतं, 'लेट द सोल रेस्ट इन पीस'!"

राजकीय क्षेत्रात पाच तपे काम करणाऱ्या एस. एम. जोशींवर इतरांकडून बरेच लिहिले गेले आहे. प्रमिलाबाईंचे मुंबईतले घर म्हणजे मुंबईत आल्यावर एस. एम. जोशींचे कायमचे निवासस्थान. राजकारणाच्या धकाधकीत राहूनही एस. एम. अगदी पारदर्शी, प्रांजल, निर्लेप राहिले आहेत. त्यांचे जीवन रसिकतेने भरले आहे. क्रिकेटची कॉमेंटरी ऐकताना त्यांना जेवणाचे भान राहत नाही. 'शोले'तील गब्बारसिंगची 'अरे ओ सांबा' ह्या डायलॉगची नक्कल करण्याची बालसुलभ हौस त्यांना अजूनही आहे. ते थोडेच पण रसिकतेने जेवतात. कधी मंद वासाचा परफ्यूमही वापरतात. म्हातारे असूनही लांब केस ठेवून ते वळवण्याचा त्यांना शोक आहे. अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू सूचित केल्यावर लेखिका म्हणते, "मजा अशी की हे सारं त्यांना आवडतं. पण एका क्षणात ते या साऱ्यातून बाहेरही पडतात." विनोदी अण्णांचे अंतःकरण कारुण्याने सदैव भरलेले असते. आजारीपणात सेवाशुश्रूषा करणाऱ्या प्रभूभाईंना ते गेल्या जन्मीची आपली आईच कशी समजतात हे प्रमिलाबाईंनी सहृदयतेने सांगितले आहे. आजवर एस. एम. जोशींवर लिहिलेल्या व्यक्तिचित्रणपर लेखांत त्यांच्या अनोख्या स्वभावविशेषांचा परिचय घडवून देणारा 'मी पाहिलेले अण्णा– एम. एम. जोशी' हा एक उल्लेखनीय लेख आहे.

समाजवाद्यांच्या वर्तुळात राहूनही सौ. संघवींना राजकारणाचा सोस नाही. अध्यापनाचा व्यवसाय करताना आपल्या चिमण्या विद्यार्थिनींच्या छोटचाशा भाव-विश्वात त्यांना मनापासून रमावेसे वाटते. या व्यवसायासाठी आवश्यक असणारा विद्यार्थ्यांविषयीचा जिव्हाळा त्यांच्याजवळ भरपूर आहे. आपल्या विद्यार्थिनींच्या व्यथावेदना, सुखदुःखे, त्यांचे आंतरमन, त्यांच्या वैयक्तिक अडचणी, त्यांचे कुटुंब-जीवन, या सर्वांशी त्या समरस होताना दिसतात. म्हणूनच विद्यार्थिनींशी त्यांचे नाते कधी मैत्रिणीचे तर कधी आईचे बनते. कामिनी, मानसी, वनिता, नीला ह्या त्यांच्या चार विद्यार्थिनींची व्यक्तिरेखाटने कथेच्या रूपाने आकारास आली आहेत. यांतल्या प्रत्येक मुलीची वेगळी तऱ्हा, वेगळा स्वभाव आणि वेगळे प्रश्न. एका गरीब कामगार कुटुंबात जन्माला आलेली, हुशारीचे देणे लाभलेली कामिनी एम. बी. बी. एस. होते, पण घरच्या माणसांपासून सतत दुरावलेलीच राहते. घरची माणसे तिच्याशी कधीच जुळवून घेत नाहीत, तिचे कौतुक करीत नाहीत. घरच्यांच्या उपहासाचा विषय झालेल्या कामिनीच्या मनावर याचा परिणाम होतो. मनोरुग्ण तज्ज्ञांकडून तिला औषधोपचार करवून घ्यावे लागतात. डॉक्टर होऊन कुटुंबाचा भार सोसणाऱ्या कामिनीच्या विवाहाचा साधा विचारही घरच्या माणसांच्या मनात येत नाही. ती एकाकीच राहते. त्याविषयी लेखिकेची प्रतिक्रिया अशी– "मी कामिनीच्या घरच्या लोकांशी याबाबत अनेकदा बोलले आहे. पण विचारांच्या या खोल दरीच्या दोन्ही कडांवर उभ्या असलेल्या या व्यक्तींना जोडणारा एखादा पूल मला अजून गवसलेला नाही. तो गवसावा असं मला तीव्रतेनं वाटतं आहे." मानसीची कथा याहूनही भयानक. हुशार आणि कर्तृत्ववान आईची मुलगी मानसी आईच्या आक्रमक स्वभावामुळे दबून जाते. तिचं व्यक्तिमत्त्व खुरटून जातं आणि शेवटी ती आत्महत्या करते. अभ्यासावरून आईने मानसीकडे जरा थंड डोक्याने पाहिले असते तर पुढील घटना टळल्या असत्या. आत्महत्येच्या आदल्या दिवशी शाळेत खूप वेळ रेंगाळणाऱ्या मानसीकडे आपण लक्ष दिले असते तर मिटलेल्या ओठांच्या पाकळ्या उघडल्या असत्या. अकालीच मृत्यूचा थंड हात धरून गेलेल्या या निरागस मुलीला जीवाच्या आश्वासक उष्णतेची ऊब मिळाली असती, असे लेखिकेला वाटते. नवऱ्याने सोडलेली वनिता दुर्दैवाने जीवनात कशी भरकटत जाते आणि सामाजिक छळाचा व मोहाचा बळी ठरते, याचे उदाहरण म्हणजे वनिता या विद्यार्थिनीचे स्वभावचित्र. या स्वभावचित्रात 'काबुलीवाला' कथेतील मिनीचा सूचक वापर केला गेला आहे. प्रमिलाबाईंच्या सर्वच विद्यार्थिनी अशा अपयशी ठरलेल्या नाहीत. रश्मी ही काही लेखिकेची विद्यार्थिनी नाही. नेहमी हूडपणा करणारी आणि मुलांच्यात दांडगटपणा करणारी ही जवळच्या वस्तीत राहणारी एक परिचित मुलगी आहे. रश्मीच्या खोडचा हा लेखिकेच्या कुतूहलाचा विषय.

आपल्या सवंगडयांना घेऊन ती एका वेडीला सतावते आणि कावळचाच्या चोचीतून अर्धमेल्या अवस्थेत सोडवलेल्या चिमणीच्या पिलाला खाऊपिऊ घालून जगवते. रश्मीच्या वागण्यातला दांडगेपणा, मनाचा ताजेपणा आणि वृत्तीतील रगेलपणा लोभस आहे. भित्र्या मुलींनी रश्मीचे हे गुण घ्यावेत असे लेखिकेला वाटते. कस्तुरबा, सरोजिनींना दुरून पाहणाऱ्या प्रमिलाबाईंनी एस. एम., भास्कर आठल्ये, मालूताई या संबंधितांकडे वेगळचा दृष्टीने पाहिले आहे आणि आपल्या विद्यार्थिनींच्या अंतरंगाचा मनःपूर्वक ठाव घेतला आहे.

'न पुसणारे ठसे' हे प्रमिला संघवींचे पहिलेच पुस्तक आहे. जाणूनबुजून साहित्यनिर्मिती करण्याची भावना या लेखनामागे नाही. जे जाणवले, जे अनुभवाला आले ते सहजपणे मांडीत जावे, असा हा प्रयत्न आहे. असे असले तरीही या साध्यासुध्या निवेदनातील परिणामकारकता जाणवते.

साहित्यक्षेत्राबाहेरील एखाद्या व्यक्तीचे लेखन कधी कधी वाङ्मयदृष्टचा मोलाचे ठरते याचे उदाहरण म्हणजे प्रमिला संघवींचे 'न पुसणारे ठसे' हे व्यक्तिरेखाटनपर पुस्तक. चमकदार वाङ्मयीन शैलीपेक्षा अनुभवाचा सच्चेपणा, निवेदनातील साधेपणा व भावनेचा जिव्हाळा यामुळे या पुस्तकाचा रसिकांच्या मनावर 'उमटणारा ठसा 'ही न पुसला जाणारा आहे.

न पुसणारे ठसे– प्रमिला संघवी
साधना प्रकाशन, पुणे–४११०३०
(मुंबई सकाळ)

रामकृष्ण आणि विवेकानंद– दोन अलौकिक व्यक्तिमत्त्वांचा शोध

भगवान श्री रामकृष्ण आणि स्वामी विवेकानंद या, बंगालमध्ये गेल्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या दोन अलौकिक विभूती आहेत. एकमेकांना पूरक ठरलेली ही गुरुशिष्यांची अविस्मरणीय जोडी आहे. या गुरुशिष्यांच्या कार्याचा परिचय डॉ. वि. रा. करंदीकर यांनी 'रामकृष्ण आणि विवेकानंद' या विस्तृत ग्रंथात करून दिला आहे.

रूढ अर्थाने ज्याला चरित्रग्रंथ म्हणता येईल असा हा ग्रंथ नाही. रामकृष्ण आणि विवेकानंद यांच्या विचारांचा किंवा तत्त्वज्ञानाचा परंपरागत पद्धतीने

आढावाही या ग्रंथात घेतलेला नाही. या दोन महापुरुषांच्या आयुष्याची घडण कशी झाली, त्यांच्या विचारविश्वाला आकार कसा आला, सामान्यत्वातून असामान्यत्वाकडे त्यांनी वाटचाल कशी केली हे लेखकाने सांगितले आहे. रामकृष्ण आणि विवेकानंद यांनी केलेल्या वाटचालीच्या अवलोकनातून आपल्या हाती कोणती मूल्ये लागतात, त्या मूल्यांचा आपल्या जीवनाशी कोणता अनुबंध आहे, याचाही शोध लेखकाने घेतला आहे. रामकृष्ण आणि विवेकानंद यांची शिकवण कोणत्या प्रकारची आहे आणि त्यांच्या शिकवणुकीतून कोणता शाश्वत अंश आजही शिल्लक उरतो हे पाहणे, हासुद्धा करंदीकरांचा या ग्रंथाच्या लेखनामागील हेतू आहे. केवळ दोन महान व्यक्तींच्या चरित्राची रूपरेषा देऊन त्यांच्या कार्याची तुलना करणे, असा लेखकाचा प्रयत्न नाही. आपल्या विवेचनाच्या सोईसाठी चरित्रनायकांच्या जीवन-चरित्रातील घटना घेऊन त्यांवर भाष्य करीत जाणे अशी लेखकाची पद्धत आहे. आपले विवेचन साधार आणि काटेकोर व्हावे म्हणून लेखकाने पुरेशी काळजी घेतली आहे.

'रामकृष्ण आणि विवेकानंद' हा ग्रंथ सहा प्रकरणांत विभागलेला आहे. पहिले प्रकरण 'अथातो वस्तुजिज्ञासा' हे आहे. या प्रकरणात इतिहासातील गुरु-शिष्यांच्या जोड्यांची उदाहरणे देऊन निवृत्ती व ज्ञानेश्वर यांची तुलना रामकृष्ण व विवेकानंद यांच्याशी केली आहे. नंतरच्या दोन प्रकरणांत रामकृष्ण व विवेकानंद यांचे जीवन कसे घडत गेले याचा परिचय करून दिला आहे. चवथ्या आणि पाचव्या प्रकरणांत रामकृष्ण-विवेकानंदांचे कार्य आणि तत्त्वज्ञान यांचा परिचय करून दिला आहे. शेवटच्या सहाव्या प्रकरणात रामकृष्ण आणि विवेकानंद यांच्या कार्याची तुलना केली आहे. या ग्रंथात एकूण तीन परिशिष्टे आहेत. त्यांमध्ये रामकृष्ण आणि विवेकानंद यांचा जीवनपट आणि संबंधित व्यक्तींची सूची दिली आहे. शिवाय संदर्भ-ग्रंथांची सूची ग्रंथाच्या शेवटी आहे. रामकृष्ण-विवेकानंदांविषयी विशेष कुतुहल असणाऱ्या वाचकांना या परिशिष्टांमुळे आणि सूचींमुळे अधिक वाचण्याची प्रेरणा मिळेल.

रामकृष्ण आणि विवेकानंद यांचे नाते गुरुशिष्याचे असले तरी त्या दोघांमध्ये मूलभूत फरक होता. रामकृष्ण सतत भावावेशात जात असत. विवेकानंद भावावेशात गेल्याची फार कमी उदाहरणे आहेत. खरे तर त्यांचा तो स्वभावही नव्हता. रामकृष्ण फारसे शिकलेले नव्हते. कालिमातेचे ते निस्सीम सश्रद्ध भक्त होते. त्यांच्या बोलण्यात रांगडेपणा, अशुद्धता आणि अश्लीलता डोकावत असे. उलट नरेंद्र म्हणजेच विवेकानंद सुशिक्षित आणि बुद्धिमत्तेचे तेजस्वी देणे लाभलेला बंगाली नवयुवक होता. रामकृष्णांच्या अंगी अलौकिक गणल्या गेलेल्या शक्ती होत्या. बाहेरून ओबडधोबड, वेडसर, अनाकर्षक वाटणारे रामकृष्ण तत्कालीन

सुशिक्षितांवर छाप पाडीत असत. इतरांना संमोहित करण्याची त्यांच्याजवळ जबर शक्ती होती. नरेंद्राशी झालेल्या तीन भेटींत त्याला संमोहित करून त्यांनी त्याच्यावर चांगलीच छाप पाडली आणि त्याला आपलेसे केले. रामकृष्णांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सतत भावावेशात जाणे शक्य होई. बुद्धिवादी नरेंद्राला ते शक्य होत नसे; किंबहुना समाधीप्राप्तीपेक्षा या आपल्या सत्‌शिष्याकडून वेगळे काहीतरी घड वे असे त्यांना सतत वाटत असे. अगदी सुरुवातीपासूनच त्यांनी तसे प्रयत्न केले आहेत आणि विवेकानंदाला आपला अलौकिक शिष्य घडविण्याचे कार्य साध्य करून घेतले आहे. 'अंतःकरणापासून इच्छा असेल तर ईश्वरदर्शन घडेल' या रामकृष्णांच्या उत्तराने विवेकानंद कमालीचे प्रभावित झाले होते. रामकृष्णांचे विवेकानंदांवर इतके मनस्वी आणि उत्कट प्रेम होते, की कोणतेही नियम ते विवेकानंदांना लावीत नव्हते. त्याने गोमांस खाल्ले तरी त्यांना ते चालले असते. समाधीच्या अनुभवाची विवेकानंदांची मागणी इहलोक सोडण्यापूर्वी सहा महिने आधी रामकृष्णांनी पूर्ण केली होती. मात्र या अनुभवात गुरफटून राहण्यापेक्षा वेगळा संदेश त्यांनी विवेकानंदांना दिला. तो म्हणजे–'शिवभावाने जिवांची केली जाणारी सेवा.' भारतभ्रमंती केल्यावर परतंत्र भारतातील जनतेचे दारिद्र्य आणि दुर्दशा यांचा पुरेपूर प्रत्यय विवेकानंदांना आला होता. हिमालयाचे आकर्षण असलेले अंतर्मुख एकांतप्रिय विवेकानंद नंतर बहिर्मुख झाले. जबर आंतरिक ऊर्मीमुळे एकांतातून लोकांतात आले. त्यांनी अमेरिकेचा दौरा यशस्वी केला. हिंदुधर्माचे महत्त्व तत्कालीन ख्रिश्चन पंडितांना समजावून दिले. 'माझ्या अमेरिकन बंधुभगिनींनो–' हे त्यांचे उद्‌गार म्हणजे सभा जिंकण्यासाठी वापरलेले कृत्रिम, नाटकी शब्द नव्हते; तर ती एक आंतरिक ऊर्मीच होती. 'मला तुमच्यासारखा पुत्र हवा,' असे म्हणणाऱ्या विकारी पाश्चात्य स्त्रीला, 'माते, हा तुझा पुत्र तुझ्यापुढे उभा आहे,' असे म्हणणारे विवेकानंद खरेखुरे संन्यस्त होते. बाजारातील वेश्यांचे कुजबुजणे ऐकून व्यथित झालेले विवेकानंद परम कारुणिक होते. विवेकानंद एका बालकाप्रमाणे साधे निष्कपट आहेत, असे श्रीमती बॅग्ले यांनी त्यांचे वर्णन करून ठेवले आहे. एका हातात बायबल आणि दुसऱ्या हातात शिरस्त्राण घेऊन येणाऱ्या ख्रिश्चनांना त्यांनी हिंदू धर्मातील सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. 'यापुढची सत्ता शूद्रसत्ता आहे,' हे त्यांचे भाकित त्यांच्या द्रष्टेपणाचे निदर्शक आहे. मात्र त्यांच्या समाजवादाचा पाया आध्यात्मिक होता. भारतात आल्यावर त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. धर्मपरिवर्तन, दरिद्रीनारायणसेवा या कार्यास त्यांनी प्रारंभ केला. रामकृष्णांसारख्या एका अशिक्षित भावनाप्रवण गुरूकडून मार्गदर्शन मिळालेल्या विवेकानंदांनी आपल्या कार्यास सेवाधर्म आणि ईहवादाची जोड दिली. 'गरिबांची सेवा करण्यासाठी मी हजार वेळा जन्म घेण्यास तयार आहे.' हे त्यांचे उद्‌गार

त्यांच्या तत्त्वप्रणालीशी सुसंगतच आहेत. दुष्काळात मेलेले भारतीय त्यांच्या पूर्व-कर्माचे बळी आहेत, असे म्हणणाऱ्यांचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. रामकृष्ण आणि विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा साक्षेपी आणि विस्तृत परिचय करून देणारा हा ग्रंथ मुळातून वाचावा एवढा मौलिक आहे.

रामकृष्ण आणि विवेकानंद यांच्या जीवनासंबंधी अनेक पुरावे ग्रंथरूपाने उपलब्ध आहेत. डॉ. वि. रा. करंदीकरांनी आपल्या विवेचनाच्या सोईसाठी या सर्व पुराव्यांचा भरपूर उपयोग केला आहे. रामकृष्णांचे जीवन त्यांना येणारी भावावस्था आणि त्यांना होणारी दर्शने यांनी भरलेले आहे. त्यांचे स्वतःचे तत्त्वज्ञान सहज संवादांतून प्रकट होई. ते संवाद एकत्रितपणे अभ्यासून त्यांचे तत्त्वज्ञान लेखकाने वाचकांसमोर ठेवले आहे. मात्र रामकृष्णांना येणाऱ्या अतींद्रिय अनुभवांची मीमांसा तार्किकपणे केलेली नाही. अर्थात ती तशी करता येणे शक्यही नाही. त्यात डॉ. करंदीकर वाङ्मयाचे अभ्यासक आहेत. विश्लेषणाच्या चिमटचात न बसणारे इंद्रियातीत अनुभव आणि चमत्कारसदृश घटना यांचा आधार घेऊन न लिहिणे, हे पथ्य त्यांनी अवश्य पाळले आहे. या पथ्याचा भंग झाला तर अनवधानाने झालेला आहे, असे समजावे ही लेखकाची कबुली त्याच्या नम्रतेची द्योतक आहे. ग्रंथामधील विवेचनात डॉ. करंदीकरांच्या साक्षेपी, स्वतंत्र शोधक दृष्टीचा प्रत्ययही काही वेळा येतो. या बाबतीत लोकमान्य टिळक आणि विवेकानंद यांची केलेली तुलना उदाहरण म्हणून सांगता येईल. 'टिळकांचा जाज्वल्य धर्माभिमान विवेकानंदात होता पण विवेकानंदात आढळणारी भेदक सामाजिक दृष्टी, स्त्रीशिक्षण आणि मानवामानवा-मधील सामाजिक समतेचा पुरस्कार हे भाग टिळकांच्या विचारात तितके प्रकर्षाने येत नाहीत. साकल्याने विचार करताना असे म्हणता येते की, केवळ ऐहिक जीवनातील समस्यांपुरताच विचार केला तर विवेकानंद हे आगरकर व टिळक यांचे सुयोग्य मिश्रण होते. पण त्याच वेळी हेही ध्यानात हवे की, विवेकानंदांचे व्यक्तिमत्त्व एवढ्यात सामावणारे नव्हते, ते ऐहिक जीवनाच्या अतीत पोचणारे होते. तेथे पोचण्याची आवश्यकता आगरकरांना वाटत नसे. आणि टिळकांना ती वाटत असली तरी ते तिथे पोचले होते असे म्हणवत नाही."

विवेकानंदांच्या व्यापक आणि शाश्वत धर्मविचाराचा परामर्ष करंदीकरांनी ग्रंथाच्या शेवटी घेतला आहे. विवेकानंदांनी ईश्वरसन्मुखतेला मानवसन्मुखतेची जोड दिली. अखेर धर्म हा माणसांसाठी आहे. तो तसा असायला हवा हा विवेकानंदांचा आग्रह होता, शंकराचार्यांच्या तीक्ष्ण प्रज्ञेला बुद्धाच्या करुणेची जोड द्यायला हवी असे त्यांनी पुनः पुन्हा सांगितले आहे. त्यासाठी संन्यस्त वृत्ती स्वीकारून सर्वस्वाचा त्याग करणारी आणि पोलादाचे स्नायू आणि वज्राचे हृदय असणारी माणसे तयार व्हायला हवीत, ती या देशाची आजची गरज आहे, अशी विवेकानंदांची

भूमिका होती. विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाची शाश्वतता आणि आजच्या जीवनाशी तिचा असलेला अनुबंध लेखकाने मार्मिकपणे सांगितला आहे. म्हणूनच रामकृष्ण आणि विवेकानंद हा ग्रंथ दोन महान विभूतींच्या तत्त्वज्ञानाचा केवळ परिचय करून देणारा ग्रंथ ठरत नाही; तर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या दोन अलौकिक तत्त्वज्ञ व विचारवंत यांच्या विचारधनातील 'अक्षर' ता, चिरकालीनता प्रकट करणारा ग्रंथ ठरतो.

डॉ. वि. रा. करंदीकर यांना रामकृष्ण व विवेकानंद यांच्याविषयी कमालीचा जिव्हाळा आहे. एवढेच नव्हे, तर ती त्यांची श्रद्धास्थाने आहेत. 'रामकृष्ण आणि विवेकानंद' या ग्रंथात त्या दोघांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध करंदीकरांनी समरसतेने घेतला आहे. उत्कटता, समरसता आणि जिव्हाळा या गुणविशेषांमुळे ग्रंथाची लेखनशैली कुठेही क्लिष्ट होताना दिसत नाही. उलट ती अधिक मर्मस्पर्शी व आल्हादक झाली आहे. आपल्या ओघवत्या आणि प्रासादिक शैलीत लेखकाने विषय मांडला आहे. जवळजवळ शहाशे पृष्ठांचा प्रचंड ग्रंथ प्रत्यक्षात आणण्यासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचे अनंतराव कुलकर्णी यांनीही मोठे साहस केले आहे. चोखंदळ मराठी वाचक 'रामकृष्ण आणि विवेकानंद' या ग्रंथाच्या सिद्धीबद्दल लेखक आणि प्रकाशक यांना खरोखरच धन्यवाद देतील.

रामकृष्ण आणि विवेकानंद—डॉ.वि.रा. करंदीकर
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
(आकाशवाणी)

ललित गद्य

'द्राक्ष आणि रुद्राक्ष'– आल्हाददायक कौटुंबिक विनोदी लेखसंग्रह

सुभाष भेंडे हे कादंबरीकार, विनोदी लेखक आणि प्रवासवर्णनकार म्हणून मराठी साहित्यविश्वात चांगलेच स्थिरावले आहेत. आजपर्यंत त्यांचे विनोदी लेखांचे अकरा संग्रह प्रसिद्ध झाले असून 'द्राक्ष आणि रुद्राक्ष' हा विनोदी लेखांचा बारावा संग्रह प्रकाशित झाला आहे. सुभाष भेंडे यांचा विनोद जीवनाच्या वेग–वेगळ्या अंगांना स्पर्श करून जातो. नेहमीच्या जीवनात घडणारी एखादी घटना, साहित्यक्षेत्रातील घडामोडी, स्वत:चे कौटुंबिक जीवन यामधून हा विनोद स्फुरलेला असतो.

'द्राक्ष आणि रुद्राक्ष'मधील 'सत्त्राशे विघ्ने' हा पहिलाच लेख सामाजिक जीवनातील विसंगती दर्शविणारा लेख आहे. सामाजिक संस्थांनी आणि कार्यकर्त्यांनी आदिवासी लोकांची सामुदायिक लग्ने अल्प खर्चात लावून दिल्याची बातमी आपण वर्तमानपत्रात (फोटोसह) वाचतो. विनोदकार भेंडयांनी या घटनेचा वापर विनोद-निर्मितीसाठी मार्मिकपणे आपल्या 'सत्त्राशे विघ्ने' या लेखात केला आहे. कॉलेजातील मथुरेबाई आणि हौशी विद्यार्थी यांच्याबरोबर लेखक आदिवासींच्या सामुदायिक विवाहाच्या कार्यक्रमाला मथुरेबाईंच्या गाडीतून जातो. तिथे अनेक गमतीदार प्रसंग घडतात. खरे म्हणजे मथुरेबाईंना समाजकार्याची मनापासून आवड नाही. डहाणूच्या फॅक्टरीचा मालक असलेल्या त्यांच्या नवऱ्याला या आदिवासींच्या मतांवर निवडून यायचे असते, म्हणून हा सर्व खटाटोप आदिवासींच्या सेवेपेक्षा नवऱ्याच्या फायद्यासाठी चाललेला आहे. त्यामुळे समाजकार्याची आच कमी आणि वैयक्तिक स्वार्थ अधिक अशी वस्तुस्थिती आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा कार्यक्रम म्हणजे एक पिकनिक आहे आणि आदिवासींच्या दृष्टीने ह्या सर्वांहून वेगळाच प्रकार आहे. नव्या कपडयांच्या आशेने एकदा लग्न झालेली जोडपी पुन्हा लग्नाला उभी राहतात, त्यांच्यात गरोदर स्त्रिया, एवढेच नव्हे तर आधीची मुले असलेले

आदिवासी स्त्री-पुरुषही आहेत; लग्न लागल्यावर दारू मिळावी हा सर्वांचा जोरदार आग्रह आहे. लेखकाला खराखुरा डॉक्टर समजून एक आदिवासी औषधाची मागणी करतो; अडलेल्या बाळंतीणीची सुटका करण्याची विनंतीही करतो. लेखकाला मंगलाष्टके येत नसतानाही भटजीचे काम करून त्याला मंगलाष्टके म्हणावी लागतात. सगळ्या गोंधळात नवरानवरीची अदलाबदल होते. लेखकाच्या वाट्याला आलेली संकटाची मालिका शेवटपर्यंत सुरूच राहते. 'आमचंही लग्न करा', म्हणून हट्ट धरून बसलेले आदिवासी मुंबईला परतणाऱ्या या तथाकथित समाजसेवकांच्या गाडीसमोर मोठे झाड आडवे पाडून ठेवतात. नेहमी गंभीरपणे आदिवासींच्या सामुदायिक विवाहाची बातमी वाचणाऱ्या वाचकांना भेंडयांचा हा 'वेगळा प्रवास' आल्हाददायक वाटेल. 'सत्राशे विघ्ने' या लेखात विसंगती, उपरोध, विरोध आणि अतिशयोक्ती आहे.

'पुण्यात शेअर मार्केट' या लेखात पुणेरी प्रवृत्तीवर लेखकाने उपरोधिकपणे टीकाटिप्पणी केली आहे.

भेंडयांचा विनोदी लेख कधी कधी कथेचे रूप घेऊन येतो. 'झाकली मूठ', 'मंत्री, धोतर आणि पँट!', 'विषबाधेची चित्तरकथा' हे तीन लेख म्हणजे विनोदी कथा आहेत. या कथांत अपेक्षाभंग व मानवी स्वभावातील विसंगती यांचे दर्शन होते. सांताक्रूझ एअरपोर्टवर सौ. मुजुमदार आणि सौ. दर्शने आपापल्या यजमानांना घेऊन जाण्यासाठी आल्या आहेत. सौ. धराधरांचे यजमान महाबळेश्वर येथे कॉन्फरन्सला गेल्याचे त्यांच्या बोलण्यावरून समजते. तेव्हा आपल्या मैत्रिणींच्या नवऱ्यांच्या, स्त्रियांबाबत सैल वागणुकीच्या 'कथा' सौ. दर्शने व सौ. मुजुमदार सांगतात. तेव्हा सौ. धराधर यांनाही आपल्या नवऱ्याच्या वागण्याविषयी संशय येऊ लागतो. मूळ कथेत संभाषणाच्या ओघात दोन्ही स्त्रियांनी आपापल्या नवऱ्यांच्या बाबतीत घडलेल्या कथा दुसऱ्यांच्या नावावर रंगवून सांगितल्या आहेत.

अल्पशिक्षित आमदार आणि मंत्री म्हणजे विनोदी लेखकांना मोठीच सामग्री. दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन खात्याचे राज्यमंत्री दौऱ्याहून मुंबईस परतत असताना मित्राकडे भरपूर दारू पितात, मसालेदार कोंबडी खातात. रात्री अर्ध्या चड्डीत दारूच्या नशेत ते खोपोलीला गाडीतून खाली उतरतात आणि मंत्रीमहाशय गाडीत बसले आहेत, असे समजून ड्रायव्हर गाडी मुंबईस घेऊन जातो तेव्हा काय धमाल उडते, याची हकीकत म्हणजे 'मंत्री, धोतर आणि पँट!' ही कथा होय. 'विषबाधेची चित्तरकथा' ही हाय सोसायटीमधील दारूची पार्टी करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या मूर्खपणाची कथा आहे. जुहू बीचवरच्या कॉंट्रॅक्टर मोघ्यांकडच्या पार्टीला डझनभर जोडपी आलेली आहेत. पार्टी भर मध्यावर आली असताना एक बातमी समजते. पार्टीसाठी केलेले पुडिंग खाल्ल्यामुळे मोघ्यांची कुत्री

मरून पडली आहे. त्यामुळे पुडिंग खाल्लेल्या सर्वच मंडळींना विषबाधा झाल्यासारखे वाटते. धावाधाव होते. हॉस्पिटलला फोन जातो. निर्वाणीचे निरोप दिले-घेतले जातात. कुत्री मेलेली असते हे खरे आहे, पण ती टॅक्सीच्या धक्क्याने मेली आहे ही गोष्ट वॉचमन सर्वांत शेवटी सांगतो. अपेक्षाभंगातून आनंद देणारी भेंडयांची ही 'धक्कांतिका' वाचनीय आहे.

'एक सांस्कृतिक दुर्घटना', 'मराठी डॉक्टर्सची प्रबंध कामाठी– एक सोपपत्तिक मीमांसा' हे दोन लेख साहित्यक्षेत्राशी निगडित आहेत. 'सत्यकथे'चा अस्त झाल्यावर मनोहर दशपुत्रे, कवी महेश केणी, समीक्षक प्रा. प्र. पां. कुलकर्णी, भीमराव वाघ इ. साहित्यिकांच्या दैनंदिनीतील वेगवेगळ्या प्रतिक्रिया भेंडयांनी उपहासगर्भ शैलीत नोंदवल्या आहेत. या लेखाच्या सुरुवातीला कंसात टाकलेले वाक्य (श्री. पु. आणि सत्यकथा हे काल्पनिक उल्लेख सोडल्यास अन्य सर्व उल्लेख व प्रसंग सत्य आहेत.) सूचक विनोदाचे उदाहरण आहे. कणकवलीसारख्या छोट्या गावात राहणाऱ्या प्रा. कु. नंदिनी बेडकीहाळ आणि प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. दबडघाव यांच्यातील पत्रव्यवहार 'मराठी डॉक्टर्सची प्रबंधकामाठी' या लेखात आला आहे. क्षुद्र विषयातून मोठा आशय शोधून काढण्याची प्रबंधलेखकाची धडपड, मार्गदर्शकाचा लंपटपणा, विद्यापीठ क्षेत्रातील वशिलेबाजी आणि हेवेदावे इ. चे दर्शन या लेखात होते.

सुभाष भेंडे यांचा विनोद प्रामुख्याने कुटुंबजीवनाशी निगडित आणि आत्मनिवेदनपर आहे. (हा विनोद वाचत असताना चि. वि. जोशी यांच्या कुटुंबप्रधान विनोदाची आठवण होते. मात्र दोघांच्या विनोदनिर्मितीच्या तपशिलात बराच फरक आहे.) चिमणराव हा मध्यमवर्गीय कारकून तर भेंडयांच्या विनोदी लेखनातील 'मी' बराचसा सुखवस्तू. कधी कधी बायकोचा व मुलांचा वरचष्मा व लेखकांचे स्वतःचे अनेक गोष्टींचे अज्ञान, बावळटपणा आणि साधेपणा यांमुळे या विनोदात अधिक भर पडते. 'द्राक्ष आणि रुद्राक्ष' या संग्रहातील 'माझी दुसरी चूक' व 'गर्लफ्रेंडचा पेटिकोट' हे दोन आत्मनिवेदनपर लेख गोव्याच्या कॉलेजात अनुक्रमे प्राध्यापक आणि शारीरिक शिक्षक म्हणून गेलेल्या 'मी'च्या फजितीचे चित्रण करणारे लेख आहेत. 'बिकट वाट वहिवाट', 'मस्तपैकी विश्रांती', 'हौसेला मोल असतं!', 'गॉसिप! गॉसिप', 'अभयारण्यात मी', 'मी काटकसर करतो त्याची गोष्ट' हे लेख लेखकाच्या कौटुंबिक वातावरणावर आधारलेले आहेत. या सर्व लेखातील 'मी' हा एक सुखवस्तू मराठी माणूस आहे. त्याची बायको सुषमा, मुलगी बाबी आणि मुलगा मिट्टो असे हे चौकोनी कुटुंब आहे. लेखकाची पत्नी सर्वसाधारण मध्यमवर्गीय गृहिणींची प्रतिनिधी आहे. आपल्या नवऱ्याला व्यवहारातले कळत नाही, असे तिचे ठाम मत आहे. मात्र ती स्वतः एक भाबडी स्त्री आहे.

घरात कधीच विश्रांती मिळत नाही म्हणून ती व्याख्यानासाठी दापोलीला जाणाऱ्या नवऱ्याबरोबर स्वत: जाते. तिथे विश्रांती घेण्याऐवजी स्वत:च कपडे धुणे, स्वयंपाक करणे यांतच गुंतून राहते. नवऱ्याबरोबर मुंबईस परतल्यावर सोलापूरला व्याख्यानाच्या निमित्ताने पुन्हा 'विश्रांती'साठी जाण्याचा निश्चय जाहीर करते. लेखक आणि त्याची पत्नी यांच्यात जसा विरोध आहे तसाच त्यांच्या बाबी आणि मिट्टो या मुलांच्यातही आहे. भेंडयांच्या विनोदातील 'मी' सुशिक्षित, संपन्न असला तरी हा सरधोपटपणे जीवन जगणारा माणूस. नवे जग, नव्या कल्पना, फिल्मी सृष्टी यांच्याशी त्याचा परिचय जवळजवळ नाहीच. यामुळेच बाबी आणि मिट्टो त्याला अडाणी ठरवतात. अमिताभच्या आजाराचे गांभीर्य या 'मी'च्या कधीच लक्षात येत नाही. अमिताभ बरा व्हावा म्हणून सुषमा सिद्धिविनायकाला चांदीच्या एकवीस दुर्वा वाहण्याचा नवस बोलते. अमिताभचे काही बरेवाईट झाले तर फिल्मी मॅगेझिन्स न वाचण्याचा निर्णय बाबी घेऊन टाकते आणि तो खडखडीत बरा झाल्यावर तर लायब्ररीतून मॅगेझिन्स आणायच्याऐवजी सर्व मॅगेझिन्स विकत घेऊन वाचायचा निर्णय मुले घेतात. (त्यातही, 'आपण फक्त इंग्रजी मॅगेझिन्सच घेणार, मराठी, हिंदी नाही– हे तुमचं नशीब समजा', असे बापाला बजावायलाही मुले कमी करीत नाहीत.) 'मी काटकसर करतो' व 'हौसेला मोल असतं!' हे दोन विनोदी लेख लेखकाची फजिती कशी झाली हे सांगणारे लेख आहेत. एका सुट्टीत थंड हवेच्या ठिकाणी जायचे रद्द करून लेखक घरीच सुट्टी घालवायचे ठरवतो. त्यामुळे पत्नी केक तयार करण्याचे शिकवणारा क्लास, मुलगी पोहण्याचा वर्ग व मुलगा क्रिकेट ट्रेनिंगसाठी जायचे ठरवतो. त्यासाठी हजार-बाराशेचा खर्च येणार असतो. (त्यापेक्षा परगावची ट्रीप स्वस्तात झाली असती!) वेगवेगळ्या वर्गासाठी घातलेले पैसेही शेवटी फुकट जातात; कारण कधी नव्हे ते जावईबापू घरी आहेत म्हणून लेखकाचे सासू-सासरे आपल्या मुलाबाळांसह जावयाकडे मुक्काम ठोकायला येतात. घरात प्रशस्त टब असावे हे लेखकाचे फार जुने स्वप्न. नवीन सोसायटीत जागा घेतल्यावर अनेक फेरबदल करून न्हाणीघराची जागा वाढवून प्रशस्त टब तो बसवून घेतो. यासाठी पत्नी व मुले यांचा रोषही त्याला पत्करावा लागतो, पण शेवटी मोठ्या टबसाठीच काय पण पिण्यासाठीही पुरेसे पाणी नव्या ब्लॉकपर्यंत पोचत नाही. शेवटी 'हौसेला मोल नसते' हे तत्त्व अपेक्षाभंगातून व प्रत्यक्ष अनुभवातून लेखकाला पटते.

'द्राक्ष आणि रुद्राक्ष'मधील सुभाष भेंडे यांचा विनोद दैनंदिन जीवनातील साध्यासुद्धा घटनांवर आधारलेला हलकाफुलका विनोद आहे. दोन घटनांतील विरोध, मानवी स्वभावातील विसंगती, उपहास, उपरोध, यांना भेंडयांच्या विनोदी लेखनात महत्त्वाचे स्थान आहे. विनोदी लेखकाच्या हातातील हुकमी हत्यार म्हणजे

अतिशयोक्ती. त्यातही मराठी लेखकांना स्त्रियांवर विनोदी लिहावेसे सतत वाटत आलेले आहे. असा विनोद कधी कधी अश्लीलतेकडे झुकतो. सुभाष भेंडे या मोहापासून दूर राहिले आहेत. कौटुंबिक जीवनात घडलेल्या मजेशीर घटनांवर भेंडयांचा विनोद उभारलेला आहे. ते आपल्या स्वभावदोषाकडे, फजितीकडे अगदी अलिप्ततेने पाहतात. खरे म्हणजे भाबडेपणा व साधेपणा यांचा एक बुरखा त्याच वेळी ते पांघरत असतात. कुटुंबातील आपले नगण्य स्थान सूचित करून ते वाचकांना मिष्किलपणे हलकेच गुदगुल्या करतात. सुभाष भेंडे यांचा कौटुंबिक प्रसंगांवर आधारलेला विनोद खरोखरच आल्हाददायक आहे.

द्राक्ष आणि रुद्राक्ष– सुभाष भेंडे
श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०.
(मुंबई सकाळ)

रवींद्र पिंगे यांचे आनंददायी 'आनंदव्रत.'

रवींद्र पिंगे हे गेली पंचवीस-तीस वर्षे विविध नियतकालिकांतून ललितलेखन आणि स्तंभलेखन करणारे शैलीदार लेखक. 'आनंदाच्या दाही दिशा' हा त्यांचा प्रवासवर्णनपर लेखांचा पहिला संग्रह. 'आनंदव्रत' हा प्रवासवर्णनपर लेखांचा दुसरा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. तीस वर्षांच्या कालावधीत पिंग्यांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर भारताच्या कानाकोपऱ्यात मनःपूर्वक भ्रमंती केली. आपला प्रवास म्हणजे एक 'आनंदव्रत' आहे असे ते मानतात. हे आनंदव्रत निष्ठेने जोपासणाऱ्या पिंग्यांनी जे पाहिले त्याचा ग्रांथिक व माहितीपूर्ण आलेख त्यांनी उभा केला नाही तर ज्या समरसतेने त्यांनी प्रवास केला त्याच समरसतेने त्यांनी लिहिले–स्वतःच्या शैलीत उभे केले. "सृष्टीत पावलोपावली जीवनाचा जयजयकार चालू आहे नि जगण्याचा ध्यास घेतलेल्या माणसाच्या खांद्यावर आनंदाचे निशाण आहे" या शब्दांत आपल्या भटकंतीच्या अनुभवाचा अर्क आहे, असे पिंगे सुरुवातीच्या लेखात नमूद करतात. आपल्या प्रवासवर्णनपर लेखनाची भूमिका त्यांनी प्रस्तावनेत मांडली आहे. "ही नुसती स्थलवर्णने अजिबात नाहीत. एकाकी माणूस, समाजाचे व्यवहार, अथांग निसर्ग आणि अलिप्त थंड नियती यांचं उलटसुलट विणकाम मी जागोजागी निरखलं आणि त्याची नोंद केली. अर्थात, लालित्याच्या

अंगाने."

'आनंदव्रत' मधील जास्त म्हणजे चौदा लेख १९७५ ते ८० या कालखंडात लिहिलेले आहेत. याला अपवाद फक्त १९७५ साली लिहिलेल्या 'अरविंदांच्या पाँडेचरीत' आणि १९६१ साली लिहिलेल्या 'गांधीजींच्या गावी' या दोन लेखांचा. रामकृष्णांचे दक्षिणेश्वर, हैद्राबाद, पाँडेचरी, कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मद्रास, अहमदाबाद, गोवा ही महाराष्ट्राबाहेरील स्थळे तर सेवाग्राम, गणपतीपुळे, मालवण, श्रीवर्धन, अक्कलकोट ही महाराष्ट्रातील छोटी-मोठी गावे पिंग्यांच्या निवेदनाचे विषय आहेत. ही सगळी वर्णने वाचल्यावर प्रवासवर्णनकार पिंग्यांच्या स्वतंत्र शैलीचे विशेष जाणवू लागतात. त्यांचा एखाद्या ठिकाणाचा प्रवास कधी कधी केवळ निमित्त ठरतो. त्या स्थळाची विशेष माहिती मिळेलच असे सांगता येत नाही. विशिष्ट स्थळाला भेट दिल्यावर त्या स्थळासंबंधी चिंतनाला अधिक वाव मिळतो. या प्रकारचा लेखनातला स्वरपणा याचे सौंदर्य अधिक वाढवतो. दक्षिणेश्वर, कन्याकुमारी, मालवण, अक्कलकोट, श्रीवर्धन या स्थळांच्या निवेदनाच्या बाबतीत तसे घडले आहे. पिंग्यांच्या निवेदनात निसर्गाची सूक्ष्म, मार्मिक निरीक्षणे जशी येतात तशीच विभिन्न प्रदेशातील माणसे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध कंगोऱ्यांसह प्रकट होताना दिसतात. प्रेक्षणीय स्थळे आणि भिन्नधर्मी माणसे ह्या दोहोंबद्दल पिंग्यांना सारखेच आकर्षण नि कुतुहल आहे. पिंग्यांमधला गप्पिष्ट 'कॉमन मॅन' प्रवासात भेटलेल्या व्यक्तींच्या अंतरंगाचा वेध घेताना दिसतो. समोरच्या अपरिचित व्यक्तींना बोलके करण्याची किमया लेखकाला साधल्यामुळे त्याचे विविधरंगी चित्रण 'आनंदव्रत' मधील वर्णनाचा एक अविभाज्य भाग बनते. पाँडेचरीचा रिक्षावाला, निवृत्त मद्रासी चीफ इंजिनियर, मद्रासचा महाराष्ट्रीय कार्यकर्ता सूर्यकर, अहमदाबादमधील प्रा. वसंतराव जोशी, अहमदाबादचा लेखकाचा मित्र हरिश्चंद्र पाटील, हैद्राबादचा मुसलमान वाटाड्या, रामेश्वरचा मराठी पुस्तकविक्रेता, एकवीरा देवीच्या देवळातील गुरव, अक्कलकोटची खानावळवाली ब्राह्मणबाई, सिंधुदुर्ग किल्ल्यावरील शेतकरी, पाँडेचरीतील डॉ. चोळकर, अशा वेगवेगळ्या व्यक्ती आपल्या रूपविशेषांसह 'आनंदव्रत' मध्ये उभ्या राहिलेल्या दिसतात. भेटलेल्या माणसांशी झालेल्या संवादातून पिंग्यांना कधी कधी अनपेक्षित टोलाही मिळालेला दिसतो. गणपतीपुळ्याच्या अभिषेकी ब्राह्मणाला पिंगे भाबड्या जिज्ञासेने विचारतात– "गेल्या पाच वर्षांत इथं येऊन गेलेल्या एखाद्या थोर भारतीयाचं नाव सांगाल का?" तोही तेवढचा भाबडेपणानं म्हणतो–'हो, चिपळूणचे रेडीजशेट गुदस्ता येऊन गेले." असा हा अपेक्षाभंगाचा मिळालेला धक्का लेखकाला आणि वाचकालासुद्धा!

माणसात रमणाऱ्या पिंग्यांनी रेखाटलेली निसर्गचित्रेही आल्हादक आहेत.

समुद्र, समुद्राची गाज, समुद्राचे निळे, हिरवे रंग, आकाशातले निरनिराळे रंग, सूर्योदय, सूर्यास्त, गडद काळोख, चांदणे, पक्षी, त्यांचा किलबिलाट या सर्वांची रेखीव वर्णने म्हणजे 'आनंदव्रत' मधील वेधक अशी प्रादेशिकता आहे. रामेश्वरावरील लेखातील सुरुवातीचा एकच उतारा या संदर्भात पुरेसा बोलका आहे. "रेल्वे फाटचाच्या दोन्ही डेंगेंना दोन खारी, निश्चल सरोवर. त्यांच्या उथळ पाण्यावर परावर्तित झालेले सरत्या उन्हाचे तिरपे कोमल किरण, सरोवरात तरंगणारी सहस्रावधी सफेद बदकं. बदकांचे ठिपके दोन्ही सरोवरांना शोभा आणीत आहेत. जणू काही आपले ठिपकेदार आरस्पानी दुपानी पंख पसरून यक्षनगरीतलं एक मोठं फुलपाखरूच या धनुष्यकोडीच्या वाळवंटावर विश्रांती घेत बसलं होतं. त्या सरोवराच्या पुढे पुन्हा वाळूचे विस्तीर्ण गुबगुबीत थर पसरलेले. अगदी टोकाला त्या सागरी रेल्वेफाटचावरलं अखेरचं निर्मनुष्य स्टेशन समुद्रात चोच बुडवून बसलं होतं...पलीकडे पसरलेलं होतं सागराचं अथांग निरंकुश राज्य. पाणीही निळं आणि पाण्यात उतरलेलं तलम आभाळही निळं. जातीचा समुद्र असूनही त्याच्यावर प्रमत्त लाटांचं थमान नव्हतं. गालातल्या गालात हसावं, तसे हलके तरंग पृष्ठभागावर लहरत होते. वाटायचं, कृष्णकमळांच्या पाकळयांचा सडाच थेट क्षितिजापर्यंत अंथरलेला आहे."

कथा-कादंबरी या दोन ललित वाङ्मयप्रकारांच्या लेखनशैलीत आणि प्रवासवर्णनपर लेखनाच्या शैलीत बराच फरक आहे. एकाच स्थळाच्या वर्णनात लेखकपरत्वे फरक पडतो तो यामुळेच. काकासाहेब कालेलकर, रा. भि. जोशी, गंगाधर गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, पु. ल. देशपांडे या सर्वांच्या प्रवासवर्णनात शैलीदृष्टया फरक पडलेला आहे. रवींद्र पिंग्यांची स्वत:चे सामर्थ्य आणि मर्यादा असलेली वेधक शैली आहे. विशेषणयुक्त जोडशब्द वापरण्याची त्यांची एक लकब आहे. आनंदाचे निशाण, भगभगीत कोरडा माळ, ओघळते रस्ते, पडवळचे तामीळ तरुण, कापीव हमरस्ते, चांदण्याची मऊगार पिसे, कळीकोमल नजर, आभाळाचा ताणलेला लखलखीत पत्रा, भिजलेला प्रकाश, काळोखाचा प्रचंड पक्षी अशा काही सुंदर प्रतिमा या लेखनात येतात. काही वेळा मात्र चित्तचुंबक आश्रम, भानहरपू पुस्तक, क्लेशाम्ल नजर, घमघमीत दृश्य अशी कर्णकटू आणि खटकणारी शब्दजोड केली गेली आहे. अहमदाबादवरील लेखात विरोधलयीचा मार्मिक उपयोग लेखकाने केला आहे–" बाहेरून धुरकटलेलं भाताचं तपेलं आतून लख्ख ताजी कलई लावल्यामुळं लखपख दिसावं, तसं आख्खं अहमदाबाद स्टेशन आतून दुधाळ प्रकाशलोटांनी भगभगलं होतं. बाहेर मात्र मिट्ट काळोख होता. सर्वत्र चिडीचूप होतं. वातावरण मलूल होतं." समर्पक उपमांचा, प्रतिमांचा वापर हाही पिंगे यांच्या लेखनशैलीचा विशेष आहे. उदा.–" सूर्य मावळला होता. फुलं कोमेजावीत तसे किरण निमाले.

तिन्हीसांजा झाल्या." "पटावर फासे पडावेत तसे छोटच्या छोटच्या कॉलनीजचे पुंजके सर्व शहरभर पसरलेले आहेत." "मीही, बायका तुळशीवृंदावनासमोर जातात, त्या विनम्रतेनं त्याच्याजवळ गेलो." "बाळंतिणीनं मूल सांभाळावं, तसा फणस सांभाळीत पोर्टर खोलीत येतो." "टाकीतल्या पाण्यासारखं स्टेशन निष्कंप असतं.", "मोराचं अवघं वैभव त्याच्या पिसाऱ्यात, तसं सेवाग्रामच्या या आश्रमाचे सर्व प्राण बा–बापूजींच्या झोपडचात आहेत." "स्तब्ध रानातल्या तळचात कमळ उमलावं तसं जलवेष्टित पणजी गाव कोणे एके काळी कोवळिक पांघरून प्रकाशाला सामोरं जायचं."

प्रवासाचे 'आनंदव्रत' निष्ठेने जोपासणाऱ्या रवींद्र पिंग्यांनी आपल्या शोधक नजरेने विविध अनुभव टिपले. लालित्याच्या अंगाने त्याची नोंद घेतली. पिंग्यांच्या या प्रवासवर्णनपर लेखनाचा आस्वाद घेताना रसिकांनाही आनंद होईल.

आनंदव्रत–रवींद्र पिंगे'
प्रेस्टिज पब्लिकेशन्स, पुणे ४११०३०.
(मुंबई सकाळ)

साच्यात न बसणारे ललित लेख : 'शालजोडी'

मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष गेली चाळीस वर्षे ललितलेखन करीत आहेत. धीम्या गतीने लेखन करणाऱ्या राजाध्यक्षांनी १९४७–८० या तेहतीस वर्षांच्या कालावधीत लिहिलेल्या एकवीस लेखांचा संग्रह 'शालजोडी.' हा त्यांचा तिसरा लेखसंग्रह आहे. 'खर्डेघाशी', 'आकाशभाषिते' हे त्यांचे यापूर्वी प्रसिद्ध झालेले लेखसंग्रह आहेत.

'शालजोडी'तील राजाध्यक्षांचे लेखन केवळ ललित लेख या सदरात बसणारे लेख नाहीत. या लेखसंग्रहात अनेक विषय आहेत. त्यात काही तात्कालिक, काही स्थलवर्णनपर, काही व्यक्तिचित्रणपर तर काही साहित्यविषयक आहेत. यामुळेच आशयदृष्टचा व अभिव्यक्तीदृष्टचा लेखनात भेद पडला आहे. ललित लेख असे या लेखांचे सोयीचे वर्गीकरण करता येत नाही.

वाङ्मयीन प्रश्न किंवा एकूणच वाङ्मयव्यवहार याविषयी राजाध्यक्षांना कुतुहल आहे. त्यांच्या आधीच्या 'खर्डेघाशी' या लेखसंग्रहातील 'माझी मैत्रीण म्हणाली',

'साहित्याची धूळाक्षरे', 'पुस्तकांची दुःखे', 'प्रस्तावना कशी लिहावी' इ. लेख वाङ्मयव्यवहाराशी निगडित आहेत. 'शालजोडी' मध्ये 'येथे टीका केली जाते', 'टोपणनावाविषयी' 'लेखक आणि त्यांची नावे,' 'माझे आगामी आत्मचरित्र', 'न लिहिलेले आत्मचरित्र' इ. लेख वाङ्मयीन संकल्पनांशी निगडित आहेत. अन्य विनोदी लेखनापेक्षा वाङ्मयविषयक विडंबनपर लेखन करणे अधिक कठीण असते. 'खर्डेघाशी'मधील राजाध्यक्षांनी लिहिलेल्या वाङ्मयविषयक विनोदी लेखनात विडंबनाची प्रवृत्ती जास्त प्रमाणात आढळते. 'शालजोडी' मध्येही राजाध्यक्षांचा तसा प्रयत्न आहे. मात्र काही वेळा हे वाङ्मयीन विषयांवरील लेख बोजड, ग्रांथिक आणि वाचकांकडून विशिष्ट बौद्धिक स्तराची अपेक्षा करणारे ठरतात. अशा प्रकारच्या लेखनाचा आस्वाद घ्यायला वाचकही तितकाच बहुश्रुत, रसिक, तत्पर आणि वाङ्मयीन जाण असणारा हवा. या लेखनातील सूक्ष्म उपरोध व उपहास त्याला जाणवला नाही, तर हे लेख नीरस वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

'एका लेखकाच्या घराची गोष्ट' आणि 'एक फारच यशस्वी प्राध्यापक', हे कथेचा घाट असणारे दोन लेख म्हणजे राजाध्यक्षांच्या उपरोधिक आणि मिष्किल-शैलीचे दर्शन घडविणाऱ्या कथा आहेत. घर बांधू पाहणाऱ्या मित्राच्या स्वभावातील विसंगती आणि यशस्वी प्राध्यापकाच्या जीवनातील आणि स्वभावातील विसंगती यामुळे दोन्ही कथा आस्वाद्य झाल्या आहेत. यशस्वी प्राध्यापकाच्या जीवनाची कहाणी राजाध्यक्षांनी आपल्या संयमित शैलीत पण चिमटे घेत घेत फुलवली आहे. वरवर विनोदी वाटणारी ही कथा केवळ वैयक्तिक दृष्टचा एक प्राध्यापकावरच नव्हे, तर संपूर्ण शिक्षणपद्धतीवर, तिच्यातील सोंगाढोंगावर अप्रत्यक्षरीत्या आघात करीत राहते.

'शालजोडी' संग्रहातील चटकन लक्ष वेधून घेणारे म्हणजे प्रासंगिक स्थल-वर्णनपर आणि व्यक्तिवर्णनपर लेख. 'शेवटची ट्रॅम', 'मुंबई ग नगरी', 'जुने चित्र', 'आंबोली' हे स्थलवर्णनपर लेख लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा प्रत्यय देतात. आज चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीची शांत, सुंदर मुंबई अस्तित्वात नाही, खडखडत जाणारी ट्रॅमही अस्तित्वात नाही. मुंबईतील ट्रॅम बंद होणे ही मुंबापुरीच्या इतिहासातील एक अविस्मरणीय घटना. मध्य मुंबईतून खडखडाट करीत जाणारी ट्रॅम हा त्या जीवनाचा एक अविभाज्य भाग होता. ती ट्रॅम बंद होते त्या वेळच्या हुरहूर लावणाऱ्या भावनात्मक प्रतिक्रिया 'शेवटची ट्रॅम' या लेखात शब्दबद्ध झाल्या आहेत. "आमची ही इतकी व्यवहारी, पण एकोणतीस तारखेला प्रार्थना समाज-जवळ कायसेसे आण्याभराने स्वस्त पडते, म्हणून तेवढचासाठी ट्रॅमने गेली" असे खोचक आणि मानवी स्वभावातील विसंगती दर्शविणारे वाक्य लिहिणाऱ्या लेखकाने

आपल्या जीवनातील ट्रॅम आता कायमची गेली याची हळहळ शेवटी व्यक्त केली आहे. 'जुने चित्र' या लेखातही हुरहूर लावणारे जुन्या मुंबईचे वर्णन आहे. आज यातले काहीच अस्तित्वात नाही, पण जुना काळ पाहिलेल्या वाचकाला पुनः-प्रत्ययाचा आनंद देणारे आणि नव्या वाचकाला जुने चित्र पाहिल्याचा नवा प्रत्यय देणारे हे लेख म्हणजे राजाध्यक्षांची 'खासियत' आहे. राजाध्यक्ष फक्त एखादे स्थळ बारकाव्यानिशी उभे करीत नाहीत, तत्कालीन सामाजिक संदर्भ ते विस्ताराने पुरवितात. पूर्वी मुंबईतील वेगवेगळे विभाग विशिष्ट जातीच्या लोकवस्तीनुसार विभागलल होते. तत्कालीन मुंबईतील खिरश्चन, ज्यू, पारशी, गुजराती, दक्षिणी, मुसलमान या सर्व जातिधर्मांच्या लोकांचे स्वभावविशेष बारीकसारीक तपशिला-सह आले आहेत. उदा. ज्यू माणसांचे वर्णन 'पारशी नाकावरून, किरिस्तांव एकंदर बोलण्याचालण्यावरून ओळखू येतो, पण यहुदी म्हणजे 'ज्यू' तसा वेगळा दिसत नाही. तो भायखळा नागपाडयाकडे राहतो व पुरा मराठी बनला आहे. कुलाबा जिल्ह्यातील एखाद्या गावाच्या नावापुढे 'कर' जोडून त्याचे आडनाव होते. एके काळी मुंबईत मराठी प्राथमिक शिक्षणाचा भार या समाजातील स्त्रियांनी वाहिला. 'ब्राह्मण, पण भट नव्हे' हा लेख सार-स्वत समाजाच्या स्थितिगतीचे चित्र उभे करणारा लेख आहे. राजाध्यक्ष सारस्वत असूनही या लेखात ते सारस्वतांची मलावण करीत नाहीत. अतिरिक्त हळवेपणाने लिहीत नाहीत, उगाच वर्णनाला कारुण्याची डूब देत नाहीत. सार-स्वतांविषयी ते मार्मिकपणे म्हणतात, "ज्याच्या घरात नारळाची शेंडी नाही तो खरा सारस्वत ब्राह्मण नाही. त्याची बरीचशी पक्वान्नेही नारळात सामावलेली. त्याला इतर मोठी व्यसने नाहीत. फार तर विडी-तपकिरीचा नेमस्त रंगेलपणा. पण खऱ्या कोकण्याला जेवणावर मुखशुद्धी म्हणून 'कातळी' हवी. गरिबांच्या पैशाचेही असे खोबरे होते." (इथे 'कातळी' याचा अर्थ खोबऱ्याचा कीस. हे लक्षात आले की खोबरे होणे या वाक्प्रचारातील अर्थ उमगतो.)

राजाध्यक्षांचे विनोदी लेखन गंभीरपणे केलेले विनोदी लेखन आहे. त्यातही व्यक्तिरेखाटनपर लेखन त्यांनी समरसून पण कलावंताला आवश्यक असणारी अलिप्तता कायम ठेवून केलेले आहे. व्यक्तिरेखाटनपर लेखन कधीकधी हळवे, प्रशंसापर, अवास्तव, सांकेतिक, साचेबंद, प्रासंगिक आणि जुजबी ठरण्याची शक्यता असते. वर्ण्य व्यक्तीला दैवत बनविण्यापेक्षा खऱ्या अर्थी व्यक्तिशोध घेणे यात लेखकाची कसोटी लागत असते. राजाध्यक्षांच्या परिवारात अनेक भिन्नधर्मी व्यक्ती आल्या. त्यांच्यात 'अभिरुची'त टोपण नावाने लिहिणारे अलूरकर आहेत, चिर-तरुण कवी अनिल आहेत, अभिरुचीचे संपादक बाबूराव चित्रे आहेत, आणि रवि-किरण मंडळातील कवी श्रीधर बाळकृष्ण तथा नाना रानडेही आहेत. या सर्व

व्यक्ती परस्परांहून भिन्न आहेत. राजाध्यक्षांनी या सर्वांच्या स्वभावाचे कंगोरे बारकाव्याने न्याहाळून त्यांना शब्दरूप दिले आहे. नाना रानडे म्हणजे बालसुलभ वृत्तीचा परमोत्कर्ष. "नानांना सर्वांशी नीट जमवून घेता आले, घेता आले नाही फक्त आपल्या वयाशी." या एकाच वाक्यात नानांचे समग्र व्यक्तिमत्त्व उभे राहते. मात्र एकाकी असलेले अलूरकर आणि रसिक, प्रसन्न व आतिथ्यशील बाबूराव चित्रे यांच्या व्यक्तिरेखाटनाला कारुण्य प्राप्त झाले आहे. बाबूराव चित्र्यांविषयीच्या पुढील दोन प्रतिक्रिया चित्रे आणि राजाध्यक्ष यांच्याविषयी बरेच काही सांगून जातात–

बडोद्याचे वैभव खालसा झाले–चित्र्यांचे म्हणतो. पण मनाचे दारिद्र्य आले नाही. ती संपन्न उदार मने जपत ही माणसे मुंबईच्या मोडक्या अशांत आसऱ्याला आली. थोडी बडोद्याची सावली घेऊन आली. जेथे काहीच उरले नाही, सगळी पडझड, त्याची आठवणदेखील नकोशी वाटते. पण चित्रे मंडळींची मुळे बडोद्यात खोल रुजली, पसरली आहेत, त्यात इतरांची गुंतली आहेत. त्या बंधांनी मुंबईच्या उपरेपणातही त्यांना आधार मिळाला."

चित्र्यांचा स्नेह आठवून आपले बेचैन मन राजाध्यक्ष व्यक्त करतात." 'चित्रे' आणि 'अभिरुची' यांच्या आठवणी येऊ लागल्या की मन असेच बेचैन होते. वाटते, हे करायला हवे होते आणि ते करायला नको होते. कधी डाचते की आपण बाबूरावांच्या उण्यांची फारच चेष्टा केली, त्यांच्यासाठी भरपूर खपलो नाही,केवळ दुरून तोंडाची आणि लेखणीची पाटीलकी केली. 'अभिरुची' पुन्हा सुरू होईल का ?"

पु. ल. देशपांडे, अलूरकर आणि मं. वि. राजाध्यक्ष यांनी अभिरुचीसाठी टोपणनावाने लेखन केले. अलूरकर खूप वाचनवेडे, प्रकृतीने नरम, मैत्रीला जपणारे पण वृत्तीने एकाकी होते. त्यांच्याविषयी राजाध्यक्षांची प्रतिक्रिया–" आपुलकी म्हणजे घरगुतीपणा असे सोपे समीकरण कुणी मांडू नये. अलूरकरांनी अनेकांना आपुलकी दिली, पण घरातले म्हणण्याइतपत ते किती जणांच्या जवळ गेले, कोण जाणे ! तसे ते एकटे एकटेच राहिले असे मला वाटते."

राजाध्यक्षांच्या इतर लेखांत आढळून येणारा उपरोधिक, मिष्किल आणि खटयाळ सूर व्यक्तिचित्रणपर लेखनात दूर राहिलेला आहे. एका वेगळ्या अर्थी गंभीरपणाने केलेले हे लेखन तात्कालिकतेच्या मर्यादा ओलांडून पुढे गेले आहे. त्याला वाङ्मयीन मूल्य प्राप्त झाले आहे.

'शालजोडी' मधील लेख 'ललित लेख' रूढ वाङ्मयीन साच्यात बसणारे लेख नाहीत. ते विनोदी असले तरी वाचकाला खदखदा हसविणारे नाहीत. बोचरेपणा तर त्यांत मुळीच नाही; उलट अभिजात रसिकता, संयम, संवेदनशीलता हे

विशेष मंगेश विठ्ठल राजाध्यक्षांच्या या लेखसंग्रहात दिसून येतात.

शालजोडी– मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष
मौज प्रकाशन गृह
मुंबई– ४०००० ४

मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष गेली चाळीस-पंचेचाळीस वर्षे ललित लेखन करीत आहेत. धीम्या गतीनं लेखन करणाऱ्या राजाध्यक्षांनी १९४७ ते ८० या तेहतीस वर्षांच्या कालावधीत लिहिलेल्या एकवीस लेखांचा संग्रह 'मौज' प्रकाशनानं नुकताच प्रसिद्ध केला आहे. या लेखसंग्रहाची पृष्ठसंख्या १८० आणि मूल्य ४५।– रुपये आहे.

'शालजोडी'तील राजाध्यक्षांचं लेखन केवळ 'ललित लेख' या ढोबळ वर्गीकरणात बसणारं लेखन नाही. या लेखनात अनेक विषय आले आहेत. त्यांतील काही तत्कालीन घटनेबद्दल आहेत, तर काही लेख लेखकाच्या अन्य कुतूहलातून निर्माण होणारे आहेत. वाङ्मयीन प्रश्नांविषयी, खरं म्हणजे, एकूण वाङ्मय-व्यवहाराविषयी राजाध्यक्षांना आस्था आहे 'येथे टीका केली जाते', 'टोपण नावांविषयी', 'लेखक आणि त्यांची नावे' 'माझे आगामी आत्मचरित्र', 'न लिहिलेले आत्मचरित्र', 'फर्स्टनेम ड्रॉपर' इत्यादी लेख वाङ्मयीन वातावरणाशी निगडित आहेत. या प्रकारच्या लेखनाचा आस्वाद घ्यायला वाचकही तितकाच बहुश्रुत, रसिक, तत्पर आणि वाङ्मयीन व्यवहाराची जाण असणारा हवा. मं. विच्या वाङ्मयविषयक लेखनातील सूक्ष्म उपरोध आणि उपहास त्याला जाणवला नाही तर हे लेख त्याला नीरस आणि रूक्ष वाटतील. 'शालजोडी' या संग्रहातील इतर नर्मविनोदी आणि खुसखुशीत लेखनापेक्षा हे वाङ्मयीन क्षेत्रावरील लेख क्वचित बोजड आणि ग्रांथिक होतात.

कथनाचा घाट असणारे दोन लेख 'शालजोडी' या लेखसंग्रहात आहेत. 'एका लेखकाच्या घराची गोष्ट' आणि 'एक फारच यशस्वी प्राध्यापक' हे दोन लेख म्हणजे कथाच आहेत. राजाध्यक्षांची मिष्किल आणि उपरोधिक शैली या कथात दिसून येते. घर बांधू पाहणारा मित्र आणि लौकिक दृष्टचा यशस्वी ठरलेला प्राध्यापक या दोघांच्या स्वभावांत विसंगती आहे. या कथांतून मनुष्यस्वभावातील विसंगती जाणवल्यामुळे त्या कथा खरोखरच मनाला भिडतात.

या संग्रहातील मन अधिक वेधून घेणारे लेख म्हणजे स्थलवर्णनपर आणि

व्यक्तिचित्रणपर लेख आहेत. त्यामध्ये 'मुंबई ग नगरी', 'जुने चित्र', 'आंबोली' हे स्थलवर्णनपर प्रमुख लेख आहेत. आज चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीची मुंबई शिल्लक राहिलेली नाही; रस्त्यानं खडखडत जाणारी ट्रॅमही अस्तित्वात नाही. ही ट्रॅम ज्या दिवशी बंद होते त्या दिवशीची मनोवस्था मं. वि. नी आपल्या शब्दांतून उभी केली आहे. खरोखर ही मनःस्थिती एकटचा लेखकाची नाही; त्या वेळच्या सर्व मुंबईकरांची आहे. बालपणापासूनचं सर्व आयुष्य मुंबईत घालविलेले राजाध्यक्ष मनानं जुन्या मुंबईत वावरतात आणि मुंबईच्या जुन्या वातावरणाचे कितीतरी बारीकसारीक तपशील नेमकेपणानं देतात. जुना काळ पाहिलेल्या वाचकाला पुनः-प्रत्ययाचा आनंद देणारे आणि नव्या वाचकाला जुने चित्र पाहिल्याचा आनंद देणारे हे लेख म्हणजे राजाध्यक्षांची 'खासियत' आहे. राजाध्यक्ष केवळ एखादं स्थळ बारकाव्यानिशी उभं करीत नाहीत. तत्कालीन सामाजिक संदर्भ ते खूप विस्तारानं पुरवितात. मुंबईतील ख्रिश्चन, ज्यू, पारशी, गुजराती, दक्षिणी, मुसलमान या जातिधर्माच्या लोकांची वैशिष्टचं त्यांनी सांगितली आहेत. ज्यू माणसाविषयी राजाध्यक्षांनी मार्मिक शब्दांत सांगितलं आहे. "पारशी नाकावरून, किरिस्तांव एकंदर बोलण्या-चालण्यावरून ओळखू येतो; पण यहुदी म्हणजे 'ज्यू' तसा वेगळा दिसत नाही. तो भायखळा-नागपाडचाकडे राहतो व पुरा मराठी बनला आहे. कुलाबा जिल्ह्यातील एखाद्या गावाच्या नावापुढे 'कर' जोडून त्याचं आडनाव होतं. एके काळी मुंबईतील मराठी प्राथमिक शिक्षणाचा भार या समाजातील स्त्रियांनी वाहिला."

'ब्राह्मण– पण भट नव्हे' हा लेख सारस्वत समाजाच्या स्थितिगतीचं चित्र उभं करणारा लेख आहे. राजाध्यक्ष स्वतः सारस्वत असूनही या लेखात सारस्वतांची भलावण करीत नाहीत; सारस्वतांविषयी अतिरिक्त हळवेपणानं लिहीत नाहीत. या लेखातील सारस्वत माणसाचं चित्र किती नेमकं आहे! "ज्याच्या घरात नारळाची शेंडी नाही तो खरा सारस्वत ब्राह्मण नाही! त्याची बरीचशी पक्वानंही नारळात सामावलेली. त्याला इतर मोठी व्यसनं नाहीत; फार तर विडीतपकिरीचा नेमस्त रंगेलपणा. पण खऱ्या कोकण्याला जेवणावर मुखशुद्धी म्हणून 'कातळी' हवी. गरिबाच्या पैशाचंही असं खोबरं होतं."

'शालजोडी' या लेखसंग्रहातील मला व्यक्तिशः आवडलेले लेख म्हणजे व्यक्तिरेखाटनपर लेख आहेत. व्यक्तिरेखाटनपर लेखन कधी कधी हळवं, प्रशंसापर, अवास्तव आणि सांकेतिक होतं. राजाध्यक्षांच्या व्यक्तिरेखाटनपर लेखनाचं तसं होत नाही. 'अभिरुची' मासिकात टोपण नावानं लिहिणारे अलूरकर, कवी अनिल, 'अभिरुची'चे संपादक बाबूराव चित्रे, रविकिरण मंडळातील कवी श्रीधर बाळकृष्ण म्हणजेच नाना रानडे यांची व्यक्तिचित्रं लेखकानं रेखाटलीं आहेत. ह्या

व्यक्तिचित्रांतून व्यक्ती तर उभ्या राहतातच; पण लेखक आणि त्याचे हे मित्र यांच्या भावसंबंधातील नाजुकपणाही व्यक्त होतो. आजही 'अभिरुची' मासिकाची आठवण झाली की राजाध्यक्ष बेचैन होतात. आपण बाबूरावांच्या उण्याची फार चेष्टा केली हे त्यांना डाचत राहतं. बाबूरावांच्या संपादनाच्या काळात आपण केवळ तोंडाची आणि लेखणीची पाटीलकी केली याचंही राजाध्यक्षांना वाईट वाटतं. या निवेदनातून बाबूराव चित्रे आणि मं. वि. यांची भावनिक जवळीक जाणवते. अलूरकरांसारखा मित्र आयुष्यभर एकाकीच होता याची खंत लेखकाला वाटते. आणि हृद्य प्रतिक्रिया व्यक्त होते. "आपुलकी म्हणजे घरगुतीपणा असं सोपं समीकरण कुणी मांडू नये. अलूरकरांनी अनेकांना आपुलकी दिली; पण घरातले म्हणण्याइतके ते कितीजणांच्या जवळ गेले कोण जाणे! तसे ते एकटे एकटेच राहिले असं मला वाटतं! लेखकाच्या आपल्या मित्रांविषयीच्या प्रतिक्रिया मनाला स्पर्श करणाऱ्या आहेत. श्री. वा. रानडयांच्या व्यक्तिचित्रणात खेळकरपणा आहे. "नाना रानड्यांना सर्वांशी नीट जमवून घेता आलं; नाही फक्त आपल्या वयाशी." असं एखादं मार्मिक वाक्य लिहिणाऱ्या राजाध्यक्षांच्या इतर व्यक्तिरेखाटनपर लेखात उपरोधिक, मिष्किल आणि खटयाळ सूर दूर राहिला आहे. यामुळंच राजाध्यक्षांच्या व्यक्तिरेखाटनपर लेखनाला वाङ्मयीन मूल्य प्राप्त झालं आहे.

'शालजोडी' या मंगेश विठ्ठल राजाध्यक्षाच्या लेखसंग्रहानं मराठी साहित्यात एका दर्जेदार लेखसंग्रहाची भर पडली आहे.

शालजोडी– मं. वि. राजाध्यक्ष
मौज प्रकाशन गृह, मुंबई ४
(आकाशवाणी)

टीप : 'शालजोडी' या एकाच पुस्तकावरील दोन परीक्षणे येथे केली आहेत. पहिले वृत्तपत्रीय ग्रंथपरीक्षण आहे, तर दुसरे 'आकाश-भाषिक' आहे. तौलनिक अभ्यासासाठी या दोन परीक्षणांचा उपयोग होईल.


मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे

REFBK-0025171

लेखक आणि वाचक यांच्यात सुसंवाद साधणारा 'ग्रंथ-संवाद'

वृत्तपत्रीय ग्रंथ-परीक्षणांच्या संग्राह्यतेला वाङ्मयाभिरुची, वाङ्मयेतिहास आणि साहित्यसमीक्षा यांच्या संदर्भात महत्त्व असते.

ग्रंथनिर्मिती, वाचकवर्ग आणि ग्रंथरुची यांच्या वाढीबरोबर वृत्तपत्रीय ग्रंथपरीक्षणे हे आजच्या व्यापक वाङ्मय-व्यवहाराचे लक्षणीय अंग झाले आहे. विविध स्तरांतील संमिश्र वाचकवर्गाची गरज लक्षात घेता हे माध्यम अधिकच उपयुक्त ठरते.

या माध्यमाचे डौलस भान ठेवून प्रा. वि. शं. चौंधुले यांनी वृत्तपत्रातून आणि आकाशवाणीवरून केलेली ग्रंथपरीक्षणे येथे संग्रहीत केली आहेत. येथे निवडलेल्या साहित्यकृती आणि त्या कृतींचे वाङ्मयप्रकार प्रा. चौंधुले यांची चोखंदळ आस्वाददृष्टी आणि सुजाण रसिकता यांचा प्रत्यय आणून देतात.

'वृत्तपत्रीय ग्रंथपरीक्षण' या वाङ्मयप्रकाराची तत्त्वचर्चा लेखकाने आपल्या प्रस्तावनेत समर्थपणे केली आहे. प्रस्तावना आणि परीक्षणे ही दोन्ही या काहीशा उपेक्षित माध्यमाची प्रतिष्ठा सांभाळणारी आहेत.

'ग्रंथु निका जाला असे!'

– प्रा. रमेश तेंडुलकर